म. ग्रं. सं. ठाणे
विषय — चरित्र
सं. क्र. ९३३५

# क्रांति-उपासक रणदिवे बंधू

केदारनाथ

REFBK-0015258

साधना प्रकाशन, पुणे २

मराठा ग्रंथ संग्रहालय ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम 20505 दि: ..................
क्रमांक 1335 नों. दि. 20/5/55

# क्रांति-उपासक

# रणदिवे बंधू

( संक्षीप्त जीवन वृत्तांत )

केदारनाथ

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 15258
ग्रंथ शाखा स्थल

REFBK-0015258

एकमेव विक्रेते
साधना प्रकाशन, पुणे

प्रथमावृत्ती
सुभाष जयंती १९६६
प्रकाशक
कांतीलाल परीख
३८७ रविवार पेठ, पुणे २
मुद्रक
वि. नी. पटवर्धन
साधना प्रेस
४३०-३१ शनिवार, पुणे
© केदारनाथ
किंमत
रु. २·००

अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १) | विद्यार्थिदशा व व्यायाम प्रवृत्ती | १ |
| २) | रामदासी संशोधन व कार्य | २० |
| ३) | व्यायाम प्रगती व क्रांतीच्या खटपटी | ३२ |
| ४) | युगपालट व स्वराज्यप्राप्ती | ५५ |
| ५) | विशिष्ट प्रसंग, गुण व स्वभाव दर्शन | ७४ |
| ६) | तिसरे बंधू | ९४ |
| ७) | विशिष्ट व्यक्ती परिचय | १०२ |
| ८) | उत्तरावस्था व अखेर | ११२ |
| ९) | श्रद्धांजली व स्मरणांजली | १२२ |
| १०) | निष्पाप सेवामय जीवन | १२५ |
| ११) | उपसंहार | १३६ |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना.
अनुक्रम ........ दि: ........
नोंद ........ ग्रं० दि० ........

# प्रस्तावना

ती. विष्णु सीताराम व ती. महादेव सीताराम रणदिवे हे दोघे सख्खे भाऊ. त्यांत विष्णु सीताराम मोठे व महादेव सीताराम हे धाकटे. ह्यांना लोक अनुक्रमे आप्पासाहेब व भाईसाहेब या नावांनी ओळखत असत व दोघांची सर्वत्र प्रसिद्धि रणदिवे बंधू या नांवाने होती. विद्यार्थिदशेपासूनच त्यांची व्यायामाची प्रवृत्ती चालू होती व तेव्हापासून त्यांच्या मनात देश-स्वातंत्र्याचे व क्रांतीचे विचारही चालू होते. व्यायामाच्या मागे त्यांची केवळ हौसेची वृत्ती नसून त्यायोगे तरुणांत बळ, उत्साह, स्फूर्ती, निर्भयता वगैरे सद्‌गुण आणून त्यांना सशस्त्र क्रांतीकरितां तयार करावे हा त्यांचा मुख्य हेतू होता. त्याकरिता ते जीवनभर झटत राहिले, सोशीत राहिले व झिजत राहिले. त्यांच्या जीवनाचा हेतू उदात्त होता व तत्सिद्ध्यर्थ ते सतत प्रयत्न-शील राहिले. वंगभंगाच्या कारणाने निर्माण झालेल्या चळवळीत त्यांनी मनःपूर्वक भाग घेतला होता. त्यातूनच पुढे दहशतवादापर्यंत मजल गेली. पुढे १९२० नंतरच्या पालटलेल्या युगातही स्वराज्य–प्राप्तीपर्यंतच्या प्रत्येक राष्ट्रव्यापी आंदोलनात व विधायक कार्यात ते पूर्णपणे पडले होते. त्यातही त्यांना शारीरिक व आर्थिक बाजूने खूपच सहन करावे लागले.

राष्ट्रसेवेच्या कार्यात रणदिवे बंधूंनी अशा रीतीने सदैव सहन करीत आपले जीवन संपवले. अशा व्यक्तींची माहिती चालू व पुढील पिढीला

थोडी तरी असणे आवश्यक आहे असे त्यांच्या निधनानंतर मला वाटू लागले. जसजसे दिवस जाऊ लागले तसतशी ही जाणीव मला अधिक तीव्रपणे होऊ लागली. आपल्या समाजात सद्गुणांची व कर्तृत्वाची वृद्धी झाल्याशिवाय आपला समाज–आपले राष्ट्र उन्नत होणार नाही असे ज्यांना वाटत असेल त्यांनी रणदिवे बंधूंसारख्या निःस्वार्थी व राष्ट्रहितार्थ जीवन घालवलेल्या व्यक्तींची माहिती समाजाला, विशेषतः तरुण पिढीला, करून दिली पाहिजे. त्यांना मानणाऱ्यांचे, त्यातूनही त्यांच्या मित्राचे, ते कर्तव्य आहे असे मला वाटत असल्यावरून त्यांच्या मित्रांना त्याबाबतीत मी विनंती केली, रणदिवे बंधूंचे मित्र कन्हैयाभाई मालपूरवाला यांना मी माझी इच्छा दर्शवताच त्यांनी 'स्वतंत्र भारत' ( धुळे ) या वृत्तपत्रांत रणदिवे बंधूं-विषयी जनहिताच्या दृष्टीने उपयुक्त अशी माहिती व आठवणी पाठवण्या-विषयी जनतेला जाहीरपणे विनंती केली. अनेकांना व्यक्तिशः छापील कार्डेही पाठवली. परंतु विशेष उपयुक्त माहिती प्राप्त झाली नाही. याची कारणे म्हणजे एक तर रणदिवे बंधूंना प्रत्यक्ष जाणणाऱ्यांपैकी त्यांचे समवयस्क मित्र आता क्वचितच राहिले आहेत व जे आहेत ते वार्धक्याने जर्जर झालेले. त्यामुळे उदासीन. शिवाय त्यांचे अंतर्बाह्य जीवन जाणणारे त्यातूनही दुर्मिळ. आज ज्यांचे वय ६० ६५ वर्षांचे असेल त्यांनाही रणदिवे बंधूंच्या समग्र जीवनाची माहिती नसणार. नवीन पिढीतील मंडळी तर त्यांच्याविषयी अगदीच अनभिज्ञ ! अशा स्थितीत बाळूभाई मेहता व सेनापती बापट या दोघांविषयी मला फार आशा वाटत होती. कारण दोघांचाही रणदिवे बंधूंशी चांगलाच परिचय होता. शिवाय त्यांच्यात लेखनशक्ती चांगली. त्यांनी जीवनवृत्तांत लिहावा व त्यात मी काही आठवणी द्याव्या असे मी ठरवले होते. पण बाळूभाईंनी कळवले की 'स्वतंत्र भारत' यांत मी आप्पासाहेबांवर लेख दिला होता, त्यापेक्षा अधिक माहिती मला नाही. तुम्हीच जीवन-वृत्तांत लिहावा." बापट यांनी प्रत्यक्ष भेटीत सांगितले, " माझी स्मृती

फारच कमी झाली आहे. तुम्हीच वृत्तांत लिहा. पाहिजे तर मी खाली सही करीन." शंकरराव जोग व भाईसाहेबांचे कॉलेजमधील सहाध्यायी नारायणराव गोगटे यांच्याकडून काही आठवणी आल्या. दत्तात्रय ग निरखे यांना मी विनंति करताच त्यांनी श्रद्धांजली लिहून पाठवली. अशा स्थितीत माझ्या स्वतःच्या भावतृप्तीकरिता व रणदिवे बंधूंच्या जीवनवृत्तांतावरून नवीन पिढीला काहीं प्रेरणा मिळाली तर सद्गुण व सत्कार्यांच्या रूपाने ती प्रकट होईल व आज अनेक बाजूंनी अवनत झालेल्या आपल्या राष्ट्राला उन्नत करण्यास त्या सर्वांचा उपयोग होऊ शकेल या आशेने शेवटी हे कार्य मलाच पत्करावे लागले. माझ्यात लेखनशक्ती नाही. भाषाज्ञानही कमी, म्हणून साहित्य असे नाव देता येईल असे लिहायचे मला साधत नाही. असे असताही रणदिवे बंधूंविषयी माझ्या मनात आदर व कृतज्ञभाव असल्यामुळे त्यांच्याविषयीचे ज्ञान जनतेला करून देणे मला कर्तव्यप्राप्त वाटले. रणदिवे बंधू व त्यांच्यासारखे देशहिताकरिता तळमळणारे, स्वातंत्र्याकरिता वाटेल ते साहस करायला तयार असणारे तरुण-६०-६५ वर्षांपूर्वीही होते अशी जाणीव सर्वांना व्हावी व आपला देश उन्नत व्हावा अशी आपली सर्वांची इच्छा असेल तर रणदिवे बंधूंसारख्यांची परंपरा कालानुरूप स्वार्थत्यागपूर्वक आपण चालवली पाहिजे इतका तरी संस्कार, इतका तरी भाव आजच्या तरुणांच्या मनांत उत्पन्न व्हावा अशी दृढ इच्छा माझ्या मनात आहे. म्हणूनच रणदिवे बंधूंचा जीवनवृत्तांत लिहिण्याचा मी संकल्प केला.

तरुणांचे मन विशेषेकरून वर्तमानकाळातील कोणत्या तरी जोरदार प्रवाहाबरोबर ताणले जात असते, हे मला माहीत आहे. म्हणून त्यांच्या मनात राष्ट्रीयेतचा भाव जागृत होऊन त्याला भरपूर वेग मिळाला तर त्य दिशेने त्या क्षेत्रातही धन्यता वाटण्यासारखी कार्ये त्यांच्याकडून होऊं लागतील असा मला त्यांच्या बाबतीत भरंवसा आहे. राष्ट्राचे सारे भविष्य

तरुणांच्या हातात आहे. त्यांच्या हृदयात जर सद्भावना जागृत झाल्या, त्यांच्या बुद्धीत प्रखरता व प्रगल्भता आली व भविष्य जाणण्याइतकी विशाल व दीर्घदृष्टी त्यांना लाभली तर आपले व आपल्या राष्ट्राचे मांगल्य व सद्भाग्य कशात आहे ते त्यांना समजल्याशिवाय राहणार नाही. आणि ते ज्ञान व ती अवस्था त्यांच्या हृदयात ठसली तर त्या सर्वांचे प्रकटीकरणही त्यांच्या बलशाली हातांच्या व अंगप्रत्यगांच्या द्वारा झाल्याशिवाय राहणार नाही, अशी शुभ व भव्य आशा त्यांच्या बाबतीत माझ्या मनात भरलेली आहे.

रणदिवे बंधूंचा हा जीवनवृत्तांत लिहिण्यात त्यांच्या निरनिराळ्या वैशिष्ट्यांवर भर देऊन ती प्रकाशित करण्याचा मी प्रयत्न केला आहे. वैशिष्ट्याची माझी व्याख्या जवळजवळ पुढीलप्रमाणे आहे : जे उपयुक्त गुण, जे भाव, जे कर्तृत्व, ज्ञान व जो सुस्वभाव हजारो लोकांत सहसा दिसून येत नाही, पण सर्वांत त्या विशेषता असल्याशिवाय मानवसमाज उन्नत होणार नाही, मानव मनुष्य बनणार नाही, त्यांना मी वैशिष्ट्यें समजतो. अशा प्रकारची वैशिष्ट्ये चांगल्या लोकात, विद्वानात, सुशिक्षित म्हणवणारांत किंवा धन व साधनसंपन्न व्यक्तीतही दिसून येत नाहीत. अशी कित्येक वैशिष्ट्यें रणदिवे बंधूंत होती. अशा प्रकारच्या कर्तृत्ववान, पुरुषार्थी व राष्ट्रकार्याला स्वतःला वाहून घेतलेल्या व्यक्ती रणदिवे बंधूंच्या ऐन उमेदीच्या काळात तरी फार प्रमाणात नव्हत्या, म्हणून त्यांच्यांतील वैशिष्ट्यांचे दिग्दर्शन वृत्तांतात केले आहे. त्यांच्या समग्र जीवनातील सर्वसाधारण माहिती, हकीकती किंवा सामान्य बनाव, त्याचप्रमाणे वैयक्तिक अगर कौटुंबिक संबंध, ज्यांची माहिती किंवा वर्णने यांचे ध्येयनिष्ठ जीवनाच्या दृष्टीने महत्त्व नसते, त्यांचा या जीवनवृत्तांतात समावेश केला नाही. रणदिवेबंधूंच्या मूळ संकल्पित कार्यांच्या उद्देशाने अनेकांशी आलेल्या त्यांच्या संबधांतील संवाद, चर्चा, विचारविनिमय–यांतून परस्परांच्या मनात

आलेल्या उत्तेजना, त्या आवेशात अनेकांनी केलेले निश्चय व प्रतिज्ञा वगैरे प्रकार या वृत्तांतात दिले नाहीत. ज्यांना प्रतिष्ठेची कधीही इच्छा झाली नाही अशा खऱ्या कळकळीच्या मंडळींचे वर्तुळ रणदिवे बंधूंच्या भोवती नेहमी असे. अशी अगदी अंतर्गत मंडळी सोडून बाहेरच्या प्रदेशात त्यांच्या कार्याचा कोणालाही मागमूस लागला नाही. अशा स्थितीतही पुष्कळ एकनिष्ठ व्यक्तींशी त्यांचे संबंध आले, ते सर्व मी जाणत नाही. तरी जे थोडे फार मी जाणतो त्यांतूनही इतकेच मी या वृत्तांतांत दिले आहेत की, ज्यावरून रणदिवे बंधूंना त्यांच्या कार्यांत कशा प्रकारची संकटे व अडचणी येत, किती प्रकारच्या चिंता वहाव्या लागत, जीवन किती सावधपणे चालवावे लागे, त्याकरिता किती खबरदारी घ्यावी लागे याची वाचकांना काही कल्पना येऊ शकेल. या दृष्टीमुळे जीवनवृत्तांत शक्य तितका आटोपशीर करता आला. अशा रीतीने लिहिलेले जीवनवृत्तांत संक्षिप्त असले तरी हरकत नाही, पण ते बोधप्रद असावेत, मानवी मनातील क्षुद्र व हलक्या वृत्तींना क्षीण करून, सद्वृत्तींना जागृत करणारे व त्यांना उठाव देऊन मनुष्याला सदाचाराच्या व पुरुषार्थाच्या मार्गांत प्रवृत्त व प्रगत करणारे ते असावेत, ही मुख्य दृष्टी ठेवून मी हा वृत्तांत लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. तो मला कितपत साधला आहे ते ठरवणे वाचकांच्या हाती आहे.

आप्पासाहेब व भाईसाहेब या दोघां बंधूंबरोबरच त्यांचे चुलत बंधू डॉ. गोपाळ काशीनाथ ( बाबासाहेब ) यांचाही संक्षिप्त वृत्तांत पुस्तकात दिला आहे. तो देण्याची मित्रधर्माच्या दृष्टीने मला आवश्यकता वाटली. म्हणून त्याचाही यात समावेश केला आहे. चारित्र्य, औदार्य, परोपकार-वृत्ती, देशप्रेम, निगर्वीपणा, गरीबांविषयी कळवळा वगैरे सद्‌गुणात वडील दोघा बंधूंपेक्षा ते किंचितही कमी नव्हते.

वासुदेव बळवंत यांच्याविषयी माझ्या मनात खूपच आदर असूनही त्यांच्या बाबतींत दोन तीन वाक्येच मी उपसंहारात दिली आहेत. तेवढ्याने माझे

समाधान झालेले नाही. त्यांचे बाबतीत थोडे विस्तृतपणे लिहिल्याशिवाय माझ्या मनाचे समाधान होणार नाही. आता यापुढे शक्ती व बुद्धीचा यथा-प्रमाण सहयोग जमून येण्यावर ही गोष्ट अवलंबून आहे.

वृत्तांतात रणदिवे बंधूंचा उल्लेख प्रत्येक ठिकाणी आप्पासाहेब, भाई-साहेब असा मानवाचक शब्दांनी न करता आम्ही नेहमी वागत व बोलत असू त्याप्रमाणे एकेरी नावांनी केला आहे. त्यात कोणाला धृष्टता, अविनय, अशिष्टता किंवा अविवेक न वाटावा अशी माझी नम्र विनंती आहे. मी मुद्दाम आप्पासाहेब, भाईसाहेब असे शब्दप्रयोग करून लिहिण्याचा प्रयत्न करून पाहिला; पण त्यात मला माझ्या मनाची सहजता घालवूनही बनावटी-पणा साधेना व मनाच्या एकधारी लिहिण्याच्या कार्यात वरचेवर खंड पडू लागून जागजागीं विसंगती येऊं लागली म्हणून तो प्रयत्न सोडून द्यावा लागला.

आज पांच सहा वर्षे माझी प्रकृती अस्वस्थ राहात आहे. दोनही डोळ्यांचे ऑपरेशन झाले असल्यामुळे दिसण्याचे मान बरेच कमी झाले आहे. तशा-तच मधूनमधून भोवळ (घेरी) येत असते. तशा स्थितीत लिहिण्याचे, विचार करण्याचे काम बंद पडे. माझा स्वभाव व परिस्थितीप्रमाणे लिहिण्याचे व पुनः पुन्हा तपासण्याचे काम मला स्वतःलाच बारकाईने करावे लागले. या सर्व कारणांमुळे काम पुरे होण्याला विलंब लागला. या कामात अनेक मित्रांचे मला निरनिराळ्या रीतीने साहाय्य झाले आहे. विशेषतः कन्हैया-भाई मालपूरवाला, रामेश्वरजी पोद्दार व श्री. शंकरराव जोग यांनी या कार्यात बरेच लक्ष्य पुरवले. शंकरराव यांचे वय ८४ वर्षांचे. अशा वृद्ध अवस्थेत त्यांनी आठवणी लिहून पाठवल्या. त्यांच्या पायाचा दुखावा चालू असता तशा स्थितीत त्यांनी गुरुवर्य कोंडाजी वस्ताद यांची छायाचित्रे मिळवण्याचे परिश्रम घेतले. वस्तादजी व भाईसाहेब यांची छायाचित्रे त्यांच्या

प्रयत्नाने मिळू शकली. या सर्व मित्रांच्या अशा रीतीच्या साहाय्याबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानीत आहे.

वृत्तांत तयार करण्याचे काम माझ्याकडून कसेबसे पार पडल्यावर माझी प्रकृती दिवसेंदिवस अधिक नादुरुस्त राहू लागली. अशा स्थितीत पुढील कार्याची मला चिंता राहू नये व परिश्रम पडू नयेत म्हणून चि. कांतिलाल परीख व चि. भाऊ धर्माधिकारी या दोघांनी या कार्याचा भार आपण होऊन स्वतःवर घेतला व छपाईची व्यवस्था कांतिभाईंनी 'साधना प्रेस'मध्यें तावडतोब लावली. या कार्याच्या व्यवस्थेत त्यांना पुणे–मुंबईच्या अनेक खेपा कराव्या लागल्या. चि. भाऊंनी माझे लिखाण लक्षपूर्वक वाचून त्यात मला भाषेच्या दृष्टीने काही योग्य सूचना दिल्या व प्रुफे तपासण्याचे काम खूप बारकाईने पण शीघ्रतेने आटोपले. या दोघांनी मला इतके साहाय्य केवळ माझ्याविषयीच्या सद्भावनेने करूनही त्याबद्दल त्यांचे आभार प्रदर्शित करण्याचीही त्यांनी मला मोकळीक ठेवली नाही. श्री. यदुनाथ थत्ते यांचा माझा विशेष पूर्वपरिचय नसताही छपाईचे काम अत्यंत तत्परतेने, आत्मीयतेने व अल्पावकाशात त्यांनी पार पाडले याबद्दल त्यांचे आभार मानल्याशिवाय राहवत नाही. पुस्तक लवकर प्रसिद्ध होण्याचे सर्व श्रेय निःशंकपणे या तिघांकडे आहे.

ता. १ जानेवारी १९६६<br>
२१ 'हॅपी होम' सेंट मार्टिन्स रोड<br>
वांद्रे-मुंबई ५० AS

केदारनाथ

# शुद्धिपत्र

पुस्तक वाचण्यास सुरुवात करण्यापूर्वी छपाईत झालेल्या खालील ठळक चुका वाचकाने कृपा करून दुरुस्त करून घ्याव्यात :

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
| --- | --- | --- | --- |
| ५ | १ | तुच्छता वाढू | तुच्छता वाटू |
| ११ | खालून ६ | नसती | नसतां |
| ३७ | खालून ७ | सेनपाती | सेनापती |
| ४९ | २ | साध्या | साध्य |
| ५३ | १२ | त्या त्या वेळचे | त्या वेळचे |
| ५६ | ४ | रणदिवे बंधू बद्दल | रणदिवे बंधू बदल |
| ६२ | खालून ११ | समजता | समजावता |
| ६९ | १३ | कामाच्या संस्था | सार्वजनिक कामाच्या संस्था |
| ८९ | खालून ९ | प्रसंग किंचित् | प्रसंगोचित |
| १०६ | ३ | देशविषयक नाही | ( हे शब्द गाळणे ) |
| ११६ | ४ | मान | भान |
| ११९ | १७ | मुलां बरोबर | मुलाबरोबर |
| १२३ | १ | प्रमाण | प्रणाम |
| १३१ | खालून ८ | प्रवृत्तीमुळे | प्रकृतीमुळे |

दा. क्र. १५२५८

# १ : विद्यार्थिदशा व व्यायाम प्रवृत्ती

रणदिवे यांचे घराणे मूळ कुलाबा जिल्ह्यातील तळे या गावाकडील. तेथून आप्पासाहेब व भाईसाहेब यांचे वडील सीताराम आत्माराम हे धुळे येथे येऊन वकीली करू लागले. ते बहुतेक दिवाणी कोर्टातच काम करीत. त्या काळात धुळे येथे वकीलांची संख्या फार नव्हती. सीताराम आत्माराम ( बापूसाहेब ) फार सरळ व प्रामाणिक वृत्तीचे असून वकीलीच्या कामात हुशार होते. दिवाणी कामामुळे व्यापारी वर्गात त्यांचे वजन चांगले होते. आप्पासाहेब व भाईसाहेब यांचे लहानपण धुळ्यासच गेले. तेथील शाळांत त्यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण झाले. मी धुळे येथे हायस्कूलच्या शिक्षणाकरिता आलो तेव्हा हे दोघे बंधु हायस्कूलमध्ये शिकत होते. दोघेही त्या वेळी सातवीत ( आजच्या अकरावीत ) होते. माझे वडील बंधू त्रिंबकराव

( प्रि. टी. ए. कुलकर्णी ) हेही त्यावेळी धुळे येथे सातवीत होते. मी सन १८९९ साली धुळ्यास आलो. माझे बंधु त्यापूर्वी एक वर्षापासून धुळ्यास शिक्षणाकरिता होते. त्यांनी रणदिवे बंधूंशी माझी ओळख करुन दिली. नंतर मला बंधूंकडून कळले, हे दोघे भाऊ व्यायामात निष्णात असून सर्व खानदेशात प्रख्यात आहेत. त्यावेळी रणदिवे बंधु आग्रारोडवर रहात असत. व आम्ही त्यांच्या घरासमोरच्या रांगेत जवळच एका घरात रहात होतो. सीताराम आत्माराम आम्हांला गार्डियन प्रमाणे होते. आमच्या वडिलांचा व त्यांचा नात्याचा काही संबंध होता. त्या दोघां बंधूंशी माझा थोड्याच दिवसांत चांगलाच परिचय झाला. ते दोघे बंधु व आम्ही दोघे बंधु रोज रात्रीचे जेवणानंतर त्यांच्या घराच्या वरंड्यात किंवा शेजारच्या सीताराम शेटच्या दुकानात जमत असू. माझ्या बंधूंचा व त्यांचा अगोदरचाच घरोब्याचा संबंध झालेला असल्यामुळे माझाही त्यांच्याशी व घरातील मंडळींशी निकट संबंध येत राहिला. अशा रीतीने रणदिवे बंधूंशी माझा लवकरच निकट संबंध जडला.

धुळ्यास त्यावेळी पाताळे यांचे घराणे श्रीमंतांत गणले जात असे. त्यांतील एक तरुण विनायकराव पाताळे यांना व्यायामाची फार हौस होती. त्यांनी स्वतःच्या जागेत व्यायाम शाळा काढली होती. गोविंदराव जांदे यांच्या मार्फत रणदिवे बंधूंचा विनायकराव यांच्याशी संबंध आल्यावरुन दोघां भावांना व्यायामाची गोडी लागली. पुढे विनायकरावांशी त्यांची खूप घनिष्ट मैत्री जमली. थोड्याच काळात दोघा बंधूंनी व्यायाम–विषयात प्राविण्य मिळविले. पुढे पाताळे यांची तालीम चालवण्याचे काम प्रामुख्याने ह्या दोघा बंधूंकडेच आले. त्यांतही आप्पासाहेब वडील असल्यामुळे त्यांच्या-वर या कामाचा भार अधिक असे.

आम्ही दोघे बंधु प्रथम आग्रारोडवरील जागेत रहात होतो. पुढे ती सोडून आम्ही पाताळ्यांच्या तालमेच्या वरील जागेत माडीवर रहायला आलो. त्यावेळी मला क्रिकेटचा नाद होता. माझे बंधु स्कॉलर म्हणून हायस्कूलमध्ये जसे प्रसिद्ध होते तसेच ते चांगले क्रिकेटियर म्हणूनही प्रसिद्ध होते. ते सकाळी तालमेत जाऊन व्यायाम करीत व सायंकाळी क्रिकेट क्लबमध्ये जात असत. मी सकाळी लवकर उठत नसे. तेव्हा माझ्या बंधूंनी

मला एके दिवशी सांगितले की लवकर उठून खाली तालमेत जाऊन व्यायाम करीत जा. त्यावरून मी आप्पाला म्हणालो की मला तालमेत व्यायाम करायला यायचे आहे. त्याने शनिवारी उदीच्या वेळी मला यायला सांगितले. तालमेत दर शनिवारी सायंकाळी मारुतीची पूजा व उदी होत असे. पहिल्याच शनिवारी उदी घेऊन मी व्यायाम शाळेत दाखल झालो. तेव्हापासून रोज सकाळी व सायंकाळी तेथे जाऊन व्यायाम करण्याचा माझा क्रम चालू झाला व त्यावेळेपासून रणदिवे बंधूंशी माझी घनिष्ठता वाढू लागली. त्या दिवसांत तालमेत येणाऱ्या मंडळींपैकी कित्येकांची नांवे मला आठवत आहेत. गोविंदराव जादे, रामभाऊ मराठे, बापू दांडेकर, शंकरराव जोगळेकर, माझे बंधु, नारायण गाडगीळ, नारायण जमखिंडीकर, गणपति परांजपे, त्रिंबक पेठे, नाखरे, दादा डोंगरे, माधव वैद्य, उदगीरकर, ढापरे, मोडक, बाबू वैद्य, करंदीकर, अण्णा सोनार वगैरे मंडळी तालमेत येत असत. इतरही बरीच मंडळी येत असत; पण आता त्यांची नावे आठवत नाहीत. वर लिहिल्यापैकी जांदे, मराठे, दांडेकर, डोंगरे ही मंडळी वयाने मोठी होती. बाकी सर्व लहान असून विद्यार्थी होते. जांदे, मराठे हे पट्टा खेळण्यात प्रवीण होते. ते तालमेत कधी कधी सायंकाळी येत. जांदे, मराठे, आप्पा, भाई ही मंडळी कोंडाजी वस्ताद यांचे जवळ ही विद्या शिकली. आप्पा पट्टा खेळण्यात प्रवीण होता. त्याचे पट्ट्याचे हात ( डाव ) पहाण्यासारखे असत. त्यांतील त्याची चपळता, तडफ, त्याचा पवित्रा वगैरे खरोखरच प्रेक्षणीय असे. दोरीची जळती बनाटी आप्पानेच फिरवावी इतका तो त्या विद्येत निष्णात होता. कुस्तीतही तो तसाच तरबेज होता. त्यावेळच्या विद्यार्थीवर्गात किंवा तालमेत येणारांत त्याच्या बरोबरीचा कोणी नव्हता. त्यावेळी आमच्या व्यायामशाळेत भाऊसाहेब जोशी या नावाचे चांगले कुस्ती जाणणार व शिकवणार मधून मधून सायंकाळी येत असत. ते फक्त आप्पा व भाई या दोघांनाच कुस्ती शिकवीत असत. त्यांचे वय ३०–३५ वर्षांचे असावे. जिल्ह्याचे फॉरेस्ट ऑफिसात त्यांना नोकरी होती. त्यांचे शरीर काहीसे स्थूल होते पण कुस्ती खूपच चपळाईने करीत. ते बरेच मोठे व आप्पा, भाई वयाने लहान. ते दोघांना शिकवीत तेव्हा आम्ही सर्व त्यांची कुस्तीडावावरील डाव व पेचावरील पेच – पहात असू. आम्हांला खूप

गंमत वाटे व त्याबरोबरच कुस्तीचे ज्ञानही होत असे. सर्व व्यायामशाळेत रणदिवे बंधू व माझे बंधू यांची शरीरे अत्यंत सुघटित, रेखीव, पिळदार व सुंदर होती. अप्पाचे शरीरात खूपच स्फूर्ती व तरळपणा दिसून येई. त्याच्या प्रत्येक खेळात कौशल्य, चपळता, तडफ व सफाईदारपणा असे. रणदिवे बंधूंवर सर्वांचे अतिशय प्रेम असे.

त्या काळात आपल्या पांढरपेशा म्हणजे स्वतःला सुशिक्षित म्हणविणाऱ्या वर्गात देशी व्यायामाची आवड मुळीच नव्हती. त्याची अनेक कारणे असावीत. व्यायामाची आवड असणे, त्याचे महत्त्व समजणे यालाही काही सामाजिक विवक्षित परिस्थिती व जीवनविषयक काही विशिष्ट विचारांची आवश्यकता असते. आपण इंग्रजी अमलाखाली आल्यावर आपल्या पहिल्या परिस्थितीत अनेक बाजूंनी पालट झाला. त्यामुळे जीवनविषयक आपले विचार व आपल्या महत्त्वाकांक्षा यांत फार फरक पडला. इंग्रजी अमलामुळे इंग्रजी शिक्षणाला महत्त्व आले. ते शिक्षण घेतलेला सुशिक्षित समजला जाऊ लागला. सरकारी उच्च प्रतीची नोकरी त्यालाच मिळायची व बढतीही त्याचीच होत रहायची, अशी स्थिती झाली. पांढरपेशा लोकांना लष्करी खात्यात प्रवेश मिळेनासा झाल्यामुळे शस्त्रविद्येशी आपला संबंध तुटला. तेव्हा इंग्रजी बौद्धिक शिक्षण व त्या मार्फत चालणाऱ्या बौद्धिक व्यवसाया-शिवाय आपल्या लोकांच्या महत्त्वाकांक्षांना मार्ग राहिला नाही. सरकारी नोकरी मिळण्यापुरती शारीरिक पात्रता असली म्हणजे झाले. ह्याशिवाय आरोग्य, बळ, स्फूर्ती, उत्साह, चपळता, साहस वगैरेंची जीवनाला आवश्यकता वाटेनाशी झाली. नोकरी मिळविण्याला बळसंपन्न होण्याची आवश्यकता नाही म्हणून जीवनालाही त्या गुणांची आवश्यकता नाही अशी पांढरपेशा वर्गाची त्या काळी भावना होती. दोन तीन पिढ्या अशा भावनेत, समजुतीत व संस्कारांत आमच्या गेल्यामुळे आमच्यांतील बळ-प्राप्तीची परंपरा व संस्कार नष्टप्राय झाले. केवळ अशिक्षित वर्गात व्यायामाची व पट्टा–बनाटी सारख्या मर्दानी खेळांची आवड राहिली. सुशिक्षित म्हणवणारांचा देशी व्यायामाशी संबंध सुटला, त्याचा परिणाम पिढी दर पिढी वाढत वाढत इतक्या विपरीत स्थितीला येऊन पोहोचला की देशी व्यायामाविषयी पांढरपेशा वर्गात एक प्रकारची अप्रीति उत्पन्न

झाली. काहींशी तुच्छता वाटू लागली. दंड, बैठक, पट्टा, बनाटी हे अशिक्षित वर्गाचे खेळ आहेत. सभ्यवर्गाचे ते काम नाही. इंग्रजी शिकलेला किंवा शिकणारा तो सुशिक्षित व सभ्य व इतर अशिक्षित ते असभ्य असे मानले जाऊ लागले. खेळांची आवडच असेल तर इंग्रजी खेळ खेळावे अशी सुशिक्षित लोकांची मान्यता झाली. अशा प्रकारे सत्ताधाऱ्यांची छाप तरुण पण परतंत्र प्रजेवर नकळत पडत असते असे अनुभवावरून वाटते. महाराष्ट्रात क्रिकेटला उत्तेजन हारिस गवर्नरच्या कारकीर्दीत आले. तेव्हापासून तो खेळ राजमान्य मानला जाऊन त्याचा फैलाव होत चालला. त्यापूर्वी त्याला विशेष महत्त्व नव्हते. अशा अनेक कारणांमुळे शिक्षित घराण्यातील कोणी तरुण देशी व्यायामाकडे वळला तर त्याच्या सभ्यपणात काही कमीपणा मानला जात असे. त्या काळात पांढरपेशा वर्गात देशी व्यायामाची आवड पुणे, नाशिक सारख्या ठिकाणी क्वचित थोडी फार दिसून येत असे. ग्वाल्हेर, इंदूर, बडोदे, कोल्हापूर सारख्या देशी संस्थानांतही देशी व्यायामाची काही प्रवृत्ती असे. परंतु तीत पहिलवानी शौक व बऱ्याच अंशी रजवाडी रंग असे. पांढरपेशा वर्गात देशी व्यायामाची आवड नसण्याला-उलट त्याविषयी अप्रीति असण्याला—आणखी एक महत्त्वाचे कारण हेही होते की देशी व्यायाम व त्यातील मर्दानी खेळांची आवड असणाऱ्या सुशिक्षितांकडे इंग्रज सरकार साशंकतेने पहात असे. म्हणून पांढरपेशा विशेषतः नोकरवर्गात या कारणामुळे त्या खेळांबद्दलच्या अप्रीतीत भयाचाही काही भाग असे. ही स्थिती जवळ जवळ १९०४-५ पर्यंत होती. त्याच सुमारास वंगभंगामुळे निर्माण झालेल्या राष्ट्रीय जागृतीत बुद्धिमान नेतावर्गाचे या विषयाकडे लक्ष गेले. त्यापूर्वी या विषयाकडे कोणीही आस्थेने किंवा आदराने पहात नसत. अशा प्रतिकूल काळात व परिस्थितीत रणदिवे बंधू देशी व्यायामशाळा चालवीत होते. तरुणांना, विद्यार्थ्यांना त्या प्रकारचे शिक्षण देत होते. स्वतःप्रमाणे त्यांना बनवण्याचा प्रयत्न करीत होते. त्या काळी १७-१८ तालुक्यांचा मिळून एक खानदेश जिल्हा होता व सर्व खानदेशात मिळून एकच धुळ्याचे गरुड हायस्कूल होते. म्हणून हायस्कूलचे शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना धुळ्यासच यावे लागे व देशी व्यायामाचे शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्यांना पाताळ्यांच्या तालमेशिवाय दुसरे

स्थान नव्हते. रणदिवे बंधूंपासून विद्यार्थ्यांना केवळ शारीरिक शिक्षण मिळत नसून त्याबरोबरच चारित्र्य, शील, सदाचार, स्वार्थत्याग, परोपकार वगैरेचेही संस्कार मिळत असत. त्या समयात अशा प्रकारची संस्था निदान खानदेशात तरी दुसरी नव्हती असे मला वाटते व रणदिवे बंधूंसारखे प्रेम ठेवून सर्वांवर चांगले संस्कार व देशीपद्धतीअनुसार शारीरिक शिक्षण देणारे पांढरपेशा वर्गात तरी अन्य कोणी नव्हते असे मला आजही वाटत आहे. त्या काळात प्रत्यक्ष त्यांच्याकडून शिक्षण घेतलेल्यापैकी अनेकांनी आपआपल्या गावी गेल्यावर स्वतःचे ज्ञान व कर्तृत्व याप्रमाणे व्यायाम-शाळा काढल्या व त्यांनी त्या चांगल्या रीतीने चालवल्या. त्यापैकी आजही जे हयात आहेत ते रणदिवे बंधूंनी आपल्याला दिलेले शारीरिक शिक्षण, त्यानी दिलेले सुसंस्कार व त्यांचा सहवास यांचा आपल्या जीवनात आरोग्य, बळ, उत्साह व सदाचार वगैरे दृष्टींनी किती लाभ झाला ह्याचे वर्णन अजूनही फार कृतज्ञतेने व आदराने करतात व त्यांना मनःपूर्वक धन्यवाद देतात. त्यांच्याकडून अशा प्रकारचा लाभ करून घेतलेले बहुसंख्य तरुण धुळ्यातील आपला अभ्यासक्रम आटोपून दरसाल आपल्या गावी जात असत. एके काळी अशा रीतीचा तरुण वर्ग सर्व खानदेशभर पसरलेला होता. त्याच्या मनात रणदिवे बंधूंविषयी नितांत प्रेम व आदर असे. आपल्या विद्यार्थीदशेतच रणदिवे बंधू व्यायामाचे बाबतीत सर्व खानदेशात तर प्रसिद्ध होतेच; परंतु धुळ्याची पाताळे यांची तालीम व रणदिवे बंधू यांची माहिती पुणे, नाशिक, नगर, सातारा वगैरे ठिकाणच्या व्यायाम-प्रिय वर्गालाही होती.

व्यायाम शाळेत रणदिवे बंधू व त्यांच्या हाताखालची मंडळी सर्वांना शिक्षण देत असत तरी या विद्येत सर्वांचे गुरु म्हणून कोंडाजी भवानी वस्ताद मानले जात असत. त्यांच्या कडून शिक्षण घेऊन उदात्त हेतूने त्याचा विकास आपल्या जीवनात करून इतरांनाही ते शिक्षण देण्याचा व्यापक प्रयत्न रणदिवे बंधूंशिवाय कोणी केल्याचे मला तरी माहीत नाही. वस्तादजी तालमेत क्वचितच येत. ते आले की आम्ही प्रत्येक जण क्रमाने त्यांच्या समोर जाऊन ‘ रामराम वस्तादजी ’ असे मोठ्या आनंदाने म्हणून त्यांना नम्रपणे अभिवादन करीत असू. आम्हां सर्वांना त्यांच्याविषयी खूप



गुरुवर्य कोंडाजी भवानी वस्ताद

आदर व पूज्यभाव वाटे. तेही आम्हांला प्रेमाने ' रामराम, रामराम ' असे प्रत्येकाला म्हणत आशीर्वाद द्यायचे. रस्त्यात त्यांची कोठेही भेट झाली तरी ' रामराम वस्तादजी ' असे म्हणून त्यांना अभिवादन करण्यात आम्हांला हर्ष व अभिमान वाटे. तेही आम्हांला कुशल प्रश्न करून आपले प्रेम व्यक्त करीत. वस्तादजींचे वय त्यावेळी ५५–६० च्या सुमाराने असावे. त्यांची शरीरयष्टी उंच, मजबूत व कणखर. आवाज खणखणीत. ड्रिलच्या प्रसंगी आवाजात पुरा करडेपणा, चालणे ताठ, लष्करी पद्धतीचे, पोषाकही तसाच अनुरूप. कल्लेदार मिशामुळे गंभीर वाटायचे. पण फारच प्रेमळ होते. त्यांचे एकंदर बोलणे चालणे रुबाबदार. एखाद्या घरंदाज सरदारासारखे. डोक्यावर मराठेशाही बांधीव पागोटे. चालतांना हातांत ऐटदार काठी. या सर्वांमुळे त्यांच्याकडे पाहिले की भव्यतेची मूर्तीच वाटायची ! त्यांच्या वियोगाला आज साठापेक्षा अधिक वर्षे लोटून गेली तरी त्यांच्या स्मरणाबरोबर हृदय पूज्यतेने व कृतज्ञतेने भरून येते !

आमच्या हायस्कूलचे व ट्रेनिंग कॉलेजचे ते ड्रिल मास्तर व तालीम-मास्तर होते. ट्रेनिंग कॉलेजची व्यायामशाळा होती. तेथे सिंगल बार, डबल बार वगैरेंचे शिक्षण वस्तादजीच देत असत. तेथे व्यायाम करणाऱ्या गरीब विद्यार्थ्यांना धारोष्ण दूध मोफत देण्याची सोय केलेली होती. त्यावर वस्तादजींची देखरेख होती. देशी व्यायामपद्धतीचे शिक्षण देणारे आमचे सर्वांचे गुरु कोंडाजी वस्ताद होते. त्यांचे त्या विद्येतील कौशल्य व प्राविण्य पाहण्याचा योग माझ्या वयाच्या त्यावेळच्या मंडळीपैकी कोणालाही कधीच आला नाही. पण रणदिवे बंधू, जांदे, मराठे यांचे कौशल्य आम्ही पाहत होतो व ही मंडळी वस्तादजींच्या त्या विद्येतील कौशल्याची, तडफेची, चापल्याची प्रशंसा करीत असत. त्यावरून त्यांच्या प्राविण्याची आम्हांला कल्पना येऊन त्यांच्याविषयी आम्हांला परम आदर वाटे. अशा प्रेमळ व निष्णात गुरूपासून जीवनाला अत्यंत आवश्यक व तितकीच महत्त्वाची विद्या संपादन करून तिचा त्या काळच्या विद्यार्थीवर्गात व तरुणांत प्रसार करण्याचे काम रणदिवे बंधूंनी त्या प्रतिकूल काळात व प्रतिकूल परिस्थितीत एकनिष्ठेने केले हेच त्यांच्यांतील वैशिष्ट्य आहे. खानदेशातील त्या काळच्या विद्यार्थी-वर्गात मर्दानी खेळांची आवड निर्माण करण्याचे काम कोणी केले असेल

तर ते रणदिवे बंधूंनीच केले असे म्हटल्यास त्यात अतिशयोक्ती नाही. विद्यार्थीदशेत व त्यानंतरही पुढे कित्येक वर्षे त्याच प्रवृत्तीच्या मागे ते तन-मन-धनाने लागलेले होते. आपल्या पूज्य गुरुपासून प्राप्त झालेल्या विद्येचे ऋण त्यांनी त्याच मार्गाने फेडण्याचा प्रयत्न केला. रणदिवे बंधूंच्या केवळ त्या काळातील कर्तृत्वाचा व धडाडीचा विचार केला तरी त्यांच्या विषयी आदर वाटल्याशिवाय रहात नाही. त्या काळात धुळ्यास येऊन शारीरिक शिक्षण व उच्च संस्कार घेतलेला खानदेशातील तमाम विद्यार्थी-वर्ग या उभयबंधूंचा ऋणी आहे यात शंका नाही. या सर्व गोष्टी रणदिवे बंधूंना गौरवास्पद असून त्यांना धन्यता देण्यासारख्या आहेत.

आमचे हायस्कूल सकाळचे चालू असता एके दिवशी जिल्ह्याचे कलेक्टर, असिस्टंट कलेक्टर, पोलिस सुपरिंटेंडंट व असिस्टंट पोलिस सुपरिंटेंडंट असे चार गोरे अधिकारी हायस्कूल पाहण्याकरिता आले. त्या काळी जिल्ह्याचे वरचे अधिकारी गोरे असत व सर्व जिल्ह्यावर चार अधिकारी वरिष्ठ म्हणून असत. ते बहुतकरून इंग्रज असत. त्यावेळी आगाशे हेडमास्तर होते. त्यांनी अधिकाऱ्यांना सर्व हायस्कूल दाखवले. त्यानंतर त्यांनी मुलांचे ड्रिल पाहण्याची इच्छा दर्शविली. वस्तादजींनी त्यांना मुलांची कवायत दाखवली. लॉंग जंप, हाय जंपमध्ये आमच्या व्यायाम-शाळेतील नारायण जमखिंडीकर याने सर्वात उंच उडी मारली. एका अधिकाऱ्याने उठून आपल्या शरीरावरून उडीच्या उंचीचे माप काढले. ते जवळ जवळ त्याच्या डोक्याइतके भरले. साहेबानी जमखिंडीकरला शाबासकी दिली. सर्व हायस्कूल-मध्ये तोच सर्वात उंच उडी मारणारा होता. हे प्रयोग झाल्यावर साहेबांनी टग ऑफ वॉरचा प्रयोग करण्यास सांगितले. वस्तादजींनी विद्यार्थ्यांकडून तो प्रयोग दाखवला. त्यावर साहेबांना वाटले की, आपण स्वतः तो प्रयोग विद्यार्थ्यांना दाखवावा. त्यातील त्यांचा हेतु हा होता की, टग ऑफ वॉर-च्या वेळी उभे कसे रहावे, पाय कसे ठेवावे, दोर कसा धरावा, नेट कसा लावावा वगैरे पद्धतशीर मुलांना शिकवावे. त्याप्रमाणे चौघे उठून टग ऑफ वॉरला तयार झाले. हेडमास्तरांनी वस्तादजींना सांगितले, चार चांगले मजबूत विद्यार्थी निवडून काढा. त्यावरून वस्तादजींनी दोघे रणदिवे बंधू, माझे बंधू ( त्रिंबक आप्पाजी ) व चवथा नारायण गाडगीळ की

देशपांडे मला नीटसे आठवत नाही, परंतु चारजण साहेबांच्या बरोबर उभे केले. साहेब शरीराने उंच व धिप्पाड. त्यांना चार जणांबरोबर—लहान विद्यार्थ्यांबरोबर-टग ऑफ वॉर करण्यात कमीपणा वाटला म्हणून त्यांनी सहा विद्यार्थी तयार करण्यास सांगितले. वस्तादजींनी आमच्या तालमेपैकी आणखी दोन विद्यार्थी उभे करून एकंदर सहा केले. नंतर ते चार व विद्यार्थी सहा अशा दोन पार्ट्या तयार झाल्या. आम्ही सर्व विद्यार्थी पटांगणात बसलो होतो. दोन्ही पार्ट्या आपापल्या जागी हुकुमाची वाट पहात उभ्या राहिल्या. मध्यभागी वस्तादजींनी दोराला हात लावलेला होता. त्यानी इशारा करताच प्रत्येक पार्टी आपापल्या बाजूने रस्सी खेचू लागली, थोडा वेळ कोणीच कोणाला खेचू शकले नाही पण पुढे साहेबांचे पाय जमिनीपासून सरकू लागले व विद्यार्थी त्यांना खेचू लागले. वस्तादजींना वाटले आता साहेबांची अब्रू जाणार, हे बरे नाही. ते मध्यावरच होते. त्यांनी दोराला एक हात लावून दोर साहेबांच्या बाजूला खेचला. साहेबांची बाजू सावरली व त्यांची सरशी झाली. साहेबांचे पाय जमिनीपासून सरकू लागले होते. तेव्हा आम्हां विद्यार्थ्यांना आनंद वाटू लागला होता. पुढे वस्तादजींनी काय केले तेही सर्वांनी पाहिले. त्यावरून हार जीतचा निर्णय साहेबांसुद्धा सर्व आपआपल्या ठिकाणी समजून गेले. हेडमास्तरना बरे वाटले. पण माझे बंधू या तालमेच्या विद्यार्थ्यांबरोबर कसे याचे त्यांना आश्चर्य वाटून ते काही बोललेही. कारण माझे बंधू स्कॉलर होते. हुशार विद्यार्थ्यांत त्यांची गणना होती. हेडमास्तरांचे त्यांच्यावर प्रेम होते. पण हा हुशार विद्यार्थी या तालमीच्या मंडळीत कसा ? हा त्यांना प्रश्न पडला. आप्पाने त्यांना सांगितले हा आमच्यातलाच आहे. हा प्रकार झाला त्या दिवशी आम्हां सर्वांना फार आनंद झाला. हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी साहेबांना हार दिली हा सर्व विद्यार्थ्यांबरोबर आम्हांलाही आनंद वाटत होता. पण त्या विद्यार्थ्यांत बहुतेक आमच्या तालमेतील विद्यार्थी होते. आप्पा, भाई, माझे बंधू ही मंडळी प्रामुख्याने होती. हेडमास्तरांनी वस्तादजींना चार मजबूत विद्यार्थी निवडून काढायला सांगितले, तेव्हा वस्तादजींनी ते काम आप्पाकडे सोपवून तालमेतील विद्यार्थी निवडायला सांगितले व त्यांनी साहेबांना हार दिली. या आनंदाची सर्वांबरोबरच्या आमच्या आनंदात चांगलीच भर होती. ही घटना सन १९०० साली

झाली. पण ती माझ्या पक्की ध्यानात राहिलेली आहे. या घटनेपासून पाताळे यांच्या तालमेची अधिक प्रसिद्धी झाली.

या घटनेनंतरच मला वाटते आप्पा टायफाइडने आजारी पडला. त्या काळी हल्लीच्याप्रमाणे टायफाइडवर खात्रीचा असा काहीच उपाय सापडलेला नव्हता. डॉक्टरांच्या सल्ल्याप्रमाणे उपचार चालू ठेवायचे. व घाम केव्हा सुटेल त्याची वाट पहात रहायचे. घरात व बाहेर सर्वांना महान चिंता पडली. त्यावेळी तालमेतील मंडळींनी पुष्कळच परिश्रम घेतले. त्याचे आजारीपणात शंकरराव जोगळेकर होते असे मला वाटते. सर्वांचे रात्रंदिवसाचे परिश्रम, योग्य उपचार व ईश्वराची कृपा—आप्पाचा ताप उतरू लागला. घाम सुटून त्याची प्रकृती सुधरू लागली. सर्वांना आनंद झाला. पण थोड्याच दिवसांनी तोच ताप उलटला की काही दिवसांनी पुनः टाइफाइड झाला ते मला आता नीटसे आठवत नाही. परंतु आप्पाला दोन वेळा टायफाइड काही दिवसांच्या अंतराने झाला होता इतके मला स्मरण आहे. दुसऱ्या खेपेला त्याला अशक्तपणा फार आला होता. त्यातून शक्ती यायला पुष्कळ दिवस लागले. दोनही वेळेच्या टायफाइडची मला आठवण आहे. पण समय निश्चितपणे आठवत नाहीत. पण आजारीपणा त्याला लग्नापूर्वी येऊन गेला होता याविषयी मला खात्री वाटते.

सन १९०० साली दोघा भावांची थोड्या दिवसांच्या अंतराने लग्ने झाली. लग्ने खूपच थाटात झाली. त्यांच्या वडिलांचा लौकिक मोठा व कमाईही चांगली होती. दोघांच्या सोयरीकी चांगल्या घराण्यांशी जमल्या. लग्नांत तालमेतील मंडळीचे खूप सहाय झाले. नेहमीच्या दिवसांतही रणदिवे यांच्या घरी येणारे जाणारे पाहुणे वगैरे पुष्कळ असत. लग्नांत तर भरपूर गर्दी झाली होती.

आप्पा व भाई यांच्याविषयी लिहिताना त्यांच्या जीवनातील पुष्कळशा घटना आठवतात परंतु आतापर्यंत मध्यंतरी पुष्कळच काळ गेल्यामुळे त्या घटनांचा कालानुक्रम बरोबर आठवत नाही. सन १९०० सालाचीच गोष्ट. पण महिना कोणता ते आठवत नाही. एके दिवशी सर्व धुळे शहरात जागोजागी जाणाऱ्या येणाऱ्या लोकांची जेथे सहजच नजर जाईल अशा

नाक्याच्या अनेक ठिकाणी हस्तलिखित जाहिरनामे लावलेले आढळून आले. मी तालमेच्या वरचे जागी रहात होतो. तेथून सकाळीच बाहेर पडल्यावर जवळच ट्रेनिंग कॉलेजच्या कंपाउंडच्या फाटकाच्या बाजूला एक जाहिरनामा लावलेला आढळला. तो फार मोठा नव्हता. मुलांच्या परीक्षेचे जसे चतकोर कागद असतात तेवढ्या आकाराचा तो होता. त्यात इंग्रजांची नालस्ती व त्यांना धमकी दिलेली होती. खाली सही तुमचा 'शत्रू' अशी होती. थोड्याच वेळात मला कळले की असे जाहिरनामे सर्व शहरात अनेक जागी लावलेले आहेत. सही कोठे 'शत्रु', कोठे 'एनिमी' अशी शत्रुत्वसूचक केलेली होती. पोलिसांनी ते ताबडतोब काढून नेले. पण तितक्या वेळांत ते शेकडो लोकांच्या वाचण्यात आले. गावात खूपच गवगवा झाला. सर्वत्र भयाचे व संशयाचे वातावरण निर्माण झाले. सरकारने पुष्कळ शोध करूनही जाहिरनामे लावणारा शेवटपर्यंत सांपडला नाही, पण तेव्हापासून पाताळ्यांच्या तालमेविषयी पोलिसांना शंका वाटू लागली. हे काम तरुणांचे आहे व सूड घेण्याची थोडी फार शक्ति असणारांचे आहे, असे जाहिरनाम्यांतील सूडाची भाषा व भावना यांवरून वाटण्यासारखे होते. मी एक जाहिरनामा वाचला होता त्यावरून त्यातील अक्षरे चांगली वळणदार असल्याचे मला अजूनही आठवत आहे. सरकारने पुष्कळ शोध केला पण पत्ता लागला नाही.

आता हा वर वर्णन केलेला प्रसंग अगोदर घडला की गोरे अधिकारी हायस्कूलमध्ये येऊन गेले ती घटना अगोदरची ते आता मला नक्की आठवत नाही. पण जाहिरनाम्याची घटना होऊन गेल्यावर एकाद्या आठवड्याच्या आतच हायस्कूलमधील चवथीपासून सातवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांची लेखी परीक्षा घेतली गेली. पेपर कोणत्या विषयाचा होता ते आता स्मरत नाही. परंतु अशी मध्येच लेखी परीक्षा नेहमीच्या क्रमानुसार नसती का घेतली ? हा प्रश्न आम्हा विद्यार्थ्यांचे मनात आल्याशिवाय राहिला नाही. जाहिरनाम्या-मुळे निर्माण झालेले वातावरण अजून तसेच होते. पाताळ्यांचे तालमेविषयी शंका घेतली जात आहे असे आम्हांला कळत होते. पाताळ्यांची तालीम म्हणजे मुख्यतः रणदिवे बंधूंवरच शंका आलेली असावी. परंतु त्यांचे वडील फार सरळ व सज्जन गृहस्थ, त्यांचे वजनही सरकारी मंडळीत चांगले.

शिवाय त्यांच्या मुलांची वयेही संशय टिकण्यासारखी नव्हती. असे होते तरी संशयाचे वातावरण बराच काळ राहिले. व्यायाम-शाळेत व्यायामाशिवाय इतर शंकास्पद विषयाची कधीच चर्चा होत नसे. परंतु व्यायामशाळेत पट्टा, बोथाटी, फरीगदगा हे विषय शिकवले जात असल्यामुळे व्यायामशाळा संशयास्पद वाटू लागली होती.

या प्रसंगाच्या आसपासच अगोदर किंवा मागून एक गोष्ट घडली. एके दिवशी सायंकाळी आमचे नेहमीप्रमाणे खेळ चालू असता एक शरीराने चांगले भरदार, अंगात खादीसारख्या जाड्याभरड्या कापडाची बंडी, डोक्याला फेट्यासारखे गुंडाळलेले, असे गृहस्थ तेथे आले. त्यांचे वय साधारण तिशीच्या सुमाराचे असावे. त्यांनी तालमेच्या मुख्याची आमच्याजवळ चौकशी केली. आम्ही आप्पासाहेबांचे नाव सांगितले व त्यांची भेट करून दिली. पुढे त्यांनी स्वतः पट्टा व लाठीचे काही डाव सर्वांना दाखवले. त्यांच्या डावांत जोरकसपणा चांगलाच होता. पण त्यांचे शरीर काहीसे स्थूल असल्यामुळे त्यात चपळता व सफाईदारपणा दिसून आला नाही. त्यानंतर ते पुन्हा दोन तीन वेळा व्यायामशाळेत आले होते. त्या वेळीही त्यांनी काही डाव दाखवले. स्वतःचे नाव 'महागावकर' असे त्यांनी सांगितले. रणदिवे बंधूंचा व त्यांचा त्या प्रसंगातच काही विशेष परिचय वाढला असावा असे वाटते. कारण आप्पाने त्यांच्याविषयी मला इतकेच सांगितले की ते गृहस्थ रँडच्या खुनाच्या कटापैकी आहेत. ही गोष्ट त्यांने माझ्याशिवाय कोणाला सांगितली किंवा नाही ते मला माहित नाही, पण ती मला सांगितली तेव्हा दुसऱ्या कोणाला ऐकू न जावी अशा आवाजात व आविर्भावाने सांगितली. थोड्याच दिवसांनी ते गृहस्थ पुनः धुळ्यास आले तेव्हा ते रणदिवे यांच्याकडेच उतरले होते. तेव्हा त्यांना 'भटजी' या नावाने संबोधतात असे समजले. महर्षी अण्णासाहेब पटवर्धन यांचा व भटजींचा संबंध असल्याचेही तेव्हा मला समजले. रणदिवे बंधूंशी त्यांचे बोलणे काय होत असे व ते कशाकरिता येतात याची चौकशी मी दोघांपैकी कोणाशीच केली नाही. त्यांचा संबंध विशेषतः आप्पाशीच येई. पुढे मी धुळ्यास नसतानाही ते धुळ्यास येऊन जात असल्याचे मला समजले होते. भटजींची मला काही माहिती झाल्यावर पूर्वी सांगितलेल्या जाहिरनाम्याचा व त्यांचा काही संबंध असावा अशी शंका माझ्या

मनात येऊन गेली. भटजी कारस्थानी मनुष्य आहेत असे त्यांच्या पुनः पुनः धुळ्यास येण्याच्या व रणदिवे बंधूंशी निकट संबंध आणण्याच्या त्यांच्या प्रयत्नावरून मला वाटू लागले होते. रणदिवे बंधूंची पात्रता, योग्यता व विशेषतः आप्पाची तेजस्विता यांमुळे भटजींना त्याचा वेध लागला असावा असेही त्या वेळी मला वाटले. मी पुष्कळ लहान, म्हणून माझ्याशी भटजींचे स्वतंत्रपणे असे कधीच बोलणे झालेले नाही. परंतु आप्पाशी त्यांचे बोलणे होई त्यावेळी मी तेथे आल्यावरून त्यांचा स्वभाव काही अंशी माझ्या लक्षात आला, त्यात तोंडावरून मनुष्याची पारख आपण करू शकतो असे स्वतःला ज्ञान असल्याचे त्यांच्या बोलण्यात अनेक वेळा आलेले मला स्मरते.

धुळ्यास मी एक वर्ष माझ्या बंधूंबरोबर राहिलो. त्यानंतर त्यांनी धुळे सोडले. तेव्हापासून पुढे मला आप्पा व भाईचाच आधार होता. ते मला लहान भावाप्रमाणे वागवीत. शाळेत मी व आप्पा बरोबर जात असू. त्याला घरून निघायला उशीर झाला तरी मी त्याचेकरिता थांबून राही. ते दोघे मधून मधून वस्तादजींच्याकडे जात असत तेव्हा मलाही बरोबर नेत. एके दिवशी ते दोघे, मी व आणखी एक जण—महादेव वैद्य असावा असे वाटते— आम्ही चौघे वस्तादजींच्या घरी सायंकाळी गेलो. वस्तादजी पांझरा नदीच्या पलीकडे देवपुरात मारुतीच्या देवळाजवळ रहात असत. तेथे गेल्यावर त्यांच्यासमोर आम्ही आदबीने बसलो. वस्तादजींचे रणदिवे बंधूंशी बोलणे सुरू झाले. आम्ही दोघे त्यांचे संभाषण ऐकत राहिलो. त्यांचे या दोघा बंधूंवर पुत्रवत् प्रेम होते. त्यांच्याशी वस्तादजी बोलू लागले म्हणजे त्यांच्यातील वात्सल्य ओतप्रोत दिसून येई. त्यांना मूलबाळ नव्हते. बोलण्यातील विषय बहुतेक व्यायामाचा असायचा. त्या दिवशी गोफणीचा विषय निघाला. आम्हाला कोणालाच गोफण मारण्याची माहिती नव्हती. शेत राखणारे गोफण मारतात. चोर, लुटारू गोफणीचा प्रयोग करतात वगैरे माहिती होती. त्या दिवशीच्या बोलण्यावरून वस्तादजी चांगले गोफण मारणारे आहेत हे आम्हाला कळले. ते म्हणाले मी तुम्हांला गोफण मारायला शिकवीन. आप्पाने व भाईने वस्तादजींच्या सोयीप्रमाणे दुसराच दिवस त्याकरिता ठरवला. दुसऱ्या दिवशी आम्ही नदीकाठावरील मैदानावर वस्तादजींबरोबर गेलो. मैदानात गोफणीने मारण्यासारख्या दगडांना

तोटा नव्हता. वस्तादजी म्हणाले गोफण मारण्याचे प्रकार दोन आहेत : एक केवळ दगडफेकीचा व दुसरा नेम साधण्याचा. नेम मारता येणे हे त्यातील खरे कौशल्य. याप्रमाणे सांगून त्यांनी दोनही प्रकार आम्हांला दाखवले. आम्ही आपआपल्या ग्रहणशक्तीप्रमाणे व अनुकरणशक्तीप्रमाणे ते उचलले व पुढे दर बुधवारी नदीवरील मैदानावर त्याची प्रॅक्टीस करण्याकरिता दहा बारा जण मिळून जाऊ लागलो. त्यात आमची काही प्रगती झाली असे आम्हांला वाटल्यावर आम्ही आपसांतच दोन टोळ्या करून एकमेकांवर दगडफेक करू लागलो. स्वतः झाडाच्या आड बचावाकरिता आश्रय घेऊन प्रतिपक्षांवर मारा करण्यापर्यंत आमची मजल त्या विद्येत गेली. परंतु दैवयोग म्हणा की झाडाचा आश्रय घेण्याची आमची हुशारी की नेमबाजी-तील आमची अपूर्णता म्हणा पण कोणालाच कोणाचा दगड लागला नाही व कोणाला इजा झाली नाही. प्रतिपक्षाचे दगड आमच्या म्हणजे झाडाच्या बाजूने सणाणत जायचे मात्र. या विद्येची माहिती रणदिवे बंधूंमुळे वस्तादजींकडून आम्हांला झाली. नाहीतर वस्तादजींकडे आमचे जाणेयेणे शक्य नव्हते. मग आमच्यावर त्यांची कृपा कोठून होणार ? आप्पा–भाईवर वस्तादजींची कृपा म्हणा की माया म्हणा–परिपूर्ण होती व त्या बंधूंचे सर्वांवर प्रेम होते या योगामुळेच सर्व गोष्टी घडत आल्या.

रणदिवे बंधूंप्रमाणेच आम्ही बहुतेक जण त्यावेळी विद्यार्थीच होतो. व्यायाम शाळेत येणाऱ्या लहान मोठ्या सर्वांवर आप्पाची हुकमत चालत असे. त्याच्या शब्दाबरोबर वाटेल ते कष्ट व साहस करायला प्रत्येक जण तयार असे. इतके असूनही त्याचा स्वभाव निगर्वी, निरहंकारी. शिकवते वेळी मात्र त्याचा शिस्तीवर फार भर असे. त्यामुळे सर्वांना त्याचा वचक वाटे. माझा त्याचा संबंध आला त्या वेळी आम्ही दोघेही विद्यार्थी होतो. पण त्यानंतरच्या काळातही विद्यार्थ्यांची परंपरा चालूच होती. त्या सर्वांना आप्पाची शिस्तप्रियता माहिती होती. पुढे वंगभंगाच्या चळवळीनंतर विद्यार्थ्यांत राष्ट्रीय भाव निर्माण होऊ लागला. तालमेत येणाऱ्या विद्यार्थ्यांना व इतर मंडळीला आप्पाकडून राष्ट्रीय भावनेचा व देशभक्तीचा संस्कार मिळू लागला. पण या गोष्टी आप्पाचे विद्यार्थीजीवन संपल्यानंतरच्या आहेत.

या प्रकारे रणदिवे बंधूंची व्यायामविषयक शिक्षणप्रवृत्ती चालू असता त्याच सुमारास बर्वे नावाचे स्वदेशीवर व्याख्याने देणारे एक गृहस्थ धुळ्यास येऊन गेले. त्यांची अगलट काहीशी स्थूल पण चांगली मजबूत, कपडे स्वदेशी, डोक्याला किरमिजी रंगाचा रुमाल, चेहरा वाटोळा गोलदार, भाषण करण्याची शैली अस्खलित प्रवाहाप्रमाणे, शब्दात आवश, कडकपणा व धारदारपणा. पण आवाजात कर्कशता बिलकुल नाही, सरकारवर कडक टीका, भाषणाचे विषय स्वदेशी व गोरक्षण. त्यांचा देखावा व प्रवृत्ती ह्या प्रकारची होती. एकंदर धोरण समाजात विशेषतः तरुणांत देशभक्ती व सरकारविषयी अप्रीति व रोष निर्माण करण्याचे. त्यांच्यात वक्तृत्व व गांभीर्य दोन्हीही होती. त्यांची भाषणे नदीच्या वाळवंटात होत होती, विद्यार्थी वर्गाची खूप गर्दी व्याख्यानाला होत असे. तालमेतील आम्ही मंडळी व्याख्यानाला रोज जात असू. त्यात रणदिवे बंधूही असत. व्याख्यानांचा परिणाम विद्यार्थिवर्गावर बराच झाला. आम्ही पुष्कळांनी स्वदेशी कपडा वापरण्याचा निश्चय केला. घरात रॉकेल वापरण्याचे बंद केले.

आप्पा व भाई यांना घोड्यावर बसण्याचा फार नाद होता. दोघेही घोड्यावर बसण्यात पटाईत होते. त्यांचे वडीलही त्याबाबतीत त्यांची हौस पुरवीत असत. दोघांनाही पोहण्याची आवड होती. धुळ्याचे नदीला पावसाळ्याशिवाय पोहण्यासारखे पाणी कधीच नसे. पण पावसाळ्यात पोहणे धोक्याचे असे. पावसाळा संपल्यावर हत्तीडोहात काय ते पोहण्यासारखे पाणी असे. हत्तीडोह गावापासून बराच दूर, तरी रणदिवे बंधूंबरोबर आम्ही तालमेतील मंडळी तेथे पोहायला कधी कधी जात असू, पोहण्याची कला प्रत्येकाला चांगली अवगत असली पाहिजे असे त्यांचे सांगणे असे.

त्या काळात विद्यार्थ्यांना करण्यासारखी सार्वजनिक विधायक सेवाकार्ये दाखवून देणारा पुढारी कोणीच नव्हता. त्यामुळे विद्यार्थ्यांत असलेली प्रवृत्तिशीलता, कार्यशक्ती व सेवावृत्ती केवळ सुप्तावस्थेत राही. योग्य कार्य मिळून त्यांना प्रकट होण्याला व त्यांचा विकास होण्याला त्या काळात

काही साधनच कोणी दाखवू शकत नव्हता. धुळ्यात त्या वेळी कपाशीची सरकी काढण्याच्या जीनिंग फॅक्टरी होत्या व कापसाच्या गांठी बांधण्याचे प्रेस बरेच होते. त्यात कधी कधी अकस्मात आगी लागत व त्या भडकत असत. आग विझविण्याची आजच्यासारखी साधने त्या काळी तेथे नव्हती. अशा स्थितीत आगीपासून मालाचा जितका बचाव करता येईल तितका करण्याचा प्रयत्न करणे हेच मुख्य कार्य असे. अशा आपत्प्रसंगी आग विझवण्यास व माल बचावण्यास मोठ्या विद्यार्थ्यांचा फार उपयोग होत असे. कारखान्यात किंवा प्रेसमध्ये आग लागताच तेथील भोंगा मोठ्यातील मोठ्या आवाजात चालू होई. तो आगीचा 'डेंजर सिग्नल' ठरलेला होता. तो होताच हायस्कूलमधील वरच्या वर्गांना सुटी दिली जाई व तमाम मोठे विद्यार्थी आगीच्या स्थानावर जाऊन आपल्या शक्तीची, चपळतेची व साहसाची पराकाष्ठा करून आग विझवण्याचा व माल बचावण्याचा प्रयत्न करीत. त्या वेळी एकही विद्यार्थी आगीच्या जागी जाऊन आपले कर्तव्य केल्याशिवाय रहात नसे. रणदिवे बंधूंसह तालमेतील विद्यार्थी अशा प्रसंगीं आपला पुरा हिस्सा तेथील कार्यात देत असत.

मागे वर्णन केलेला जाहिरनाम्याचा प्रकार घडल्यापासून तालीम व व्यायाम यांमुळे आप्पा व भाई यांच्याविषयी ज्यांच्या मनात प्रथमपासून अप्रियता होती, त्यांची अप्रियता काही अशी वाढली. रणदिवे बंधूंना व्यायामाचे बाबतीत कोणाही वडील मंडळींचा पाठिंबा नव्हता. आप्पा व भाई अगदी प्रथम गोविंदराव जांदे यांच्या संगतीने व्यायामाकडे वळले तेव्हाही वडिलांना न कळतच त्यांना व्यायामशाळेत जावे लागे. पुढे व्यायामाने त्यांच्या प्रकृती सुधारल्यावर वडील मंडळींच्या मनातील पहिला विरोध काही कमी झाला, तरी त्या बाबतीत त्यांना प्रोत्साहन मिळाले असावे असे वाटत नाही. वडिलांचा स्वभावही अशा कोणत्या बाबतीत फार खोलात जाण्याचा नव्हता. आप्पाचे आजारीपण व दोघा भावांची लग्ने या प्रसंगात त्यांना कळून आले की या दोघांचा मित्रपरिवार खूप मोठा आहे व तो सर्व या दोघांवर फार प्रेम करणारा, प्रसंगी त्यांच्याकरिता खूप परिश्रम घेणारा व मनापासून झटणारा आहे, असे त्यांच्या वडिलांच्या व घरातील इतर सर्वांच्या प्रत्ययास आले. पण त्या सर्वांत आप्पा व भाई यांचे चुलते (सीताराम

आत्माराम यांचे कनिष्ठ बंधू ) काशिनाथ आत्माराम यांचा स्वभाव निराळाच असून त्यांचे आपल्या या दोन पुतण्यांवर प्रथमपासूनच फार प्रेम होते. त्यांना ह्या दोघांबद्दल एक प्रकारचा अभिमान होता की आपल्या कुळात ही दोन मुले केवळ रत्ने आहेत. ते मुंबईत रहात असत. तेथे त्यांचा काही व्यापारी व्यवसाय, काही एजन्सी वगैरे होत्या. ते मधून मधून धुळ्यास येत असत. आप्पा व भाई यांना वडीलांजवळ काही संकोच वाटे. परंतु काकांशी ते अगदी निःसंकोचपणे वागत असत. काकांचा स्वभाव फार प्रेमळ, मनमोकळा व दिलदार होता. त्यामुळे आप्पा व भाईही त्यांच्याशी मोकळेपणे वागत. दोघा बंधूंना आपल्या जीवनकार्यात प्रथमपासून त्यांचा आधार वाटे. आम्ही दोघा भावांचे मित्र म्हणून आमच्यावरही त्यांचे प्रेम होते. आप्पा व भाई यांच्या प्रवृत्तीचे बाबतीत घरातील किंवा बाहेरील कोणी आजूबाजूच्यांनी त्यांना नावे ठेवल्यास त्यांना ते सहन होत नसे. त्यावर ते त्यांना म्हणत " अप्पा व भाई हे किती सद्वर्तनी आहेत, किती सुस्वभावी आहेत, याची तुम्हांला कल्पना नाही. त्यांच्यात उदारता आहे. लोकांना उपयोगी पडण्याची, विद्यार्थ्यांना चांगले संस्कार लावण्याची वृत्ती त्यांच्यात आहे. त्याकरिता ते प्रयत्नशील आहेत. आपल्या शक्तीचा चांगल्या कार्यात उपयोग करण्याची त्यांना इच्छा आहे. त्यांच्यात देशभक्ती आहे, ते अत्यंत प्रेमळ व प्रामाणिक आहेत. दोष ठेवण्याला त्यांच्या वर्तनात जागा नाही. आपल्या समाजात, आपल्या जातीत त्यांच्यासारखे सद्गुणी मुलगे किती सांपडतील ? " अशा प्रकारे या दोघा पुतण्यांचा ते अभिमानाने कैवार घेत असत.

अशा प्रकारे घरच्या मंडळीपैकी त्यांच्या काकांचेच त्यांच्या प्रवृत्तीला प्रोत्साहन मिळे. बाहेरच्या शिक्षित मंडळींपैकी कोणाकडून प्रोत्साहन नसे. वस्तादजींकडून त्यांना सल्ला, प्रोत्साहन, ज्ञान, प्रेरणा ही नेहमी मिळत. हायस्कूलमधील एक शिक्षक पेटकर मास्तर सोडून बाकी सर्व शिक्षक मागे वर्णन केलेल्या सुशिक्षित व पांढरपेशा वर्गापैकी होते. पेटकर मास्तर स्वतः व्यायामाचे चाहते होते. त्यांचे शरीर व्यायामाने कसलेले होते. आप्पा व भाई त्यांच्याकडे जाऊन कधी कधी व्यायामाचे बाबतीत त्यांच्याकडून सल्ला घेत असत. मीही त्यांचेबरोबर त्यांचेकडे जात असे. मी पाचवीत

२

असता तेच माझे वर्गशिक्षक होते. ते नेहमी शांत, गंभीर व प्रसन्न असत. त्यांचेकडून रणदिवे बंधूंना प्रोत्साहन मिळत असे. बाकी घरच्या किंवा बाहेरच्यापैकी कोणाचाच त्यांना पाठिंबा किंवा प्रोत्साहन नसे. तो काळ असा होता की व्यायाम या विषयाकडे कोणाचेच आस्थापूर्वक लक्ष नसे. देशभक्तांनाही त्या विषयाची आवड नव्हती. व्यायामशाळेत दसरा व हनुमानजयंती हे दोन दिवस साजरे केले जात. पण तेही सार्वजनिकपणे नसून व्यायामशाळेच्या लहानशा जागेत व व्यायामशाळेतील मंडळीपुरतेच; साजरा करणारे तेच व प्रेक्षकही तेच, अशी त्या वेळची स्थिती होती. आजच्या प्रमाणे व्यायामशाळेच्या मार्फत सार्वजनिक समारंभ त्या दिवसांत कधीच केला जात नसे. त्यामुळे व्यायाम करणारांना सार्वजनिकपणे व त्या निमित्ताने बाहेर येण्याला अवसरच नसे. हायस्कूलच्या तर्फे क्रिकेटच्या मॅचेस होत असत. पण देशी व्यायामाला उत्तेजन मिळू शकेल अशा प्रकारचा कोठूनही सार्वजनिक अवसर, समय, योग किंवा संधी मिळत नसे. अशी व्यायामाचे बाबतीत वरिष्ठ मानलेल्या समाजात त्या काळी अनास्था होती. अशा स्थितीत व्यायामशाळेत येणाऱ्या मंडळीपैकी बहुतेक जण स्वतःच्या हौशीखातर व्यायामशाळेत येऊन व्यायाम करीत असत. काही रोजच्या सवयीमुळे तर काही मित्रत्वाच्या ओढीने, काही आरोग्य व शक्तिप्राप्तीच्या हेतूने व्यायामशाळेत येत असत, व रणदिवे बंधू आपल्या तरुणांची शरीरे चांगली सुदृढ व्हावी, त्यांच्यात बळ, स्फूर्ती वाढावी ह्या उच्च हेतूने व्यायामाचा प्रसार करण्याचे काम करीत होते. खरोखर पाहता आम्ही बहुतेक स्वतःतील तत्संबंधी काहीतरी आवड, प्रेम, सवयी वगैरेमुळेच त्या प्रवृत्तीत टिकून राहिलो होतो. बाहेरून प्रोत्साहन मिळण्यासारखी स्थितीच तेव्हा नव्हती. अशा स्थितीतील रणदिवे बंधूंच्या उच्च हेतुपूर्वक, निःस्वार्थपणे चालवलेल्या लोकोपयोगी महत्त्वाच्या कार्याचा व प्रवृत्तीचा विचार करता त्याबद्दल त्यांना कितीही धन्यवाद दिले तरी ते अपुरेच पडतील असे मला कृतज्ञतापूर्वक वाटते.

मी पाचवीत गेल्यावर थोड्याच महिन्यांत शाळा सोडून धुळ्याहून निघून गेलो व तेव्हापासून रणदिवे बंधूंचा माझा नित्याचा संबंध बंद पडला. तरी आमचा मधून मधून पत्रव्यवहार चाले. त्यावरून व्यायामशाळेची भर-

भराट होत असल्याचे व पहिल्यापेक्षा अधिक मंडळी व्यायामशाळेत येत असल्याचे मला कळे. विद्यार्थ्यांबरोबरच पुढे गावातील इतर मंडळी—वकील, डॉक्टर व अन्य व्यवसायीही व्यायामशाळेत अधिक संख्येने येऊ लागले होते. व्यायामशाळेची पहिली जागा फारच अपुरी होती. ती एकाददुसरे ठिकाणी बदलून शेवटी नदीच्या काठी उंचवट्यावर एक स्वतंत्र ऐसपैस जागा रणदिवे बंधूंनी मिळवून त्या ठिकाणी व्यायामशाळेची इमारत बांधली. ती चांगली सोयीस्कर बनवली. त्यात अनेक प्रकारच्या खेळांच्या सोयी निर्माण केल्या. हौदा मोठा बनवला. साध्या व मर्दानी खेळांकरिता विस्तीर्ण पटांगण बनवले. शिक्षणात चांगले क्रम बसवून व्यवस्था निर्माण केली. चांगले शिक्षक तयार होतील अशा योजना तयार करून त्याप्रमाणे कार्याची शिस्त बसवली. त्या विस्तीर्ण जागेला ‘ लोकमान्य उद्यान ’ हे नाव दिले. त्यात लोकमान्यांचा अर्धपुतळा बसवला. व्यायामशाळेचे पहिले नाव बदलून तिला ‘ विजय व्यायामशाळा ’ हे नाव दिले व काही वर्षांनी तेथे एक तलाव ( मोठा हौद ) पोहण्याकरिता निर्माण केला व त्याचे नाव ‘विजय तलाव’ ठेवले. अशा रीतीने रणदिवे बंधूंनी व्यायामक्षेत्रात पुढे अनेक वर्षांत निरनिराळ्या सुधारणा व सोयी निर्माण केल्या व व्यायाम या विषयाला अधिकाअधिक विकसित करीत त्याला उपयुक्त बनवण्याचा प्रयत्न केला.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम........................ दि: ....................
...... ........................ नों दि ....................

## २ : रामदासी संशोधन व कार्य

**मी** शाळा सोडल्यावर त्याच साली आप्पा व भाई याचा हायस्कूलचा अभ्यास पुरा झाला. आप्पाने ड्रॉइंगचा कोर्स घेतलेला होता तोही पुरा झाला. हायस्कूलचा अभ्यास पुरा होईपर्यंत दोघे बंधू बरोबरच होते. दोघांचीही विद्यार्थिदशा होती. दोघे मिळून व्यायामप्रवृत्ती चालवीत होते. दोघांचाही मित्रवर्ग एकच होता. दोघांचेही जीवन एकाच प्रकारचे होते. दोघांत अप्रतिम बंधुप्रेम होते. दोघांचे विचार, दोघांची मते, दोघांचे व्यवसाय, आदर्श, दैनंदिन जीवनक्रम सर्व सर्व काही एकसारखे व जवळ जवळ एकरूप होते. एकाचे जीवन तसेच दुसऱ्याचे. मूलभूत प्रकृती व स्वभाव यात काही भेद असेल तेवढाच. तोही लक्ष्यात घेण्यासारखा आहे. दोघांही भावांशी माझा जवळ जवळ सारखाच जिव्हाळ्याचा संबंध होता. माझे

बंधू धुळ्याहून गेल्यापासून माझी ह्या दोघांशी घनिष्ठता वाढली. तरी स्वभाव-भिन्नतेमुळे आप्पाशी माझा अधिक संबंध येई. ही स्थिती माझीच होती असे नाही. परंतु निकटच्या बहुतेक मित्रांचा अनुभव जवळ जवळ असाच होता. दोघेही सारखेच प्रेमळ, सारखेच सरळ व उदार, सारखेच शुद्धचरित. त्यांत कोणी कमी अगर अधिक असे नव्हते. दोघेही मितभाषी; पण त्यांतून आप्पात अधिक मनमिळाऊपणा व भाई अधिक गंभीर व खोल. बोलणे जितक्यास तितके, बेताचे. निदान त्या काळात तरी तसे होते. पुढे कॉलेजात गेल्यावर त्यात बदल झाला. पण त्याचा गंभीर व खोल विचारीपणा त्याच्या पुढील वकीलीच्या कामात त्याला पुष्कळ उपयोगी पडला. आप्पा लवकर उठून तालमेत येई. भाईची झोप लवकर पुरी होत नसे. आप्पामध्ये खूप तत्परता व चपळता. भाईचा स्वभाव धिम्मा, शांत. चटपट, खटपट त्याला जमायची नाही.

भाईच्या शिक्षणाचे लक्ष्य अगोदरपासूनच ठरलेले असावे. वडीलांचे वकीलीचे काम, त्यांची परंपरा त्यालाच चालवावी लागणार होती. त्याकरिता कॉलेजचे शिक्षण घेऊन त्याला एल्एल्. बी. होणे आवश्यक होते. म्हणून मॅट्रिक होताच पुढील अभ्यासाकरिता तो पुण्यास डेक्कन कॉलेजात दाखल झाला. त्या वेळी धुळ्यास कॉलेज नव्हते.

वडिलांचा विचार आप्पाने धुळ्यासच काही व्यवसायात पडावे असा होता व त्याप्रमाणे त्यांनी त्याला आपल्या खात्रीच्या एका प्रौढ वयाच्या व्यापाऱ्याबरोबर सराफीच्या धंद्यात जोडून दिले. त्यात त्याचा सोने, चांदी, खरेदी, विक्री, दुकान, गिऱ्हाईक यांच्याशी संबंध येऊ लागला. चांगल्या चांगल्या श्रीमंत व शेठसावकारांच्या ओळखी, भेटी–गाठी त्याला होऊ लागल्या. अजूनपर्यंत कोणत्याही प्रत्यक्ष व्यवहारात तो पडला नव्हता. परंतु आता पडल्यावर तो आपल्या स्वभावाप्रमाणे त्यात पूर्ण लक्ष देऊ लागला. ज्यांच्यापासून खरेदी करायची व ज्यांना माल विकायचा त्यांच्या देण्या-घेण्याच्या रीती, पद्धती, विचार, आचार, ज्ञान, अज्ञान वगैरे त्याला चांगले माहीत होऊ लागले. त्या व्यवहारातील सत्य·असत्य, फसवेगिरी हे सर्व तो जाणू लागला. त्या सर्वांतून त्याने निष्कर्ष काढला की, हा धंदा सचोटीचा

नाही. आप्पाचा स्वभाव सरळ व प्रामाणिक. असत्य किंवा फसवेगिरी करायचे त्याला कधी माहीत नाही. तो गिऱ्हाइकांशी खरेपणाने वागे. ते त्याच्या भागीदाराला बरे वाटेना. भागीदार दादांना ( आप्पाच्या वडीलांना ) या गोष्टी सांगे. आप्पानेही वडीलांना सांगितले की, हा धंदा मी करू शकणार नाही. हा लबाडीचा धंदा आहे. सचोटीचा नाही. वडीलांनी आप्पाला ह्या धंद्यातून मोकळे केले. आप्पाही मोकळा झाला. आप्पा प्रथमपासूनच सत्यनिष्ठ. तो असल्या धंद्यात कसा राहणार ? ज्याच्या जीवनाला काही उदात्त हेतू आहे, तो त्यात कसा टिकणार ? हजारो रुपये कमवून देऊन धनवान बनवणारा धंदा, त्यातील फसवेगिरी लक्ष्यात येताच, आप्पाने ऐन तारुण्यात एकदम सोडून दिला. सर्व बाजूंनी धंद्याची अनुकूलता असता तो किंचितही लोभात फसला नाही हेच त्याचे त्या वयातील वैशिष्ट्य व ते त्याला राखता आले यातच त्याची खरी धन्यता. वाटेल ते करून धनिक होण्याकरिता आपले जीवन नाही याची त्याला स्मृती होती. आपल्या जीवन-विषयक ध्येयाचे त्याला स्मरण होते. धंदा सोडल्याने वडीलांना काय वाटेल याची त्याला कल्पना होती. पण ती असूनही आपली दानत शुद्ध राखणे व आपल्या जीवन – आदर्शाच्या विरुद्ध न वागणे हेच आपले कर्तव्य व हाच आपला धर्म आहे याचेही भान त्याला होते. त्या धर्मश्रद्धेच्या बळावर व्यावहारिक दृष्ट्या पुष्कळच लाभदायक व फार परिश्रम करावे न लागता पैसे मिळवून देणारा धंदा सोडून तो मोकळा झाला. धंद्यातील खरी स्थिती आप्पाने वडिलांना समजावल्यावर आप्पाच्या निश्चयात किती पवित्रता व उदात्तता आहे ते वडिलांना कळून आले व पुत्राच्या सात्विक, निर्लोभी व निष्पाप अंतःकरणाबद्दल त्यांना आनंद व अभिमान वाटला.

आप्पा धंद्यातून मोकळा झाला पण पुढे काय करायचे हा प्रश्न त्याला पडला. व्यायामाचे कार्य त्याच्यावर होते. पण जीवन–निर्वाहाकरता वडिलांना सहाय्य करण्याकरिता म्हणून काही व्यवसाय त्याला पाहिजे होता. संसाराची जबाबदारी त्याच्यावर नव्हती. वडिलांची वकिली चालू होती. सार्वजनिक रचनात्मक सेवाकार्य त्या काळात कोणाला सुचत नव्हते. तशा प्रकारच्या संस्थाही निर्माण झालेल्या नव्हत्या. अशा स्थितीत काही चांगले वाचन वगैरेने आपले ज्ञान वाढवण्याच्या विचारात तो होता. त्या सुमारास

त्याचे मित्र गोविंदराव जांदे यांनी शंकर श्रीकृष्ण (नानासाहेब) देव यांची व आप्पाची ओळख करून दिली. देव त्या काळी अगदी तरुण होते. धंदा वकीलीचा होता. त्यातले ते फार हुशार अशी त्यांची थोड्याच दिवसात ख्याती झालेली होती. ते लोकमान्य टिळकांच्या लॉ क्लासमध्ये शिकलेले. टिळकांचे अनुयायी व देशभक्त समजले जात होते. त्यांचे मित्र भास्कर वामन (तात्यासाहेब) भट व गोविंदराव (नानासाहेब) चांदोरकर हे दोघेही वकील होते. या तिघांनी मिळून धुळ्यास 'सत्कार्योत्तेजक सभा' या नावाची संस्था स्थापन केली होती. तिच्यामार्फत पुस्तके प्रसिद्ध केली जात असत. तीत बहुशः देशभक्तीचा भाग मुख्यपणे असे. हे तिघे मित्र देशभक्त म्हणून खानदेशात प्रसिद्ध होते. त्यापैकी देवांची समर्थ रामदास स्वामी यांचेवर श्रद्धा होती. भट वकिलांना इतिहासाची विशेष आवड होती व चांदोरकरांना ज्ञानेश्वरी व वारकरी पंथ प्रिय होता. तिघांत चांगलाच मित्रभाव होता. तिघेही तरुण असून वकिलीच्या धंद्यात पडलेले होते. देव वकिलांच्यामुळे आप्पाचा भट व चांदोरकर यांच्याशी संबंध आला. त्यांतूनही आप्पाचे देव वकिलाशी अधिक जमले. त्यांची त्याला अधिक संगत लागली. देवांची समर्थांवर फार श्रद्धा. त्यामुळे शुद्ध दासबोध प्रसिद्ध करण्याची त्यांची इच्छा होती. त्यांनी कल्याण स्वामींच्या हातचा मूळ दासबोध मिळवला व तो निर्णयसागर छापखान्यात छापवला. ही गोष्ट सन १९०५ मधील. त्यानंतर नानासाहेब देवांची इच्छा की रामदासी संप्रदायाचे मठ वगैरे धुंडून त्यातून समर्थांचे व रामदासी सांप्रदायाचे वाङ्मय शोधून काढून त्यातील उपयुक्त वाटेल ते छापून काढावे. आप्पासारखा परिश्रमी, हुशार व समर्थांविषयी श्रद्धावान तरुण कार्यकर्ता सहाय्यक म्हणून मिळाल्यामुळे हे सर्व नानांना सुचले असावे असे मला वाटते. नानांचे मनात समर्थांविषयी अपार श्रद्धा. पण त्या श्रद्धेतून त्यांना वाङ्मयप्रसिद्धीचे कार्य सुचले. त्यांना वाटे समर्थांचे वाङ्मय प्रसिद्ध करून त्याचा महाराष्ट्रात घरोघर प्रचार करणे, त्याकरिता वाटेल ते कष्ट सहन करणे, पैसा खर्च करणे हीच समर्थांची खरी सेवा व भक्ती. यांतच देशभक्ती आहे व यानेच देशाचा उद्धार होणार आहे. अशा प्रकारची श्रद्धा सर्वांच्या मनात उत्पन्न व्हावी हा त्यांचा सर्व प्रयत्नांतील हेतू.

आप्पालाही ते या प्रकारे समजावीत व सांगत असत. आप्पाच्या मनात समर्थांविषयी फारच पूज्यभाव व श्रद्धा होती. परंतु त्यांचे वाङ्मय प्रसिद्ध करून त्याचा प्रचार करण्याने देशोद्धार होईल अशी त्याची श्रद्धा नव्हती. तरी त्याचा स्वभाव काहीसा संकोचशील. त्यातून त्याच्या स्वभावात मित्र-निष्ठा पुष्कळच व मुख्य गोष्ट म्हणजे त्या काळात त्याच्या योग्य, त्याच्यातील स्वभावसिद्ध गुणांना, कर्तृत्वाला व पुरुषार्थाला लायक व पोषक असे कार्य त्याला स्वतःला सुचत नव्हते व तसे कार्य दाखवून देईल असा कोणी त्याला मिळत नव्हता. अशा स्थितीत साधारणपणे बरे असे जे कार्य मिळाले ते करावे या विचाराने तो देव वकिलांच्या कार्यात पडला असावा. कार्यात स्वतःचा व्यावहारिक लाभ अगर स्वार्थ नाही व कार्य थोडे फार उपयुक्त आहे. नानासाहेबांशी चांगली मैत्री झाल्यामुळे मित्रकार्य करावे, त्यांना या वेळी सहाय्य न केल्यास कार्य पडून राहील, इतकाच त्याच्या दृष्टीने त्यात अर्थ असावा अशी माझी समजूत आहे. कारण मला आप्पाबरोबर या कार्यार्थ पुष्कळ फिरावे लागले आहे.

कार्याचा नियमच असा आहे की, एका कार्याला प्रारंभ केला की, त्याच्या सिद्धीकरिता त्याच्या अनुषंगिक अनेक उपाधी कराव्याच लागतात. नानांची इच्छा केवळ दासबोध छापण्याने पुरी न होता त्यातून रामदासी संशोधनाची कल्पना त्यांना सुचली. संशोधनाकरिता रामदासी मठ, मंदिरे व इतरही स्थाने धुंडाळावी लागली. जेथे जेथे रामदासी वाङ्मय सापडण्याचा व शिवकालीन माहिती मिळण्याचा संभव, तेथे तेथे आप्पाला प्रथम नानांच्या बरोबर व नंतर एकटेच जावे लागे. त्याकरिता तत्कालीन ऐतिहासिक संशोधन करावे लागले. संशोधनाकरिता महाराष्ट्रभर-विशेषतः पुणे, सातारा, कुलाबा, रत्नागिरी, मावळ, नाशिक हे जिल्हे, मोंगलाई निजामशाही म्हणजे आजचा मराठवाडा, कर्नाटकातील काही भाग-थेट तंजावरपर्यंत—वरचेवर चकरा घालाव्या लागल्या. आजची मोठी शहरे सोडून गावोगाव, खेडीपाडी यांतून रखडावे लागले. जाण्यायेण्याची साधने त्या काळात आजच्यासारखी नव्हती. अगदी अल्पवस्तीची पण पूर्वकाळात महत्त्वाची असलेली गावे, गड, किल्ले वगैरे जागी रानावनातून, डोंगरकपाऱ्यातून, दऱ्याखोऱ्यातून, पायी, पाठीशी सामान बांधून उपाशीही त्याला फिरावे

लागले. लोकांना समजावून, त्यांची मनधरणी करून, त्यांना खुश क! कागदपत्र दाखवायला त्यांना तयार करावे लागे. कोणाची ओळख नाही-देख नाही, अशा ठिकाणी जाऊनही तेथे आपल्याला विश्वासाने कागद कोण दाखवणार ? जुन्या मठातून, जुनाट अंधाऱ्या घरांतून, खोपटांतून धुरळा व कोळिष्टकांनी भरलेला गळाटा उपसून त्यातून कागद शोधावे लागत. त्यांतून काही उपयुक्त मिळाले तर लोक ते द्यायला तयार नसत. पाहिजे तर नकला करून घ्या म्हणत. नकला करून घ्यायच्या म्हणजे सर्व बाजूंनी गैरसोयी असलेल्या जागी रहावे लागे. तेथे मिळेल ते खावे, असेल तशा जागी झोपावे, अशा प्रकारे दिवसच्या दिवस, महिनेच्या महिने आप्पाने एकनिष्ठेने काम करीत काढले आहेत. नानासाहेब देवांच्याने अशा हाल अपेष्टा सोसवत नसत. ते केव्हा तरी सुटीत प्रमुख व साधारण सोयीच्या ठिकाणी येत असत. बाकी सर्व ठिकाणच्या कामाचा भार आप्पावरच पडे. लोक साशंकपणे त्याच्याकडे पहात. हा कोण आहे ? काय हेतूने आपले कागदपत्र पहायला मागतो – घेऊन जातो, नकला करून घेतो ? सरकारी माणूस असावा. आमचे वतनासंबंधी कागद पाहून घेऊन नंतर आमची वतने, इनामे घेण्याचा सरकारचा इरादा असावा. कोणी समजत, असे कागद एकत्र करून ते छापून पैसे मिळवण्याचा याचा धंदा असावा. अशा एक ना दोन, अनेक शंका जागोजागी लोक घेत. त्या फेडीत, निवारीत प्रवास करीत त्याला काम करावे लागे. मला या स्थितीचा पूर्ण अनुभव असल्यावरून मी हे लिहीत आहे. कित्येक वेळा आप्पाबरोबर मला या कार्यात फिरावे लागले आहे. माझी या कार्यावर देवांच्याप्रमाणे श्रद्धा नव्हती. तरी आप्पा जसा त्याची स्वतःची श्रद्धा नानासाहेबांच्याप्रमाणे नसता त्यांच्या कार्याकरिता हाल कष्ट सोशीत होता त्याचप्रमाणे मी बरोबर असल्याने आप्पाला कष्ट कमी पडतील, त्याच्या अडचणीत मला त्याला काही साह्य करता येईल, तो संकोचशील आहे त्यामुळे त्याला सोसाव्या लागणाऱ्या गैरसोयी मी त्याचेबरोबर असल्याने क.ही कमी करू शकेन. त्याचेबरोबर मी राहिल्याने दोन महिन्यांचे काम एक महिन्यात व महिन्याचे पंधरा दिवसांत आटोपले जाईल अशा प्रकारच्या अनेक हेतूंनी मी त्याच्या-बरोबर हिंडे, फिरे, संशोधन करी व हालअपेष्टा सोशी. त्याने मला

बोलवल्यावर किंवा बरोबर येण्याविषयी विचारल्यावर मी त्याला कधीही नाही म्हणालो नाही. याचे कारण त्याच्यावर माझे अतोनात प्रेम होते. त्याचे कष्ट कमी करण्यात मला आनंद वाटे. स्वतः हालअपेष्टा सोसण्यात मला धन्यता वाटे. आणि खरोखर स्थिती तशीच होती. त्याला एकाकी फिरावे लागत असता त्याच्या संकोचशील व आपल्याकरिता कोणाला त्रास पडू न देण्याच्या स्वभावामुळे त्याला किती सहन करावे लागे याची यथार्थ कल्पना आम्ही दोघे बरोबर असता मला येई. व मी त्याचेबरोबर असल्या-बद्दल मला समाधान वाटे. कित्येक जागी माझी ओळख असल्यामुळे त्याला त्रास न होता त्याचे काम सहज होऊन जाई तेव्हा मला संतोष वाटे. अशा स्थितीत अनेक वेळा पुणे, सातारा, कुलाबा, रत्नागिरी वगैरे जिल्हे व मावळचा भाग यांतील अनेक खडतर जागांतून, दऱ्याखोऱ्यांतून आम्ही बरोबर रखडलो आहो. त्यात मला प्रसन्नता वाटे. अपरिचित स्थानांतून, निरनिराळ्या गैरसोयीच्या ठिकाणी, कष्टतर कार्याकरिता, लोकांना आपल्या कार्याचे महत्त्व समजत नसता, त्यांचा आपल्यावर विश्वास नसता, आपल्या कार्यसिद्धीकरिता एकट्याने फिरत राहणे व दोघांनी फिरणे यात किती फरक आहे याचा आप्पाला दर ठिकाणी अनुभव येई व मी बरोबर असल्याबद्दल त्याला आनंद वाटे. तो त्याचा आनंद पाहून मला समाधान वाटत असे. शिवाजी महाराजांविषयी आमच्या दोघांच्या मनांत नितांत भक्तिभाव. त्या महापुरुषाने घोड्यावरून किंवा पायांनी कैक वेळा भ्रमण केलेल्या मुलुखातून प्रवास करतांना आम्हांला काय वाटत असे, हृदयात काय काय विचार, भावना उसळून येत असत! सज्जनगड, चाफळची रामघळ, शिवथरची घळ, रायगड, प्रचंडगड (तोरणा), प्रतापगड, जावळी, चंद्रराव मोऱ्याच्या डोंगर-कपारातील गुप्त जागा, भुयारे वगैरे ठिकाणी आम्ही काय काय अनुभवले त्याचे वर्णन कसे करणार? शिवथरची घळ-जीत समर्थांचे वास्तव्य मधून मधून काही काळ होत असे, जेथे ते आनंदाने, शांतिपूर्वक कैक दिवस रहात असत-ती जागा कित्येक वर्षे शोधीत असता सापडली नव्हती. ती एका फेरीत आम्ही दोघे बरोबर असता सापडली. ती घळ महाडवरून भोरकडे जाणाऱ्या रस्त्याने वरंध घाटाने वर चढून गेल्यावर तेथून डाव्या हाताला खालच्या प्रदेशात पायवाटेने

उतरल्यावर आम्हांला सापडली. त्या वेळी आप्पाला केवढा आनंद झाला! नानासाहेब देवांची कैक वर्षांची एक इच्छा पूर्ण झाली या गोष्टीचाच त्याला आनंद झाला. अशा प्रकारे फिरत-रखडत मला आप्पाबरोबर अनेक वेळा जावे लागले आहे. एकदा तंजावरला आम्हाला एक महिना रहावे लागले. अनेक प्रकारच्या अडचणी, गैरसोयी सहन कराव्या लागल्या. हाती धरलेल्या एका कार्यातील सिद्धीकरिता अनुषंगिक किती कार्यांचा व्याप सहन करावा लागतो याचे दिग्दर्शनाकरिता इतके लिहावे लागले. संशोधनाचे बाबतीत फिरण्याचे प्रसंगांत आप्पाला किती प्रकारे सहन करावे लागले याची अनुभवात्मक माहिती मला असल्यावरून मी हे लिहू शकलो. ज्या ज्या प्रदेशांत, ज्या ज्या ठिकाणी आम्ही फिरलो तेथील अनेक देखावे, तेथील लोकस्थिती, अज्ञान, दारिद्र्य, तेथील प्रजेची पिळवणूक ही सर्व आजही माझ्या डोळ्यासमोर येत आहेत. त्या त्या विशिष्ट प्रसंगीच्या निरनिराळ्या भावनांनी हृदय भरून येत आहे. रामदासी संशोधनाकरिता आप्पाने किती व किती प्रकारे सोसले आहे त्याची पूर्ण कल्पना तशा प्रकारच्या अनुभवाशिवाय कोणाला येणे शक्य नाही.

अशा प्रकारची रखडपट्टी आप्पाने कैक वर्षे केली. संशोधन म्हणजे केवळ फिरणे नसून फिरण्यात गोळा केलेले कागदपत्र घरी आणल्यावर त्यातूनही उपयुक्त कागद निवडून काढणे, ते छापण्याला सोयीस्कर असे लिहून काढणे ही कार्ये करावी लागतात. कागद लिहून काढण्याचे काम आप्पा व शंकरराव देव यांनाच प्रथम प्रथम करावे लागे. त्यातूनही आप्पाच्याच वाट्याला ते काम अधिक येई. छापायला व प्रसिद्ध करायला योग्य कागदांची निवड करणे हे नानांचेच काम असे. निवड झाल्यावर कागद छापून काढणे, ते प्रसिद्ध करणे ही सर्व कामे आप्पावर पडत. रामदास-रामदासी मासिक त्या कार्याकरिता काढावे लागले. अनेक ग्रंथ तयार होतील इतकी सामग्री तयार झाल्यावर ते ग्रंथ छापण्याकरिता स्वतःचा छापखाना पाहिजे. तो काढण्याचे काम आप्पावरच पडले. संशोधनाचे प्रकाशन सत्कार्योत्तेजक सभेमार्फत होई. आप्पाने विनावेतन उलट स्वतःचे पैसे खर्चून फिरण्याची कामे केली. सार्वजनिक कामांतून त्याने कधी एक पैसाही घेतला नाही किंवा स्वतःकरिता वापरला नाही. पण स्वतःचेच पैसे त्यात खर्च केले

आहेत. फिरण्याचे प्रसंगांत नानासाहेब बरोबर असले तरी तो स्वतःकरिता स्वतःचे पैसे खर्च करीत असे. नानांचे बरोबर असतां त्याला पायी प्रवास करावा लागत नसे. नानांचे बरोबर आगगाडीने किंवा घोडागाडीने अगर बैलगाडीने प्रवास होई. सार्वजनिक कामात आप्पाची या प्रकारची निःस्पृह वृत्ती होती.

ग्रंथ प्रकाशन, रामदासी मासिक छापून काढणे ह्याकरिता आप्पाने देवांच्या इच्छेनुरूप त्यांच्याच सल्ल्याने छापखाना काढला. त्याचे नाव 'आत्माराम छापखाना' असे ठेवले. आत्माराम हे आप्पा भाईंच्या आजोबाचे नाव. छापखान्याचा खर्च बहुतेक आप्पालाच करावा लागला. तो चालवण्याकरिता त्यातील लहानमोठ्या कामांचे ज्ञान असले पाहिजे म्हणून आप्पाने स्वतः मुंबईस राहून कामाची चांगली माहिती करून घेतली. त्यात फोटोग्राफीची जरूरी लागे म्हणून ते कामही तो शिकला. आत्माराम छापखाना चालवण्याची सर्व जबाबदारी आप्पावरच होती. त्यात कामाची वाटणी म्हणून मॅनेजरचे काम विष्णुपंत किल्लेदार यांना चांगले तयार करून त्यांच्याकडे ते सोपवले. किल्लेदार फारच सज्जन, मेहनती, बुद्धिवान व प्रामाणिक. ते मिळाल्याने आप्पाचे कष्ट काही कमी झाले. आप्पाच्या संसर्गात व संबंधात सर्व जीवनात मिळून अनेक चांगली माणसे आली. त्यापैकी विष्णुपंत किल्लेदार हे एक होते. ते तत्त्वनिष्ठ तितकेच विश्वासपात्र. आप्पाच्या अखेरीपर्यंत ते त्याच्याशी एकनिष्ठपणे वागले. सेवापरायणवृत्तीही त्यांच्यात पुष्कळ. आप्पाला त्यांच्यापासून फार संतोष होता.

वर वर्णन केल्याप्रमाणे आप्पाचे काम याच दिशेने वाढत चालले होते. काही वर्षांनी आत्माराम छापखाना त्याने काढून टाकला; पण जुन्या संग्रहित कागदपत्रांकरिता व ग्रंथाकरिता इमारत बांधण्याचे काम व त्याच्याच अनुषंगाने निर्माण झालेल्या अन्य कारणांमुळे आणखीही तशाच प्रकारची कामे त्याच्यावर पडत गेली. इमारतीच्या कामांची त्याला माहिती किंवा ज्ञान नव्हते. त्याला स्वतःचे घर बांधावे लागले तेव्हा त्यात त्याला साहाय्य व सल्ला देणारे दामुआण्णा बर्वे या नावाचे गृहस्थ होते. त्यांच्याकडून बांधकामाची काही माहिती व ज्ञान त्याला झालेले होते. पण पुढे जसजशी

त्याच्यावर या प्रकारची कामे येऊन पडत गेली तसतसे त्याने त्या विषयांतील पुस्तके वाचून पुष्कळ ज्ञान प्राप्त केले. निजामहद्दीत ( मराठवाड्यात ) जांब हे गाव रामदासी सांप्रदायाचे तीर्थस्थान आहे. ते समर्थांचे जन्मस्थान. स्वामींच्या जन्मस्थानी त्यांचे मंदीर बांधावे अशी नानासाहेब देवांची सर्वात मोठी आकांक्षा. ती आप्पाच्या परिश्रमाशिवाय पूर्ण होणे जवळ जवळ अशक्य होते. लाभामुळे लोभ वाढत जातो असा नियम आहे. त्या नियमाप्रमाणे नानांच्या मूळ साधारण आकांक्षा आप्पाच्या सहाय्याने जसजशा पूर्ण होत गेल्या तसतशा त्या पुढे मोठ्या प्रमाणाने वाढत चालल्या. त्यातीलच जांबेचे मंदिर ही त्यांची एक आकांक्षा. ती सफल होण्याकरिता किती परिश्रम आप्पाला पडले, किती चिंता, किती त्रास सहन करावा लागला ते जाणणाऱ्यांपैकी सध्या कोणी क्वचितच शिल्लक राहिले असतील. तरी त्यांच्या व्यायामशाळेतील त्यांच्याकडून शिक्षण घेतलेले व नानासाहेब देवांचे अनेक कार्यातील सेक्रेटरी शंकरराव जोग आता वृद्ध झालेले आहेत. त्यांनाही त्या कार्यात कष्ट पडलेले असल्यामुळे त्यांना आप्पाच्या कष्टांची माहिती आहे. जांबेच्या मंदिराचे व एकंदर रामदासी कार्याचे बाबतीत आप्पाबद्दल नानासाहेब देवांचे पुढील धन्योद्‌गार वाचल्याने आप्पाच्या कष्टांची काही कल्पना येण्यासारखी आहे. नानासाहेब देवांनी जाहीरपणे लेखांकित केलेले शब्द पुढीलप्रमाणे आहेतः—

## धन्योद्गार !

" जांबेच्या मंदिरासंबंधी मी सारा भार आप्पासाहेबांवर टाकला होता. सर्वथैव निःस्वार्थपणे, निस्पृहपणे आणि निमूटपणे मित्रसेवा, जनसेवा, राष्ट्रसेवा आणि श्रीसमर्थसेवा करण्याची आप्पासाहेबांची वृत्ती अलौकिक होय. हे त्यांचे सारे मित्रही कबूल करतील. आप्पासाहेबांच्या उदाहरणावरून इतरांनी शक्य तर बोधच घ्यावा म्हणून मी निःशंकपणे असे म्हणू शकतो की, गेल्या चाळीस वर्षांच्या तुटपुंज्या सार्वजनिक आयुष्यात मी हजारो स्वयंसेवक पाहिले पण आप्पासाहेबांसारखा निखालस निरपेक्षपणे सेवा करणारा मी दुसरा पाहिला नाही. माझ्यापासून आजपर्यंत जे थोडे रामदासी कार्य

झाले ते आप्पासाहेबांसारखा मित्र न मिळता तर होण्याचा संभव नव्हता. श्री समर्थमंदिराचे शिखर माझ्या दृष्टीस पाडण्याचे सारे श्रेय कोणास आहे हे सांगून टाकून किंचित ऋणमुक्त होत आहे. मी फक्त दौरे काढून श्रीसमर्थांची प्रार्थना करीत व गुणानुवाद गात मंदिरासाठी भिक्षा मागितली व जरूर तो निधी मिळवला. पण मंदिराच्या उभारणीची लहानमोठी किचकट ज्ञानाची, नाजुक जबाबदारीची सारी कामे आप्पासाहेबांनीच पार पाडली. आप्पासाहेब तीस वर्षे संगतीत असूनही वास्तुशास्त्राचे ज्ञान त्यांस असल्याचे निदर्शनास आलेले नव्हते."

जांबेचे समर्थ मंदिर व त्याच्या बाजूची इमारती कामे पूर्ण झाल्यावर रामदासी संशोधनातील कागदपत्र सुरक्षित राखण्यासाठी धुळे येथे 'समर्थ वाग्देवता-मंदिर' नांवाची इमारत बांधली. त्याचे बाजूला हरिहराश्रम शंकरराव देवाना राहण्याकरिता बांधला. अतिथि म्हणून तेथे येणाऱ्याकरिता बांधलेली इमारत अभ्यागताश्रम, ह्याप्रमाणे एका मागून एक अशी अनेक कामे आप्पावरच पडत गेली व ती त्याला त्या त्या प्रसंगी जबाबदारी घेऊन पार पाडावीच लागली.

रामदासी संशोधनात आप्पाने जीवापाड परिश्रम केले. परंतु त्यातूनही राहिली साहिली त्याची कसोटी विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांच्याबरोबर इतिहास संशोधनाचे कार्यात त्यांना मदत करण्याकरिता म्हणून खेडोपाडी फिरण्यात झाली. राजवाडे यांना जाणणारे आताच्या पिढीत क्वचितच कोणी सापडतील. त्यांच्याबरोबर कार्य करण्याचा प्रसंग ज्यांना आलेला असेल तेच त्यांचा स्वभाव जाणत असणार. त्यांच्याशी सहकार्य करणे किंवा निभावून घेणे अत्यंत कठीण होते यात शंका नाही. पण तेही आप्पाने सहन करून निभावून घेतले होते. देव वकीलांनी सांगितल्यावरून आप्पा हा राजवाडे यांचेबरोबर राहिला होता. त्या प्रसंगीच्या त्यांच्या विलक्षण स्वभावाच्या गोष्टी व अनुभव त्याने मला सांगितले तेव्हा मी त्याला म्हणालो, "आम्ही कोणीच तुझ्यासारखे सहन केले नसते. तूच हे सहन करू शकलास. पण तुला तरी इतके सहन करण्याची जरूरच काय होती ?" तेव्हा तो म्हणाला, "नानांच्या

सांगण्यावरून मी त्यांना कबूल केले होते म्हणूनच मी त्यांच्याबरोबर राहिलो, नाही तर राहिलो नसतो." आप्पाचा स्वभाव अशा प्रसंगात फार संकोचशील व भिडस्त, शक्य तोवर दुसऱ्याला वाईट वाटेल असे न करण्याचा. राजवाड्यांचा स्वभाव मी जाणत होतो. ते अत्यंत शीघ्रकोपी. थोड्याशाही मतभेदाने किंवा विरोधाने संतापून जाण्याचा त्यांचा स्वभाव व त्यातूनच कधी कधी अस्तन्या सारून पुढच्या प्रसंगावर येण्याची त्यांची तयारी असे. त्यांच्यात काही सद्गुण होते यात शंका नाही. ते देशहिताचे कार्य स्वार्थ-त्यागपूर्वक करीत होते. या एकाच भावनेमुळे आप्पाने त्यांना साहाय्य केले. राजवाड्यांचे बाबतीत आप्पा असेही माझ्याजवळ बोलला होता की, त्यांच्याबरोबर राहिल्याने मला संशोधनाचे बाबतीत काही ज्ञान झाले, संशोधनाची पद्धतीही समजली. असो. काही झाले तरी आप्पा राजवाड्यांच्या कसोटीवर कसला जाऊन कसोटीला उतरला यात संशय नाही.

रामदासी संशोधनाच्या निमित्ताने आप्पा व मी सर्व महाराष्ट्रभर अनेक-वेळा फिरलो–रखडलो. त्यात संशोधनाच्या दृष्टीने आम्हाला लाभ वाटला नाही. तरी महाराष्ट्रातील निरनिराळी स्थाने, गड, कोट, किल्ले, दऱ्या, डोंगर, तिकडील जनतेची परिस्थिती, नैसर्गिक भौगोलिक स्थिती, जाण्या–येण्याचे गुप्त–प्रकट मार्ग, सोयी यांचा आपल्या संकल्पित कार्यात कितपत उपयोग होऊ शकेल, याचा अंदाज काढायला त्याचा उपयोग झाला. संशोधनाचे बाह्य निमित्त या कामी आम्हांला उपयोगी पडले यात मात्र शंका नाही.

## ३ : व्यायाम प्रगती व क्रांतीच्या खटपटी

रणदिवे बंधूंच्या जीवन चरित्रातील आप्पाच्या रामदासी कार्यांची माहिती देण्यात विषयाच्या संदर्भाप्रमाणे व ओघाप्रमाणे त्याच्या जीवनातील पुष्कळच पुढील भागापर्यंत जावे लागले. म्हणून व्यायाम व इतर कार्यांच्या हकीकतींचा मागे सोडलेला धागा आता पुनः येथून जुळवून घ्यावा लागत आहे. सराफीच्या दुकानाचे काम आप्पाने सोडल्यावर तो व्यायामाच्या कार्याकडे अधिक लक्ष पुरवू लागला. भाई मधून मधून सुटीच्या दिवसात धुळ्यास आल्यावर तोही त्याला त्या कार्यात सहाय्य करीत असे. शिवाय इतर मंडळीही शिकविणारी हळूहळू तयार होत होती व काही तयार झालीही होती. त्या काळी तरुणांच्या मनात देशविषयक भाव विशेषसा जागृत झालेला नव्हता व थोडा फार जेथे जागृत झालेला असे तेथेही

प्रत्यक्ष काही रचनात्मक कार्य करणाऱ्या संस्था किंवा योजना निर्माण झालेल्या नव्हत्या. लोकमान्य टिळक, ना. गोखले यांच्यासारखे पुढारी आपआपल्या मतानुसार काम करींत होते. आगरकरांचा सुधारणावाद तोपर्यंत बहुजनसमाजाला रुचला नव्हता. स्वतः आगरकर पूर्वीच निघून गेले होते. महर्षि रानडेही दिवंगत झाले होते. टिळक, गोखले, यांचे जहाल मवाळ असे दोन पक्ष पडले होते. यातील मवाळ हे नाव जहाल म्हणवणारानी दुसऱ्या पक्षाला दिलेले असावे. तो पक्ष स्वतःला नेमस्त म्हणवीत होता. पण त्या दोनही पक्षांचे प्रत्यक्ष कार्य म्हणजे वर्तमानपत्रे चालवणे व व्याख्याने देऊन आपआपली मते प्रतिपादन करीत समाजात काही जागृती निर्माण करणे इतकेच होते. त्यातही ‘ मतामतांचा गलबला, कोणी पुसेना कोणाला ’ अशीच अवस्था बहुतेक होती. गणेशोत्सव, शिवाजी उत्सव यासारख्या प्रवृत्ती त्या काळात देशभक्तीच्या मानल्या जात होत्या. पण त्यात रमण्यासारखा आप्पा व भाई यांचा स्वभाव नव्हता. व्यायामाचे कार्य देशहिताच्या दृष्टीने करण्याकडे त्यांचा ओढा होता व त्याप्रमाणे ते दोघे कार्य करीत होते. पण तेवढ्याने त्यांना समाधान नव्हते. व्यायामाने अंगात आलेल्या गुणांचा देशहिताच्या दृष्टीने उपयोग कसा करायचा ते त्यांना सुचत नव्हते. स्वदेशी कपडा, स्वदेशी माल-वस्तु वापरणे या गोष्टी त्यांना पटत होत्या. पण तेवढ्याने स्वातंत्र्य मिळणार नाही म्हणून त्यापेक्षाही व्यापक व परिणामकारक अशा योजना, रचना यांची त्यांना आवश्यकता वाटत होती. ही स्थिती केवळ आप्पा व भाई यांचीच होती असे नसून त्या काळातील काही तरुणांची तरी अशी स्थिती होती. पुढारी आपआपल्या मताप्रमाणे उपदेश करीत होते. तरुण तो ऐकत होते; पण वर दर्शविलेल्या मनःस्थितीतील तरुणांना तेवढ्याने स्वतःतील क्रियाशक्तीला रस्ता मिळत नव्हता. त्यांतून त्यांना काही सापडत नसे. अशा समयात माझी व आप्पाची मुंबईस भेट झाली व तो मला धुळ्यास घेऊन गेला. त्यातील हेतू पुष्कळ दिवसांत आम्हाला स्वस्थपणे बोलायला मिळाले नव्हते ते मिळावे हा होता. हा समय आप्पा रामदासी कार्यात पडण्यापूर्वीचा होता. धुळ्यास गेल्यावर मी तालमेची प्रवृत्ती पाहिली. ती मागे लिहिल्याप्रमाणे वाढत्या प्रमाणावर दिसली. मला आप्पा मुद्दाम बोलण्याकरिता घेऊन आला होता. त्यापूर्वी मी एकादे वेळी धुळ्यास येऊन

गेलो असेन; पण तो फारच घाईघाईने. हा वेळेपर्यंत आप्पाला माझ्या जीवनक्रमाची किंवा मी शाळा सोडून एकाएकी निघून का गेलो याची काहीच माहिती नव्हती. मी व्यायामाचे कार्य करीत असल्याचे मात्र त्याला माहीत होते. या खेपेला क्रांतीच्या बाबतीत मी त्याच्याशी काही बोललो. केवळ व्यायामाच्या शिक्षणाने क्रांतीचे कार्य कसे होणार ? जनतेत त्याविषयी जागृती कशी येणार ? जागृती आली तरी क्रांतीचे प्रत्यक्ष कार्य जनतेकडून कसे घडवून आणणार ? वगैरे वगैरे विषयी आमचे खूप बोलणे झाले. आप्पाचे मनात अगोदरपासून तेच विचार चालू होते. काही प्रयत्नातही तो होता. पण स्पष्टपणे काही योजना आखलेली नव्हती. भाई त्या वेळी तेथे नव्हता. पुण्यास होता. मी धुळे सोडल्यापासून इतक्या स्वस्थपणे बोलायची आम्हाला संधीच आली नव्हती. माझे जीवनविषयक विचारही त्याला याच वेळी काही माहीत झाले. क्रांतीचे त्याचे विचारही मला याच वेळी उघडपणे समजले. पूर्वी उल्लेख केलेल्या भटजीशी त्याचा संबंध आल्यापासून काही तर्क मला झाला होता; पण स्वतः आप्पाच्या तोंडून मला या वेळेपर्यंत काही समजले नव्हते. पण या-वेळीही क्रांतीच्या विचारात कोणाची स्पष्ट योजना दिसून आली नाही. आमचे परस्परांचे विचार परस्परांना समजल्यावर मी बडोद्याचे माणिकराव यांचेविषयी त्याचेजवळ बोललो. मी बडोद्यास असतांना व्यायामाच्या निमित्ताने त्यांची भेट झाल्यावर पुढील कार्यात त्यांना जोडून घेण्याच्या हेतूने माझे विचार मी त्यांच्याजवळ बोललो होतो. आप्पाच्या इच्छेनुसार मी त्याची व माणिकराव यांची पत्रद्वारे ओळख करून दिली व परस्परांचा पत्रव्यवहार जमवून दिला. त्यानंतर लवकरच मी धुळ्याहून निघून मुंबईला आलो. धुळ्यास जाऊन आल्याने बऱ्याच हकीकती कळल्या. आमची परस्परांची माहिती परस्परांना झाली. सर्वांनी अन्योन्यपोषक व सहाय्यक कार्ये करावी, एकमेकांशी सहकार असावा येथपर्यंत विचार जमले. आप्पा व भाई या दोघांचे विचार तंतोतंत एकच असणार त्याविषयी माझी खात्री होती. पुढे भाईला आप्पाकडून माणिकराव यांची माहिती झाली व तो केवळ त्यांची व्यायामप्रवृत्ती पाहण्याकरिता म्हणून बडोद्यास जाऊन आला. तेथील त्या वेळची त्यांची दांडीया बाजारातील व्यायामशाळा व तत्संबंधी प्रवृत्ती

त्याने पाहिली. ती पाहून त्याला आनंद झाला. त्यावेळी त्याने माणिकराव यांना एक पदक अर्पण केले.ही हकीकत मला त्या वेळच्या ' बडोदावत्सल ' वर्तमान-पत्रातून कळली. नंतर भाईनेही सांगितली. त्यानंतर भटजी बडोद्यास जाऊन आले. थोड्या दिवसांनी तात्यासाहेब ( भास्कर वामन ) भट वकीलही बडोद्यास जाऊन माणिकराव यांना भेटून त्यांची व्यायामसंस्था पाहून आले. दोघांनाही त्यांची व्यायामप्रवृत्ती पाहून संतोष झाला. पुढे आप्पाने माणिकराव यांना धुळ्यास बोलवले. तेही कलकत्त्याचे काँग्रेसमधून परत बडोद्यास जातांना धुळ्यास आले. ही गोष्ट सन १९०६ च्या सुमाराची-अखेरची. धुळ्याची व्यायामशाळा—तेथील व्यायामप्रवृत्ती पाहून माणिकराव यांना संतोष झाला. त्या वेळी शस्त्रांचे काही डावपेचही त्यांनी तेथील मंडळींना शिकवले. अशा रीतीने रणदिवे बंधूंचा व माणिकराव यांचा संबंध अधिक वाढत जाऊन दृढ झाला. त्या दोघा बंधूंविषयी माणिकराव माझ्याशी अनेक वेळा बोलले आहेत की, तुमच्यामुळे आप्पासाहेब व भाईसाहेब यांच्याशी माझा संबंध आला हे मी माझे भाग्य समजतो. दोघा भावांचे शुद्ध जीवन, उदात्त विचार, तेजस्विता व प्रेमळपणा या सर्वांचा इष्ट परिणाम दुसऱ्यांवर झाल्या-शिवाय राहात नसे.

ही हकीकत दिली आहे ती सर्व घडण्यापूर्वीच वंगभंगाची चळवळ सुरू झाली होती. माझी व आप्पाची भेट झाली त्या वेळी ती चळवळ सुरू झालेली नव्हती. त्यानंतर सुरू झाली. तेव्हापासून १९०८ पर्यंतच्या काळात लोकमान्य टिळक, खाडिलकर, बाबू अरविंद घोष वगैरे अनेक देशभक्त व पुढारी धुळ्यास येऊन गेले. लोकमान्य टिळक व बाबू अरविंद घोष यांचे तेथे फार मोठ्या प्रमाणावर सत्कार समारंभ झाले. व्याख्याने झाली. त्या प्रसंगांत या दोन बंधूंचा प्रामुख्याने सर्वांशी संबंध आला. राष्ट्रीय कार्याकरिता संघटितपणे काम करणाऱ्या बलवान व शिस्तबद्ध तरुणांची नेहमी आवश्यकता असते. त्याशिवाय कोणतेही महान व व्यापक कार्य पार पडू शकत नाही. आप्पाच्या हुकमतीत शिस्तीने व व्यवस्थितपणे काम करणाऱ्या बलवान तरुणांची संस्था होती. तीतील तरुणांत उत्साह होता जोम होता व आप्पासारख्या कुशल पुढाऱ्याकडून व्यवस्थितपणे काम करण्याची तालीम त्यांना मिळालेली होती. धुळ्याची प्रांतिक परिषद त्याच काळात झाली. त्या काळी धुळे शहरात

कोणतेही राष्ट्रीय कार्य असो, आप्पाच्या हाताखाली तयार झालेली मंडळी ते करायला—पार पाडायला तयार असत. त्यांतील प्रत्येक तरुण आप्पाच्या शब्दाबरोबर, त्याच्या हुकुमाबरोबर वाटेल ते कष्ट सोसायला व साहस करायला तयार असे. रणदिवे बंधूंनी या प्रकारचे तयार केलेले तरुण त्या काळी सर्व खानदेशभर पसरलेले होते. बाबू अरविंद घोष धुळ्यास आले असता, बंगाल व महाराष्ट्र या दोन प्रांतांतील तरुण एकत्र मिळून काही जोरदार साहसिक कार्य करता येईल अशी योजना तयार करण्याचे घाटत होते असे मी ऐकले होते.

त्या दिवसांत निरनिराळ्या ठिकाणचे पुढारी धुळ्यास येत होते. वंगभंगाच्या आंदोलनाचा जोर वाढत चालला होता. देशी व्यायाम-प्रवृत्तीलाही त्या दिवसात काही महत्त्व येऊ लागले होते. आध्यात्मिक, धार्मिक, पौराणिक, ऐतिहासिक कथांनाही महत्त्व दिले जाऊन त्या कथांच्या निमित्ताने समाजात जागृती व देशप्रेम निर्माण करण्याचे प्रयत्न चालू होते. व्याख्याते, प्रवचनकार, कथाकीर्तनकार, नाटक—कादंबऱ्या लेखक, नाटककार वगैरे सर्वांचे प्रयत्न याच दिशेने त्या वेळी चालले होते. रामदासी संशोधनाच्या कार्यातही अशाच प्रकारची काही अपेक्षा बाळगली जात होती. त्याच सुमारास रामशास्त्री कान्हेरे यांची धुळे येथे व्याख्याने बरेच दिवस चालली. लोकांना ती फार आवडली. आप्पाचाही रामशास्त्री यांच्याशी खूप निकट संबंध त्यामुळे आला. शास्त्रीबुवा फार सज्जन व भाविक असल्याचे आप्पा मला सांगे. दामलेशास्त्री यांनीही ‘ तस्मात् सर्वेषु कालेषु मामनुस्मर युद्धय च । मय्यर्पित मनोबुद्धिर्मामेवैष्यस्यसंशयम् ’ । । ( गीता अ. ८ श्लोक ७ ) या एका श्लोकावर खूप विस्तृत भाष्य करून त्याला ‘ एकश्लोकी गीता ’ हे नाव दिले व ते आत्माराम छापखान्यात पुस्तक रूपाने छापवून प्रसिद्ध केले. ही गोष्टही त्याच काळात घडली. निरनिराळ्या देशांतील स्वातंत्र्याचा इतिहास, परदेशातील व आपल्या देशातील क्रांतिकारकांची चरित्रे, त्यांनी केलेली आंदोलने वगैरेंचा अभ्यास करण्याची आवड तरुण वर्गात त्या काळात उत्पन्न झाली. सावरकरांनी लिहिलेले मॅझिनी पुस्तक त्याच समयात प्रसिद्ध झाले. एकंदरीत सर्वत्र चेतना निर्माण करण्याचे काम त्या काळात जोराने चालू होते. रणदिवे बंधूंनी त्या काळातील प्रवृत्तीत खूपच भाग घेतला.

व्यायामाची प्रवृत्ती त्या दिवसांत त्यांनी पुष्कळच वाढवली. व्यायामाच्या निमित्ताने संबंध आलेल्या विद्यार्थ्यांत व तरुणांत त्यांनी चांगलाच उत्साह आणला. त्यांना देशभक्तीचे संस्कार दिले. त्यांच्यात दृढता, निग्रह, कट्टरपणा हे गुण आणण्याचा व ते वाढवण्याचा त्यांनी प्रयत्न केला. रणदिवे बंधूंचा तो काळ क्रांतीचे विचार करण्यात, ते फैलावण्यात व ते कार्य घडवून आणण्याच्या प्रयत्नात अविरतपणे गेला. खानदेशात–विशेषतः धुळे व आजूबाजूच्या भागात–जागृती निर्माण करण्याचे कामात नानासाहेब देव, रणदिवे बंधू, आण्णासाहेब (वासुदेवराव) दास्ताने ही मंडळी व त्यांचा मित्रपरिवार यांनी फार परिश्रम घेतले.

या आंदोलनांत जशी स्थिती धुळ्यात तशीच जवळजवळ सर्व महाराष्ट्रात निर्माण झाली होती. १९०३ साली धुळे येथे नाशिकच्या 'अभिनव भारत' ह्या संस्थेची पहिली बैठक रणदिवे बंधूंच्या घरी झाल्याचे डॉ. भट यांनी १९५० साली प्रसिद्ध केलेल्या आपल्या 'अभिनव भारत' या पुस्तकात लिहिले आहे. रणदिवे बंधूंचा क्रांतीच्या कार्यातील संबंधाचा प्रसिद्धपणे व जाहीरपणे उल्लेख आला असल्याचा हा पहिलाच प्रसंग मला आढळला व तोही स्वराज्यप्राप्तीनंतरच्या पुस्तकात. तत्पूर्वी त्यांच्या नावाचा अशा-रीतीने कोठेही उल्लेख आलेला नाही. भाई डेक्कन कॉलेजांत असता तेथील विद्यार्थ्यांत आपल्या विचारांचा प्रचार, व्यक्ती पाहून, तो तारतम्याने व सावधगिरीने करीत होता. दास्तानेही त्याच कॉलेजात होते. ते मूळचे खानदेशातील. आम्ही धुळ्यास हायस्कूलमध्ये बरोबर होतो. डेक्कनमध्ये गेल्यावर भाईची व त्यांची मैत्री जमली. त्यांनाही त्याने आपल्या कार्यात ओढले. पुढे भाई व दास्ताने यांनी पी. एम्. बापट (मुळशी सत्याग्रहातील सेनापती) यांना आपल्या विचारात आणण्याचा प्रयत्न चालवला. त्यांना आपल्या विचारात आणणे सोपे नव्हते. पण भाईला ते साधले. दास्ताने यांचे त्याला त्यांत साहाय्य झाले. या प्रसंगाचे वर्णन आपटे गुरुजी यांनी लिहिलेल्या बापटांच्या चरित्रात संक्षेपाने दिले आहे. त्यात ते म्हणतात– "एका तरुणाने आपल्या (डेक्कन कॉलेज वसतिगृहाच्या) खोलीत त्यांना नेले व मायभूबद्दलच्या आपल्या कर्तव्याविषयी खूप गंभीरपणे समजावले व त्यानेच त्यांच्याकडून देशभक्तीची शपथ घेववली. आपटे गुरुजी यांनी त्या

प्रसंगाचे वर्णन खूप गांभीर्याने केले आहे. त्यात तरुणाचे नाव दिले नाही' कारण इंग्रजी राज्य असतांना हे चरित्र लिहिले गेले आहे. त्या वेळी तरुणाचे नाव देण्यात धोका होता. म्हणून तारतम्य व सावधगिरी ठेवून त्यांना तसे करावे लागले. त्यातील हकीकत खरी आहे. पण तो प्रकार एका दिवसांत किंवा पाच दहा मिनिटात घडून आलेला नाही. ज्या तरुणाने बापटांचे मन वळवले तो तरुण म्हणजे भाई रणदिवे. भाई व दास्ताने यांची मैत्री जमलेलीच होती. प्रत्यक्ष दीक्षेची शपथ देण्याचे काम भटजींनी केले. भाई व दास्ताने त्या प्रसंगाचे साक्षी अशी हकीकत आहे. भाईच्या सांगण्यावरून मला ही हकीकत त्याच सुमारास माहीत झालेली होती. याप्रमाणे भाईचे अशा प्रकारचे काम त्याच्या विद्यार्थी दशेपासून चालू होते. त्यातच त्याला दास्ताने व बापट यांची प्राप्ती झाली. त्याने अनेकांना देशभक्तीची प्रेरणा दिली. बापट व दास्ताने पुढे प्रसिद्धीस आले इतकेच. बापटांना परदेशात जाण्याचे पुष्कळसे प्रोत्साहन रणदिवे बंधूंकडून मिळाले. परदेशातील बापटांचे कार्य त्यांच्या चरित्रात आलेले आहे. परंतु त्यांच्या अज्ञातवासातील माहिती अजून अज्ञातच आहे.

याप्रमाणे दोघां बंधूंची कार्ये आपआपल्या शक्ती व बुद्धीप्रमाणे चालू होती. पुढे बापटांचा आप्पाशी संबंध आल्यावर त्यांना कळून आले की, या सर्व कार्यांचा चालक आप्पा आहे. व तेव्हापासून या दोघां बंधूंविषयी बापटांच्या मनांत नितांत श्रद्धा निर्माण झाली व अजूनही त्यांच्या मनांत त्या दोघां बंधूंविषयी तसाच भाव व कृतज्ञता कायम आहे. भाई डेक्कनमध्ये शिकत असता व आप्पा धुळ्यास असता बंगालच्या स्वदेशी आंदोलनांतून क्रांतीची ज्वाला निघाली. त्यावर सरकारी दमन सुरू झाले. कायद्याची वृद्धी होऊ लागली. त्याबरोबरच त्यांचा कडकपणे अम्मल चालू झाला. बंगाल, महाराष्ट्र, तामिलनाड वगैरे अनेक प्रांतातील पुढारी जेलमध्ये गेले. त्याच सुमारास १९०८ साली बापट इंग्लंडहून परत आले. येताच रणदिवे बंधूंना ते भेटले व तसेच बंगालमध्ये गेले. तेथील कटवाल्यांशी त्यांनी विचार-विनिमय व चर्चा केली परस्परांच्या योजनेत मतभेद झाल्यामुळे ते परत महाराष्ट्रात आले. येथील पुढील योजना बनवण्यापूर्वीच बंगालमध्ये बॉम्ब उडवले जाऊन खून झाले. खुदीराम व प्रफुल्ल चक्रवर्ती पकडले गेले.

त्यांच्यावरील खटल्यात बापट व हेमचंद्र यांची नावे निघाली. तत्काळ बापटांना अज्ञातवास पत्करावा लागला. पुढे त्यात निर्माण झालेल्या अडचणी व संकटे स्वतः बापटांना सोसावी लागली व मित्र मंडळींना निस्तरावी लागली. रणदिवे बंधूंवरच त्यांतील पुष्कळसा भार पडला. बापटांनी परदेशातून येतांना काही हत्यारे व बेकायदा लिखाण बरोबर आणले होते. ते सर्व सामान रणदिवे यांच्या शीव येथील बंगल्यातच ठेवले होते. आप्पा व भाई यांचे काका काशीनाथ आत्माराम व त्यांचे चिरंजीव गोपाळ काशीनाथ ( पुढे डॉक्टर झालेले ) यांचे साहाय्य त्या प्रसंगी फारच झाले. ते सर्व सामान बंगल्याच्या समोरच्या चाळीत ( त्या वेळच्या मुरलीधराचे देवळा-जवळचे ) एका खोलीत ठेवण्याची व्यवस्था केली. पुढे तेथून ते सामान काही चाळीसगांवला महादेव वैद्याकडे, काही धुळ्यास व काही पालीस माझ्याकडे ठेवण्यात आले. त्यानंतर दीड वर्षांतच नासिक येथे जॅक्सनचा खून झाला व अनंत कान्हेरे, कर्वे, देशपांडे यांची बलिदाने झाली. त्यांतच किती तरी जणांना जन्मठेप, काळेपाणी, सक्त मजुरी वगैरे असह्य शिक्षा झाल्या. महाराष्ट्रांतील अभिनव भारत ( नाशिक ) या संस्थेवर या प्रकारचा जुलमाचा कहर गुजरला. कित्येकांच्या जीवनातील ऐन उमेदीचा, पुरुषार्थाचा व कर्तृत्वाचा काळ कारावासातील भयंकर व खडतर हालअपेष्टा सोसण्यात गेला. त्याची केवळ वर्णनेच आपल्या हृदयात असह्य वेदना उत्पन्न करतात. मग ज्यांनी त्या हालअपेष्टा प्रत्यक्ष सहन केल्या, त्यांची स्थिती त्या प्रसंगी काय झाली असेल ! पण धन्य त्या देशभक्तांची की, ज्यांनी त्या सर्व हाल-अपेष्टा आपल्यातील दृढ कर्तव्यनिष्ठेने, मनाच्या दृढतेने व कणखरपणाने सहन केल्या ! पंजाबमधील कित्येक देशभक्तांनाही याप्रमाणेच सहन करावे लागले.

या सर्व हकीकती जगजाहीर असल्यामुळे तो भाग सोडून देऊन पुनः बापटांच्या अज्ञातवासाकडे वळू. कारण त्यात रणदिवे बंधूंचा संबंध होता व त्या दोघांचा वृत्तांत देण्याचा या सर्व लिहिण्यातील मुख्य हेतू आहे. बापटांच्या अज्ञातवासापासून त्यांची व्यवस्था लावण्याचा भार रणदिवे बंधू व दास्ताने यांच्यावरच पडला. तो समय त्यांनाही फार कठीण व धोक्याचा गेला. भाई वकीलीच्या अभ्यासाकरिता मुंबईत शीवला राहू लागल्यापासून दास्ताने, भाजेकर वगैरे मंडळी त्याला तेथेच भेटत असत. आप्पा व

भाई यांचे काका आपल्या पुतण्यांची व त्यांच्याकडे येणाऱ्या आम्हा सर्वांची कारस्थाने जाणत होते. त्यांच्याच साहाय्याने बापटांच्या बरोबरच्या सामानाची व्यवस्था लावल्यावर बापटांच्या व्यवस्थेचे काम दास्ताने व महादेव वैद्य यांनी आपल्यावर घेतले व त्यांना चाळिसगांवावरून औटरॅम घाटाने औरंगाबादेस पोहोचवण्याचे माधवराव ताम्हणे यांच्यावर सोपवले. ते बापटांना घेऊन औरंगाबाद येथे गेले व त्यांचे बंधू जयराम रामचंद्र ( भाऊसाहेब ) ताम्हणे हे औरंगाबाद कॅन्टोन्मेंट मॅजिस्ट्रेटचे हेडक्लार्क होते त्यांच्या हवाली त्यांनी बापटांना केले. भाऊसाहेब यांनी त्यांना स्वतःकडे किंवा विश्वासपात्र मित्राकडे स्वयंपाकी म्हणून ठेवले. दहा महिने त्यांना तेथेच ठेवल्यानंतर यापुढे त्यांना औरंगाबाद येथे ठेवणे भाऊसाहेबांना सुरक्षितपणाचे न वाटल्यामुळे त्यांनी त्यांची रवानगी ( इंदूरच्या बाजूच्या ) बडवाणी या संस्थानात विश्वासपात्र व्यक्तीकडे केली.

सेनापती बापट यांच्या अज्ञातवासातील वास्तव्याविषयी व त्यांच्या व्यवसायांविषयी किती तरी अफवा अजूनही ऐकिवात येतात. रणदिवे बंधूंच्या या वृत्तांतात देण्याकरिता म्हणून श्री. कन्हैयालाल मालपूरवाला ( नंदुरबार ) यांनी बापटांनाच पत्र पाठवून त्याबाबतीत खुलासा विचारल्यावरून बापटांनी त्यांना लिहिलेल्या पत्रातून खरी हकीकत समजून येत आहे. ते पत्र पुढीलप्रमाणे आहे :

ता. २४–४–६४ गोखलेवाडी – भवानीशंकर रोड, दादर,
मुंबई– २८.

सादर नमस्कार वि. वि. आपले पत्र ता. १९–४ चे मिळाले. अज्ञातवासात ६ महिने आप्पांच्या शेतीवर मला ठेवले होते ही दंतकथा आहे. दास्ताने व रणदिवे ( भाईसाहेब ) यांनी प्रथम मला औरंगाबादेस ( जुलै १९०८ ते मे १९०९ ) नंतर बडवाणीस ठेवले. बडवाणीहून मी धारला गेलो. तेथे सातव्या इयत्तेत नाव घालून परीक्षेला बसलो. मॅट्रिक झालो. पुढे देवास येथे काही दिवस राहिलो. नंतर परत धार, बडवाणी व शेवटी काशी येथे १९१२ मार्च ते

डिसेंबर ता २४ पर्यंत. नंतर इंदूरास आलो व महाराज ऊर्फ आबा-साहेब रामचंद्र यांच्या हस्तकांनी मला व्हिन्सेंट ( मुंबई सी. आय. डी. प्रमुख ) यांच्या ताब्यात दिले. अज्ञातवासात खर्च सर्व रणदिवे व दास्ताने यांनी चालवला. पुढेही घरी १९१३ व १९१४ साली त्यांनीच चालवला. १९१५ साली पुण्यास आल्यावर मी मिळवता झालो.

**पां. म. बापट**

बापटांच्या ह्या स्वतःच्या पत्रावरून त्यांच्या अज्ञातवासात त्यांना कोठे-कोठे कसा कसा स्थानपालट करावा लागला याची थोडीशी माहिती मिळते. वरील हकीकतीत त्यांना सातव्या इयत्तेत नाव घालावे लागून मॅट्रिकची परिक्षा द्यावी लागल्याचा उल्लेख आहे. त्याचे कारण त्यांना शाळेत शिक्षकाची नोकरी मिळवणे आवश्यक होते व तेवढ्याकरिता त्यांना मॅट्रिकच्या परिक्षेचे सर्टिफिकेट पाहिजे होते. त्याशिवाय नोकरी मिळणे शक्य नव्हते. हिंदुस्थानातील व इंग्लंडमधील कॉलेजच्या परीक्षा देऊनही त्यांना पुनः मॅट्रिकच्या परीक्षेस बसावे लागले. कारण पूर्वीची सर्टिफिकिटे 'पी. एम. बापट' या नावाची होती. अज्ञातवासात ती काय कामाची ! मी एकदा बापटांना विचारले की अज्ञातवासातील मॅट्रिकच्या परिक्षेच्या वेळी नाव काय धारण केले होते ! तेव्हा ते म्हणाले वैद्य नाव धारण केले होते असे वाटते. अज्ञातवासातील व्यक्तीला आपला अज्ञातवास निर्विघ्नपणे चालवण्याकरिता प्रसंगोपात्त काय काय करामती कराव्या लागतात त्याची कल्पना बापटांच्या परीक्षा-प्रकरणावरून होण्यासारखी आहे.

आप्पा व भाई यांना आपल्या विद्यार्थीदशेपासूनच सार्वजनिक बाबतीत इतरांना साहाय्य करण्याचे प्रसंग येत असत. दोघांचाही स्वभाव उदार असल्यामुळे मित्रांच्या अडचणीत ते कधी कोणाला मदतीचे बाबतीत नाही म्हणत नसत. दोघेही क्रांतीचे उपासक झाल्यापासून तशा प्रकारच्या भानगडींत कोणावर संकट आले की, या दोघांना सहन करावे लागे. बापटांच्या अज्ञातवासाच्या काळात व त्यानंतर त्याच्या समाप्तीनंतरच्या काळातही या दोघा भावांचे जीवन धास्तीतच होते. या दोघा बंधूंचे साहाय्य बापटांना

पूर्णपणे आहे अशी पोलिस खात्याला माहिती होती. त्या बाबतीत पोलिसांना शंका नव्हती. तरी रणदिवे बंधूंच्या घराची झडती घेण्याचा, त्यांचा जबाब घेण्याचा किंवा अशाच कांही प्रकारचा अन्य प्रसंग त्यांच्यावर आला नाही. याची कारणे नक्की माहीत नाहीत. पण त्यांचा मितभाषीपणा, त्यांची प्रसिद्धी व कीर्तिपराङ्मुखता, गुप्तता राखण्याची हर-एक प्रसंगातील सावधगिरी व काही अंशी लोकप्रियता वगैरे कारणे असावीत असे वाटते. बापट अज्ञातवासात गेल्यावर त्यांचे प्रकरण बाह्यतः मिटल्या-सारखे वाटत होते तरी आप्पा व भाई चिंतामुक्त नव्हते. दीड वर्षानंतर जॅक्सन यांच्या खुनाचे प्रकरण निघाले. पण त्यातील कोणत्याच गोष्टीशी रणदिवे बंधूंचा काही संबंध नव्हता. पण त्यापूर्वीच दुसरे एक प्रकरण उपस्थित झाले व त्यात रणदिवे बंधूंना फार चिंता सहन करावी लागली व आर्थिक दृष्टयाही बरेच सहन करावे लागले. ते प्रकरण कृष्णा भोसेकर याचे. कृष्णा मुंबईत व्ही. जे. टी. आय्. चा विद्यार्थी होता. तो फार भावनाशील, कळकळीचा, प्रामाणिक व साहसी होता. प्रेमळ पण खूपच होता. त्याने बॉम्बचे साहित्य व काही लिखाण ट्रंकमध्ये भरून एका मित्राबरोबर मनमाडला पोहोचवण्याकरिता दिले. त्या मित्राला बोरीबंदर-वर रात्रीच्या गाडीत बसवून त्याच गाडीतून भायखळ्याला तो उतरला. तेथून आपल्या वसतिगृहात आला. सध्या भायखळ्यावर रेल्वे हॉस्पिटल आहे तेथे त्या वेळी वसतिगृह होते. भायखळ्याला उतरल्यावर तिकिटाची काही गफलत झाल्याचे त्याच्या लक्षात आले. त्यावरून तो चिंतेत पडला व सावध राहिला. पोलिसांना चकवून तो वसतिगृहातून निघून गेला तरी पुढे पकडला गेला. तिकिटाच्या गफलतीमुळे त्याच्या मित्राला कल्याणच्या पुढे जाऊ दिले नाही. त्या काळात वातावरण सर्वत्र संशयग्रस्त असल्यामुळे पोलिसांनी त्याची ट्रंक उघडली. तीतील सामान तपासता त्यात बेकायदेशीर वस्तू व लिखाण सापडले. मित्राला अटक झाली. कृष्णाही पकडला गेला. पुढे खटला चालला. त्याचा भार सर्व रणदिवे बंधूंवर पडला. कारण कृष्णा त्यांचाच शिष्य. त्यांच्यापासूनच प्रेरणा मिळवून त्यांच्या कार्यात सामील झालेला. त्या खटल्यात खर्च बराच आला. त्यापेक्षा चिंतेचा भार दोघा बंधूंना फार सहन करावा लागला. त्या प्रसंगात माधव वैद्याचा

फारच उपयोग झाला. बहुतेक खटपट खटल्याचे बाबतीतील त्यालाच करावी लागली. कृष्णावरील आरोप पुराव्याच्या अभावी त्याच्यावर सिद्ध होऊ शकला नाही व तो अल्पवयी म्हणूनच त्याला ताकीद देऊन सोडून दिला. त्याच्या मित्राचे नाव पराडकर (?) असावे. नीटसे आठवत नाही. त्याचे बाबतीत पुढे काय झाले आता आठवत नाही. कृष्णाच्या या केसमध्ये मॅजिस्ट्रेट काही उदार मनाचा-क्षमाशील वृत्तीचा – म्हणूनच कृष्णा सुटला असे आम्हांला वाटले. अशा रीतीने तो सुटला तरी तो गुन्हेगार असल्याबद्दल पोलिसांची खात्री होती म्हणून सुटल्यावरही त्याच्यावर पोलीसची सतत नजर राहिली. केसमुळे शिक्षण सुटले. नोकरी करावी तर जेथे नोकरी लागे तेथे पोलिस पाळतीवर राही. त्यामुळे त्याच्या मालकाला किंवा कारखानेवाल्याला धास्ती वाटे. कोठे भेटायला गेला, कोणत्या गांवी पाहुणा म्हणून गेला तरी तेथेही पोलिस हजर. अशा परिस्थितीमुळे कृष्णाची फार कुचंबणा होई. नोकरी टिकत नसे. कोणाकडे जाता येत नसे. त्याला मधून मधून खर्चाला पैसे आप्पाला पुरवावे लागत. तो काळही असा होता की, सरकारच्या दृष्टीने गुन्हेगार ठरलेल्या व्यक्तीला साहाय्य करणे त्याच्याशी संबंध ठेवणे भयप्रद वाटे. त्याला साहाय्य करणारे सरकारात शंकापात्र समजले जात. म्हणून अशा व्यक्तीवर केस चालू असता त्याला साहाय्य करणे किंवा त्याला भेटणे म्हणजे स्वतःवर संकट ओढवून घेणे हाच त्याचा परिणाम समजला जाई. अशा प्रकारच्या सर्व बाजूंनी विपरीत स्थितीमुळे रणदिवे बंधूंना त्या काळात अनेक प्रकारे वरचेवर सहन करावे लागे.

त्यानंतर काही काळाने पण त्याच क्षुब्ध वातावरणाच्या दिवसात घडलेली गोष्ट. दामलेशास्त्री यांनी लिहिलेले व आत्माराम छापखान्यांत छापलेले ‘ एकश्लोकी गीता ’ हे पुस्तक सरकारने जप्त केले. त्या प्रसंगांत आत्माराम छापखान्याची झडती झाली. दामलेशास्त्री व शंकरराव ( नाना-साहेब ) देव वकील यांना अटक झाली. सन १९१० च्या उन्हाळ्यांतील ही गोष्ट. आप्पा त्या वेळी धुळ्यास नव्हता. ही खबर त्याला ताबडतोब देणे अवश्य होते. आप्पा व मी त्या दिवसात संशोधनाच्या निमित्ताने खेडोपाडी फिरत होतो. आप्पाची त्या प्रसंगी धुळे येथे अत्यंत निकडीने जरूर होती.

आम्ही एके जागी नव्हतो. नक्की स्थान कोणालाच माहीत नव्हते. माधव वैद्य त्या वेळी प्रकृती सुधारण्याकरिता पुण्यास राहिला होता. प्रवास करण्यासारखी त्याची प्रकृती नसताही त्याला धुळ्याहून निरोप मिळताच तो कुलाबा व रत्नागिरी जिल्ह्याच्या एका माहीतगाराला घेऊन आमच्या शोधार्थ निघाला तो महाडला माझे मित्र गोविंदराव टिपणीस यांना भेटला. कुलाबा व रत्नागिरी या जिल्ह्यांच्या सीमाभागातच किंवा महाडच्या आसपासच कोठे आम्ही असू व आमचा पत्ता गोविंदराव ह्यांना माहीत असणारच ह्याविषयी माधव वैद्याला खात्री होती. पण त्याची व गोविंदराव यांची ओळख नसल्यामुळे गोविंदराव यांना त्याचा विश्वास वाटेना. ते दिवस देशभक्तांना कठीण होते. गोविंदराव स्वतः त्यात चांगले पोळून निघाले होते. माधव आमचा मित्र आहे की, आमच्या मागचा सी. आय. डी. आहे ? ही शंका त्यांना वाटत असल्यामुळे गोविंदराव उडवाउडवीची उत्तरे देत आहेत हे जाणून माधवने माझे त्याला गेलेले एक पत्रच त्यांना दाखविले. ताबडतोब त्यांनी आमचा बरोबर पत्ता दिला. माधव त्या पत्त्यावर आम्हांला येऊन भेटला. फारच थकून गेलेला. पुष्कळसा प्रवास पायानेच करावा लागण्याचे ते दिवस होते. आतांच्या प्रमाणे बस सर्व्हिस तिकडे किंवा कोठेच नव्हती. त्याला प्रकृतीच्या नादुरुस्त स्थितीत थकून आलेला पाहताच आमची मने कळवळली. पण त्याचेकडून धुळ्याची हकीकत कळताच त्याच्या कर्तव्यनिष्ठेविषयी धन्यता वाटली व एकंदर स्थितीविषयी चिंता वाटू लागली. आप्पाचे मन तर चिंतेने भरून गेले. नानांना अटक व छापखान्याची जप्ती या गोष्टी ऐकताच त्याने ताबडतोब निघण्याची तयारी केली. आम्ही त्या वेळी आयनी मेटे, तालुका खेड, जि. रत्नागिरी या ठिकाणी रामशास्त्री कान्हेरे यांच्याकडे होतो. ताबडतोब माधवसहीत आम्ही चौघे निरनिराळ्या दोन मार्गांनी निघालो व दाभोळची बोट गाठली. गोवळकोटपर्यंत मला व माधवला डोंगरातून भर उन्हाचे वेळी दगड–धोंड्यातून प्रवास करावा लागला. त्या दिवशी माधव थकून आलेला असता त्याला तसेच पुन्हा निघावे लागले; पण इलाज नव्हता. दाभोळहून आम्ही सकाळी मुंबईला आलो. आप्पा तसाच धुळ्याला गेला. माधव वैद्य मुंबईत दोन दिवस राहून पुण्याला गेला. मी ताबडतोब कोठे

गेलो ते आठवत नाही. पण धुळ्यास गेलो नाही इतके आठवते. कारण तेथे माझी आवश्यकता नव्हती.

या एकश्लोकी प्रकरणात आप्पाला फारच सोसावे लागले. आयनीला त्याला हकीकत कळताच तो चिंतेत पडला. नानांच्यावर त्याची फारच श्रद्धा. आत्माराम छापखाना त्याच्या स्वतःच्या मालकीचा. आप्पा धुळ्यास गेल्यावर केस चालली. तीत दामलेशास्त्री यांना एक वर्षाची कैद व नानासाहेब देवांना एक वर्षाची कैद व हजार रुपये दंड याप्रमाणे शिक्षा झाल्या. दामलेशास्त्री यांनी एक वर्ष कैद भोगली. नानांनी अपील केले, त्यात दंड व शिक्षाही रद्द झाली व ते दोषमुक्त ठरले. या सर्व प्रकरणात आप्पाला पुष्कळच सहन करावे लागले, चिंता वहावी लागली; पण पहिल्या दिवसापासूनही तो कधी घाबरला नाही. नानांनाही बराच खर्च आला. आत्माराम छापखान्याला म्हणजे आप्पाला बरेच नुकसान सहन करावे लागले. पुस्तके सर्व जप्त झाली.

अशा प्रकारे एकामागून एक संकटे रणदिवेबंधूंवर येतच होती. त्यातूनही आप्पा वडील असल्यामुळे त्याच्यावर भार कोणत्याही बाबतीत अधिक येई. त्या काळात प्रवास करणे, आपसांत पत्रव्यवहार करणेही धोक्याचे असे. सर्वत्र संशयाचे वातावरणामुळेच आयनीहून आम्ही सर्व बरोबर प्रवास करू शकलो नाही. क्रांतीच्या प्रयत्नांत उघडकीस आलेल्यांना व न आलेल्यांना बहुतेकांना त्या काळात निरनिराळ्या रीतीने सहन करावे लागले आहे. उघडकीस न आलेल्यांना त्या मानाने पुष्कळच कमी. तरी त्यांतूनही आप्पासारख्याला पुष्कळच सोसावे लागले. कारण काही मंडळीचे पुढारीपण त्याच्याकडे होते. त्याच्यावरील केवळ विश्वासामुळे कित्येक जण त्या कार्यात पडले होते. शिवाय आप्पा व भाई मनाने फार उदार. ज्याला आपला म्हटले त्याला कधीही कोणत्याही प्रसंगी अंतर न देण्याइतकी त्यांची सत्त्वशीलता. जबाबदारीचा भार आप्पावर अधिक पडे. स्वतःला कितीही सोसावे लागले तरी त्याबाबतीत कोणाजवळही न बोलण्याचा आप्पाचा स्वभाव. क्रांतीच्या कार्यात जे पडतात त्यांना मानसिक स्वस्थता लाभणे शक्य नाही असा साधारणपणे नियमच आहे. कारण एक तर जाणून-

बुजून संकटे व अनेक अडचणींनी ग्रस्त, केवळ अंगच्या साहसावरच उभारलेल्या शक्तिबाह्य व भयजनक कार्यांत ते पडलेले असतात. नित्य उलट सुलट योजना व बेत त्यांचे चालूच असतात. त्या योजना व ते बेत पार पाडण्याच्या चिंता वहाव्याच लागतात. अत्यंत सावधपणे वागत असताही कटातील एखाद्या व्यक्तीच्या बेसावधपणाचा, अदूरदर्शीपणाचा, उतावळेपणाचा केव्हा काय परिणाम होईल याचीही सदैव चिंता व धास्ती असते. अशा स्थितीत एखाद्याकडून एखादी गफलत झाल्यावर भयंकर चिंता निर्माण होत असते. एखादी व्यक्ती काही गफलतीमुळे किंवा अन्य काही कारणाने पकडली गेल्यावर त्यातून निर्माण होणाऱ्या अनर्थाची परंपरा कोठवर जाऊन पोहोचेल, त्यात किती जणांचे गळे गोवले जातील त्याची भयप्रद कल्पना त्या प्रकरणाचा अंतिम निकाल लागेपर्यंत रोजच्या रोज अधिकाधिक तीव्रपणे वाढत जात असते. अशा रीतीने एकामागून एक संकटे सोशीत, निस्तरीत जीवन चालू असता पुढचे तयारच असते. एखादी चिंता काही ओसरते न ओसरते तो दुसरीची सुरुवात होते. क्रांतीउपासकांची जीवनयात्रा याच मानसिक अवस्थेतून चाललेली असते. मानसिक स्वस्थता व शांती ही त्यांच्यापासून फारच दूर असतात.

रणदिवे बंधूंचे नित्याचे जीवन याच अवस्थेतून जात असता दामलेशास्त्री यांचे प्रकरण संपल्यावर दोन वर्षांतच घडून आलेली एक चिंताजनक घटना आठवते. रणदिवे बंधूंच्या जीवनात अशा कैक घटना बनून गेल्या असतील, पण मला आठवत आहे ती घटना पुढीलप्रमाणे:—आमच्या मंडळीत कृष्णराव या नावाचे एक गृहस्थ दाखल झाले होते. त्यांचे आडनाव दिघे असावे असे वाटते. ते मूळचे मावळच्या बाजूचे राहणारे. मला त्यांची माहिती नव्हती. पण आप्पाला होती. ते धुळ्यास जंगलखात्याचे ऑफिसमध्ये नोकरी करीत होते. माझे मित्र माधवराव ताम्हणे व शंकरराव पालकर यांनी चाळिसगाव तालुक्यातील पाटणजवळच्या जंगलात देवीच्या देवळात काही मंडळींना नेऊन तेथे त्यांच्याकडून देशसेवेच्या शपथा घेववल्या. तो दिवस भीष्माष्टमीचा होता. १९०७–८ सालची गोष्ट असावी. त्या दिवशीच्या त्या मंडळीत कृष्णराव होते. त्यांनी शपथ घेतल्यावर नोकरी सोडली व मावळात आपल्या गावी ते गेले. घरचे काही शेतीचे उत्पन्न असेल. नोकरी सोडल्यावर त्या उत्पन्ना-

वर घरखर्च चालवू लागले. पण उत्पन्न पुरे पडेना. घरात पत्नी व मुले. पत्नी एक वेळच्या मुंबईतील मोठ्याची मुलगी. चांगल्या स्थितीत वाढलेली. मला कृष्णराव १९०८ साली पुण्यात भेटले होते. माझी त्यांची ओळख नव्हती म्हणून माधवराव ताम्हणे व शंकरराव पालकर यांच्या ओळखीने ते माझ्याकडे आले व त्यांनी सांगितल्यावरून माझ्या भेटीला व माझ्याकडून काही सल्ला घेण्याकरिता आल्याचे त्यांनी मला सांगितले व पुढे म्हणाले, आता क्रांतीच्या कार्याकरिता दरवडे घालून एखादा किल्ला आपण आपल्या हाती घेतला पाहिजे. त्याशिवाय उपाय नाही. मी त्या कार्यातील काही योजना व सफलतेविषयी विचारता त्यांनी आपल्या विचारानुरूप मला सांगितले. त्यावर मी सांगितले की, किल्ला हाती घेतल्याने आपले काम होणार नाही व आता किल्ल्यांचा काही उपयोग होणार नाही. वगैरे मी त्यांना सांगितले. पण ते त्यांना पटलेसे मला वाटले नाही. त्यानंतर माझी त्यांची भेट झाली नाही. पण ताम्हणे व पालकर यांना त्यांच्याविषयी विचारता ते म्हणाले की त्यांना (कृष्णराव) घरखर्च चालवणे कठीण झाले आहे .कृष्णराव मला भेटून परत जात असता मी त्यांना सुचविले होते की, आप्पासाहेबांजवळ ही गोष्ट काढू नका. ही सूचना त्यांना देण्याचा माझा हेतू इतकाच की आप्पा अगोदरच अनेक प्रकारच्या चिंतांमुळे व्यग्र झालेला असता त्याच्यावर आणखी कोणत्या चिंतेचा भार न पडावा. पुढे ते आप्पाला भेटले किंवा नाही ते मला काही कळले नाही.

ही गोष्ट घडल्यानंतर मध्यंतरी जवळ जवळ चार वर्षांचा काळ गेला. तितक्यात कृष्णराव यांनी दरवड्याची काही योजना आखली व भोरचा खजिना लुटण्याचे ठरवून त्याकरिता दिवसही मुक्रर केला. परंतु ठरल्याप्रमाणे घडवून आणण्यापूर्वी कट व कारस्थान उघडकीस येऊन कृष्णराव व शिर्के नावाचे त्याचे साथी पकडले गेले. आम्हाला कोणालाही या योजनेची काहीच माहिती नव्हती. कृष्णराव पकडले गेल्यानंतर आप्पाला व मला खबर कळली. कृष्णराव मला भेटले त्या वेळी त्यांच्याजवळ काही विशेष साधने नव्हती व काही तयारीही नव्हती. पण चार वर्षांत त्यांनी काही तरी तयारी केली असावी. भोर संस्थानचा खजिना लुटणे सामान्य काम नव्हते. शिर्के हे कृष्णराव यांचे मुख्य मदतगार होते व आणखीही कोणी टोळीत

असावे. विचार साहसाचा होता यात शंका नाही. पण ऐन वेळी बेत फसला. मध्येच बातमी फुटली, केस चालली, कृष्णराव व शिर्के यांना प्रत्येकी दोन दोन वर्षांची सजा झाली. इतरांविषयी काही कळले नाही.

या घटनेनंतर रणदिवे बंधूंना पुष्कळच त्रास झाला. चिंता फारच वाटली. कृष्णराव पकडले गेल्यावर भोर येथे कच्च्या कैदेत असता घाबरून किंवा सरकारकडून माफीच्या आशेने त्यांनी आपली शपथविधीपासूनची सर्व हकीकत लिहून काढून ते निवेदन सरकारात देण्याचे ठरवले. त्यात रणदिवे-बंधूंची व इतर मित्रांची नावे दिली होती. चांगले लांबलचक निवेदन त्यांनी तयार केले होते. कृष्णराव यांचा मेव्हणा– त्यांच्या पत्नीचा भाऊ– हिरडस मावळचा– रामचंद्र देवराव देशपांडे त्यांना जेलमध्ये भेटायला गेला असता त्याने ते निवेदन पाहिले. ते निवेदन सरकारात गेल्यावर ज्यांची नावे त्यात आहेत ते सर्व पकडले जातील व महा अनर्थ ओढवेल हे देशपांडे यांच्या तेव्हाच लक्ष्यात आले. त्याने कृष्णरावांना धीर दिला. जे घडले त्यात इतरांना गोवू नका. धैर्याने आता तुम्हीच सहन करा वगैरे वगैरे सांगून व धीर देऊन न घाबरण्याविषयी समजावून ते निवेदन फाडून टाकले. रामचंद्र देवराव याचा व माझा पुष्कळच संबंध. त्याचे वजन भोरला चांगले होते. भोरच्या तुरुंगातील ही गोष्ट होती, म्हणून निभावले. रामचंद्र देवराव याचा फारच चांगला उपयोग झाला. अनर्थ टळला. ईश्वराची कृपा म्हणून सर्वांचा त्या वेळी बचाव झाला. केसचा निकाल लागेपर्यंत आप्पाला, भाईला व इतरांना चैन नव्हते. तो प्रसंग टळल्यानंतरही कृष्णराव यांच्या प्रकरणात आप्पाला आर्थिक बाबतीत पुष्कळ सहन करावे लागले. १९१४ साली कृष्णराव बंधमुक्त झाले. त्या वेळी पहिले महायुद्ध चालू होते. कृष्णराव लष्करामध्ये दाखल होऊन लढाईवर गेल्याचे कळले होते, पुढे काय झाले काही कळले नाही.

दामलेशास्त्री यांचे प्रकरण निघण्यापूर्वीपासून आप्पा धुळ्याच्या जवळपास कोठे तरी शेतजमीन मिळवण्याचे मागे होता. त्यातील हेतू क्रांतिकारकांना आश्रयाकरिता एखादी जागा शहरापासून दूरच अशी असावी, तेथे त्यांच्या निर्वाहाची सोय असावी, हत्याराचे, निशाणबाजीचे शिक्षण देता यावे, हत्यारे ठेवता यावी. याकरिता जागा शोधीत असता धुळ्या-

पासून तीन मैलांवर चाळीसगांव रस्त्याला लागून दास्ताने यांच्या मालकीची आपल्या कार्याला अनेक दृष्ट्या सोयीची जमीन आप्पाला पसंत पडली. तिची व्यवस्था शंकरराव जोग प्रथम पहात होते. पुढे काही वर्षांनी माधव वैद्य वहिवाट करू लागला. तेथे नानासाहेब देव, तात्यासाहेब भट, चांदोरकर वकील, विसूभाऊ राजवाडे वगैरे मंडळी मधून मधून जमत असत मूळ हेतूप्रमाणे ह्या जमिनीचा फारसा उपयोग झाला नाही, होऊ शकला नाही. तरी हत्यारे लपवून ठेवण्याकरिता, बंदुकीचा नेम शिकण्याकरिता थोडा फार उपयोग होऊ शकला. ग्वाल्हेरच्या बाजूलाही विस्तीर्ण अशी जागा मिळण्याचा प्रयत्न रणदिवे बंधूंनी केला; परंतु तिकडे सोयीची जमीन मिळाली नाही. आप्पाच्या मित्राचे भाचे ग्वाल्हेरच्या लष्करात मोठ्या हुद्यावर होते. त्यांच्याशी गुप्त कारस्थानात संधान बांधण्याकरिता महादेव वैद्याला पाठवले होते. तेथे लोकांना लष्करी शिक्षण देण्याची काही सोय व्हावी हा मुख्य हेतू महादेवला तिकडे पाठवण्यात होता. त्याप्रमाणे सोय होऊ शकेल इतकी संमती व साहाय्यार्ची कबुली घेऊन तो परत आला. त्या वेळच्या निजाम हद्दीत म्हणजे आजच्या मराठवाड्यात जमीन मिळवण्याचा प्रयत्न चालवला असता दौलताबाद–औरंगाबादच्या जवळ जंगलला लागूनच अर्धवट जंगलासारखीच जवळ जवळ पाच–सहाशे एकर जमीन आप्पा, शंकरराव देव व तात्यासाहेब भट या तिघांच्या नावाने घेतली. ती जमीन पुष्कळ विस्तीर्ण पण डोंगराळ म्हणून तीतील बराच भाग उंच–सखल, अगदी एका बाजूला असल्यामुळे शहरचा कॉंही संबंध नाही अशी, त्यामुळे पसंत पडली. तेथे शेतीही करावी, तीतून उत्पन्न काढावे व त्याचा व स्थानाचा उपयोग मुख्य संकल्पित कार्यात करावा. जमिनीच्या वहिवाटीकरिता एक खात्रीचे इसमही तेथे ठेवले होते. त्या जमिनीत लागवडीत येण्यासारखा भाग थोडा होता व पडीत जमीन पुष्कळ होती. तेथे जमिनीची मशागत होऊन चांगले पीक हातांत येईल अशी व्यवस्था बरेच वर्षांत करता आली नाही व मूळ अंतःस्थ हेतू साध्य करण्याच्या दृष्टीनेही काही जमवता येईना. त्या प्रयत्नांतून आम्हांला बोध इतकाच झाला की दोन परस्पर अगदी निरनिराळे हेतू एकाच ठिकाणातून साध्या करता येत नाहीत. शेतीचा बाह्य देखावा असला तरी त्यातूनही काही प्राप्त करून घेण्याकरिता शेतीमधील तज्ज्ञ माणसांची

जरूर असते. तशी लायक माणसे मिळाली तरी त्यांच्या हजीरीत गुप्त कार्ये करता येत नाहीत. गुप्त कार्यातील कोणी शेतीचे तज्ज्ञ मिळत नाहीत व बिन-अनुभवी माणसांकडून शेतीत काही प्राप्ति होऊ शकत नाही. अशा प्रकारचे अनुभवात्मक ज्ञान होण्यालाही बराच काळ लागला. तितक्यात कर्ज मात्र भरपूर झाले. त्याची सर्व चिंता रणदिवे बंधूंना. हा सर्व अनुभव येण्यात मध्यंतरी बराच काळ गेला. तितक्यात बहुतेक चळवळी बंद पडत गेल्या. अशा अनेक कारणामुळे धुळ्याजवळची शेती आप्पाने सोडून दिली. दौलताबादकडील जमिनीपैकी तात्यासाहेब भट यांनी आपला हिस्सा आप्पाचे लहानपणापासूनचे स्नेही गणपतराव परांजपे यांना विकत देऊन ते मोकळे झाले. त्यानंतरच्या काळात लोकमानसात हळूहळू बदल होऊ लागला. देशसेवेच्या साधनमार्गात महत्त्वाचे विचारभेद पडू लागले. तेव्हा शेतीतील मूळ अंतःस्थ हेतू साध्य होण्याची आशा अगदीच मंद होत चालली. उत्पादनाचे बाजूनेही काही आशा दिसत नाही. अशा स्थितीत शंकरराव देवांनी जमिनीतील आपला हिस्सा रणदिवे बंधूंना विकत देऊन तेही या भानगडीतून मुक्त झाले. आप्पाने इतके दिवसांच्या अनुभवावरून ठरवले की, स्वतः ज्ञानपूर्वक, योजनापूर्वक व तोच एक जीवन व्यवसाय ठरवून शेती केल्याशिवाय ती फायदेशीर होऊ शकणार नाही. या विचाराने त्याने आपले लक्ष शेतीकडे देण्याचे योजले. तरी त्याच्यावर रामदासी कार्याची जबाबदारी होतीच. संशोधनाचे कार्य हळू हळू कमी होत गेले. तरी समर्थांचे मंदिर बांधण्याचा, ग्रंथ व संग्रहित कागदपत्र सुरक्षित राखण्याकरीता इमारत बांधण्याचा बराचसा भार त्याच्यावर पडला. जवळच कोठे शेती मिळाली तर तीत आपण लक्ष देऊ शकू या विचाराने धुळे स्टेशनजवळ व आग्रारोडवर ( मालेगाव रस्त्यावर ) अशा दोन ठिकाणी त्याने जमिनी विकत घेतल्या व दोनही जमिनीत कलमी आंब्याची, संत्री-मुसंबीची लागवड करण्याकडे तो खूप लक्ष पुरवू लागला. दौलताबादेकडील जमिनीतही आंब्याची लागवड त्याने सुरू केली. त्याचे मित्र गणपतराव परांजपे त्याच्या सर्व विचारांना अनुकूल असल्यामुळे तेथेही आंब्यांची लागवड चांगली झाली. पण या सर्व कार्यात पूर्वीचा काही अनुभव किंवा ज्ञान कोणालाच नसल्यामुळे कर्ज पुष्कळच

वाढले. त्याची जबाबदारी आप्पावरच विशेष असल्यामुळे त्याच्या मनोवर त्या चिंतेचाही भार सतत रहात होता.

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. १५२५८

आप्पा जरी शेतीच्या कार्यात पडला व भाई परीक्षा पास झाल्यावर वकीली करू लागला तरी पहिल्यापासूनच्या क्रांतीच्या विचारामुळे व त्या कार्यात प्रथमपासून प्रयत्नशील असल्यामुळे त्यांच्यावरील तो भार पुढेही पुष्कळ वर्षे उतरला नाही. याशिवाय व्यायाम, संशोधन, शेती, इस्लाली, गोरक्षण व आणखीही बाहेरील सेवाकार्ये यांपैकी काहीत भाईला लक्ष द्यावे लागे. बाकी कार्यांचा भार आप्पावरच पडे. कारण निरनिराळ्या क्षेत्रांत त्याचाच संबंध होता. त्यामुळे सर्व बाबतीत त्याला चिंता अधिक वाटत राही.

आप्पा व भाई यांचे जीवन सदैव अशा प्रकारच्या भानगडीत असल्यामुळे व काही कौटुंबिक कारणामुळे त्यांच्या वडिलांनी दोघांना वेगळे केले. त्यावेळी दोघांवर चिंतेचा मोठाच भार पडला. त्यापूर्वी त्यांना सांसारिक बाबतीत काहीच चिंता नव्हती. घरखर्च वडीलांकडून चालत असे. कुटुंब मोठे होते. येणार जाणार मंडळी नेहमीच बरीच असत. माझी समजूत आप्पा व भाई यांच्या नेहमीच्या भयग्रस्त जीवनामुळे वडील नेहमी फार चिंतेत असत. दोघा भावांच्या गुप्त कारस्थानामुळे निदान घरावर व इतरांवर तरी काही विपरीत प्रसंग येऊ नये या दूरदर्शी विचाराने व हेतूने त्यांनी दोघा भावांना वेगळे होण्याचा सल्ला दिला असावा. इतर कारणे असली तरी ती गौण असावीत.

दोघां भावांना वेगळे व्हावे लागले. त्यांच्यावर एकदम मोठा भार पडला. निराळी जागा पाहून त्यांना तेथे संसार मांडावा लागला. भाई नुकताच वडिलांच्या हाताखाली वकिलीचे काम पाहू लागला होता. अशा स्थितीत संसार–कुटुंब-खर्च चालवण्याची दोघांना फार चिंता पडली. परंतु त्या दोघांच्या गृहिणी फारच चांगल्या स्वभावाच्या व धीराच्या होत्या. त्यांनी हिंमत धरली व हिंमत दिली. दोघीही संसारकार्यात फारच दक्ष व कर्तृत्ववान् होत्या. कशाही स्थितीत व कोणत्याही आपत्तीत आपल्या पतीबरोबर संतोषाने आपले कर्तव्य करण्यास त्या तयार असत. आप्पा व

भाई यांचे जीवन कोणत्या प्रकारचे आहे, त्यांचे विचार, त्यांच्या खटपटी याचे ज्ञान दोघींनाही होते. त्यांच्या संकटमय, अनिश्चित व भय-चिंताजनक जीवनाची त्यांना माहिती होती तरी त्याबद्दल दोघींपैकी कोणीही आपल्या पतीला त्याबाबतीत कधी दोष दिला नाही किंवा असंतोष दर्शविला नाही. उलट त्या दोघींना आपआपल्या पतीच्या खऱ्या स्थितीबद्दल, त्यांच्या उदारतेबद्दल, राष्ट्रभक्तीबद्दल व वीरवृत्तीबद्दल अभिमान व गौरव वाटे. त्या गृहिणी सहधर्मचारिणी या पदाला योग्य होत्या. त्यांच्यातील अनेक श्रेष्ठ गुणांमुळे आप्पा व भाई यांना आपल्या जीवनकार्यात सदैव धैर्य व उत्साह वाटत असे. दोघांच्या सत्कार्यात त्या दोघींचाही परिपूर्ण हिस्सा होता यात शंका नाही. आम्ही त्यांना मोठ्या वहिनी व धाकट्या वहिनी म्हणत असू. मोठ्या वहिनींचे नाव लक्ष्मीबाई व धाकटींचे नाव पार्वतीबाई.

आप्पा व भाई यांच्यावर कौटुंबिक संसारविषयक जबाबदारी आल्यावर पहिल्याप्रमाणे इतरांना साहाय्य करणे त्यांना कठिण जाऊ लागले. तरी तशाही स्थितीत जेव्हा जेव्हा मला त्यांची उदारता दिसून येई तेव्हा तेव्हा त्यांच्या महान गुणाविषयी मला फार आश्चर्य वाटून त्यांच्या विषयीचा माझ्या मनातील आदरभाव वृद्धिंगत होत असे व केव्हा केव्हा त्यांची उदारता मला असह्यही वाटे. अशाच प्रकारचा एक प्रसंग मला अजून चांगला आठवत आहे. कृष्णा भोसेकरचा उल्लेख मागे आलेलाच आहे. त्याच्या सारख्या तरुणांची त्या काळात फारच दैन्यावस्था होती. त्यांना साहाय्य करणारे सहसा मिळत नसत. साहाय्य करणारांना व करू इच्छिणारांना सरकारचे भय वाटे. आप्पा कृष्णाला साहाय्य करीत असे. १९१४ साली कृष्णा मुंबईत असता मला भेटत असे. तो रात्री १२ च्या सुमारास माझ्याकडे येई. दिवसा येण्याचे प्रसंगी त्याला पोलीसाची नजर चुकवावी लागे. मध्यंतरी जरूर लागल्यास किंवा निरोप कळवायचा असल्यास एक हॉटेलवाला आम्हांला साहाय्य करीत असे. एकदा चार पाच दिवसांत त्याचा पत्ता लागला नाही. त्यानंतर भेट झाल्यावर त्याचे कारण विचारता तो म्हणाला मुंबईला व्हाईसरॉय होता तोपर्यंत मला पोलीसांनी डोंगरीच्या तुरुंगात ठेवले होते. अशी त्याची स्थिती होती. त्या दिवसांत तो एकदा पैशाच्या अडचणीत होता तेव्हा मला म्हणाला, आप्पासाहेबांना पत्र पाठवून माझ्या-

करितां पैसे मागवा. किती पैसे मागवायला सांगितले ते आता आठवत नाही, तरी पन्नासपर्यंत मागवले असावे असा अंदाज आहे. त्या दिवसांत आप्पाची आर्थिक स्थिती स्वतःवरील कौटुंबिक जबाबदारीमुळे इतरांना साहाय्य करण्यासारखी नव्हती. कृष्णाला ती स्थिती माहित नव्हती. मी आप्पाची परिस्थिती त्याला सांगितली. अशा त्याच्या स्थितीत त्यांच्याकडून पैसे मागवणे योग्य नाही असे मी त्याला म्हणालो. पण तोही फार अडचणीत होता. म्हणून तो म्हणाला, मागवून तर पहा. मला दोनही बाजूंनी अडचण वाटत होती. तरी त्याच्याकरिता आप्पाला पत्र पाठवले. त्यात जराही आग्रहाने लिहिले नव्हते. असे असताही स्वतःच्या अडचणींच्या दिवसात स्वतःवर पूर्वीच्या कर्जाचा भार असताही त्याने कृष्णाची अडचण जाणून ताबडतोब माझ्याकडे पैसे पाठवले. पैसे माझ्या हातांत आले, पण आप्पाची स्थिती मनात येऊन मला वाईट वाटले. त्याचे त्या त्या वेळचे औदार्य मला असह्य झाले. कृष्णा भेटल्यावर पैसे आल्याचे मी त्याला सांगितले. पण माझ्याने तुला ते देववत नाहीत असे म्हणालो. आप्पाच्या स्थितीची त्याला पुनः जाणीव दिली व अशा स्थितीत तू आप्पासाहेबांच्या साहाय्याची अपेक्षा न ठेवली पाहिजेस. ते स्वतः फार अडचणीत आहेत. कर्जाचा बोजा त्यांच्यावर आहे. कौटुंबिक जबाबदारी त्यांच्यावर पडलेली आहे. अशाही स्थितीत त्यांनी पैसे पाठविले आहेत. आप्पासाहेबांची धन्य आहे. त्यांच्या उदारतेची कमाल आहे. असे सांगून त्याला म्हणालो की तू एकटा आहेस. स्वतःचे कसेही चालवू शकशील. पण आता त्यांच्यावर भार टाकू नको. आप्पाची अशाही स्थितीतील उदारता पाहून आमच्या दोघांच्याही डोळ्यांत अश्रू आले. कृष्णाची समजूत पटली. पैसे मागविल्याबद्दल त्याला वाईट वाटले. आप्पाच्या जीवनात क्रांतीच्या उपासनेमुळे असे अनेक प्रसंग आले; पण केव्हाही कोणाला साहाय्य केल्यावर त्याला त्याबद्दल अभिमान वाटल्याचे आढळून आले नाही. कृष्णाचा विषय याच प्रसंगी आटोपणे बरे म्हणून त्याच्या बाबतीत दोन शब्द लिहून तो आटोपीत आहे. त्याच्याविषयी पूर्वी थोडे लिहिले आहे. तो फार भावनाशील व कट्टर. त्याच्या सारखे साहसी, प्रामाणिक व एकनिष्ठ तरुण त्या काळातही क्वचितच आढळत. पण त्याला पुढेपुढे जीवन चालवणे कठिण होत चालले. पोलिसचा

ससेमिरा त्याच्यामागे होताच. अखेर अमेरिकेत जाण्याचे ठरवून तो तिकडे गेला. तेथे काही वर्षे तो होता. पण पुढे तिकडे आजारी होऊन हॉस्पिटल-मध्ये त्याचे देहावसान झाले. ही हकीकत मला आप्पाकडून कळली. दोघांचा पत्रव्यवहार चालत असे. देहावसान कोणत्या वर्षी झाले ते स्मरत नाही. पण त्याची खबर कळून मला हळहळ वाटली. एक खऱ्या हृदयाचा प्रामाणिक, देशाकरिता तळमळणारा तरुण काहीच विशेष करू न शकता नाहीसा झाला ! हा कशाचा परिणाम ? आपल्या देशातील अशा दुर्लभ तरुण देशभक्तांचे बहुमोल जीवन असेच त्यांचेकडून विशेष काही न घडून येता फुकट नाहीसे होत राहणार काय ? हा विचार कृष्णाची हकीकत कळल्यावर पुनःपुनः मनात उठत राहिला.

... ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम........................ वि: ........................
क्रमांक ........................ नों दि ........................

## ४ : युगपालट व स्वराज्यप्राप्ती

वंगभंगाच्या क्षोभातून स्वदेशी आंदोलन १९०४ च्या सुमाराने उठले. त्यानंतर तो क्षोभ वाढतच गेला. १९०८ पर्यंत त्याचे पर्यवसान दहशतवादापर्यंत पोहचून त्यातून खुनापर्यंत मजल गेली. हिंदुस्थानात बॉम्बची एक शक्तिशाली कला अवतरली. तिचे प्रयोग कोठे कोठे होऊ लागले. क्रांतिकारकांच्या बाबतीत सरकारचे धोरण व वर्तन दिवसानुदिवस उग्र, उग्रतर होत गेले. त्याचा परिणाम म्हणून महाराष्ट्रात तरी हळूहळू ते विचार दबले जाऊ लागले. बंगाल्यातही जवळजवळ तीच स्थिती आली. गदर पार्टीचे काम मात्र काहीना काही स्वरूपात केव्हातरी व कोठेतरी प्रकट होई. महाराष्ट्रातील तरुणांत भावना होत्या पण त्यांच्या स्वभावानुसार आक्रमक किंवा चढाईच्या धोरणाच्या किंवा केवळ विधायक स्वरूपाच्याही योजना त्यांच्यापुढे

नव्हत्या. टिळक सुटून आल्यावर थोड्याच दिवसांत होमरूलची चळवळ सुरू झाली, पण ते काम क्रांतिउपासकांच्या स्वभावाला अनुरूप नव्हते. तरी त्या काळातही क्रांती उपासकांच्या विचारात काही बदल झाला नव्हता. रणदिवे बंधूबद्दल न झालेल्यापैकी होते.

शंकरराव देवांचे वडील बंधु डॉ. हरिभाऊ मधून मधून धुळ्यास येत असत. त्यांचा व आप्पाचा संबंध त्या दिवसांत येई. डॉ. हरिभाऊ हे गोखल्यांचे मित्र होते. गोखले दिवंगत झाल्यावर हरिभाऊंनी नोकरी सोडली व ते सर्वन्टस् ऑफ इंडिया सोसायटीचे लाईफ मेंबर झाले. त्यांनी त्या संस्थेला स्वतःला वाहून घेतले. त्यांचा स्वभाव शांत व निःस्वार्थी होता. त्यांच्यात सेवापरायणता, गरीबांविषयी कळकळ व देशभक्तीही होती. या त्यांच्या सद्‌गुणांचा आप्पाला जसजसा परिचय होऊ लागला तसतसा आप्पाच्या मनात त्यांच्याविषयी आदर उत्पन्न होऊ लागला व तो वाढू लागला. १९१५ साली हरिद्वार येथे कुंभमेळा भरणार होता. तेव्हा तेथे लाखो यात्रेकरू एकत्र होणार होते. त्या प्रसंगी तेथे सेवाकार्य करण्याकरिता अलाहाबादच्या सेवा समितीने भारताच्या निरनिराळ्या प्रांतांतून स्वयंसेवकांची मागणी केली होती. पं. कुंझरू त्या समितीचे अध्यक्ष होते. कुंझरू हे सर्वन्टस ऑफ इंडियात असल्यामुळे हरिभाऊंचे मित्र होते. त्यांनी हरिभाऊंना कुंभमेळ्यात बोलवले. हरिभाऊंनी आप्पाला काही स्वयंसेवक घेऊन येण्याविषयी लिहिले. त्याप्रमाणे आप्पा धुळ्याहून काही स्वयंसेवक घेऊन हरिद्वारला गेला. मीही त्याच दिवशी कुंभमेळ्याला जाण्याकरिता त्याच गाडीने निघालो होतो. त्याच गाडीत हरिभाऊ, एन्. एम्. जोशी, नटेश आप्पाजी द्रविड ही मंडळी होती. आप्पाही स्वयंसेवकांना घेऊन चाळिसगांवला त्या गाडीत बसला. त्याचे बरोबर शंकरराव जोग, गजानन नगरकर, दत्तात्रय ग. निरखे, बाबूराव जोशी, डॉ. आपटे वगैरे मंडळी स्वयंसेवक म्हणून होती. मी हरिद्वारला साधु-महात्म्यांच्या शोधार्थ निघालो होतो. रस्त्यातच ही मंडळी भेटली. हरिभाऊंनी सेवासमितीच्या कॅम्पमध्येच मला राहाण्याचा आग्रह केल्यामुळे मी त्यांच्यातच राहिलो व ज्या उद्देशाने मी हरिद्वारला आलो ते काम बाजूलाच राहून स्वयंसेवकांच्या कार्यातच माझे तेथील दिवस गेले. हरिभाऊंचे म्हणणे तुम्ही या बाजूला पूर्वी बरेच

दिवस राहिला आहा म्हणून तुमचा उपयोग आम्हांला अधिक होऊ शकेल. या प्रमाणे त्यांचे म्हणणे पडल्यावर मला कँपमध्येच रहावे लागले. तेथे इतर प्रांतातूनही स्वयंसेवक आले होते. एकंदर स्वयंसेवकांचा भरणा पुष्कळच होता. यात्रा फारच मोठी होती. दर बारा वर्षांनी भरणारा तो मेळा असतो. असंख्य साधुसमुदाय व त्यातच लाखो यात्रेकरू यांची तेथे एकच गर्दी झालेली. त्या सर्वांचे वर्णन करायचे म्हटल्यास एक स्वतंत्र प्रकरणही पुरणार नाही. त्या यात्रेत पर्वाचा दिवस मुख्य असतो. त्या दिवशी फार सेवाकार्य असते. त्या प्रसंगी कर्मवीर मोहनदास करमचंद गांधी तेथे आले होते व ते सेवा समितीच्या कॅम्पमध्येच आमच्या शेजारच्या तंबूत आपल्या मंडळीसह उतरले होते. कस्तुरबा पण त्यात होत्या. त्यावेळेपर्यंत त्यांना महात्मा हे पद प्राप्त झाले नव्हते. साध्या काठेवाडी पेहेरावात ते त्यावेळी होते. गोखले नुकतेच दिवंगत झाले होते. त्या निमित्ताने ते पायांत काही घालीत नसत. दोन तीन दिवस त्यांचा मुक्काम तेथे होता. सवड असे तेव्हा आम्ही त्यांच्या तंबूत जाऊन बसत असू व त्यांचे इतरांशी चालत असलेले संभाषण ऐकत असू. मी त्यांचे ' हिंद–स्वराज्य ' पुस्तक १९०९ सालीच वाचले होते. आप्पाला व मला त्यांच्या दर्शनाचा तो पहिलाच प्रसंग होता.

धुळ्याच्या स्वयंसेवकांनी मेळ्याचे प्रसंगी खूप काम केले. ती मंडळी आप्पाच्या हाताखाली तयार झालेली होती. यात्रेत पर्वाचा दिवस मुख्य मानला जातो. त्या दिवशी पहाटेपासून स्नानाची गर्दी चालू असते. त्या दिवशीच्या अतोनात गर्दीमुळे व्यवस्थेत काही घोटाळा झाला व त्यामुळे हरीच्या पायरीच्या वरच्या बाजूला मोठा अपघात झाला. गर्दीत काही माणसे पडली. त्यांना उठायला मिळालेच नाही. त्यांच्यावरून मागच्या गर्दीचे लोंढे त्यांना तुडवीत जात राहिले. त्यामुळे अपघात झाला. गर्दी हटविल्याशिवाय पडलेली माणसे काढता येईनात. बंदोबस्ताकरिता ड्युटीवर असलेले पोलिस व स्वयंसेवक यांनाही आपला जीव बचावणे त्याप्रसंगी कठिण झाले म्हणून ते तेथून कसेतरी बाहेर पडले. पण अशा जिवावरच्या प्रसंगी धुळ्याचे एक विद्यार्थी स्वयंसेवक दत्तात्रय निरखे हे स्वतःच्या जीवाची पर्वा न करता गर्दी हटवून लोकांना वाचवण्याचा प्रयत्न करीत होते.

अपघात झाल्याचे कळताच पोलिसाचे मुख्य अधिकारी तेथे आले व त्यांनी महाप्रयत्नाने गर्दी हटवली, तों तेथे बावीस की तेवीस स्त्रीपुरुषांची तुडवलेली प्रेते सापडली. जेथे पोलिस टिकले नाहीत त्या प्रसंगात एक तरुण बहाद्दरीने व धैर्याने धोका पत्करून काम करीत असलेला पाहून तो अधिकारी त्याच्यावर खुश झाला व त्याला त्याने शाबासकी दिली. तो अधिकारी सायंकाळी कॅम्पवर आला. तेथे निरखे यांचे त्याने अभिनंदन करून त्यांना धन्यवाद दिले. कुंभ मेळ्याचा पर्वकाळ संपल्यावर यात्रा परत जाऊ लागली. तेव्हा स्वयंसेवकही आपआपल्या ठिकाणी परतले. आप्पा व धुळ्याची मंडळीही परत गेली. मी काही दिवस गुरूकुल कांगडी येथे व त्याच भागात राहिलो.

कुंभ मेळ्याच्या प्रसंगानंतर हरिभाऊंचा व आप्पाचा संबंध विशेष येऊ लागला. १९१७ साली हरिभाऊ चंपारण्यात म. गांधींच्याकडे सत्याग्रहाच्या प्रसंगानंतर गेले तेव्हा आप्पाही त्यांच्याबरोबर व इतर कार्यकर्त्यांच्याबरोबर तेथे सेवा कार्य करीत कित्येक महिने राहिला. तो चंपारण्यात गेल्याचे मला कळले, तेव्हा मला बरे वाटले. चंपारण्यात गेल्यामुळे तो संकुचित क्षेत्रातून बाहेर पडला व अखिल भारताच्या दृष्टीने आवश्यक अशा सेवा-कार्यात तो जोडला गेला. तेथे अनेक थोर थोर देशभक्तांचा सहवास त्याला लाभेल, त्याची दृष्टि विशाल होईल, विचारांत व्यापकता येईल, वगैरे वगैरे विचार मनात येऊन मला आप्पाच्या बाबतीत पुष्कळ बरे वाटले व खरोखरच मला वाटत होते त्याप्रमाणेच घडून आले. चंपारण्यात तो गेल्यामुळे गांधीजी, राजेंद्रबाबू, महादेवभाई, नरहरीभाई, अवंतिकाबाई गोखले वगैरे पुढारी व अनेक कार्यकर्ते यांच्याशी त्याचा संबंध आला. हरिभाऊंच्या बरोबर अनेक महिने प्रत्यक्ष सेवाकार्यात त्याला रहायला मिळाले. अशा स्थितीत चंपारण्यात काही महिने काम केल्यावर हरिभाऊंच्या बरोबर तो धुळ्यास परत आला.

हरिभाऊ धुळ्यास परत आल्यावर त्यांची प्रकृती जलोदराने बिघडली. त्यांना चंपारण्यातच त्या रोगाची लक्षणे जाणवू लागली होती. ते स्वतः डॉक्टर असल्यामुळे ते ती गोष्ट जाणून होते. पण चंपारण्यात त्यावर काही

उपचार होण्यासारखा नव्हता. पण तितक्या दिवसांत रोगाचे प्रमाण वाढले व धुळ्यास आल्यावर त्यांना अधिक त्रास होऊ लागला. तेथे उपचार करूनही त्यांना काही आराम वाटेना म्हणून उपचारासाठी ते मुंबईस गेले. बरोबर आप्पा गेला. हरिभाऊंची तबियत बिघडल्यापासून आप्पा त्यांच्याकडे खूप लक्ष देऊन त्यांना संभाळू लागला. मुंबईस डॉ. भाजेकर यांच्या हॉस्पिटलमध्ये हरिभाऊंना ठेवले. डॉ. भाजेकर हरिभाऊंचे मित्र होते. तेथे उपचार शुश्रुषा वगैरे सर्व चांगल्या प्रकारे होत असताही त्यांचे स्वास्थ्य सुधरेना. तेथेही प्रकृती अधिक बिघडू लागली. म्हणून त्यांना घेऊन आप्पा धुळ्याला आला. गावात घरी न जाता हरिभाऊंची इच्छा मळ्यात (आप्पाच्या शेतीवर) राहण्याची होती. पण तेथे आल्यावर दोन किंवा तीन दिवसांतच त्यांचे देहावसान झाले. त्या वेळी मी तेथे शेतावरच होतो.

डॉ. हरिभाऊ फारच सज्जन, आप्पाच्यामुळे माझा व त्यांचा काही परिचय आला होता. त्यांना समाजाविषयी पुष्कळ कळकळ. सेवा करण्यात कोणत्याही प्रकारचा लोभ नाही, स्वार्थ नाही व अहंकारही नाही. मानप्रतिष्ठेची इच्छा नाही. अशी माणसे समाजात क्वचित आढळतात. गोखले व गांधीजी यांच्याविषयी त्यांच्या मनात फार सद्भाव, या त्यांच्या गुणांची ओळख आप्पाला कुंभमेळ्याचे प्रसंगी व चंपारण्यात, त्यांच्याबरोबर सतत सेवाकार्य करीत राहिल्याने झाली. नानासाहेब देवांचा व आप्पाचा पुष्कळ घनिष्ठ संबंध. पण सज्जनतेत दोन भावांमध्ये हरिभाऊ श्रेष्ठ अशी आप्पाची श्रद्धा व खात्री होती, म्हणून हरिभाऊ गेल्याने त्याला फार दुःख वाटले. तो मला म्हणाला, ज्यांच्या संगतीने व आधाराने काही विधायक सेवाकार्य करू शकेन अशी आशा वाटत होती तेच निघून गेले. आणि खरोखरच आप्पाचे मनोगत व श्रद्धा तशीच होती. त्याला प्रत्यक्ष सेवा-कार्य प्रिय होते व तसे कार्य हरिभाऊंच्या साहाय्याने, संगतीने मिळू शकेल असे त्याला कुंभमेळ्याचे व चंपारण्यातील अनुभवावरून वाटू लागले होते. त्याने हरिभाऊंची चंपारण्यात व धुळ्यास व मुंबईस त्यांच्या आजारीपणात एकट्याने मनःपूर्वक कष्ट सोसून सेवा-शुश्रुषा केली. शेवटी परिणाम अनिष्ट आला. या सर्वांचा मिळून आप्पाचे मनावर खेदजनक परिणाम झाला.

जो कोणाकरिता मनःपूर्वक व श्रद्धापूर्वक कष्ट करतो त्याच्या मनावरच अशा प्रकारचा परिणाम तीव्रपणे होत असतो. आप्पाच्या त्या वेळच्या मनःस्थितीचे हेच कारण होते. त्याच्या मनात कोणताही पक्षाभिमान नव्हता. टिळक, परांजपे, खाडिलकर, महर्षी अण्णासाहेब पटवर्धन वगैरे सर्वांशी आप्पाचा चांगलाच संबंध होता. अण्णासाहेब पटवर्धनांचे रणदिवे बंधूंवर फार प्रेम होते. त्याचप्रमाणे डॉ. हरिभाऊ, गांधीजी, महादेवभाई, किशोरलाल मश्रूवाला, काकासाहेब कालेलकर, जमनालालजी वगैरे मंडळीशीही त्याचा परिचय आल्यावर त्यांच्या विषयीही आप्पाच्या मनात सद्भाव उत्पन्न होऊन तो शेवटपर्यंत वाढत राहिला. देशाला स्वातंत्र्य मिळावे अशी इच्छा करणारे व त्याकरिता प्रामाणिकपणे सेवा-कार्य करणारे या सर्वांविषयी आप्पाचे मनात सद्भाव असे व त्यांच्याविषयी त्याला आदर वाटे.

सन १९२० साली लोकमान्यांचे देहावसान झाले. त्यानंतर संपूर्ण राष्ट्राचे सुकाणू गांधीजींच्या हातात आले. त्यापूर्वीच चंपारण्य व खेडा सत्याग्रह, रौलट ॲक्ट वगैरेचे धामधुमीत त्यांना झालेली अटक, जालियनवाला बाग प्रकरणानंतरचे त्यांचे कर्तृत्व व धैर्य, सर्व भारतातील प्रांतोप्रांतीच्या पुढाऱ्यांचे त्यांच्या नेतृत्वाखाली झालेले एकीकरण व त्यामुळे काँग्रेसमध्ये आलेले नवचेतन वगैरे घटना राष्ट्रात एकामागून एक घडत असलेल्या पाहून रणदिवे बंधूंच्या मनावर गांधीजींचा प्रभाव पडू लागला होता. चंपारण्यात म. गांधी सुद्धा कांही पुढाऱ्यांशी आप्पाचा संबंध आलाच होता. त्यानंतर गांधीजींची एकामागून एक राष्ट्रव्यापी आंदोलने चालू होती. विधायक कार्याच्या योजना त्यांनी राष्ट्रापुढे ठेवल्या होत्या. आप्पाला त्या पटल्या व त्या त्याचे मनात ठसल्या. जीवनभरचा देशसेवेचा संकल्प त्याच्या मनात सदैव जागृत होताच. सशस्त्र क्रांतीच्या बाबतीत सर्व देशात पसरलेले भय व औदासिन्य त्याला माहीत होते. आप्पाच्या मनात खरी सेवावृत्ती होती. सशस्त्र क्रांतीच्या मार्गात प्रगतीपर असे प्रत्यक्ष काही करता येत नव्हते. आज ना उद्या पण प्रत्यक्ष काही कार्य होईल असे चिन्हही कोठे दिसत नव्हते. तशा कार्याकरिता त्याने निरनिराळ्या जागी जमिनी विकत घेतल्या, लोकांकडून पैसा कर्जाऊ घेतला पण काही जम बसला नाही. सशस्त्र

क्रांतीचा प्रसंग केव्हा तरी येणार या उमेदीने व हुरूपाने रणदिवे बंधूंनी या सर्व खटपटी केल्या. क्रांतीकरिता शोधून शोधून योग्य माणसांचा संग्रह करणे, त्यांना शिक्षण देऊन तयार करणे, त्यांच्या आजीविकेची व्यवस्था करणे, त्यांची राहण्याची सोय करणे, काही संकट आल्यास ते निवारण केले जाण्याची प्रथमपासूनच सावधगिरी बाळगणे, त्याकारिता योग्य तजवीज करून ठेवणे वगैरे वगैरे विचार व प्रयत्न यांत दोघा बंधूंचे जीवन तोपर्यंत गेले होते. पण इतके करूनही त्यात पुढे काही आशास्पद मार्ग दिसत नव्हता. योजना सुचत नव्हती. सर्वत्र निराशेची छाया पसरली होती. पुढे जम बसत नव्हता. विशेष काही प्रभावी कार्य न होताही कोणाच्या तरी थोड्याशा गफलतीने आलेली संकटे निस्तरीत, बापटा-सारख्यांना लपवून त्यातच युक्त्या व कौशल्य लढवीत, कृष्णा किंवा कृष्णराव यांच्यासारख्यांच्या फसलेल्या कार्यात त्यांना पडणाऱ्या त्रासात व संकटांत त्यांना साहाय्य करीत, शेतीच्या कष्टावर व आधारावर मागील कार्यात झालेले कर्ज फेडण्याचा प्रयत्न करीत, आपण सशस्त्र क्रांतीच्या प्रयत्नांत आहोत असे केवळ मानून घेऊन संतोषात जीवन घालवणे दोघा भावांपैकी कोणालाही पसंत नव्हते. त्यांच्यात तशी वृत्तीच नव्हती. वर दिलेली कार्ये त्यांच्याकडून होतच होती. मित्रनिष्ठेमुळे ती घडत होती. पण तेवढ्याने त्यांना संतोष नव्हता. रामदासी संशोधनात आप्पाने कित्येक वर्षे घालवून त्यात त्याने आपले रक्त आटवून, मास खर्ची घालून हाडेही झिजवली. पण त्यायोगे राष्ट्र वर येऊन त्याचा उद्धार होण्याची चिन्हेही त्याला कधी दिसली नाहीत. समर्थांविषयी भक्ती व शंकरराव देव यांची इच्छा व आग्रह यामुळे कैक वर्षे तो ते कार्य करीतच राहिला. पण त्यातही त्याला राष्ट्रीय दृष्टया काही लाभ वाटला नाही. अशा स्थितीत स्वतःतील भाव, संकल्प व शक्ती यांना योग्य कार्य त्याला सुचत नव्हते. अशा समयातच गांधीजींनी देशापुढे अनेक कार्यक्रम ठेवलेले त्याच्या मनात भरले. त्यांनी निर्माण केलेल्या कार्यात हरिभाऊ देवांच्यामुळे प्रत्यक्ष गांधीजी व इतर देशभक्त कार्यकर्ते यांच्यासमवेत सेवा कार्य करण्याचा योग त्याला लाभला. त्यामुळे त्याची बुद्धी, त्याचे विचार, त्याच्यातील सेवावृत्ती व कर्तृत्व यांना चालना मिळाली. त्यात व्यापकपणा

आला. एखादा गाव, एखादा प्रांत यातच घोटाळणारी त्याची दृष्टी विशाल झाली, तीतून त्याला भारताइतके विशाल क्षेत्र सेवाकार्याकरिता दिसू लागले. क्रांतीची उपासना केवळ शस्त्रानेच होऊ शकते असे नाही. तिच्या उपासनेची अनेक साधने व तितकीच अंगे पण आहेत. ती साऱ्या हिंदुस्थानभर पसरलेली व प्रजेच्या दैनंदिन जीवनक्रमाशी निगडित आहेत. आपण जे जे कार्य या विशिष्ट दृष्टीने करू ते ते विधायक कार्यच आहे. स्वतंत्र देश व स्वतंत्र प्रजा या दृष्टीने ज्या ज्या आपल्यात उणीवा आहेत, कमतरता आहेत, ज्या ज्या अपात्रता आहेत त्या त्या सर्व काढून टाकून आपल्यात सर्व बाजूंनी पात्रता आणण्याचा प्रयत्न करणे, ही सर्व क्रांतीचीच कार्ये आहेत. आपले कर्तव्य-आपला धर्म समजून ही कार्ये करीत राहणारे सर्व क्रांतीचे उपासकच आहेत. अशा रीतीचा काही बोध आप्पाच्या मनात उतरल्यावरून तो गांधीजींच्या विधायक कार्याकडे वळला असावा असे मला वाटते. सशस्त्र क्रांतीला आपली शक्ती-बुद्धी अपूर्ण आहे असे समजून आल्यावर प्रत्यक्ष कार्यात परिणत करता येत नसलेल्या केवळ विचारात गर्क राहून त्यातच समाधान मानण्याचा किंवा शोधण्याचा त्याचा स्वभाव नव्हता. त्याला काही प्रत्यक्ष सेवाकार्य पाहिजे होते. ते त्याला मिळाले. त्याने ते स्वीकारले व आपला जीवनक्रम त्याप्रमाणे आखला.

दोघा बंधूंत व त्यांच्या कुटुंबात असे ऐक्य होते की, आप्पाला जे पटले ते भाईला न समजता पटायचेच व भाईने जे स्वीकारले ते आप्पाला मान्य व्हावयाचेच व त्यांच्या घरातील मंडळींनी त्याबाबतीत त्यांना मनापासून साहाय्य करायचे. अशा रीतीचा एकोपा – दोघांच्या गृहिणी सुद्धा सर्वांचा मनामिलाफ-हे त्या सर्वांचे बलवत्तर भाग्यच मला वाटे. आप्पा व भाई व त्यांची मंडळी सूत कातू लागली. आप्पा व भाई यांनी खादीचे व्रत घेतले. हरिजन सेवा, राष्ट्रीय शिक्षण, शेतीसुधार, गोरक्षण वगैरे सर्व विधायक कार्यात रणदिवे बंधूंचा भरपूर हिस्सा पडू लागला. आप्पाने आपल्या मुलाला त्या काळच्या चालू शिक्षणातून काढून अमळनेरच्या राष्ट्रीय शाळेत घातले. रणदिवे बंधूंच्या खादीप्रेमाच्या बाबतीत धुळे येथील त्या समया-तील खादीभांडाराचे संचालक कन्हैयाभाई मालपूरवाला आपल्या आठ-वणीत लिहितात –



आप्पासाहेब रणादिवे

"रणदिवे बंधू सुमारे १९२३-२४ पासून संपूर्ण शुद्ध खादीधारी झाले होते. गरीबांबद्दलचे प्रेम त्यांच्या हृदयात वसलेले होते. ते व्रत त्यांनी अखेरपर्यंत पाळले. साधी राहणी, सत्य, जीवननिष्ठा, प्रेमळ स्वभाव ही त्यांच्या जीवनाची मुख्य अंगे होती. खादी व विधायक कामाच्या सभा व घडामोडी त्यांच्या घरात होत. त्यांचे घर म्हणजे सार्वजनिक कार्यालय होते. त्यामुळे येणाऱ्या जाणाऱ्या कार्यकर्त्यांचा वापर त्यांचे घरी नेहमीचा होऊन बसला होता. (त्यात) त्यांना कधी संकट तर वाटलेच नाही, पण प्रेमाने ते सर्वांचे स्वागत करीत. ते जुन्या पिढीतील स्वदेशी विचाराने भरलेले व राष्ट्रप्रेमाने रंगलेले राष्ट्रभक्त होते. आपणा सर्वांना त्यांच्यापासून प्रेरणा मिळो!"

(रणदिवे बंधूंच्या वरील आठवणी देणारे कन्हैयाभाई हे स्वराज्याच्या चळवळीपासून खादीच्या विधायक कार्यात पडलेले आहेत व अजूनपर्यंत खादीच्याच कार्यात ते मुख्यतः आहेत. सध्या नंदुरबार (जि. धुळे) येथील खादी-भांडार व विधायक कार्यात त्यांचे वार्धक्याचे दिवस शांततेत जात आहेत. ते प्रथमपासून तत्वनिष्ठ असून सरळ व प्रामाणिक वृत्तीचे आहेत. सज्जनता त्यांच्या अंगात मुरलेली आहे.)

आप्पा मुळशी सत्याग्रहात बापटांना साहाय्य करण्याकरिता कित्येक महिने जाऊन राहिला होता. अशा प्रकारची बाहेरची सार्वजनिक कामे संभाळून त्याला शेतीकडे लक्ष द्यावे लागे. पण शेतीकडे पुरेसे लक्ष देता न आल्यामुळे तीत नुकसानही येई. गांधी-युगातही धुळ्याचे पुढारीपण बहुतेक आप्पाकडेच होते. आप्पा व भाई यांची किंमत ज्याप्रमाणे नानासाहेब देव, लो. टिळक, परांजपे हे जाणून होते, त्याचप्रमाणे गांधीजींचा संबंध आल्यावर ते व त्यांचा परिवार यांनाही त्यांच्या योग्यतेची पूर्णपणे जाणीव झाली होती. गंगाधरराव देशपांडे मला एकदा म्हणाले, रणदिवे बंधूंना—विशेषतः आप्पासाहेबांना देव वकिलांनी रामदासी कार्यात गुंतवले हे बळवंतरावांना (टिळक) योग्य वाटले नाही. त्यावरून देवांना बळवंतराव म्हणाले की, **रणदिवे बंधू लष्करी वृत्तीचे व स्वभावाचे. त्यांना असल्या संशोधनाच्या कार्यात कशाला ओढलेत?** त्यावर देव काही बोलले नाहीत. लोकमान्यांचा या प्रकारचा

अभिप्राय व विश्वास रणदिवे बंधूंविषयी असल्याचे गंगाधरराव यांनी मला सांगितले. त्यावर गंगाधररावांचे व माझे काही बोलणेही झाले. लोकमान्यांच्या या शब्दांवरून ते आप्पा व भाईविषयी काय समजत होते ते उघड दिसून येते. त्याचप्रमाणे गांधीजी व राजेन्द्रबाबू वगैरेंच्या प्रेमाला व विश्वासालाही ते दोघे पात्र झाले होते. लोकमान्यांच्या खास तालमेत तयार झालेले व त्यांच्याबरोबर संपूर्णपणे देशकार्यात पडलेले गंगाधरराव देशपांडे, खाडिलकर, परांजपे ही मंडळी गांधींनी एकामागून एक उठवलेल्या चळवळी व त्यातून निर्माण झालेली राष्ट्रव्यापी आंदोलने, त्यातील दिसून येणारी त्यांची धडाडी, त्यांची निर्भयता, देशाविषयी अलोट भक्ती, त्यांची सत्यनिष्ठा, चारित्र्य, व त्याचप्रमाणे विधायक कार्यातील त्यांची योजनाशक्ती वगैरे पाहून जशी त्यांच्याकडे एकनिष्ठपणे वळली तोच प्रकार रणदिवेबंधूंचे बाबतीत घडून आला. रणदिवे बंधूंचे मित्र दास्ताने हे गांधीजींच्या कार्यात अगोदरच सामील झाले होते. रणदिवेबंधूंना पक्ष नको होता. प्रत्यक्ष सेवाकार्य पाहिजे होते. ते त्यांना मिळाले व त्या काळातील प्रभावीत कार्यक्रमात ते दोघेही पडले.

या सर्व कारभारात आप्पा शेतीकडे पूर्ण लक्ष देऊ शकत नव्हता तरी त्याचे तेही काम चालूच होते. विधायक कार्यामुळे त्याच्या पहिल्या मित्र-मंडळीत भर पडली. विधायक कार्यातील त्याचे मित्र खादी-भांडारवाले कन्हैयाभाई मालपूरवाला, हरिजन सेवक संघाचे प्रमुख काकासाहेब बरवे, जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष बाळूभाई मेहता, गोरक्षणाच्या कार्यात मनःपूर्वक भाग घेणारे रामेश्वरजी पोद्दार, पूर्वीचेच खूप परिचित शंकरराव जोग, आत्माराम प्रेसचे मॅनेजर विष्णुपंत किल्लेदार वगैरे वगैरेंशी आप्पाचा पहिल्यापेक्षा अधिक व घनिष्ट संबंध येऊ लागला. या व इतर नवीन नवीन विधायक कार्यकर्त्यांशी मिळून तो विधायक कार्यात शक्य ते साहाय्य करीत असे. ते कार्य करून बाकीचा वेळ तो शेती सुधारण्याकडे लावीत असे. शेती करण्यात त्याचा हेतू स्वतःच्या संसाराला मदत व्हावी हा तर होताच; पण त्यातही त्याची व्यापक व विशाल दृष्टी ही होती की, बुद्धिमान माणसांनी शेतीच्या व्यवसायात पडून बुद्धी चालवून शेतीचे उत्पन्न वाढवले पाहिजे. तो स्वतःविषयी म्हणत असे की, मी शेतकरी आहे, माझे कर्तव्य देशातील

लोकांना शक्य तितके अधिक धान्य पुरवणे हे आहे. मी स्वतः शेती करून केवळ मी सुखी व्हावे हा विचार माझ्या मनात येत नाही. शेतकरी बुद्धिवान नाही, त्याच्याजवळ साधनांचा तोटा आहे. म्हणून शेतकरी वर्ग दिवसेंदिवस गरीब होत चालला आहे. आपण बुद्धिवानांनी त्या व्यवसायात पडून शेती व शेतकरी-दोघांमध्ये सुधारणा घडवून आणली पाहिजे. त्या सुधारणेतील पहिली गोष्ट म्हणजे शेतीचे उत्पन्न वाढवून शेतकऱ्याचे दारिद्र्य नाहीसे करणे ही आहे. या त्याच्या विचाराप्रमाणे त्याने फळझाडांच्या लागवडीकडे लक्ष दिले. निरनिराळ्या प्रांतांतील आंब्यांच्या झाडांची, उत्पन्नाची, त्यांच्या लागवडीची त्याने माहिती मिळवली. त्याकरिता कोकण, त्याचा पश्चिम किनारा, कर्नाटक वगैरे भागात तो पुष्कळ हिंडला. मद्रास व उत्तरेकडील आंब्याची माहिती त्याने मिळविली. पुस्तकावरूनही त्याने या विषयाचा अभ्यास केला. धुळे येथील दोन ठिकाणची जमीन व दौलताबादकडील जमीन या तीनही जागी आंब्यांच्या निरनिराळ्या जातींच्या कलमांची त्याने लागवड केली. या विषयात पुढे पुढे तो चांगला ज्ञाता बनला. या विषयाचे अभ्यासी व विद्यार्थी त्याची शेती पाहण्याकरिता मुद्दाम त्याचे शेतीवर कधी कधी येऊ लागले. खानदेशात कलमी आंब्यांची त्यानेच प्रथम सुरुवात केली असावी असे मला वाटते. कलमे तयार करून त्याने नर्सरी सुरू केली. त्यामुळे कलमांचा प्रसार खानदेशात झाला. या बाबतीत त्याची दृष्टी संकुचित नसून खूपच व्यापक होती हे मागे दाखवलेच आहे. या त्याच्या व्यवसायामुळे, व्यापक हेतूमुळे व या विषयातील ज्ञानाची त्याला खूप आवड असल्यामुळे शहादे येथील डॉ. विश्राम पाटील यांचा व त्याचा फारच स्नेह जमला. आप्पाबद्दल डॉ. पाटील यांच्या मनात फार सद्भाव व आदर होता. आप्पाच्या देहावसानानंतर डॉक्टरांचा लेख जो धुळ्याच्या स्वतंत्र भारतात प्रसिद्ध झाला त्यातील काही भाग मी पुढे देत आहे. डॉ. विश्राम पाटील हे अमेरिकेत कृषी-शास्त्राची परीक्षा देऊन पीएच्. डी. झालेले विद्वान व सज्जन गृहस्थ आहेत. ते आपल्या लेखात म्हणतात—
" धुळ्यास गेलो म्हणजे मी नेहमी त्यांच्याकडे ( आप्पासाहेबांकडे ) उतरत असे. आप्पासाहेब व भाईसाहेब यांचे बंधूप्रेम पाहून मी थक्क झालो. भाईसाहेब आपली वकीली संभाळून धुळ्यातील सार्वजनिक काम करण्यास

तयार असत. साधारणतः दररोज तालमेच्या व्यवस्थेत त्यांचा काळ जायचा. आप्पासाहेबानी धुळ्यातील अनेक सार्वजनिक कामांचा आरंभ केला. राष्ट्र-कार्यार्थ आप्पासाहेबांनी अपार कष्ट सोसले. ते नेहमी दुसऱ्याच्या उपयोगी पडण्यास तत्पर असत. व स्वतःपासून दुसऱ्याला कमीत कमी त्रास होईल ह्याकडे त्यांचे सदोदित लक्ष असे. आपल्या कामाकरिता दुसऱ्याचा उपयोग करून घेणे त्यांना आवडत नसे. त्यांनी निरनिराळ्या जातींचे आंबे आपल्या बागेत लावून त्याचा प्रसार करण्याचे काम केले. खानदेशामध्ये त्यांच्या प्रयत्नामुळे बऱ्याच नवीन जातींची ओळख अनेक शेतकऱ्यांना झाली. शेतकऱ्यांना मदत करण्यास ते नेहमी तत्पर असत. आप्पासाहेबांनी अनेक तऱ्हेचे जे राष्ट्रकार्य काही गाजावाजा न करता केले ते अनमोल आहे. मी माझ्या आयुष्यात त्यांच्यापासून फार शिकलो. त्यांच्या जाण्याने मला फार दुःख झाले. किंबहुना त्यांच्या आप्तापेक्षा मी जास्त त्यांची आठवण करीन.'' ( मूक सेवकाचे बहुमोल स्फूर्तिदायक कार्यः लेखक—डॉ. विश्राम पाटील, शहादे. स्वतंत्र भारत, धुळे ता. ९–१०–१९६२. )

आप्पाचा व डॉ. पाटील यांचा स्नेह कोणत्या प्रकारचा होता ते वरील लिखाणावरून स्पष्ट दिसून येत आहे. आपला शेतकरी वर्ग नवीन नवीन ज्ञानाने समृद्ध व्हावा, तो सुखी व्हावा, याकरिता त्याने जिवापाड परिश्रम केले. हाती घेतलेल्या कोणत्याही कार्यात त्याला हयगय, दुर्लक्ष, कंटाळा किंवा आळस करणे माहीतच नव्हते. कितीही परिश्रम पडले तरी त्याची पर्वा न करता सतत प्रयत्न करीत राहून कार्य यशस्वी व्हावे व गरीब जनता सुखी व्हावी हीच त्याची इच्छा असे. स्वतः सुखी व्हावे, धनसंपन्न व्हावे, चैनीत राहावे अशा इच्छेचा त्याच्या मनाला स्पर्शही नव्हता.

शेतीप्रमाणे गोरक्षण, गोसंवर्धन याचीही त्याला मनापासून आवड होती. त्या विषयाची त्याने अनेक पुस्तके वाचून अनुभव घेऊन अभ्यास केला होता. या त्याच्या आवडीमुळे साबरमती आश्रमातून मगनलाल गांधी यांनी त्याला एक उत्तमपैकी गाय दिली व चांगल्या जातीच्या काही कालवडी व एक गोऱ्हा दिला. त्याने स्वतःच्या जमिनीवर काही चांगल्या गायी बाळगल्या. धुळ्यास गोशाळा स्थापन करण्यात व ती चालवण्यात

आप्पाचा बहुतांशी भाग होता असे त्याचे मित्र रामेश्वरजी पोद्दार व शंकरराव जोग यांनी आपल्या आठवणीत खूपच प्रशंसापर शब्दांनी लिहिले आहे. गोशाळा--चालकांना व ती यशस्वी चालावी व तिची वाढ व्हावी अशी इच्छा करणारांना आप्पाचा सल्ला व साहाय्य नेहमी उपयोगी होत असे. देशात चांगल्या गाईची पैदास व्हावी व प्रजेला पुरेसे दूध मिळावे हीच त्याची इच्छा होती.

आप्पाला वास्तुशास्त्राची चांगली माहिती झाली होती. रणदिवे बंधूंना आपले घर बांधण्याचा प्रसंग आला तेव्हा त्यांना त्या बाबतीत काहीच ज्ञान नव्हते. त्या वेळी खोलगल्लीत दामुआण्णा बरवे या नावाचे एक सद्गृहस्थ फार चांगल्या स्वभावाचे रहात होते. कोणालाही उपयोगी पडण्याचा त्यांचा स्वभाव होता. त्यांना घर बांधण्यासंबंधी फार चांगली माहिती होती. त्यांच्या घरासमोरच रणदिवे बंधूंच्या घराचे काम चालू होते, त्यांनी दोघा बंधूंना घराच्या बाबतीत वेळोवेळी सल्ला देऊन साहाय्य केले. त्या प्रसंगात घरबांधणीच्या विषयाची आप्पाला काही माहिती झाली. त्याच्या स्वभावाप्रमाणे त्याने पुढे पुस्तके वाचून त्या विषयाचे ज्ञान वाढवले. पुढे अनेक अनुभवांवरून तो त्या शास्त्रात चांगलाच माहितगार झाला. रामदासी कार्यक्षेत्रातील अनेक कार्यांपैकी इमारतींचे बांधकाम हे एक मोठेच जबाबदारीचे, परिश्रमाचे व बौद्धिक हुशारीचे काम होते. या कार्यांच्या निमित्ताने अनेक इमारती तयार कराव्या लागल्या. त्यांचा उल्लेख पूर्वी आलेलाच आहे. त्या कार्याची जबाबदारी आप्पावरच होती. त्या कामात आप्पाच्या मित्राचे चिरंजीव वासुदेवराव गोगटे यांनी इंजिनीयरींगचे काम फार चांगल्या प्रकारे केले. शंकरराव जोग यांनाही या कार्यात पुष्कळच परिश्रम पडले. आप्पाचे मित्र किंवा संबंधी घरबांधणीच्या प्रसंगी आप्पाचा सल्ला जरूर घेत असत. आप्पाचे लहान चुलत बंधु पुण्याचे डॉक्टर गोपाळ काशिनाथ यांनी पुण्याचा फलटणकर राजे निंबाळकर यांचा फलटण लॉज बंगला विकत घेतला. बंगला पुष्कळ मोठा. प्रस्तुत काळाला सोईस्कर होईल अशा रीतीचे बांधकाम त्यात करून घेणे आवश्यक म्हणून डॉक्टरनी तज्ञ इंजिनियरचा सल्ला घेऊन त्याप्रमाणे काम सुरू केले. पण ते फार खर्चिक होऊ लागले. डॉक्टरांनी आपले वडील बंधू आप्पासाहेबांना

बोलवले. त्यांनी आपली बुद्धी चालवून तेच काम थोड्या खर्चात चांगले सोयीस्कर करून दिले. त्याचप्रमाणे आप्पाचे मित्र रामेश्वरजी पोद्दार आपल्या आठवणीत लिहितात की, माझ्या घराचे दुरुस्तीचे काही काम निघाले असता आप्पासाहेबांनी ते थोड्या खर्चात, अधिक सोयीस्कर व टिकाऊ करून दिले. अशा प्रकारची इतरांची अनेक कामे त्यांनी आपल्या जीवनात करून दिल्याची कितीतरी उदाहरणे आहेत. गरीबांची झोपड्यांची कामे असली तरी आप्पा तितकेच लक्ष त्यात घालून त्यांना योग्य सल्ला देऊन त्यांची कामे चांगली करून देत असे. वास्तुशास्त्राच्या कार्यात पुढे पुढे आप्पाची बुद्धी इतकी बरोबर व अचूक चाले की मोठमोठे इंजिनीयरही त्याची त्या कामातील बुद्धिमत्ता, दीर्घ दृष्टी व थोड्या खर्चात चांगले काम करून देण्याची हातोटी पाहून चकित होत असत. या कार्यातील त्याची योग्यता पाहता चालू व्यवहाराच्या दृष्टीने आप्पाने नुसती इमारतीची कामे करून देण्याचा व्यवसाय केला असता तरी तो हजारो रुपयांचा धनी झाला असता पण त्याचा पिंड त्या प्रकारचा नव्हता. त्याचे मन त्या बाजूला कधी गेले नाही. म्हणूनच त्याच्याविषयी आदर व धन्यता वाटते !

सार्वजनिक विधायक कार्यात आप्पा भाग घेऊ लागल्यापासून त्याच्या कौटुंबिक खर्चाबरोबर त्याच्या सार्वजनिक कार्यातील खर्चही वाढत चालला होता. विधायक कार्य करणारे, त्या कार्यातील पुढारी, देशनेते वगैरेंचे त्याच्याकडे येणे जाणे वाढले व त्यापैकी बहुतेकांचे उतरण्याचे स्थान म्हणजे रणदिवे बंधूंचे घर झाले होते. त्यांचे घर विधायक कार्याचे केंद्रच बनले होते. अशा स्थितीत दोघा भावांना आर्थिक बाजूने खूपच सहन करावे लागले. म. गांधी दौऱ्यावर असता ते धुळ्यास आले होते. दोन तीन दिवस त्यांचा मुक्काम त्यांच्या परिवारासह रणदिवे बंधूंच्याच घरी होता. तेथे त्यांची फारच चांगली व्यवस्था ठेवली होती. राजेंद्रबाबू धुळ्यास आले असता त्यांचीही व्यवस्था रणदिवे बंधूंकडेच होती. कोणीही पुढारी आल्यावर त्या निमित्ताने येणारांची, उतरणारांची बरीच गर्दी त्या वेळी होत असे व त्यांचीही व्यवस्था रणदिवे बंधूंनाच करावी लागे. त्या प्रसंगी कराव्या लागणाऱ्या बाह्य खटपटीत रणदिवे बंधूंशी सार्वजनिक कामात सहकार ठेवणारी मंडळीही असत. शिवाय आप्पाची पत्नी व भाईची पत्नी या दोघीही गृहव्यवस्थेत

अत्यंत हुशार व दक्ष होत्या. त्यांच्यातही आपल्या पतीप्रमाणे आतिथ्यवृत्ती भरपूर होती. विशेष प्रसंगी किंवा नेहमीच्या घरी येणाऱ्या मंडळीची व्यवस्था ठेवण्यात त्या कधी कंटाळा किंवा दुर्लक्ष करीत नसत. त्या आपले कर्तव्य जाणत असत व ते परिश्रम घेऊन संतोषपूर्वक पार पाडण्याची धमक व पात्रताही त्यांच्यात होती. त्या दोघींमधील अशा प्रकारच्या सद्गुणामुळे व पात्रतेमुळे रणदिवे बंधू सार्वजनिक कामे चांगल्या रीतीने, लौकिकासह करू शकले. त्या जितक्या कर्तृत्ववान् होत्या तितक्याच कर्तव्यनिष्ठही होत्या. या त्यांच्या सद्गुणांची ओळख त्या काळातील सर्व परिचितांना पूर्णपणे झालेली होती.

शेती व सार्वजनिक कामे या गोष्टी संभाळून आप्पाचे जीवन चालले होते. भाई वकीली संभाळून सार्वजनिक कामात भाग घेत होता. आप्पा व भाई दोघांनी जीवनाची व सार्वजनिक कार्याची साधारणतः वाटणी केली होती. त्या काळात कामाच्या संस्था नव्हत्या. संसार व संसाराचा खर्च चालवून त्यांतूनच सार्वजनिक काम आपल्या स्वतःच्या पैशानेच कोणालाही करावे लागे. आप्पाने व भाईने ठरवले होते की आपल्या दोघांपैकी एकाने कुटुंबसंसार चालवावा व एकाने सर्व जीवन सार्वजनिक कार्याला द्यावे. त्यावरून आप्पाने सार्वजनिक कार्य पत्करले व भाईने कुटुंब-संसाराचा भार पत्करला. काही काळ अशी व्यवस्था चालली पण पुढे कौटुंबिक संबंध, बाह्य परिस्थिती, सार्वजनिक कार्याची क्षेत्रे, त्यांची साधने वगैरे सर्वातच कल्पनातीत बदल होऊ लागल्यामुळे दोघांच्या पहिल्या व्यवस्थेत बदल करावा लागला. दोघांनाही जीवन-निर्वाहाच्या व्यवसायात पडावे लागले व सार्वजनिक कार्यातही लक्ष द्यावे लागले. म्हणून आप्पाला शेतीकडे लक्ष द्यावे लागे व भाईचे वकिलीचे काम चालूच होते. पुढे पुढे आप्पाची व्यायाम-क्षेत्रातील जबाबदारी भाईनेच स्वीकारली. म्हणून लोकमान्य उद्यान, विजय व्यायामशाळा, विजय तलाव या सर्व प्रवृत्तीत भाईचाच भाग अधिक आहे. लोकमान्य उद्यान ही सार्वजनिक प्रवृत्तीला फारच चांगली जागेची सोय झाली विजय तलावाने बाराही महिने पोहण्याची व स्नानाची सोय झाली. उन्हाळ्याचे दिवसांत या सोईचा फारच चांगला उपयोग होऊ

लागला. सर्व खानदेशात त्या काळी तरी अशा प्रकारची सोय दुसऱ्या कोठे नव्हती असे वाटते. पोहण्यात व्यायाम होतो व एक चांगली कला अवगत होते. प्रत्येकाला पोहता आलेच पाहिजे असा भाईचा त्या बाबतीत आग्रह असे. कारण तो स्वतः उत्तम पोहणारा होता. त्याचे पोहणे साधारण चारपाच तासांचे असे. आप्पा शेतीच्या कामात गढलेला. पण भाईने आपल्या शहराची एक मोठीच अडचण विजय तलावाने नाहीशी केली. भाईचे लक्ष अशा उपयुक्त बाबतीत पहिल्यापासूनच विशेष असे. त्याने आपला वकिलीचा व्यवसाय संभाळून व्यायाम विषयावरील पुष्कळ पुस्तके वाचून, मनन करून त्याचा चांगलाच अभ्यास केला. त्या विषयांतील इंग्लिश वाङ्मय त्याने वाचून काढले. व्यायामाच्या निरनिराळ्या पद्धतींचा अभ्यास करून त्यातून आपल्या प्रजेला कोणता व्यायाम उपयुक्त व थोड्या खर्चात होण्यासारखा आहे त्यावर त्याने खूप मनन केले. व्यायामाला शास्त्रीय ज्ञानाची जोड असली पाहिजे असे त्याचे मत होते. ते सर्व विचार अमलात आणण्याकरिता ‘ खानदेश फिझिकल कल्चर असोसिएशन ’ या नावाची एक संस्था त्याने स्थापन केली, व तिच्या मार्फत सुटीच्या दिवसांत निरनिराळ्या जागी व्यायामवर्ग व शिबिरे भरवण्याचा उपक्रम त्याने सुरू केला. त्या प्रसंगी समारंभ करून व्यायाम निष्णातांना प्रमाणपत्रे, बक्षिसे व पदके देण्याचा रिवाज त्याने पाडला. व्यायाम-शिक्षक तयार करण्याकरिता पद्धतशीर अभ्यासक्रम तयार केले. या सर्वांचा उद्देश आपली प्रजा चांगली कणखर व बलिष्ठ व्हावी, प्रजेतील भय, दौर्बल्य ही जाऊन त्या जागी निर्भयता व शक्तिसंपन्नता यावी, सर्व खानदेश भर या प्रवृत्तीचा प्रसार करावा अशी त्याची इच्छा होती व त्याचा प्रयत्न होता. परतु हे कार्य काही वर्षे चालून पुढे अनेक कारणांमुळे बंद पडले. असोसिएशनच्या मार्फत चालणारे कामही बंद पडले. विजय व्यायामशाळेचे काम मात्र चालूच राहिले. खानदेशात फैजपूर येथे कॉंग्रेसचे अधिवेशन झाले त्या प्रसंगी भाई अडीचशे स्वयंसेवकांसह धुळ्याहून फैजपूरला अखंड ज्योत घेऊन गेला. आप्पानेही तेथील व्यवस्थेत महत्त्वाचा भाग घेतला. दोघाही बंधूंनी त्या प्रसंगी पुष्कळ परिश्रम घेतले. त्या ठिकाणी गेलेले अडीचशे स्वयंसेवक भाईच्या हाताखाली तयार झालेले होते. व्यायामशास्त्राचा भाईचा अभ्यास पुष्कळच खोल व व्यापक असल्याचे मला माहीत होते.



भाईसाहेब रणदिवे

भाईची आणखी एक योजना होती. तिचा प्रयोग त्याने काही काळ चालवला पण तिचा शेवट काय झाला ते मला नीटसे कळले नाही. ती योजना ही की व्यायामशाळेत येणाऱ्या प्रत्येकात झाडांच्या लागवडीची आवड उत्पन्न करावी. त्याकरिता व्यायाम-शाळेच्या जवळच पाण्याची सोय पाहून एक जागा तयार करावी व तेथे कलमी आंब्याची झाडे लावावी. प्रत्येकाच्या वाटणीला ठराविक झाडे द्यावी. त्यांची लावणी, पाणी घालणे, मशागत करणे वगैरेंची जबाबदारी त्या त्या व्यक्तीवर रहावी. त्या सर्वांवर देखरेख ठेवण्याकरिता व सल्ला वगैरे देण्याकरता एकदा त्या विषयाचा तज्ज्ञ असावा. अशा रीतीने चांगली लागवड होऊन उत्पन्न येऊ लागल्यावर त्या उत्पन्नाचा ठराविक भाग संस्थेला मिळावा. काही खर्चाकडे जावा व काही त्या त्या व्यक्तीला ज्याने मशागत-मेहनत केली असेल त्याला जावा. अशा प्रकारची त्याची योजना होती. ही वर दिलेली तिची केवळ रूपरेषा आहे. या योजनेप्रमाणे काम सुरु होऊन ते दोन चार वर्षे चाललेही, परंतु एके साली पांझरा नदीला कल्पनेबाहेर अमर्याद पूर आल्यावर त्यातील बऱ्याच झाडांची नासाडी झाल्याचे नंतर मला कळले होते.

महाराष्ट्रात दरसाल शारीरिक परिषदेचे अधिवेशन होत असे. कित्येक वर्षे हा क्रम चालू होता. तोपर्यंत भाई प्रत्येक अधिवेशनाला जात असे. तो त्या विषयातील तज्ज्ञ म्हणून मानला जात असे.

गांधीयुग आल्यावर तरुणांच्या विचार-आचारात बराच बदल होऊ लागला. जनतेला सत्याग्रहाचा मार्ग रुचू लागला. काही काही ठिकाणी त्यात यशाची चिन्हेही दिसू लागली. विचारांचा जम आचारात बसू लागला. अशाच स्थितीत १९३० साली मिठाच्या सत्याग्रहाच्या निमित्ताने उठलेले आसेतुहिमालय आंदोलन सर्व राष्ट्रात गाजले. गोलमेजी परिषदेने त्याची सर्व दुनियेत ख्याती झाली. परिषद आटोपताच पुनः आंदोलन उठले. ही दोनही आंदोलने सरकारशी झपाझपीच्या लढाईसारखीच झाली. त्या प्रसंगांत आबालवृद्ध स्त्री पुरुषांनी कमालीची निर्भयता, धैर्य, साहस, सहिष्णुता वगैरे सद्गुण केवळ अहिंसा, सत्य व राष्ट्रप्रेम यांच्या बळावर दाखवले ते खरोखर अपूर्व होते. त्या आंदोलनात व्हाईसराय व हिंदी पुढारी यांच्यांत

मुत्सद्दीगिरीचे चांगलेच संग्राम घडून आले. जनतेत खूप आत्मविश्वास निर्माण झाला. सरकारबद्दल वाटणारे भय, वचक नाहीसा झाला. विधायक कार्यांची केन्द्रे सत्याग्रही तयार करण्याच्या छावण्या बनू लागल्या. अशा रीतीने शांततेतील विधायक कार्यांचा समय व प्रत्यक्ष आंदोलनाचा प्रसंग यात राष्ट्रभक्तीचे व स्वराज्यप्राप्तीच्या प्रयत्नांचे अखंड वातावरण राहू लागले. तरुणांत आशा, उत्साह व आत्मविश्वास ही एकसारखी वाढू लागली. सरकार व जनतेमधील श्रीमंतापासून गरीबापर्यंत सर्वांचे म्हणजे एकंदर राष्ट्राचे लक्ष त्या काळात गांधींच्या लेखन, भाषण व हालचालीवर राहू लागले. गांधींच्या भाषेत दिवसेंदिवस उग्रता वाढू लागली. त्या काळात रणदिवे बंधूंचे लक्षही विधायक कार्यात व गांधीजींनी ठरवलेला कार्यक्रम पुरा करण्याचे कामी शक्तीप्रमाणे भाग घेण्यात लागलेले असे. त्यांचे जीवन त्याच धोरणाने चाललेले होते. १९३० सालच्या आंदोलनात कोठे कोठे जंगल-सत्याग्रहही सुरू झाले. त्यातच खानदेशातील जंगल-सत्याग्रह खूप जोरात चालला. त्यात आप्पाला पुढारीपण घ्यावे लागले. मिठाचा सत्याग्रह सुरू होण्याच्या काही दिवस अगोदर रणदिवे कुटुंबावर दोन मोठ्या आपत्ती येऊन गेल्या. आप्पाचा मोठा मुलगा व भाईचे एक जावई त्या सुमारासच इहलोक सोडून गेले. त्यामुळे सर्वांची मने विषादमय झालेली होती. परंतु राष्ट्रकार्य येताच दोघांनीही मनातील विषाद व औदासीन्य झटकून टाकून आपल्यावरील कर्तव्याचा भार उत्साहाने उचलला. आप्पाने जंगल-सत्याग्रहात पुढारीपण स्वीकारले. त्या सत्याग्रहात भाग घेतलेला खेड्यातील वर्ग पहिल्यापासून शिस्तबद्ध असा तयार झालेला नव्हता. तो केवळ तात्कालिक उत्साहाने आवेशात आलेला व भडकून गेलेला लोकसमूह मात्र होता. अशा प्रकारच्या समूहाकडून त्या प्रसंगी आप्पाला शिस्तीने काम करून घ्यावे लागले. त्या वर्गाची आप्पावर श्रद्धा होती. आप्पाच्या शब्दाने लोकांना स्फुरण चढे व त्याच्या शब्दाबरोबर ते शांतही होत असत. जनसमूहावर अशा रीतीचा आप्पाच्या शब्दाचा प्रभाव असल्यामुळे एके प्रसंगी बिथरलेल्या व भडकलेल्या लोकसमूहाला शांत करण्याकरिता कलेक्टरला आप्पालाच बोलवावे लागले व आश्चर्याची गोष्ट आप्पाच्या हुकुमी शब्दाबरोबर लोक शांत झाले. त्यामुळे त्या दिवशीचा मोठाच अनर्थ टळला.

त्या प्रसंगी बेफाम झालेला जनसमूह पोलिसांना आवरता येण्यासारखा नव्हता. त्या दिवशी आप्पा नसता तर गोळीबार, रक्तपात, प्राणहानी होऊन मोठाच गोंधळ उडाला असता. लोकसमूहाची आप्पावर एवढी श्रद्धा होती व आप्पाचा लोकसमूहावर एवढा प्रभाव होता! शेवटी १९३० च्या लढ्याचा परिणाम काय झाला ते सर्व जाणतच आहेत.

त्या काळात सशस्त्र क्रांतीचे विचार सहजच मंद पडून जवळ जवळ लुप्त झाल्यासारखे होते. त्यांना उठाव येईल असे वातावरण त्या समयास नव्हते. पुढे १९४२ साली पुनः आंदोलन सुरू झाले. इंग्रजी अमदानीतील हे शेवटचेच आंदोलन. त्यावेळीही सरकार व पुढारी यांच्यात पुष्कळ वाटाघाटी झाल्या. तेव्हा दुसरे महायुद्ध चालू होते. पुष्कळ वाटाघाटी होऊनही समझोता होईना. शेवटी 'भारत छोडो' हा निकराचा उद्गार गांधीजींच्या तोंडून बाहेर पडला. अखिल भारतातील देशभक्तांचे हृद्गत जळजळीतपणे गांधीजींच्या मुखातून बाहेर पडले. त्याचेच प्रतिध्वनी सर्व भारतात उठले व तेच सर्वत्र घुमू लागले. त्या आंदोलनात सशस्त्र-निःशस्त्र हा भेद राहिला नाही, पाळला गेला नाही. 'करेंगे या मरेंगे' या आवेशाने त्या प्रसंगी जनता सरकारशी झगडली. बाबू सुभाषचंद्र यांनी परदेशात उठावणी करून सैन्याची जमावट करून दिल्लीच्या रोखाने चढाई सुरू केली; पण त्यात त्यांना दैवाने हात दिला नाही. गांधींनाही आंदोलन थांबवावे लागले. पण पुढे लवकरच जागतिक चक्रे निराळ्या गतीने फिरू लागली. भारतावरची सत्ता इंग्रजांना सोडून द्यावी लागली. सिलोन, ब्रह्मदेश वगैरे देश एकामागून एक स्वतंत्र झाले. कैक वर्षे पारतंत्र्यात खितपत पडलेले देश पारतंत्र्यातून मुक्त झाले! जणू ईश्वरी वरदानाने कोट्यवधी प्रजा पारतंत्र्याच्या गर्तेतून बाहेर पडली!

## ५ : विशिष्ट प्रसंग, गुण व स्वभाव दर्शन

आप्पांचे धैर्य, मनाचा समतोलपणा व प्रसंगावधान दिसून येण्याचे अनेक प्रसंग आलेले आहेत. त्यापैकी एक विशिष्ट प्रसंग मला चांगला आठवतो. १९१४ किंवा १५ सालची गोष्ट असेल. त्या वेळी रामदासी व ऐतिहासिक संशोधनाच्या निमित्ताने आम्ही फिरत असता रत्नागिरी जिल्ह्यात बाणकोट-जवळ उमरोली येथे आम्ही गेलो होतो. तेथून एके दिवशी आम्ही दुपारी बाणकोटच्या खाडीतून महाडला जाण्याकरिता मचव्यातून निघालो. भरतीची वेळ असल्यामुळे मचवा चांगल्या गतीने खाडीतून चालला होता. जाता जाता संध्याकाळ झाली. पुढे अंधार पडला व दासगावच्या अलीकडेच ओहटी पूर्ण झाल्यामुळे मचवा थांबला. पुढे पाणीच खुटल्यामुळे पुनः भरती येईपर्यंत आम्हांला तेथेच थांबावे लागले. खलाशांनी

[1] क्रांति-उपासक रणदिवे बंधू

मचवा नांगरून ठेवला. रात्री चंद्रोदयानंतर भरती सुरू झाली. तेव्हा त्यांनी नांगर काढून मचवा चालू केला. पाणी वरच्या दिशेने जोराने वाहू व वाढू लागले होते. पण ते पुरेसे नव्हते. म्हणून पाण्याच्या ओघासरशी मचवा एकदम चिखलात रुतून बसला. खलाशांनी बांबूच्या नेटाने त्याला चिखलातून काढण्याचा प्रयत्न चालवला, पण तो पक्का रुतून बसल्यामुळे निघेना. पाणी वाढू लागले. मचव्याच्या काठाबरोबर जोसाने जाऊ लागले. पाण्याला फार जोर होता. आता मचवा थोडा कलंडला किंवा पाणी थोडे वाढले की, ते एकदम मचव्यात शिरणार व एका मिनिटात मचवा बुडणार याची खात्री वाटू लागली. एकदा मचवा थोडा कलंडताच पाणी आत आले; पण मचवा पुनः प्रयत्नाने समतोल केला. त्या वेळी एक एक क्षण कठीण जात होता. खलाशांनी बांबूच्या साहाय्याने पुष्कळ नेट लावूनही मचवा निघेना व वर येईना. जरासा कलंडे मात्र. पण ते कलंडणे घातक होते. मचव्याला समतोल राखण्याकरिता आम्हां दोघांना उभे राहण्याच्या जागा वरचेवर बदलाव्या लागत. आम्ही धोतरे आवरून व कसून मचवा बुडताच पोहण्याच्या तयारीने सज्ज झालेले होतो. आमच्या जवळच्या सामानाची, कागदपत्रांची आशा आम्ही ठेवली नाही. चंद्रोदय झाला होता तरी तो पूर्ण चंद्र नव्हता व वरही फार आला नव्हता. त्यामुळे सर्वत्र अंधार होता. आम्हांला पोहता येत होते. पण रात्रीची वेळ, अंधार. जागा अपरिचित. खाडीचे तीर दिसत नव्हते. त्यामुळे कोणत्या बाजूला पोहत जावे त्याचाही अंदाज होत नव्हता. पाणी तर सोसाट्याने वाढत होते. खाडीचे पात्र पुष्कळ रुंद असावे इतकाच अंदाज. अशा स्थितीत काही मिनिटे गेली. पण देवाची कृपा. पाण्याच्या जोसामुळे की चिखल ढिला झाल्यामुळे किंवा बांबूच्या नेटामुळे, पण मचवा चिखलातून सुटला व तरू लागला, व खाडीत वरच्या दिशेने भरतीच्या वेगाबरोबर जाऊ लागला. १०–१५ मिनिटेच या अवस्थेत गेली असतील, पण तितक्या वेळात आम्हांला आमच्या मनाची परीक्षा झाली. मचवा तरू लागल्यावर आम्ही खलाशांना व खलाशांनी आम्हांला परस्परांनी परस्परांना शाबासक्या दिल्या. खलाशांनी निरनिराळ्या बाजूंनी नेट लावला म्हणून व आम्ही त्यांच्या सूचनेबरोबर मचव्याचा समतोल साधण्याकरिता उभे राहण्याची

जागा चटपट बदलीत होतो म्हणून त्या उभयपक्षी शाबासक्या होत्या. मचवा तरू लागल्यावर एक खलाशी निवारण झालेल्या संकटाची यथार्थ कल्पना व्यक्त करण्याकरिता आपल्या बोलीत म्हणाला, " आता थोडी मिस्टिक झाली असती की डोळेच पांढरे झाले असते. ' संकटातून सुटल्यावर आम्ही परमेश्वराचे आभार मानले. खलाशांना असे प्रसंग कधी काळी येतही असतील पण आम्हांला जीवनात असा प्रसंग आला नव्हता. आम्ही दोघे बरोबर होतो; त्यामुळे आम्हांला एकमेकांचा धीर होता यात संशय नाही.

त्या रात्री आम्ही १२–१ वाजता महाडला पोहोचलो. रात्री श्रीराम-मंदिरात राहिलो. सकाळी उठून गोविंदराव टिपणीस यांच्याकडे गेलो. आप्पाच्या जीवनात निरनिराळ्या कारणाने अनेक कठीण प्रसंग त्याला येऊन गेले होते. त्या प्रत्येक वेळी त्याच्यातील धैर्य, स्थिरता, वैराग्य ही मला स्पष्ट दिसून आली. अशा त्याच्या स्थितीवरून बापटांनी मला पाठवलेल्या पत्रात लिहिले आहे की ह्या ( रणदिवे ) बंधूंसारखी साधुवृत्तीची माणसे संसारात असतात त्यामुळेच संसारात काही आकर्षण विरक्तांना देखील असते. आणि खरोखरच आप्पाचे वैराग्य विरक्तांनाही अनुकरणीय असे होते.

* * *

' आयनी ' जि. रत्नागिरी येथे जाता येता व इतर प्रवासाच्या प्रसंगा-तही आप्पाच्या दृढ मनःस्थितीचे दर्शन होण्याचे प्रसंग मला अनेक आले आहेत. परंतु विस्तारभयास्तव ते येथे देत नाही.

* * *

आप्पाचे धैर्य व त्याची क्षात्रवृत्ती दिसून येण्याचे अनेक प्रसंग जांबच्या कार्यक्षेत्रात निर्माण झालेल्या तंट्यात दिसून आले असल्याचे मी ऐकले आहे. काही त्याच्याकडूनही समजलेले आहेत. त्यावेळी जांब हे गाव निजाम हद्दीत होते. तेथे हत्यारांचा कायदा खालसाप्रमाणे नव्हता. घरोघर लोकांच्याजवळ हत्यारे असत व आपसांत काही झगडा निर्माण झाला की

ती हत्यारे वापरण्यापर्यंत मजल येत असे. जांब मंदिरासंबंधी किंवा गावातील इतर भानगडींसंबंधी निरनिराळ्या गटांत झगडे निर्माण झाल्यास त्यांत आप्पाचा संबंध येई. तरी तो कोणत्याही प्रसंगी कोणाच्या तरवारीला, भाल्याला किंवा बंदुकीला कधी भ्यायला नाही. पण त्या सर्व प्रसंगांपेक्षाही एका बिकट प्रसंगी आप्पाची तेजस्विता व धैर्य नानासाहेब देवांना दिसून आले. त्यावेळी ते थक्क झाले ! तो प्रसंग असा :—

सन १९४८ साली गांधीजींच्या वधानंतर महाराष्ट्रात अनेक ठिकाणी ब्राह्मणवर्गावर मोठेच बिकट प्रसंग आले. गावोगाव काही अत्याचारही घडून आले. त्या दिवसांत नानासाहेब देव धुळ्यास गावाबाहेर वाग्देवता-मंदिराजवळ हरिहराश्रमात पत्नीसह रहात होते. वधाच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या दिवशीची गोष्ट. नानांचा थोरला मुलगा जीव बचावण्याकरिता बाहेर गांवी निघून गेला होता. अशा समयी रात्री १२ च्या सुमारास गावातील नानांचे काही मित्र त्यांना गावात नेण्याकरिता हरिहराश्रमात आले. गावाबाहेरच्यापेक्षा गावात सुरक्षितता अधिक, या विचाराने ते नानांना नेण्याकरिता आले. नाना त्यांच्याबरोबर गावात जाण्याकरिता पत्नीसह निघाले. घराला कुलूप लावण्याकरिता कुलूप शोधू लागले. ते सापडेना म्हणून शेजारच्या अभ्यागताश्रमात ते कुलूप आणण्याकरिता गेले. तेथे गोगटे वकील व आप्पा झोपले होते. त्यांना उठवून आप्पाजवळ त्यांनी कुलूप मागितले. आता रात्री कुलुपाची जरूर काय ? असे आप्पाने विचारल्यावर नानांनी सर्व हकीकत सांगितली. येथे सुरक्षितता नाही म्हणून नानांचे मित्र त्यांना गावात नेत आहेत हे कळताच आप्पाला ते सहन झाले नाही. त्याची मूळवृत्ती जागृत झाली. त्याने तात्काळ नानांना सांगितले " मी येथे जिवंत असता तुमच्या केसाला तरी धक्का लावण्याची कोणाची मगदूर आहे ? तुमच्यावर हल्ला करायला कोण येणार असतील त्यांना येऊ द्या. मी पाहून घेतो. मी येथे असता सुरक्षिततेकरिता तुम्ही गावात जाणे मला कलंकरूप आहे. मला ते सहन होणार नाही. मी रात्रभर तुमच्या दारात बसून राहतो. जाण्याचा विचार तुम्ही सोडून द्या. " आप्पाच्या तोंडातून थोडेच शब्द बाहेर पडले. पण त्यांत तेजस्विता, आवेश व तडफ भरपूर होती. त्यांतील प्रत्येक शब्द खरा करून दाखविण्याची

हिंमत नानांना दिसून आली. त्यांनी जाण्याचा विचार सोडून दिला व आप्पाला ते इतकेच म्हणाले, तुमचे रक्त क्षत्रियाचे आहे. आमच्यांत ते धैर्य नाही व शक्तीही नाही, असे बोलून ते आपल्या घरात गेले. आलेली मित्रमंडळी परत गेली. आप्पाचे वय त्यावेळी साठीच्यावर होते. शरीर कृश झालेले. अंगावर पुरेसे मांस नाही. अशा स्थितीतही आप्पाची तेजस्विता कमी झाली नव्हती. आप्पाचे शब्द ऐकून व त्याचा आवेश पाहून नाना थक्कच झाले.

*　*　*

आप्पामध्ये प्रापंचिक बाबतीत अनासक्ती, दुःखाचे प्रसंगी निग्रह, दृढता व धैर्य किती होते त्याची प्रचीती मला अनेक प्रसंगी आली होती. परंतु त्यांपैकी एक दोन प्रसंगी मला खूपच तीव्र अनुभव आले. त्या प्रसंगी त्याच्या मनाची दृढता पाहून मला शांती न वाटता माझ्या मनाची उलट विलक्षण कालवाकालव होऊन गेली होती. एकादा चांगला गुणही मर्यादेच्या बाहेर अतिशयतेत गेलेला आपण स्वस्थपणे पाहू शकत नाही. अशी माझी स्थिति त्याच्या बाबतीत कधी कधी झालेली मला आठवते.

सन १९२९ सालातील गोष्ट. आप्पाचा मोठा मुलगा शांताराम पुण्यास फर्ग्युसन कॉलेजमध्ये शिकत होता. इंटरमध्ये होता. तो एकाएकी नाहीसा झाल्याची खबर मला मुंबईस मिळाली. मी तसाच निघून पुण्यास गेलो. पुण्यास तो त्याचे चुलते डॉक्टर गोपाळ काशिनाथ यांच्याकडे रहात होता. तो वेळेवर घरी न आल्यामुळे त्याला शोधण्याकरता सर्वत्र तारा गेल्या. त्यांतच मला एक तार मिळाली. त्याप्रमाणे मी गेलो. तोपर्यंत त्याचा तपास लागला होता. पण तो केवळ त्याच्या शरीराचा लागला होता. त्याचे गतप्राण शरीर नदीत मुंढवा येथे दुसऱ्या की तिसऱ्या दिवशी मिळाले होते. ही बातमी मला समजताच मला तर धक्काच बसला. पुढे सर्व हकीकत समजली. यात काय प्रकार असावा, शांतारामचा खून, अपघात की आत्महत्या ? काहीच तर्क होईना. त्याला नदीवर रात्री एकटेच जाऊन बसण्याची सवय होती. त्याप्रमाणे तो गेला असता अपघात झाला की

त्याचा स्वभाव काहीसा उग्र, त्यात काही भांडण वगैरे होऊन ते विकोपाला गेल्यामुळे त्याला कोणी नदीत ढकलून दिला ? तो चांगला पोहणारा होता. नदीत पडला किंवा कोणी ढकलून दिला तरी पोहणारा बुडेल कसा ? त्याचे शरीर मजबूत, तालमेत कसलेले. मारामारीत दोन चार जणांना तरी सहज हार न जाणारा तो होता. आत्महत्या म्हणावी तर त्याचे काही कारण शोधूनही सापडेना. अशा स्थितीत सर्वांची मने गोंधळून गेली होती. मीही गोंधळलो. काही सुचेना. धुळ्यास तर मला ताबडतोब जायलाच पाहिजे होते. आप्पाला, भाईला, मोठ्या व धाकट्या वहिनींना काय सांगू ? कोणत्या रीतीने त्यांचे सांत्वन करू ? मनाची मोठी चमत्कारिक स्थिती झाली. त्याचे—शांतारामचे काय झाले असावे ? तर्कच काही चालेना. मनाचा गोंधळ-गोंधळ झाला. डॉक्टरना फारच दुःख वाटले. घरातील आबालवृद्ध सर्व दुःखी झाली. त्यांना काही समजावण्याचा प्रयत्न करणे आवश्यक होते. पण मीच अस्वस्थ. तेव्हा अशा स्थितीत काय करणार ? शक्य तितक्या लवकर धुळ्यास जाणे जरूर होते म्हणून तसाच पुण्याहून धुळ्यास गेलो. आप्पाला भेटून काय बोलू ? मुलाचा शेवट कशा रीतीने झाला असावा याविषयी तर्कही चालत नसल्यामुळे दुःखाची तीव्रता वाढलेली. अशा स्थितीत भेटावे तरी कसे ? सांगावे तरी काय ? पुण्याहून येऊन माहिती काढून आलेला मीच प्रथम भेटणारा. आमचे संबंध अत्यंत जिव्हाळ्याचे. मनात एक ना दोन अनेक निरनिराळ्या विचित्र व दुःखद कल्पनांच्या व तर्कांच्या वावटळी चाललेल्या. माझ्या मनाची ही स्थिती; तर आप्पा-भाईच्या मनाची स्थिती काय झालेली असेल ?

अशा भांबावलेल्या मनःस्थितीत स्टेशनवरून घरी गेलो. मनाला खूप दृढ केले. तरी तो बाह्य देखावा मात्र होता. आप्पाला भेटल्यावर त्याला काय वाटेल ? काय आठवेल ? या कल्पनातच भीतभीत त्याच्याकडे गेलो. तो एकटाच माडीवर बसलेला होता. मी त्याच्यापुढे स्तब्धपणे उभा राहिलो. शब्दही तोंडातून काढला नाही. त्याने माझ्याकडे पाहिले. डोळ्यांत अश्रू नाही. मुद्रा किती गंभीर ! किती शांत ! मला पाहून अगदी शांतपणे म्हणाला, "काय तू आलास! चांगले झाले". बस्स.इतकेच शब्द! त्यावर बोलणे नाही.माझ्याकडे पहात मात्र राहिला. दारुण दुःख व तितकीच जबरदस्त दृढता व कठोर निग्रह

त्या सर्वांचे मिश्रण त्याच्या त्या डोळ्यात मला दिसले. अशा स्थितीत निग्रह व दृढता हीही पाहणाराला असह्य वाटतात. आप्पाची दृढता, त्याचे गांभीर्य व त्याची शांती ही सर्व मला त्यावेळी असह्य वाटली. त्याच्या जवळ मी बसून राहिलो. माझ्या मनाची विलक्षण कालवाकालव चालली होती. मला राहवेना. मी त्याच्या पाठीवर हात फिरवीत राहिलो. माझ्या मनात दुःखाचे उमाळे उठतच होते. आप्पाची त्यावेळची शांती! भयंकर अशांतीला दृढतेने-निग्रहाने दाबून आणलेली ती शांती! तिला शांती म्हणावे की दुःखाची पराकाष्ठा म्हणावे? माझे मन एका विचित्र कारुण्याने भरून गेले. काही वेळ तसाच गेला. आम्ही काहीच शब्द उच्चारू शकलो नाही. विषण्ण मनाने आप्पाजवळून कसा तरी उठलो. भाईजवळ गेलो. त्याचे मन अत्यंत कोमल. त्यांच्यात आप्पाइतकी दृढता कोठली? सर्वात कठिण प्रसंग मुलाच्या आईला व काकीला भेटण्याचा. काय बोलावे? कोणत्या शब्दांनी त्यांचे सांत्वन करावे? माझ्याच मनात शांती नव्हती. मी त्यांना काय सांगणार? देवाचे नाव घेऊन मी माईला कसेबसे शांत करून उठलो. दोघींना भेटलो. पुढील प्रकार मी लिहू शकत नाही. शांतारामाची बहीण भावंडे लहान. त्यांनाही भेटलो. मी काही दिवस धुळ्यास राहिलो. आप्पा —भाई यांचे संबंध फार विशाल. संबंधाची माणसे पुष्कळच. सर्व हळहळली.

त्या सर्व प्रकारात दुःखाची आणखी एक विलक्षण गोष्ट म्हणजे धुळ्यात निरनिराळ्या जागी आप्पाच्या मित्रवर्गापैकी कोणी कोणी प्लँचेटचे प्रयोग चालवले. त्या दिवसांत प्लँचेटचा नाद बराच वाढलेला होता. त्या प्रयोगापैकी दोन तीन जागी जवळजवळ एकाच प्रकारची उत्तरे येत. प्लँचेटमध्ये शांतारामचे स्पिरिट येऊन सांगे त्यातील सारांश: "मला दुष्टांनी जबरदस्तीने पकडून गाडीत घालून एका घरात नेले व तेथे पेटीत घालून ठेवले. पेटीत माझा प्राण गेला. प्राण गेल्यावर मला नदीत सोडून दिले." याच प्रकारची हकीकत दोन तीन ठिकाणांतून मला समजली. मी धुळ्यास पोहचण्यापूर्वीच हे प्रयोग होऊन ही हकीकत मुलाच्या आईपर्यंत गेली होती. त्यांना ती कळायला नको होती. पण कळली. त्याचा परिणाम सर्वांच्या मनावर विलक्षण झाला. मूळच्या दुःखात या प्रकारच्या हकीकतीने भयंकर भर पडली. असा दुष्टपणाचा प्रकार मुलाचे बाबतीत कळल्यावर कोणत्या मातापित्याचे किंवा ममतेच्या व्यक्तीचे चित्त स्वस्थ

राहणार ! मी सर्वांना सांगितले यावर विश्वास ठेवू नका. मी हे प्रकार जाणतो. माझा यावर विश्वास नाही. पण दुःखाच्या प्रसंगात व भरात मनुष्याच्या मनाची स्थिती इतकी तीव्र व हळुवार झालेली असते की त्यावेळी तीव्रता वाढवणारी हकीकतच सत्य वाटते. असंभवनीय गोष्टही संभवनीय वाटते. "मन चिंती, ते वैरी न चिंती" या प्रकारची मनःस्थिती तेव्हा झालेली असते. आणि मन दुःखातून माघार न घेता ते अपार दुःखाच्या भोवऱ्यात सापडते. वरील हकीकत ऐकताच मी त्या दिवशी रात्री माईला बरोबर घेऊन आप्पा-माईच्या एका मित्राकडे गेलो. तेथे त्यांच्या लहान मुलाच्या हाताने एकदा प्लँचेट चालवले होते. त्यावेळी वर सांगितलेली हकीकत आली होती. त्या मुलाकडून प्लँचेट पुनः चालवले. मी प्रश्न विचारीत होतो व त्याची उत्तरे कागदावर मुलाच्या हाताने पेनसिलीने लिहिली जात होती. प्लँचेट मध्ये स्पिरिट आले. त्याने प्रथमच सांगितले, "मी शांताराम आहे. माझ्यावर विश्वास ठेवा", व वर सारांश दिला आहे त्या सारखीच उत्तरे आली. पुढील लांबलचक हकीकत न लिहिता त्या गोष्टीचा शेवट मात्र लिहितो. मी स्पिरिटला शेवटी एकच प्रश्न विचारला. तो त्याच्या बाबतीतीलच होता, व तो तेथे जमलेल्या मंडळीपैकी मलाच काय तो माहीत होता. त्यावर प्लँचेटमधून काही जबाब न येता पेन्सिल कागदावरच खिळून राहिली. ती चालेचना. मी म्हणालो त्याचे उत्तर देशील तर ह्या हकीकती लक्ष्यात घेऊ, नाहीतर नाही. त्यावर काही खुलासा केला नाही. तेथून रात्री आम्ही दोघे घरी आल्यावर सर्वांना सांगितले की प्लँचेटमधून कळलेली हकीकत खरी मानून अधिक दुःखी आपण न व्हावे. असे सांगून तेथे झालेला सर्व प्रकार मी सांगितला. जी दुःखद घटना झाली तिचे खरे कारण अज्ञात राहिले तरी चालेल परंतु दुःखात भर टाकणारी ही हकीकत कोणीही खरी मानू नये. इतके सांगितल्यावर मी त्यांना हेही सांगितले की मी पुनः पुण्यास जाईन. प्लँचेटमध्ये सांगितलेल्या गाडीचा व घराचा मी तपास करीन व तुम्हांला कळवीन. मुलगा गेल्याचे दुःख तर अपार आहे, ते शांत करण्याचा प्रयत्न आपण केला पाहिजे. त्यात आणखी खोट्या हकीकतीला खरी मानून दुःख वाढवू नये. माझ्यावर सर्वांचा विश्वास असल्यामुळे सर्वांनी याबाबतीत धीर धरला.

त्यानंतर मी पुण्यास गेलो. प्लँचेटमध्ये गाडीचा नंबर सांगितला होता. त्या गाडीचा तपास करता त्या नंबरची गाडीच नाही असे समजले. घराचा पत्ता–पेठ नंबर मिळाला. परंतु प्लँचेटमध्ये नाव व वर्णन सांगितल्या-प्रकारचा माणूस तेथे मिळाला नाही. व मिळणे शक्यही नव्हते. कारण तेथे निरनिराळ्या लोकांची वसती असल्याचे दिसून आले. तेथे तपास करणे मूलतः चूक असल्याचे माझ्या अनुभवास आले. कारण प्लँचेटमध्ये सांगितलेल्या माणसाच्या वर्गातील माणसे तेथे कधीच रहात नसून भाजीवाले, पानवाले, तांबोळी वगैरेंची तेथे वसती होती. घरे लहान लहान. या सर्व तपासात प्लँचेटचे एकही उत्तर खरे मानण्याला किंचितहि पुरावा मिळाला नाही. मी त्याप्रमाणे धुळ्यास कळवले. या घटनेला आज पस्तीस छत्तीस वर्षे होऊन गेली. तिचे स्मरण झाले की तीवर पुष्कळ विचार संशोधनाच्या दृष्टीने करतो; पण घटनेचे खरे कारण काय ते काहीच अजून लक्षात आले नाही. झाला तो खून, अपघात की आत्महत्या ? या प्रश्नाचे उत्तर अजून अज्ञातच आहे !

हा प्रकार इतका सविस्तर लिहिण्याचा उद्देश रणदिवेबंधू व त्यांचे कुटुंब त्यांच्यावर हा केवढा दुःखदायक प्रसंग आला, त्यातूनच दुःखात भर टाकणारे भलभलते संशय कसे निर्माण झाले व त्यायोगे मूळ दुःखाची तीव्रता कशी वाढत गेली हे वाचकांच्या लक्षात यावे हा आहे. व तशाही स्थितीत आप्पाची आम्हांला असह्य वाटणारी शांती किती विलक्षण होती त्याची वाचकांना काही कल्पना यावी हा या सर्वांतील मुख्य उद्देश आहे. आप्पाने त्यावेळी जी शांती ठेवली ती अपूर्व होती यात शंका नाही. परंतु त्यावेळी त्याला आतून दारुण वेदना होत असल्याची मला खात्री वाटत असल्यामुळे त्यांची शांती पाहून माझी व्याकुळता कमी न होता वाढली होती.

* * *

या भयंकर प्रसंगातून आप्पा-भाई व सर्व कुटुंबी आपआपली मने सावरतात न सावरतात इतक्यात त्यापेक्षाही दुःसह असा दुसरा प्रसंग त्यांच्यावर ओढवला. पहिला प्रसंग १९२९ च्या ऑक्टोबर महिन्यात

आला होता व दुसरा तीन महिन्यांतच १९३० च्या जानेवारीत आला. त्या प्रसंगाची स्मृती येऊनच मन विव्हळ होऊन अस्वस्थ होत आहे. भाईचे वडील जावई रुक्मांगदराव कर्णिक मुंबईत बरेच दिवस आजारी होते. उपचार मोठमोठ्या डॉक्टरांचे चालले होते. तेथे मधून मधून आप्पा व भाई येऊन जात असत. पुण्याहून डॉ. बाबासाहेबही येऊन जात. मी त्या दिवसांत मुंबईत होतो. मीही त्यांच्याकडे जात असे. त्यांच्या दुखण्याला उतारही पडू लागला होता. काही चिंतेचे कारण नाही असे उपचार करणारे डॉक्टर सांगत असत. पण अशाच स्थितीत त्यांची प्रकृती एकदम बिघडून असाध्य झाली. आप्पा धुळ्याहून आला. त्याचे बंधू डॉक्टर पुण्याहून आले. निष्णात डॉक्टरांचे उपचार चालू असताही प्रकृती ताळ्यावर येईना. शेवटी रक्त दिले, पण कोणत्याच उपायाला यश न येता भाईचे जावई निघून गेले. त्या वेळी भाई मुंबईस नव्हता. सारे तात्कालिक दुःखद विधी आटोपले. डॉक्टर पुण्यास निघून गेले. आप्पाला धुळ्यास जाण्याचा प्रसंग आला. दोन तीन महिन्यांपूर्वी त्याचा प्रत्यक्ष मुलगा गेला असता त्याने जे धैर्य धारण केले, ते या प्रसंगी राहिले नाही. भरलेल्या हृदयाने तो मला म्हणाला, माझे धैर्य आता राहिले नाही. अशा स्थितीत मी धुळ्यास कसा जाऊ ? जाऊन काय सांगू ? कोणाला कसे तोंड दाखवू ? तू बरोबर आलास तर मी धुळ्यास जाऊ शकेन. नाहीतर या स्थितीत धुळ्यास जाण्याची माझी हिंमत नाही. मलाही तेथे जायलाच पाहिजे होते; पण मी पुढे दोन दिवसांनी जाणार होतो. पण आप्पाची स्थिती पाहिल्यावर मी त्याला म्हणालो, तू चिंता करू नको. मी तुझ्याबरोबर येतो. तेव्हढ्यानेच त्याला किंचित धीर येऊन त्याने मनाला सावरून घेतले. आप्पाची मनःस्थिती मी समजत होतो. मागील अनुभवावरून त्याच्या धैर्याविषयी मला काहीच शंका नव्हती. पण त्याच्या मुलीवर-पुतणीवर आलेला प्रसंग व त्यामुळे भाईला व त्याच्या मंडळीनुद्धा सर्वांना होणाऱ्या मनोवेदना यांची कल्पना त्याला सहन होईना. प्रसंग व परिस्थिती-भेदामुळे मानवी मनातील कोमल भावना व अवस्था यांच्या तीव्रपणात व असह्यपणात कमी-अधिक अंशाने अनुभवास येणारे कितीतरी निरनिराळे पदर असतात याची जाणीव मला त्या प्रसंगी स्पष्टपणे झाली.

आप्पा मनाचा खंबीर असे मी समजत होतो व खरोखर तसाच तो होताही. पण आपल्या स्वतःच्या दुःख-प्रसंगी मन दृढ व शांत ठेवणे व दुसऱ्याच्या दुःखप्रसंगी मन शांत ठेवणे यात फार अंतर आहे. पहिल्या प्रसंगात आपण स्वतः दयापात्र असतो व दुसऱ्या प्रसंगी आपले मन कारुण्याने भरलेले असते. स्वतःच्या दुःखप्रसंगी धैर्याची जरूर असते व धैर्याकरिता दृढता व निग्रहाची आवश्यकता असते, पण दुसऱ्याच्या दुःखप्रसंगी कारुण्याचे प्रसंगात धारण केलेल्या दृढतेत कठोरता येण्याचा संभव असतो. सज्जनाचे मन वज्रापेक्षाही कठोर व पुष्पाप्रमाणे मृदु असते. म्हणजे स्वतःच्या दुःख-प्रसंगी वज्रासारखे व दुसऱ्याच्या दुःखप्रसंगी पुष्पाप्रमाणे असते. आप्पा-वर आलेल्या या दोन प्रसंगांत मला त्याच्या मनःस्थितीचे दोन निरनिराळे अनुभव आले. पुत्रवियोगाचा दारुण आघात सहन करणे परम कठीण. आप्पासारखी दुर्लभ व्यक्तीच तो आघात दृढतेच्या बळावर सोसू शकते. पण दुसऱ्याची करुणाजनक स्थिती डोळ्यांसमोर किंवा कल्पनेत येत असता मन दृढ करून स्वस्थता साधणे किंवा दाखविणे कोणालाही जवळ जवळ अशक्य असावे असे वाटते. आप्पाच्या या दोन निरनिराळ्या प्रसंगीचे निरनिराळे चित्र यथातथ्य लिहून दाखवण्याची माझी शक्ती नाही हे मी समजत असताही जे मी वर काही लिहिले आहे ते केवळ माझ्या स्वतःच्या समाधानार्थ असण्याचा संभव आहे किंवा आप्पाविषयींच्या माझ्या मनातील श्रेष्ठ भावनेला धक्का न लागावा म्हणून ती सावरून घेण्याचाही यात माझा अंतःस्थ हेतु असण्याचा संभव आहे. या दुर्धर प्रसंगातही माझे मन पहिल्या-सारखेच व्याकुळ झाले. आप्पाबरोबर मी त्याच्या म्हणण्याप्रमाणे धुळ्यास गेलो. भाईचे अतिशय कोमल मन. तो शरीराने जितका दृढ तितकाच मनाचा हळुवार. म्हणून त्याची व सर्वांची स्थिती लिहिण्यास मी असमर्थ आहे! तरीही या स्थितीतूनही काही बळ व धीर धारण करून भाईच्या बाबतीत चार शब्द लिहिल्याशिवाय माझ्याने राहवत नाही. आप्पाने थोड्या दिवसांत विवेकाने व दृढतेने आपले मन सावरून घेतले. मनातील व्याकुळता विवेकाने कमी करण्याच्या प्रयत्नाकडे तो लागला व मुली-विषयीच्या भविष्याच्या जबाबदारीचा व चिंतेचा भार घेण्यास लागणारी दृढता साधू लागला. पण भाई! त्याच्या मनातील विव्हळता कमी होईना.

आम्ही दोघेजण केव्हाही बसलो तरी त्याच्या बाजूने विव्हळते शिवाय दुसरे काही दिसेना. त्याला कसे समजवावे, कसा धीर द्यावा, काय सांगावे, बोलावे म्हणजे त्याला लागलेला आघात थोडातरी सौम्य होईल, सह्य होईल, तो आपल्या मनाला थोडातरी सावरू-आवरू शकेल? मला तर काही सुचेना. तो समयही असा असतो की त्यावेळी बुद्धी चालत नाही. केवढीही मोठी सहानुभूती कामास येत नाही. अखंड वाहणारा काळच ते काम करू शकतो. मी त्याची काही-बाही समजूत करून पुनः लवकरच परत येईन असे आश्वासन देऊन परत मुंबईस आलो. भाईला सांगितल्याप्रमाणे पुनः काही दिवसांनी मी धुळ्यास गेलो. भाईचे दुःख काही आटोक्यात येत असल्याचे दिसून आले. त्याच्या शोकाच्या आवेगात काही सौम्यता-मंदता येत चालली होती.

या दोन प्रसंगाविषयी माझ्या मनाच्या ओघाबरोबर इतके सविस्तर लिहून गेलो. असे प्रसंग जीवनात कित्येकांना येत असतात. त्यांत अद्‌भुत मानण्यासारखे काही नाही. ज्यांच्यावर ते येतात ते कोणत्या ना कोणत्या मार्गाने-उपायाने त्यातून सावरताच हे सर्व जाणत असताही या दोघां बंधूंच्या जीवन-वृत्तातात या प्रसंगावर इतके सविस्तर लिहिण्याचे कारण आमच्या तिघांतील मनोवेदनांचा त्या प्रसंगात आम्हा परस्परांना जितक्या तीव्रतेने व स्पष्टपणे अनुभव आला तितका पूर्व जीवनात आम्हाला कधी आला नव्हता. आमचे तिघांचे जीवन इतके एकात्मतेने जात होते की ते आताही आठवल्यावर ते त्या रीतीने कसे गेले, का गेले, त्याची कारणे काय ते मला तरी अजूनही नीटसे उमगत नाही. तरी त्यातूनही असे वाटते की अस्मानी सुलतानीतून आमच्या जीवनाचा काळ चालला होता. साधारण व्यावहारिक सुखी दुःखी प्रवाहांतून आम्ही चाललो नसून त्या काळात फारच थोड्या व्यक्तींना बाहेरच्या राजकीय विपरीत परिस्थितीमुळे सहन कराव्या लागणाऱ्या मनोव्यथा सोशीत आम्ही जीवन कंठीत होतो. त्यामुळे एकाच विचाराचे, एकाच ध्येयाने प्रेरित झालेले, एकसारख्याच संस्कारांनी, भावनांनी व आकांक्षांनी भरलेले व भारलेले आम्ही होतो. त्यामुळे एकाच्या सुख-दुःखाच्या संवेदना दुसऱ्याच्या हृदयाला सहजच तीव्रपणे जाणवत असाव्या. अशा मानसिक अवस्थेमुळे आप्पा व भाई यांच्यावरील दुःखाचे आघात माझ्या

मनाला सहजच विव्हळ बनवीत असत. आजही तीच मनःस्थिती व त्याच भावना यांच्या स्मरणातून हे शब्द लिहिले गेले आहेत.

* * *

आप्पाला आपल्या जीवनात पुष्कळच पायी फिरावे लागले. त्यात त्याला एकदा कोठेतरी खड्ड्यावरून उडी मारून पलिकडे जावे लागले. त्या उडी मारण्यामुळे त्याला जडलेला हर्नियाचा उपद्रव व त्यामुळे होणारा त्रास त्याला पुष्कळच काळ सहन करावा लागला. तशाच स्थितीत प्रसंगोपात त्याचे फिरणे चालू असे. पुढे त्याचे बंधू पुण्याचे डॉक्टर यांनी ऑपरेशनचा सल्ला दिला व त्याप्रमाणे ऑपरेशन पुण्यास करवून घेण्याचे ठरवले. मी त्यावेळी पुण्यासच होतो. ऑपरेशनच्या वेळी भाईला व मोठ्या वहिनींना बोलवून घेण्याविषयी मी त्याला सांगितले. त्यावर तो म्हणाला, "तू आहेस. डॉक्टर ( त्याचे लहान बंधू ) आहेत, तेव्हा धुळ्याहून कोणाला मुद्दाम बोलवण्याची आवश्यकता नाही." असे सांगून त्याने कोणाला बोलवले नाही व मलाही कोणाला बोलवू दिले नाही. डॉ. घारपुरे यांच्याकडून त्यांच्याच हॉस्पिटलमध्ये ऑपरेशन झाले. ऑपरेशन चांगले झाले. ही सन १९४० सालाची गोष्ट. त्या वेळी आजच्या इतके डॉक्टरी ज्ञान पुढे गेलेले नव्हते व सोयीही आजच्या इतक्या नव्हत्या. ऑपरेशननंतर आप्पाला सतत दोन-तीन दिवस पुष्कळच यातना सहन कराव्या लागल्या. मला त्याच्या वेदना पाहवत ना. तो अत्यंत सहिष्णु पण ऑपरेशनच कठीण. तो किती सहन करणार ? मी सगळा वेळ त्याच्याजवळ रहात होतो. दोन-तीन दिवसांनी त्याच्या वेदना काही सौम्य होऊ लागल्या. किंचित आराम वाटताच त्याचा पहिला प्रश्न 'फिनलंडचे काय झाले ?' हा होता. त्या दिवसात दुसरे महायुद्ध चालू होते. मला त्याच्या प्रश्नाचे फार आश्चर्य वाटले. आप्पाला खरोखरीच सदैव दुसऱ्याची चिंता. स्वतःच्या यातना किंचित कमी होताच युद्धाविषयीचा व दुसऱ्याच्या चिंतेविषयीचा प्रश्न त्याच्या अंतरांतून निघाला. त्याच्या वेदनांत मला फिनलंडचा किंवा कोणताच प्रश्न सुचला नव्हता. पुढे हळूहळू त्याच्या यातना कमी होत गेल्या. मी त्याच्या रोजच्या प्रकृतीचा अहवाल धुळ्यास भाईला व सर्वांना कळवीत

असे. मोठ्या वहिनीही तितक्यात धुळ्याहून आल्या. थोड्या दिवसांनी आप्पा व्याधिमुक्त झाला. पण अशक्तता बरीच आली. तेव्हापासून पुढेही त्याच्यात पहिला कणखरपणा राहिला नाही. काही दिवस पुण्याला राहून तो वहिनीसह धुळ्याला गेला. विद्यार्थीदशेत असतांना आप्पाला दोनदा टायफाईड झाल्याचे मी लिहिले आहे. त्यानंतर या ऑपरेशनशिवाय त्याला विशेष चिंताजनक असे आजारीपण आल्याचे माझ्या आठवणीत नाही. त्याची प्रकृती इतके कष्ट सोसून पुष्कळशा चिंता सदैव वाहूनही बरी राहत असे. प्रथमचे व्यायामाचे व सर्व बाजूंनी सुखवस्तुपणात वाढलेले शरीर व जीवन. त्याने पुढे पुढे खूपच कष्टांत व सुखसोईविरहित स्थितीत, उपास, खाण्यापिण्याचे बाबतीत फारच संयम, स्वतःकरिता फारच काटकसर, फिरण्याचे कष्ट, शेतीचे परिश्रम यांत काढल्यामुळे पहिले शरीर नाहीसेच जसे झाले होते. एक वेळचा शरीराने यथाप्रमाण पुष्ट, पिळदार स्नायूंचा, चपळाईत मूर्तिमंत स्फूर्ति व सर्वांग सुंदर असा आप्पा पुढे ओळखू येईनासा झाला होता. त्याच्या शरीरावरचे मास कोठे गेले? रक्त कोठे नाहीसे झाले? हे सर्व कशात आटवले? कशात घालवले?

संशोधनाचे कार्यांकरिता आम्ही दोघे एकदा कुलाबा जिल्ह्यात फिरत असता पोलादपूर ( ता. महाड ) येथे गेलो होतो. तेथे नदीवर स्नानाकरिता गेलो. नदीला पाणी बरेच होते. आप्पाने पोहण्याकरिता पाण्यात जोराने सुरळी मारताच त्याच्या दोनही कानांना दडे बसले. आम्ही मुंबईस आल्यावर डॉक्टरना कान दाखवल्यावर त्यांनी काही इलाज केला. त्याने कानाचे दडे निघाले. पण पुनः काही दिवसांनी एका कानाने कमी ऐकू येण्याला सुरुवात झाली. पुढे दोनही कानांवर परिणाम होऊन ऐकू येण्याचे मान कमी-कमी होत गेले. व पुढे उतारवयात त्याच्यात ते एक प्रकारचे कायमचे वैगुण्य राहिले. आप्पाचे मनावर सार्वजनिक कामात पूर्णपणे पडण्यापूर्वीपासूनच वैराग्याचा परिणाम झालेला होता. तोच पुढे शरीराचे किंवा सुखसोईचे बाबतीत औदासिन्याचे रूपाने जीवनभर कायम राहिला. शरीराला त्याने काही प्रमाणात नीटपणे संभाळले असते तर तो फार खंगून गेला नसता, देश व समाजाचे दारिद्र्य पाहून त्याच्या मनावर झालेला परिणाम तो कोणत्याही अंशाने कमी करू शकला नाही. शेती करीत असता

तो म्हणायचा, शेतावर कष्ट करणाऱ्या मनुष्यापेक्षा मला अधिक सुखसोईने राहण्याचा काय अधिकार आहे ? त्याच्या हृदयात सदैव देशाच्या दारिद्र्याचे शल्य पीडा देत असे. त्याचे शरीर कृश होण्याला ही एक महान आधि त्याला लागलेली होती. जीवनाच्या अखेरपर्यंत तिने त्याला सोडले नाही. तिने त्याचे सर्व शरीर पोखरून, त्यातून सर्व शोषून घेतल्यावरच त्याला सोडले.

भाई कधी विशेष आजारी पडल्याचे आठवत नाही. व ऐकूनही माहीत नाही. त्याची प्रकृती आप्पाच्या मानाने पुष्कळच थंड. म्हणून स्वभावही पुष्कळ शांत. त्यालाही कानाचा काही त्रास होत असे. त्याचप्रमाणे गाउटच्या संधिवातासारखा काही त्रासही त्याला होता. हे दोनही त्रास फार पोहण्यामुळे जडले असावे असे माझे अनुमान आहे. त्याची झोपेची तक्रार असायची व त्या बाजूने त्याला कधी कधी अधिक सोसावे लागे. पण त्याचाही स्वभाव शारीरिक त्रासाबद्दल पुष्कळ उपेक्षेने व बेफिकिरपणे वागण्याचा होता. ताबडतोब योग्य उपाय करून शरीर संभाळण्याविषयी तोही जवळ जवळ उदासीनाप्रमाणे वागे. जीवन सोयीने घालवावे. उगाच त्याला ताणू नये या मताचा तो होता. पण योग्य प्रसंगी संभाळ घेण्याकरिता लागणारी तत्परता एकंदरीत प्रमाणाने त्याच्यातही कमीच होती. त्याच्या वकीलीच्या व्यवसायामुळे त्याचे जीवन आप्पाप्रमाणे खडतर नसल्यामुळे त्याच्या पहिल्या व नंतरच्या शरीरस्थितीत काही फारसा फरक पडला नाही. पण त्याच्या मनातही देशाविषयी व समाजाविषयी फारच कळकळ असल्यामुळे तोही चिंताग्रस्त असे व त्याला झोप न येण्याचे व पुढे चक्कर करू लागण्याचे व शेवटी फिट्स् येऊ लागण्याचे कारण ती चिंताग्रस्तताच असावी असे मला वाटते.

* * *

आतापर्यंतच्या वृत्तांतात दोघां भावांचे स्वभावांतील साम्य व भेद दर्शविण्याचा एक दोनदा प्रसंग आलेला आहे. त्यांतूनही काही राहून गेलेले दर्शन या प्रकरणात करून देण्याचा प्रयत्न करीत आहे. यात कदाचित पुनरुक्ती येण्याचाही संभव आहे.

दोघा भावांच्या सवयी व स्वभाव यांत साम्य पुष्कळच होते. पण क्वचित् भेदही होते. ते भेद किंवा फरक संगत, व्यवसाय व परिस्थिती यामुळे पडले होते. दोघांमध्ये भाविकता होती. दोघांचीही समर्थ रामदास स्वामी यांच्यावर नितांत श्रद्धा होती. लोकमान्य, गांधीजी यांच्यावरही दोघांची श्रद्धा होती. दोघांत भक्तिभाव होता; परंतु साधनांची आवड निरनिराळी होती. आप्पाची वृत्ती अनुष्ठान, पारायणे, ध्यान, चिंतन यांकडे विशेष होती. मनाच्या श्लोकांचा अर्थ गद्यरूपाने मनाच्या श्लोकांच्या पुस्तकांत सळंगरूपाने दिला आहे तो आप्पाला बहुतेक पाठ झालेला होता. संशोधनाच्या कार्यांत आम्ही दोघे फिरत असता समर्थांच्या विशिष्ट स्थानांत-विशेषतः चाफळची रामघळ, सज्जनगड, शिवथरची घळ अशा शांत जागी–तो गद्य अर्थ सलगपणे खूपच भक्तिभावाने व तल्लीनतेने तो वाची. त्यात तो खूप तन्मय होऊन जात असे. ऐकण्यात मलाही तल्लीनता येई. इतक्या भक्तिभावाने तो पाठ आप्पा म्हणत असे. संपूर्ण दासबोधाचे एका दिवसात एक पारायण अशा प्रकारची सात सात दिवसांची पारायणे केवळ दूध पिऊन त्याने अनेक वेळा केली आहेत. तशा उपोषणाच्या दिवसात त्याच्या तोंडावर एक प्रकारचे तेज दिसू लागे व त्याचे डोळे तेजस्वीपणे चमकू लागत. एकांत-भजन त्याला फार प्रिय वाटे. त्याकरिता धुळ्यापासून तीन मैलांवरील मळा ( शेती ) त्याला फार सोईचा वाटे. दासबोधाच्या वाचनाने भक्तीचे व गीतेच्या वाचनाने निष्काम कर्मयोगाचे संस्कार त्याच्या हृदयात ठसले गेले होते. व जीवनाच्या त्याच्या प्रत्येक विशिष्ट कार्यांत ते प्रसंग किंचित् दिसून येत असत. आप्पात त्यागवृत्ती प्रधानपणे होती. कोणत्याही प्रकारची मौज किंवा चैन त्याला प्रिय नव्हती. त्याचे सर्व जीवन साधेपणात गेले. सर्व जीवन शेती व संशोधनकार्यांत गेल्यामुळे सुखवस्तुपणाचा जीवनात संबंधच आला नाही. समजून उमजून विवेकपूर्वक व भावनापूर्वक त्याने आपले जीवन बनवले होते. भाईमध्येही भाविकता होती. पण त्याचा कल आसन, प्राणायाम, भस्त्रिका यांकडे विशेष होता. ध्यानाची त्याला आवड होती. धुळ्यास हंसस्वरूप स्वामींची व्याख्याने ऐकल्यापासून त्याचे मन त्या अभ्यासाकडे वळले होते. त्या विषयाचा त्याने थोडा फार अभ्यास केला होता. त्यात त्याला आनंद व प्रसन्नता वाटे. एके साली तो व मी

चाफळ ( जि. सातारा ) च्या बाजूला गेलो असता चाफळहून तीन मैलांवर डोंगरात घळ आहे, तीत आम्ही रात्रभर राहिलो. तेथे रात्री आम्ही जे बोलले, तो काही भक्तिपर श्लोक वगैरे म्हणाला, त्यावरून भाईच्या मनात केवढा भक्तिभाव आहे ते मला कळून आले. त्या रात्री निर्जन जागी भक्तीवर व आम्हांला प्रिय असलेल्या राष्ट्रीय विषयांवर आम्ही कितीतरी बोललो. त्या प्रसंगाला पन्नास वर्षांपेक्षा अधिक काळ निघून गेला तरी त्या रात्रीच्या अनुभवाचे स्मरण अजून हृदयात तसेच आहे. देशप्रेम, ईश्वरनिष्ठा, प्रामाणिकता, सत्याची आवड, सेवाप्रियता याप्रकारचे गुण दोघांही भावांत सारखेच ओतप्रोत होते. आप्पामध्ये परिश्रमशीलता, कणखरपणा, सहिष्णुता वगैरे अधिक होती. त्याचे कारण त्याचा जीवनव्यवहार शेतीचा होता व सार्वजनिक काम बाहेर रखडण्याचे व धकाधकीचे. बाकी आप्पा जितका उदार व प्रामाणिक तितकाच भाईही उदार व प्रामाणिक. दोघांमध्येही दिलदारपणा, ममताळूपणा व हृदयाची कोमलता सारखीच होती. या प्रमाणे दोघा बंधूंत विलक्षण साम्य होते. दोघा भावांत लोकसंग्रही वृत्ती व सेवापरायणता होती. आप्पामध्ये ती विशेष दिसून येई. कारण त्याचे सर्व जीवनच सार्वजनिक होते. सेवापरायणतेबरोबरच सेवादक्षताही असावी लागते व ती अंगी बाणण्याला प्रेम, करुणा, निरलसता, त्याग, ज्ञान, कर्तृत्व, कौशल्य, उदारता आदी शारीरिक, बौद्धिक व मानसिक पात्रतेची आवश्यकता असते. त्याशिवाय सेवेत निर्दोषता येऊ शकत नाही. आप्पामध्ये ती पात्रता होती. आपल्या संबंधी व्यक्तीपैकी कोणी कसल्याही अडचणीत किंवा संकटात असला—मग ती अडचण वैयक्तिक असो की कौटुंबिक असो, ते संकट आर्थिक असो की आजारीपणासारखे असो—आप्पा त्याला साहाय्य केल्याशिवाय रहात नसे. स्वतः अडचणीत असताही दुसऱ्याला साहाय्य करण्याला तो त्रासत नसे, कष्टी होत नसे किंवा त्यात त्याला गर्व वाटत नसे. आजाऱ्याची सेवा-शुश्रूषा करण्यास कधी कंटाळत नसे. क्रांतीच्या प्रयत्न करणारांना साहाय्य करण्यात स्वतःला कितीही देणे झाले, कर्जाचा भार असह्य झाला तरी तो ते साहाय्य करीतच राही. त्यात कोणालाही दोष न देता कर्जाचा भार तो खेचीत राही, हे सर्व त्याच्याकडून कसे घडत असे ते एक भाईच जाणे. आप्पाचा तो स्वभाव बनलेला होता. असा स्वभाव दुर्मिळ

यात संशय नाही. व आप्पाच्या या प्रकारच्या वर्तनात भाई संपूर्ण सहमत असे यातही शंका नाही.

*　　　*　　　*

भाईच्या न्यायप्रियतेविषयी व कार्यदक्षतेविषयी कोर्टाचा भाईवर विश्वास होता म्हणून त्याला एका मुकदम्यात कमिशनवर नेमले असता त्यातील त्याच्या कामगिरीबद्दल आपल्या आठवणीत शंकरराव जोग गौरवाने लिहितात–" बहुधा सन १९१७ सालीच कै. भाईसाहेब रणदिवे यांना धुळे फर्स्ट क्लास कोर्टाने एका स्पेशल मुकदम्यात कमिशनवर नेमले होते. त्यांच्या मदतीस कोर्टाने मला नेमले होते. काम फार मोठे व महत्त्वाचे होते. त्यातील ( भाईसाहेबांच्या ) वागणुकीवरून त्यांचा स्वभाव अत्यंत निर्भीड, न्यायप्रिय, करारी व पापभीरु होता, हे प्रत्ययास आले. हे काम जवळजवळ महिनाभर चालले होते. सकाळी ६॥ ते १२ व दुपारी २ ते ६ इतका वेळ ते नियमितपणे काम करीत होते. त्यांना आळस अगर कंटाळा आल्याचे कधीच दिसले नाही. हे काम अत्यंत भानगडीचे व महत्त्वाचे होते. या कामात त्यांची वागणूक अत्यंत सडेतोड व न्यायप्रिय अशी दिसून आली."

*　　　*　　　*

नारायण कृष्ण गोगटे ( भाईचे कॉलेजातील सहाध्यायी ) आपल्या आठवणीत लिहितात :

" आप्पा–भाई हे मला राम-लक्ष्मणासारखे वाटतात. त्यांच्यांत क्षात्रतेज प्रामुख्याने प्रकट होत असले तरी त्याला आधारभूत ब्रह्मतेजही त्यांच्या जीवनात नेहमी चमकत असे. पारतंत्र्याच्या काळातही त्यांचे तालमीच्या शरीरसंपत्तीच्या जोरावर तरुणांस लष्करी शिक्षण देण्याचे प्रयत्न व धडपड सारखी चालू असत. धुळ्याची तालीम म्हणजे रणदिवे बंधूंचे राष्ट्र-कार्य खानदेशात कोणाला माहीत नाही असे होणार नाही. तसेच लष्करी शिक्षणात शिस्तीचे–मनःसंयमाचे महत्त्व किती असते ते सिद्ध करणारी एक

घटना म्हणजे कायदेभंगाच्या चळवळीत धुळ्यात आप्पासाहेबांनी बेफाम झालेला व पोलिसांना आवरता न येणारा क्रुद्ध जनसमूह नुसत्या आपल्या शब्दांनी शांत करून गोळीबार, रक्तपात, प्राणहानी व गोंधळ थांबविला ही होय. ह्या कामी त्यांच्या जीवनातील तपश्चर्याच तेथे उपयोगी पडली.

"डेक्कन कॉलेजमध्ये पा. म. बापटांचा त्यांचा जो स्नेह व बंधुभाव जुळला तो अखेरपर्यंत टिकला इतकेच नव्हे तर सारखा वाढत होता. ह्या जोडीच्या प्रयत्नामुळेच अज्ञातवासात बापटांना यशस्वीपणे राहता आले. ते एक प्रकारचे सरकारला आव्हान होते. तुम्ही ज्याला गुन्हेगार म्हणता त्याला आम्ही लपवून ठेवतो. असेल ताकद तर काढा शोधून. त्यात त्यांच्या वाट्याला ९९ टक्के यश आले. पण एक टक्का अपयशही भाईंच्या क्षात्र-वृत्तीला खपले नाही. इतकी त्यांची महत्त्वाकांक्षा व कार्यनिष्ठा दांडगी होती.

"डेक्कन कॉलेजातील उपेक्षिलेली तालीम माधवराव (भाई) रणदिवे यांनी ऊर्जितावस्थेस आणली व परदेशी खेळांकडे झुकलेल्या सुशिक्षित तरुणांतून पुष्कळांस स्वदेशी खेळाकडे ओढून म्हणा, पळवून म्हणा, मतपरिवर्तन करून म्हणा पण आणले. त्याकाळी स्वदेशी खेळ 'मायनर गेम्स्' या नावाने संबोधले जात होते. कै. रामभाऊ रानडे, श्री. बाबासाहेब खापर्डे, पांडे, चौघुले, सबनीस इत्यादी मंडळी स्वदेशी खेळाचे तालमीचे—मायनर गेम्स्चे—कट्टे भक्त होते. बोटिंग व पोहणे ह्यांची माधवरावांना हौस दांडगी असे. बोटिंग शर्यतीत ते भाग घेत व पोहायला जाण्याची संधी कधी वांया दवडीत नसत. त्या पोहण्याच्या हौसेपायी शीव येथील विहीरीत ते तासनतास स्थिर पडून राहण्याचा व हातपाय मुळीच हलू द्यावयाचे नाहीत असा अभ्यास करीत असत. त्यापायी त्यांना संधिवात— गाउट लंबेगो सारखा एक रोगही जडलेला होता.

"शिवाजी—रामदास, रामदास—कल्याण, शंकरराव देव—आप्पा रणदिवे, वासिष्ठ—रामचंद्र ह्या जोड्या अभेद्य, तसाच आप्पासाहेब, भाईसाहेब, सेनापती बापट, व वासुदेव दास्ताने हा गटही अभेद्यच होता. ह्या मंडळींनी लोकमान्य टिळक व महात्मा गांधी आपणामध्ये पूर्णपणे सामावून घेतले होते. १९४७ नंतर कॉंग्रेस सरकार अधिकारारूढ असताना राष्ट्राची जी अधोगती होत

होती ती पाहून त्यांना सारखेच वाईट वाटत असे. कशाबशा म्हणजे राष्ट्राचे विभाजन करून मिळालेल्या स्वराज्याचे रूपांतर सुराज्यात करण्याची उत्तम संधी कॉंग्रेस सरकारने हातची गमावली ह्याचे त्यांना परम दुःख होत असे. चीनचे भारतावरचे आक्रमण जर १९४७-४८ मध्ये झाले असते तर आप्पा-भाई ही जोडी संरक्षणमंत्री शिक्षणमंत्री असेच कोठेतरी असते. व त्यांनी हिटलरची शिक्षण योजना-राष्ट्रीय तरुणांचे लष्करी शिक्षण-शाळातून सक्तीने सुरू केले असते. इतका त्यांचा क्षात्रियबाणा कडक आणि वर्धिष्णू होता. कांदिवली येथील पी. टी. कोर्स मधून लष्करी शिक्षण, लष्करी वळण राष्ट्रास मिळण्याजोगे नाही असे त्यांनी तेव्हाच ओळखले होते. इतर सर्वांनी अहिंसाव्रताचे परिपालन महात्माजींच्या उपदेशाप्रमाणे खुशाल व अवश्य करावे, पण **शूराची अहिंसा** कशी असते हे ह्या जोडीनेच राष्ट्रास शिकविले असते. क्षत्रियांच्या हातांत अहिंसाव्रताचे कंकण बांधून सम्राट अशोकाने राष्ट्रीय दृष्ट्या घोडचूक वा राष्ट्रीय गुन्हाच केला असे मला वाटते. पण ती चूक ह्या बंधुद्वयांनी शूरांची अहिंसा राष्ट्रास शिकवून दुरुस्त केली असती खास.आजचे चीन पाकिस्तानचे सख्य पाहून ही जोडी घरी अगर शेतांवर न दिसता म्हातारपणीही सीमा संरक्षणाच्या लढ्यात कदाचित धारातीर्थी देह ठेवून स्वर्गात गेलेलीही आपण पाहिली असती!"

**ना. कृ. गोगटे.**

# ६ : तिसरे बंधू

आप्पा व भाई या दोघा बंधूंच्या बऱ्याच पुढच्या भागापर्यंतचा जीवनवृत्तांत आतापर्यंत निवेदन केला. पुढील भागात जाण्यापूर्वी त्यांच्या तिसऱ्या बंधूंविषयी लिहिणे मला कर्तव्यप्राप्त आहे. मित्रधर्मानुसार ते माझे कर्तव्य आहे. अशी माझी समजूत असल्यामुळे मी या तिघाहि बंधूंचा परिचय लिहिण्याचे ठरवले होते. आप्पा व भाई या दोघा बंधूंचे जीवन प्रथमपासूनच एकत्र चाललेले, त्यांचे विचार, कार्यपद्धती, कार्यक्षेत्रही एकच असल्यामुळे त्यांचे सर्व जीवन संलग्नपणे चाललेले होते. त्यामुळे दोघांचा जीवनवृत्तांत एकाच ओघात संमिश्रपणे लिहिता आला. त्यांचे तिसरे बंधू आप्पा व भाई यांचे चुलते काशिनाथ आत्माराम यांचे थोरले चिरंजीव डॉ. गोपाळ काशिनाथ यांचा डॉक्टरी व्यावसायिक जीवनाचा सर्व भाग पुणे येथे गेला.



डॉ. गोपाळ काशिनाथ रणदिवे (बाबासाहेब)

व त्यांचा जीवन व्यवसाय व जीवनपद्धती वगैरेशी दोघा बंधूंचा नित्याचा संबंध नसल्यामुळे त्यांचा वृत्तांत या निराळ्या प्रकरणांत द्यावा लागत आहे. त्यांना आम्ही ' डॉक्टर ' या नावाने संबोधित असू म्हणून त्याच नावाचा वृत्तांतात उपयोग केला आहे. डॉक्टरांचे विद्यार्थीदशेतील थोडे दिवस धुळे येथे गेले होते. त्यावेळी मी धुळ्यास नव्हतो. म्हणून त्यांचा माझा त्या वेळी संबंध आला नाही. पण भाई वकिलीच्या अभ्यासाकरिता मुंबईस शीवला काकांच्याकडे राहू लागला. तेव्हापासून डॉक्टरांशी माझा संबंध येऊ लागला. शीवला काशिनाथ आत्माराम यांचा बंगला आग्रा रोडवर मुरलीधराचे देऊळ होते—( ते आता आहे किंवा नाही माहीत नाही )—त्याचे समोर होता. आप्पा व भाई यांचे काकांचा उल्लेख पूर्वी आलेलाच आहे. त्या सर्व कुटुंबात परस्परात प्रेम व ममता असल्यामुळे सख्खे व चुलत भाऊ असा त्यांच्यात भेद दिसून येत नसे.

डॉक्टर पुण्यास राहू लागल्यापासून माझा त्यांचा परिचय वाढला व जसा आप्पा—भाई यांच्याशी माझा संबंध होता त्याचप्रमाणे त्यांच्याशीही बनला व तसाच पुढे जीवनभर राहिला. डॉक्टर विद्यार्थिदशेत असता काही दिवस धुळ्यास होते. त्या वेळी आप्पाकडून त्यांना व्यायामाची दीक्षा मिळाली होती. वडील दोन भावांत जे नैतिक गुण होते त्यापैकी कोणताही गुण डॉक्टरामध्ये कमी प्रमाणात नव्हता. आप्पा व भाईप्रमाणे ते क्रांतीचे प्रत्यक्ष उपासक नव्हते तरी त्यांच्यात देशप्रेम होते व देशभक्तांविषयी त्यांच्या मनात आदर होता. वडील बंधूंची कारस्थाने, त्यांच्या खटपटी त्यांना माहीत होत्या. इतकेच नव्हे, पण प्रसंगी त्यांचे त्यांना त्यात सक्रिय साहाय्यही असे. बापट इंग्लंडहून आल्यावर त्यांच्याबरोबरचे बेकायदेशीर सामान संभाळून ठेवण्यात डॉक्टर व त्यांचे वडिल यांचे संपूर्ण साहाय्य होते. त्यानंतरही डॉक्टर आपला व्यवसाय संभाळून वडील बंधूना त्यांच्या हरएक कार्यात साहाय्य करीत असत—मग ते कार्य व्यायामाचे असो, संशोधनाचे असो की शेतीचे असो. आप्पाच्या प्रत्येक क्षेत्रात डॉक्टरांचे साहाय्य असायचेच. डॉक्टर आपल्या दोघा वडील भावांना फार मानाने व आदराने वागवीत. तिघांचे आपसात बोलणे, वागणे अत्यंत प्रेमळपणाचे असे.

या तिघा भावांच्या हार्दिक सख्यत्वामुळे सर्व कुटुंबांत ऐक्य होते. सर्वांत प्रेमळपणा होता.

डॉक्टर १९१४ साली एम्. बी. बी. एस्. झाले. त्यांना थोड्याच दिवसात पुण्याच्या ससून हॉस्पिटलमध्ये जागा मिळाली. त्यांची पुण्याची कारकीर्द सरकारी नोकरीपासून सुरू झाली. पुढे तेथील मेडीकल स्कूलमध्ये त्यांना लेक्चररचे काम मिळाले. शिवाय डॉक्टरांचा स्वतःचा दवाखानाही होता. डॉक्टरांचा स्वभाव फारच शांत. लोकात निष्कारण मिसळण्याची वृत्ती कमी. जवळ जवळ नाही सारखीच. बोलणे फार परिमित. त्यांच्या तोंडून चर्चा मी कधीच कोणाशी केलेली ऐकली नाही. त्याचप्रमाणे क्रोधाने कोणाशी बोलल्याचेही ऐकले नाही. स्वभावात गंभीरता अधिक. बाहेरून स्वस्थसे दिसत असले तरी आतून विचारमग्न असत. विचारमग्नतेत विशेषतः पेशंटच्या प्रकृतीविषयी व त्यावरील उपायाविषयी चिंतन असे. हा त्यांच्यात एक बहुमोल सद्‌गुण होता. व्यवसाय-निमित्ताने लोकांशी जसजसा त्यांचा संबंध अधिकाधिक येऊ लागला तसतसे त्यांच्यातील सद्‌गुण जनतेच्या निदर्शनास स्पष्टपणे येऊ लागले व त्याचा परिणाम त्यांच्या व्यवसायावर होऊ लागला. ते लोकप्रिय होऊ लागले. व त्यांचा सल्ला जनमान्य होऊ लागला. इतकेच नव्हे तर कठीण केसिसमध्ये इतर डॉक्टर, रणदिवे यांचा सल्ला व अभिप्राय घेण्याविषयी पेशंटना शिफारस करू लागले. असाध्य ठरलेल्या केसिस त्यांच्या औषधाने व उपचाराने सुधारल्याची कैक उदाहरणे घडून येत असत. त्यांचा स्वभाव फारच कनवाळू होता. बुद्धि कुशाग्र होती, गंभीर, खोल चिंतनशीलता व शोधकपणा त्यांच्यात होता. त्यांना परिश्रमाचा कंटाळा नव्हता. अभ्यास, संशोधन, कारुण्य, कर्तव्यनिष्ठा व सेवाधर्म अशा अनेक दृष्टीनी ते आजारी व्यक्तीकडे पहात असत. व त्याच दृष्टीने त्यांच्याशी संबंध ठेवून प्रयत्नशील असत. त्या सर्वांचा परिणाम म्हणून त्यांच्या हाताला यशही येत असे. अशा रीतीचा त्यांचा सुस्वभाव व डॉक्टरी विद्येतील त्यांचे प्राविण्य यामुळे त्यांच्यावर लोकांची खूपच श्रद्धा होती. त्यांचा व्यवसाय वाढू लागल्यावर त्यांना पुण्यात निरनिराळ्या जागी तीन दवाखाने ठेवावे लागले. त्यांचे दोन जावई डॉक्टर झाले असल्यामुळे ते त्यांच्या स्वतःच्या व्यवसायांत त्यांना चांगले सहकारी

मिळाले होते. तेही चांगले हुशार असल्यामुळे त्यांच्या साहाय्याने डॉक्टर आपली नोकरी सांभाळूनही तीन दवाखान्यांकडे लक्ष देऊ शकत होते. त्यांच्या सहकार्यामुळे त्यांच्यावरील भार काही अंशाने त्यांना कमी जाणवत होता. डॉक्टरी व्यवसाय असा आहे की, आपल्या जीवन निर्वाहा-बरोबरच त्यात सहजच लोकसेवाही होऊ शकते. कोणाही डॉक्टरला लोकसेवेकरिता म्हणून मुद्दाम दुसरा व्यवसाय किंवा कार्यक्षेत्र बहुशः शोधावे लागत नाही. मूलतः केवळ स्वार्थी व्यक्ती या व्यवसायात दयाहीन व कर्तव्यभ्रष्ट बनू शकते व मूलतः परार्थपरायण, सेवाभावी व सात्त्विक मनुष्याला तो व्यवसाय सदैव अधिक उदार, अधिक परोपकारी, कर्तव्यनिष्ठ व सेवापरायण बनविण्यास साहाय्य होत असतो. डॉक्टर रणदिवे यांचा स्वभाव त्यांच्या वडिलांप्रमाणे मूलतः उदार, प्रेमळ व सात्त्विक असल्यामुळे त्यांचा डॉक्टरी व्यवसाय त्यांच्यातील सुप्त व प्रगट सद्‌गुणांना पोषक व संवर्धक होण्यास फारच उपयुक्त झाला. डॉक्टरांचे वागणे, बोलणे, कार्य करणे इतके निर्दोष असे की त्यात कोणालाही दोष काढणे शक्य नसे. डॉक्टरी विद्येतील त्यांचे ज्ञान व अनेक सद्‌गुण यामुळे त्यांची इतकी ख्याती झाली होती की त्यांना ओळखणाऱ्या प्रत्येकाच्या तोंडून त्यांच्याविषयी धन्योद्‌गारच निघत असत. त्यांच्या सज्जनतेविषयी पुण्यात इतकी ख्याती व खूपच लोकप्रियता असताही त्यांच्यात केवळ खुशामती-पणा नसल्यामुळे त्यांच्यावर बदलीचा प्रसंग आला. त्यात आलेल्या अडचणी, सोसावा लागलेला मनस्ताप यातून मुक्त होण्याला निदान दोन चार वर्षे तरी त्यांना लागली.

डॉक्टरी व्यवसायात त्यांना शक्तिबाह्य ताण पडत असे. डॉक्टरी व्यव-सायामुळे रोजच्या जीवनात नियमितपणा राखण्याचे कठिण असल्यामुळे तो साधला जात नसे. शिवाय आजारी मनुष्याचे ते केवळ डॉक्टरच नसत तर सर्व बाजूंनी ते त्यांचे हितचिंतक असल्यामुळे त्यांच्या मनावर कधी कधी त्यांच्या चिंतेचा भारही पडत असे. डॉक्टर घरी आले तरी आजाऱ्यांच्या चिंतेत व चिंतनात मग्न असलेल्या स्थितीत मी व अनेकांनी त्यांना पाहिलेले आहे. त्या सर्वांचा परिणाम त्यांच्यावर होऊन त्यांची प्रकृती मधून मधून बिघडे. प्रकृती बिघडल्यावर आप्पा, भाई अगर मी

यापैकी कोणाला तरी त्यांचे जवळ रहावे लागे. कधी कधी आम्ही कोणी दोघेही रहात असू. आमच्यापैकी कोणी राहिल्याने त्यांच्या मनाला धीर व शांति वाटे. आमच्याशी असलेल्या घनिष्ठ संबंधाचा तो परिणाम होता. दोनवेळा लागोपाठ त्यांना टाईफाईडचा उपद्रव सोसावा लागला. कमालीची अशक्तता त्यांना त्यावेळी आली होती. त्यातून देवाच्या दयेने ते निभावले काही आराम वाटू लागल्यावर आप्पा व मी त्यांना धुळ्यास घेऊन गेलो. तथे त्यांना चांगला आराम वाटू लागल्यावर व चांगली शक्ती प्राप्त झाल्यावरच ते पुण्यास आले.

आम्हां तिघांवर त्यांचा फारच लोभ होता. माझ्या प्रकृतीस्वास्थ्याकरिता व माझ्या नातलगांच्या स्वास्थ्याकरिता त्यांनी वेळोवेळी जे लक्ष दिले व जे परिश्रम घेतले त्याचे ऋण माझ्यावर अजून तसेच आहे. ते मी फेडू शकलो नाही इतके सर्व असूनही त्यांच्या मनांतील व वागण्यातील नम्रता, प्रेम व श्रद्धा पाहून मला आश्चर्य वाटे व त्यांच्या विषयीचा माझ्या मनातील आदर दुणावे. त्यांच्यात अहंकार नसल्यामुळे त्यांच्या स्वतःकडून घडलेल्या सत्कृत्याचा उच्चार त्यांच्या तोंडून मी कधीच ऐकला नाही. मोठमोठ्या प्रख्यात सरदार, जहागीरदार व राजे लोकांचे ते फॅमिली डॉक्टर होते व दुःसाध्य आजाराने पीडित असे कितीतरी पेशंट त्यांच्याकडून बरे झाले होते. तरी या गोष्टी त्यांच्या स्वतःकडून मला कधीच कळत नसत. त्या मला बाहेरून समजत असत. व समजल्यावर त्याविषयी सहजच धन्यता वाटून मी कधी त्यांना विचारलेच तर त्या बाबतीत त्यावर काहीच प्रौढीने सांगत नसत. जणू काही आपल्याकडून विशेष झालेच नाही अशा रीतीने त्याबद्दल केवळ होकार देत असत. अशा प्रकारचा निरहंकारी, निगर्वी त्यांचा स्वभाव होता. फीच्या बाबतीत पैशाचा हव्यास नसून आजाऱ्याला आराम देण्याची त्यांची मुख्य वृत्ती असे. फीपैकी कितीतरी रक्कम वसूल न होता दरसाल बुडत असे. पण त्याबद्दल ते कधी खंत करीत नसत. स्वार्थापेक्षा परोपकारी व उदारतेची वृत्ती त्यांच्यांत आधिक्याने होती. स्वतःच्या सत्कर्माबद्दल व उदारतेबद्दल प्रौढी न मानणारा सज्जन पुरुष सध्यांच्या काळात विरळा यांत संशय नाही.

अशा प्रकारच्या त्यांच्या सज्जनतेमुळे व उदार व परोपकारी जीवनक्रमामुळे त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या जनतेने त्यांचा जाहीरपणे सत्कार करण्याचे योजले पण त्या गोष्टीला डॉक्टर अनुमती देईनात, सत्कार करून घ्यायला ते तयार होईनात. शेवटी त्यातील प्रमुख मंडळींनी मला पुण्यास बोलवले. सर्व हकीकत मला सांगितली. ती ऐकून त्या मंडळींची व जनतेची डॉक्टरावरील श्रद्धा पाहून माझे मन भरुन आले. त्यांच्या मनातील कृतज्ञभाव मला योग्य वाटला तो व्यक्त करण्याकरिता डॉक्टरांनी लोकांना संधी देण्यात काहीच अयोग्य नाही, नव्हे तशी संधी देणे हेच योग्य आहे असे मला वाटले. मी त्या मंडळीला सत्काराची तयारी करण्यास सांगितले व डॉक्टरना सत्कार करून घ्यायला तयार करण्याचे काम स्वतःकडे घेतले. डॉक्टरांशी त्याबाबतीत बोलणे काढून त्यांची समजूत घालून अनुमती मिळवली व ती गोष्ट सत्कार करू इच्छिणाऱ्या मंडळीला कळवून मी परत मुंबईला आलो. समारंभाच्या प्रसंगी पुनः पुण्यास गेलो. कारण समारंभाच्या प्रसंगाची डॉक्टरांच्या बाजूची सर्व जबाबदारी मी आपल्यावर घेण्याचे कबूल केले होते. पुण्याच्या मंडळींनी सत्कारसमारंभ फारच चांगल्या रीतीने साजरा केला. डॉक्टरांचा व त्यांची पत्नी सौ. इंदिराबाई यांचा सर्वांनी फारच कृतज्ञतेने, प्रेमाने व आनंदाने बहुमान केला. त्यांना बहुमोल वस्त्रे अर्पण केली. अनेकांनी अश्रुपूर्ण नेत्रांनी त्यांचे गुणवर्णन केले. अशा रीतीने समारंभ साजरा झाला. सर्वांना धन्यता वाटली. पण त्यातूनही डॉक्टरांची स्वतःच्या प्रशंसेबद्दलची व सत्काराबद्दलची अनासक्ती सर्वांच्या ध्यानात आली.

डॉक्टरांची गृहस्थिती व आप्पा-भाई यांची गृहस्थिती यात काही बाबतीत अंतर होते. डॉक्टरांचा ठराविक एकमार्गी व्यवसाय, त्यांतून निश्चितपणे होणारी पुरेशी अर्थप्राप्ती, मुलाबाळांच्या शिक्षणाची चांगली व्यवस्था वगैरे असल्यामुळे व जीवनात धामधूम सार्वजनिक किंवा काही गुप्त कारस्थांची भानगड अगर चिंता वगैरे काही नसल्यामुळे त्यांच्या जीवनात सहजता व सरळता होती. अनेक प्रकारच्या सांसारिक अनुकूलता होत्या. कोणत्याही साहसिक कार्याशी मुद्दाम संबंध आणलेला नव्हता म्हणून

त्यांना निश्चितता होती. आप्पा व भाई यांच्या परिस्थितीच्या मानाने डॉक्टरांची परिस्थिती पुष्कळच चांगली होती. जीवनात धांदल, ताणाताण, अनिश्चितता नाही अशा रीतीचे त्याचे जीवन गेले. आप्पा व भाई यांच्या जीवनात सदैव अनिश्चितता. क्रांतीचा उद्योग करणारांशी संबंध असल्यामुळे नेहमीची आर्थिक ताणाताण. त्याच कारणांमुळे सदैव निरनिराळे विचार, योजना व त्या सिद्धीस नेण्याच्या अखंड चिंता. घरच्या मंडळीनाही आपल्या संसाराविषयी अशाश्वती, मुलाबाळांचे बाबतीत औदासिन्य व हयगय अशा प्रकारच्या स्थितीतून त्या दोघांचे व त्यांच्यामुळे सर्व कुटुंबाचे जीवन गेलेले. त्यामुळे दोन ठिकाणच्या गृहस्थितीत सहजच अंतर होते.

डॉक्टरांनी सोमवार पेठेत फलटणकरांचा वाडा विकत घेतला. आप्पाने त्यात जरूर ते फेरफार करून काही नवीन बांधकाम करून तो अधिक उपयुक्त व व्यवस्थित केला. आप्पा-भाईच्या अडचणीत डॉक्टरांचे सहाय्य व डॉक्टरांच्या कोणत्याही अडचणीत आप्पा-भाईचे सहाय्य असा अन्योन्य-संबंध तिघा भावात होता. डॉक्टरांचे वडील वृद्धावस्था येण्यापूर्वीच गेले. पण त्यांच्या मातुश्री दीर्घायुषी होऊन गेल्या. डॉक्टरांचे मनात त्यांचे विषयी फारच पूज्यबुद्धी होती. त्यांची मातृभक्ती पाहून आम्हांला आनंद वाटे. त्याही आपल्या देवदेवतार्चनात प्रसन्न असत. त्या फारच प्रेमळ व भाविक होत्या. महात्मा गांधींना त्या अवतारी पुरुष समजत असत. वडीलांचे मागे डॉक्टरनी आपले लहान बंधू व भगिनींचा चांगला सांभाळ केला. त्यांची पत्नी व मुलेमुलीही फारच सरळ स्वभावाची. डॉक्टरांची प्रकृती शेवटची सात आठ वर्षे फारच बिघडलेली राहिली. अत्यंत पराधीनता त्यांना आलेली होती. अशा स्थितीत त्यांची पत्नी, त्यांचे पुत्र व पुत्री या सर्वांनी डॉक्टरांची जी मनःपूर्वक, न कंटाळता, निरलसपणे सेवा केली तशी आजच्या काळात कोठे दिसून येणे कठिण आहे. त्या बाबतीत त्या सर्वांना धन्य म्हटल्याशिवाय राहवत नाही. खरा धर्म त्यांनी जाणला व तो संतोषपूर्वक अखेरपर्यंत पाळला !

डॉक्टरांचा विचार नोकरीतून निवृत्त झाल्यावर उर्वरित जीवन केवळ लोकसेवेत घालवण्याचा होता. निवृत्त होण्यापूर्वी ते मला नेहमी म्हणायचे,

तुम्ही पुण्याच्या आसपास संस्था काढा. आप्पा, तुम्ही व मी असे आपण तेथे राहू. मी माझा सर्व वेळ सेवाकार्यात लावीन. ही त्यांची मनापासूनची इच्छा होती. डॉक्टरी व्यवसाय पुष्कळ वर्षे कुटुंबनिर्वाहाकरिता केला, पुढे केवळ सार्वजनिक सेवेकरिता डॉक्टरी काम करावे असे ते नेहमी म्हणत. पण निवृत्त झाल्यावर त्यांची प्रकृती पराधीन झाल्यामुळे त्यांचे व आमचे विचार सर्व मनातच राहिले. ! ईश्वरी इच्छा !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १५२५८

# ७ : विशिष्ट व्यक्ती परिचय

रणदिवे बंधूंच्या आतापर्यंतच्या वृत्तांतात ज्यांचा केवळ नाममात्र उल्लेख आलेला आहे त्यापैकी काहींचा थोडाबहुत परिचय देणे मला आवश्यक वाटत आहे. रणदिवे बंधूंच्या एकंदर जीवनात पुष्कळच चांगल्या चांगल्या अनेक व्यक्तींचा त्यांच्याशी संबंध आला. व्यायाम, रामदासी संशोधन, सार्वजनिक कामे, शेती, गोरक्षण, घरबांधणी नर्सरी, विधायक कार्ये, चळवळी, आंदोलने व त्यांची लोकसंग्रही व सेवापराणवृत्ती वगैरे अनेक कारणामुळे त्यांचा मित्रपरिवार पुष्कळच विशाल होता. त्यातूनही त्यांचे व्यक्तिगत व क्रांतीच्या विचारामुळे आलेले निकटचे व अत्यंत विश्वासाचे संबंध या सर्वांचा माहिती मला पूर्णपणे नाही. तरी त्यातूनही काही विशिष्ट संबंध मी जाणंत असल्यामुळे त्या व्यक्तींचा परिचय

मी थोडक्यात देण्याचा प्रयत्न करीत आहे. ज्यांच्या विषयी थोडीफार माहिती अगोदरच यात आलेली आहे, त्यांच्याविषयीही काही विशिष्ट परिचय आवश्यक असेल तेवढाच यात देण्याचा विचार आहे.

महादेव आत्माराम वैद्य–रणदिवे बंधूंचा नातलग-विशेषतः वर्गबंधू. व्यायामातील मित्र म्हणूनच विशेष संबंध-याला आम्ही महादेव किंवा माधव म्हणत असू. हा मलखांब, कुस्ती वगैरे चपळतेच्या खेळात प्रवीण, कार्यकुशल, चतुर, धूर्त, प्रसंगावधानी, हजरजबाबी, साहसी नंबर १. हाती घेतलेल्या कार्यात हरतऱ्हेने मार्ग काढणारा, युक्तिबाज. परोपकारी, उदार, बऱ्याच अंशी भावनाशील. कोणत्याही संकटात उपयोगी पडण्यास तत्पर. बापट व कृष्णा भोसेकर यांच्या प्रसंगात फार उपयोगी पडलेला. मित्रनिष्ठ. त्याला आळस, कंटाळा कधी माहित नाही. ग्वाल्हेरला लष्करी मोठ्या हुद्यावरील व्यक्तीकडे संधान जुळवण्याकरिता त्यालाच पाठवले होते. वैद्य घराणे मूळचे अलिबागकडील. पुढे पुणे, मुंबई, दादरच्या बाजूला प्रख्यातीस आलेले. माधवचे वडील मामलेदार होते. तो स्वतःही मॅट्रिक झाल्यावर काही काळ सरकारी नोकरीत होता. थोड्याच दिवसात राजिनामा देऊन मोकळा झाला. धुळ्याजवळील शेतीची व्यवस्था प्रथम शंकरराव जोग यांनी संभाळली होती. त्यानंतर कित्येक वर्षे माधव वैद्याने संभाळली. तीतील सर्व कारस्थानांचा तो माहितगार व त्यात मदतगार. रणदिवे बंधूप्रमाणे माझाही तो मित्र होता. पुढे माझ्या बहिणीशी त्याचे लग्न झाल्यामुळे मेहुणा बनला. पण जीवनभर संबंध मैत्रीचाच राहिला. रणदिवे बंधू, तो व मी असा आमचा चौघांचा काही काळ गट होता. आप्पा त्यावेळी म्हणायचा, आपली चौघांची गाठ जशी असावी. तशी ती होतीही पण पुढे सशस्त्र क्रांतीचे विचार मागे पडल्यावर माधव शेती सोडून व्यवसायानिमित्ताने दूर गेला.

माधव वैद्याच्या स्वभावाची काहीशी ओळख पुढील हकीकतीवरून होऊ शकेल. धुळ्याजवळील शेती तो करीत असता घरची बैलगाडी घेऊन त्याचा नोकर एकदा गावात –धुळ्यात गेला होता तेव्हा पोलीस हवालदाराने ती गाडी वेठीकरिता धरली. गाडी मामलेदार कचेरीच्या आवारात सोडून

नोकर ती हकीकत माधवला सांगण्याकरिता शेतीवर आला. हकीकत माधवला कळताच नोकराला घेऊन तो कचेरीत गेला. माधवने गाडी जोडण्यास नोकराला सांगितले. हवालदार मध्ये आडवा आला. माधवने त्याला नीट समजावून सांगितले. तो उलट उद्धटपणे बोलू लागला. ही सन १९१२–१३ सालांतील गोष्ट. त्या काळात पोलीस हवालदार वगैरे मगरूरीत असत. ते स्वतःला फार मोठे अंमलदार समजत. कलेक्टर किंवा असिस्टंट कलेक्टर यांच्या सामानाकरिता गाडी धरली होती. भाड्याची गाडी अशा कामी धरता येते. खाजगी गाडी धरता येत नाही असा काही कायदा होता. हवालदार आडवा येऊन मगरूरीने बोलू लागताच माधवने त्याच्या कानशीलात थप्पड लगावली. हवालदाराला तिरमिरी आली. गाडी घेऊन माधव शेतीवर गेला. दुसऱ्या दिवशी हवालदाराने माधववर फिर्याद दिली. सरकारी कामाला अडथळा केला व थप्पड मारली. माधवनेही फिर्याद दिली. बेकायदा गाडी अडवून ठेवली व शिवीगाळ केली. पुढे मॅजिस्ट्रेटपुढे हवालदाराची केस चालू झाली. केस चालू असता कोर्टातच हवालदार माधवला अपमानास्पद बोलू लागला. माधवने मॅजिस्ट्रेटला सांगितले— हवालदाराचे तोंड बंद करा नाही तर त्याला एक थप्पड तर दिलीच आहे दुसरी येथे लगावीन. मॅजिस्ट्रेट व हवालदार यांना वाटले ही केवळ धमकी आहे. व तसेच पूर्वीप्रमाणे हवालदार बोलू लागला. माधवने तेथे कोर्टात मॅजिस्ट्रेटच्या समोरच त्याच्या कानशीलात थप्पड दिली. मॅजिस्ट्रेटसुद्धा सर्व घाबरले. काम बंद केले व हवालदाराला सांगितले तुझी केस काढून घे. केस त्याने काढून घेतली. माधवच्या बाजूने त्याचे सहा वकील मित्र कोर्टात हजर होते. अशा प्रकारचा होता माधव वैद्य. आणखी परिचयाची जरूरी नाही.

त्रिंबकराव कुळकर्णी (टी. ए. कुळकर्णी)–माझे बंधू. यांचा थोडा परिचय प्रारंभीच आला आहे. रणदिवे बंधूंचे हायस्कूलमधील सहाध्यायी, व्यायाम शाळेतील मित्र. यांची शरीरप्रकृती खूप सुदृढ व बळकट. कॉलेज-मध्ये (मुंबईस) असतांना इतर विद्यार्थ्यांना व्यायामाची गोडी ते लावीत. त्यांचे जीवन शिक्षणक्षेत्रात व सार्वजनिक कामात अजूनही जात आहे. गोखले एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक व चेअरमन. विद्यार्थ्यांना शाळा-

कॉलेजच्या शिक्षणाबरोबरच व्यायामाच्या शिक्षणाचीही आवश्यकता आहे असे त्यांचे ठाम मत आहे. अनेक कॉलेजांचे व हायस्कूलांचे ते संस्थापक आहेत. सोशल सर्व्हीस लीगचे अध्यक्ष आहेत. रणदिवे बंधूंच्या संगतीने आपल्याला व्यायामाची गोडी लागली त्याचा आपल्या जीवनांत किती उपयोग झाला याचे त्यांना अजूनही स्मरण आहे व आप्पा-भाईविषयी त्यांच्या मनात अजूनही सद्‌भाव जागृत आहे.

वासुदेवराव दास्ताने—यांची थोडी माहिती पूर्वी आली आहे. ते एकेवेळी खानदेशचे पुढारी होते. मुळशी सत्याग्रहातील अग्रगण्य व्यक्तींपैकी म्हणून सर्वांना त्यांची माहिती आहे. बापटांचे स्नेही. त्यांच्याकरिता रणदिवेबंधूं-प्रमाणे त्यांनाही पुष्कळ कष्ट सोसावे लागले. भुसावळला ते वकीली करीत असत. पुढे गांधीयुगात त्यांच्या कार्यक्रमात सामील झाले. त्याही पूर्वी-पासूनचे ते निःसीम राष्ट्रभक्त. मुळशी सत्याग्रहांत त्यांना फार कष्ट सहन करावे लागले. स्वराज्याच्या आंदोलनांत त्यांना अनेक वेळा बंदिवास भोगावा लागला. त्यांचा स्वभाव स्पष्ट व सरळ. तशीच त्यागवृत्ती व कट्टर-पणाही त्यांच्या स्वभावात होता. खूपच भावनाशील. आप्पा व भाई यांच्याशी त्यांचा फारच घनिष्ट संबंध. पुष्कळ वर्षे चळवळीत प्रामुख्याने असल्यामुळे ते देशप्रसिद्ध होते.

जयराम रामचंद्र ताम्हणे (भाऊसाहेब)—यांचे लहान बंधु महादेव रामचंद्र यांची आमची (रणदिवे बंधू, माधव वैद्य व मी) पहिली ओळख. तीमुळे भाऊसाहेबांचा संबंध आला. हे दोघेही बंधू फार प्रामाणिक. महादेव-राव यांनी बापटांना आपल्या वडील बंधूंच्या हवाली केले. तेव्हां भाऊसाहेब कॅन्टोन्मेंट मॅजिस्ट्रेटचे हेडक्लार्क होते. बापटासारख्यांना आश्रय देण्यात व मदत करण्यांत केवढी धास्ती आहे याची पूर्ण जाणीव असूनही त्यांनी ते काम कर्तव्यबुद्धीने केले. त्यांनी बापटांची जबाबदारी घेतली यावरून त्यांची हिंमत व देशभक्ती स्पष्ट दिसून आली. त्यांनी आपल्या तारुण्यात अशाच काही खटपटी केल्याचे व रत्नागिरीला ब्रह्मदेशच्या थिबाराजाला गुप्तपणे भेटल्याचे मला समजले होते. माझी त्यांची १९०७ ला ओळख झाली. त्यावरून ते फार गंभीर, आपल्या मनाचा व स्थितीचा थांगपत्ताही लागू न

देण्याइतके खोल, सावधपणे बोलणारे व मितभाषी अशा प्रकारचे मला वाटले. त्यांचे घराणे मूळ चौक जि. कुलाबा या बाजूचे. भाऊसाहेबांचे मन मोठे यात संशय नाही, देशविषयक नाही. देशविषयक भाव त्यांच्या अंगात चांगला मुरलेला. त्यांच्या धार्मिक विचारात पुष्कळ सूक्ष्मता व तार्किकता वाटे पण आचरणात बराचसा भोळेपणा दिसून येई. त्यांच्यातील गांभीर्यामुळे ते प्रथम उग्रसे वाटत, पण ते प्रेमळ होते. हिमतीविषयी प्रश्नच नव्हता. या ताम्हणे बंधूंसारखी कळकळीची व प्रामाणिक, स्वतःच्या कार्याविषयी कोठे वाच्यताही न करता हृदयपूर्वक साहसाची कामे करणारी माणसे विरळा.

महादेव रामचंद्र ताम्हणे—वडील बंधूंच्या परिचयात यांचा परिचय काही अंशी आलाच आहे. यांचे शिक्षण मॅट्रिकपर्यंत. प्रथम मामलेदार कचेरीत नोकरी. नंतर काही वर्षे ग्वाल्हेर सरकारच्या खाजगी ऑफिसमध्ये त्यांनी काम केले. त्यानंतर मिलीटरी अकौंटंट ऑफिसमध्ये नोकरी केली. तेथून निवृत्त झाल्यावर खादी—विधायक—कार्यात ते भाग घेऊ लागले. त्यांचा स्वभाव फारच सौम्य, सरळ, अत्यंत प्रामाणिक, प्रेमळ व भावनाशील. त्यांचे स्मरण झाले तरी आपल्या मनात तेच भाव उठतील इतके सात्विक, भाविक, एकनिष्ठ, धर्ममार्गी; अनेक प्रसंगी त्यांचे धैर्य व हुशारी कसोटीला लागली. कित्येक गुप्त कारस्थाने त्यांनी पार पाडली. मान, प्रतिष्ठा, मोठेपणा वगैरे कशाचीही अपेक्षा न करता महान कार्य करणारे व त्या बाबतीत कोठे उच्चारही न करणारे असे ते होते.

शंकरराव पालकर—हे ताम्हणे बंधूंचे मित्र. शिक्षण मॅट्रीकपर्यंत त्यांना रेल्वेमेल सर्विस खात्यात नोकरी होती. देशाविषयी प्रेम, देशभक्ताविषयी सद्भाव बाळगणारे ते होते. साधुसंगतीची त्यांना आवड होती. कपट करणे त्यांच्या स्वभावातच नव्हते. स्वभाव प्रेमळ, भक्तिमार्गाकडे ओढा. ते रेल्वेमेल सर्विसमध्ये असल्यामुळे त्यांना नेहमी फिरावे लागे. गुप्त निरोप कळवण्यात त्यांचा उपयोग फार होत असे.

नारायण कृष्ण गोगटे—आप्पा, भाई, दास्ताने यांच्याच समयात धुळ्याच्या गरुड हायस्कूलचे विद्यार्थी. त्यावेळचे चांगले क्रिकेटियर. कॉलेज-

कारकीर्दीत भाईचे सहाध्यायी व त्याच्या अधिक परिचयात आलेले. राष्ट्रीय विचाराचे. देशभक्ती व देशाविषयी अभिमान अंगी मुरलेले. जीवन बहुतेक शिक्षण कार्यात गेलेले. विद्वान् व विद्याव्यासंगी. भक्ती, तत्त्वज्ञान यांविषयी आवड. जीवनाविषयी खोलपणे विचार करणारे व कर्तव्यनिष्ठ. शांत व गंभीर स्वभावाचे. रणदिवे बंधूंशी त्यांचा अखेरपर्यंत संबंध होता.

गणेश वासुदेव परांजपे–यांचा रणदिवे बंधूंशी विद्यार्थीदशेपासून संबंध. एकाच काळी हायस्कूलमध्ये शिकत असलेले. पाताळ्यांचे तालमेत रणदिवे बंधूंकडून शिकलेले, जुने मित्र. हे इंजीनीयरींगची परीक्षा दिल्यावर कित्येक वर्षे नोकरी करीत होते. नोकरीत असताही रणदिवे बंधूंशी मित्रत्वाचा संबंध चालून होता. त्यांचे आप्पा व भाईवर अतिशय प्रेम व त्यांच्याविषयी त्यांना फार आदर होता. स्वभाव सरळ व मेहनतु वृत्ती. रणदिवे बंधूंच्या वाटेल त्या कार्यात साहाय्य देण्यास तत्पर. समर्थांविषयी नितांत श्रद्धा. त्यामुळे आप्पाचा संबंध अधिक घनिष्ट. भाविकता व भावनाशीलता पुष्कळ. देशप्रेम--साधुसंताविषयी सद्भाव. आप्पाच्या कार्यावर विश्वास. लोकमान्य व गांधीजी दोघांविषयी त्यांच्या मनात श्रद्धा. नोकरीशिवाय बाकीचा वेळ रणदिवे बंधूंच्या सहवासात घालवीत असत. नोकरी सोडल्यावर दौलताबाद-कडील जमिनीत आप्पा-भाई यांचे ते हिस्सेदार होऊन तिकडील जमिनीची वहिवट त्यांनीच संभाळली होती. जीवनभर त्यांचा रणदिवे बंधूशी संबंध राहिला.

शंकरराव जोग– हे नानासाहेब देवांचे सेक्रेटरी. त्यांची अनेक कामे ते संभाळीत. आप्पाचे तालमेत वाढलेले. रणदिवे बंधूंचे विश्वासपात्र मित्र. रामदासी कार्यामुळे आप्पाचा त्यांचा विशेष संबंध. तर भाईच्या वकीलीच्या व्यवसायामुळे त्याच्याशीही त्यांचा तितकाच संबंध. व्यावहारिक कार्यातही रणदिवे बंधूंना साहाय्य देण्यात त्यांना आनंद वाटे. इतका त्यांच्या मनांत दोघांविषयी आदर व अभिमान. धुळ्याचे शेतीचे काम प्रथम तेच संभाळीत असत. ते शरीराने मजबूत व मनाने खंबीर आहेत. जांब येथील मंदीर-स्थापनेच्या कार्यात आप्पाला किती कष्ट पडले त्याची त्यांना प्रत्यक्ष माहिती आहे. कारण त्यांच्या कष्टांत त्यांनाही भाग घ्यावा लागला होता. आप्पाच्या

कोणत्याही कार्यात जीवापाड परिश्रम करणारे, प्रामाणिक व सचोटीने वागणारे असल्यामुळे कोणतेही अवघड कार्य आप्पा व भाई त्यांच्यावर सोपवीत व ते कार्य ते यशस्वीपणे पार पाडीत. कष्टांना न जुमानण्याची वृत्ती व शक्ती त्यांच्यात होती व त्याबरोबरच कार्यदक्षताही होती. या त्यांच्या अनेक सद्गुणामुळे व सुस्वभावामुळे ते या दोन बंधूंच्या विश्वासास पात्र झालेले मित्र होते. या उभय बंधूंशी त्यांचा जीवनभर चांगला सहयोग राहिला. आता वार्धक्यात धुळे येथे स्वतःच्या घरी ते स्वस्थपणे कालक्रमण करीत आहेत.

विष्णुपंत किल्लेदार– हे आप्पा व भाईंचे स्नेही. व्यायामशाळेत त्यांच्यापासून शिक्षण घेतलेले. पुढे आत्माराम छापखान्याचे मॅनेजर म्हणून आप्पाबरोबर कित्येक वर्षे सहकार्य केलेले. अत्यंत प्रामाणिक म्हणून रणदिवे बंधूंचे विश्वासपात्र. लोकमान्य व गांधीजींचे कट्टर भक्त. खादी, ग्रामोद्योग, विधायक कार्ये यांचे पुरस्कर्ते. कितीही अडचणी आल्या तरी खादीच्या व्रतात कमीपणा न येऊ देणारे. एकनिष्ठ, उद्यमशील व मेहनतु. संसाराच्या साध्या स्थितीतही संतोषी. रणदिवे यांच्या खाजगी कार्यातही साहाय्यकर्ते असे एक सज्जन. आप्पा व भाई यांच्याविषयी त्यांच्या मनात अत्यंत सद्भाव. त्यांना संतवाङ्मयाची गोडी होती. मनात भक्तिभाव भरपूर होता. त्यांची मूळचीच भाविक व सात्विक वृत्ती होती.

दादा डोंगरे–रणदिवे बंधूंचे हे फारच जुने मित्र. तालमेत बरोबरीने व्यायाम करणारे. फार संस्कारी. उभय बंधूंवर एकनिष्ठपणे प्रेम करणारे ते होते. प्रथम त्यांना धुळ्यास नोकरी होती. काही वर्षांनी ती सोडून ते मुंबईस राहू लागले. मुंबईस म्युनिसिपालिटीच्या दवाखान्यात कंपाऊंडरचे काम करीत होते. साधी राहणी पण अत्यंत व्यवस्थित. आप्पा व भाईंवर अगणित मित्रांचे प्रेम होते, पण दादांच्या प्रेमात सहजता वाटे. आप्पा व भाई यांच्याविषयी त्यांच्या मनात विलक्षण धन्यतेचा भाव दिसून येई. आप्पा आल्यावर मीही तेव्हाच मुंबईस असलो तर आम्ही दोघे त्यांच्याकडे जमत असू. प्रेमळपणात दादांची सर कोणालाही यायची नाही असे मला वाटे. आप्पा म्हणजे त्यांना भाग्याचा ठेवा वाटत असे. अशा व्यक्ती पुनः दिसणे दुर्मिळ !

शंकरराव भाजेकर–रेल्वेने मुंबईहून पुण्यास जातांना लोणावळ्याच्या पुढे मळवली स्टेशन लागते. तेथून जवळच भाजे गांव आहे. तेथील हे इनामदार.

इंजीनीयरींगची परीक्षा दिलेले. त्यांचा व भाईचा संबंध दास्ताने यांच्या मार्फत मुंबईस आला असावा. कारण मी त्यांना प्रथम शीव येथेच पाहिले. क्रांतीच्या विचारामुळे आप्पा–भाईशी त्यांचा संबंध जुळून तो वाढत गेला असावा. भाजे येथे त्यांची फॅक्टरी होती. तेथे ते काम करीत असत. नंतर अमळनेरच्या हायस्कूलमध्ये ते शिक्षणाचे काम करीत होते. पुढे गांधीयुग आल्यावर ते विधायक कार्यात पडले. गांधी विचारसरणीचा त्यांनी चांगला अभ्यास केला होता. सत्याग्रहाच्या चळवळीत त्यांनी बंदिवास भोगण्यापर्यंत भाग घेतला होता. त्या काळच्या आंदोलनात ते तन, मन धनाने पडले होते. खादी, ग्रामोद्योग यांवर त्यांची श्रद्धा होती. आसन, प्राणायाम व यौगिक क्रिया यांचे त्यांना चांगले ज्ञान होते. त्यांच्या जीवनाचे वळण विशेषतः आध्यात्मिक होते. रणदिवे बंधूंवर त्यांचे फार प्रेम असून त्यांचे विषयी त्यांना आदर होता.

बाळूभाई मेहता–हे खानदेशातील राहणारे. त्यांचे जीवन काही नंदुरबार व नंतर धुळे येथे गेले. शिक्षण एम्. ए. एल्. एल्. बी. पर्यंत. खूपच विद्वान व बुद्धिवान. काही दिवस धुळे येथील वर्तमान पत्राचे संपादकत्व केलेले. मूळचे वैष्णव सांप्रदायी त्यामुळे भाविक वृत्ती व कट्टर आचार यात त्यांचे जीवन गेलेले. पुढे गांधीजींच्या विचारसरणीचा अभ्यास केल्यावर साबरमतीस जाऊन सत्याग्रह आश्रमात गांधींच्या सान्निध्यात काही काळ राहिले. विधायक कार्ये, खादी, ग्रामोद्योग यांच्यावर त्यांचा विश्वास बसला. सत्य, अहिंसेचे एकनिष्ठ उपासक ही त्यांची भूमिका बनली. खादीचा सशास्त्र अभ्यास करता यावा म्हणून सर्व भारतात भ्रमण करून मिळालेल्या ज्ञानावर मनन करून एक पुस्तक त्यांनी लिहिले आहे. ते वाचल्यावर त्यांचा त्या विषयाचा अभ्यास किती खोल आहे याची कल्पना होऊ शकते. खानदेश जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे ते अध्यक्ष होते. त्या कार्यात त्यांना बंदिवास भोगावा लागला. स्वराज्य मिळाल्यावर सर्वोदय कार्यात, भूदान प्रवृत्तीत त्यांनी बरीच वर्षे काम केले. आता वार्धक्यामुळे एकेजागी पवनार येथे राहून शक्य ते सेवाकार्य करीत आहेत. आप्पा व भाई यांच्याविषयीं त्यांच्या मनात केवढा सद्भाव आहे ते त्यांच्या याच पुस्तकांत पुढे ‘ निष्पाप व सेवामय जीवन ’ या प्रकरणात उध्दृत केलेल्या लेखावरून दिसून येते.

काकासाहेब बर्वे–धुळ्यातील प्रसिद्ध वकील. हरिजनांच्या कार्याला स्वतःला आजन्म वाहून घेतलेले. केवळ श्रद्धेने नव्हे पण पूर्णपणे समजून विधायक कार्यात तन, मन, धनाने पडलेले धुळ्यातील निष्ठावंत पुढारी. हे भारतातील हरिजन-कार्यक्षेत्रात सर्वत्र प्रसिद्ध होते. त्यांचा व रणदिवे-बंधूंचा फारच घनिष्ट संबंध होता. काकासाहेब चांगल्यापैकी लेखक व व्याख्याते होते. समाजातील धार्मिक भोळेपणाविषयी त्यांना फार दुःख वाटे. ते घालवण्याकरिता ते प्रसंगोपात्त प्रयत्नशील असत. धुळ्याच्या 'दलित-सेवका'चे ते मूळ संपादक होते. त्यांच्यासारखे एकनिष्ठ व कळकळीचे लोक-सेवक सर्व भारतात मिळूनही फारच थोडे असतील.

रामेश्वरदासजी पोद्दार–धुळ्यातील प्रसिद्ध व्यापारी. फारच भाविक वृत्तीचे. नानासाहेब देवांच्या सहवासामुळे समर्थ रामदास स्वामीविषयी त्यांचे मनात खूप भक्तिभाव निर्माण झाला. नंतर गांधीयुगात त्यांचे मन गांधी–विचाराकडे वळले. हळूहळू ते विधायक कार्यात भाग घेऊ लागले. खादी, ग्रामोद्योग यावर त्यांची श्रद्धा आहे. गोरक्षण हा त्यांच्या खास आवडीचा व भक्तीचा विषय. कोणत्याही घरगुती म्हणा की व्यावहारिक धंद्यासंबंधी म्हणा त्यात आप्पाचा सल्ला घेतल्याशिवाय त्यांचे चालत नसे. त्या उभय बंधूंचे ते परममित्र होते. गांधीविषयीच्या भक्तिभावनेमुळे महादेवभाई देसाई यांच्या नावाने 'गांधी तत्त्वज्ञान मंदिर' बांधण्याची त्यांना प्रेरणा होऊन ते कार्य त्यांनी पार पाडले. गांधी-परिवारावर त्यांचे फार प्रेम आहे. धुळे येथील व्यापारीवर्गापैकी त्यांच्याइतकी रणदिवेबंधूंशी संबंध आलेली दुसरी व्यक्ती माझ्या माहितीत नाही. त्यांच्यात शक्यनुसार दानवृत्तिही आहे. वार्धक्य व शारीरिक अस्वास्थ्य यामुळे ते धुळे येथेच निवृत्त जीवन काढीत आहेत.

महादेवराव मुठे व गणपतराव मोहाडीकर–हे उभयता मूळचे अंमळनेरचे. धुळ्यास शिक्षणाकरिता आल्यावर पाताळे यांच्या तालमेत जाऊ लागल्या-पासून त्यांचा रणदिवे बंधूंशी संबंध येऊ लागला व तो जीवनभर वाढत जाऊन कायम राहिला. दोघेही व्यायामात निपुण झाले होते. आप्पाच्या हाताखाली शिकून तयार झालेल्या शेकडो विद्यार्थ्यांपैकी हे उभयता होते व

त्यांच्यावर आप्पाच्या चारित्र्याचा व सर्वांशी वागण्यातील प्रेमळपणाचा काही विशेष परिणाम झाला असल्यामुळे त्यांच्या मनात आप्पाविषयी अपार श्रद्धा निर्माण झाली होती. केवळ मैत्रीपेक्षाही काही उच्च प्रकारची भावना रणदिवे बंधूविषयी त्यांच्या मनात होती यात मला शंका वाटत नाही. गणपतराव हे कित्येक वर्षे अंमळनेरची व्यायामशाळा चालवीत होते. दोघेही सात्त्विक, सरळवृत्तीचे. प्रामाणिक व विश्वासपात्र. दोघांच्याही मनात दोघा भावांविषयी नितांत प्रेम व आदर. मी या दोघांकडून रणदिवे-बंधूंची प्रशंसा कैकवेळी ऐकली आहे. त्याचप्रमाणे रणदिवे बंधूकडूनही या दोघांची प्रशंसा अनेक वेळा ऐकली आहे. अशा प्रकारचे दोनही बाजूंनी प्रशंसापर उद्गार मला ऐकायला मिळाले आहेत. त्यावरून या उभयतांचा रणदिवे बंधूंशी किती गाढ संबंध होता ते वाचकांच्या सहज ध्यानात येईल.

गोविंद गोपाळ टिपणीस—महाड जि. कुलाबा येथील राहणारे. सन १९०७–०८–०९ या काळातील जिल्हा काँग्रेसचे सेक्रेटरी व पुष्कळ काळ कुलाबा जिल्ह्याचे पुढारी. आगरकरांचे अनुयायी व लोकमान्याविषयी फार आदर बाळगणारे. सामाजिक व राजकीय दोनही सुधारणांचे आग्रही व त्या विचारांचा व आचारांचा प्रचार करण्याकरिता पुष्कळ सहन केलेले. लोकजागृतीच्या कार्यात प्रयत्नशील असल्यामुळे १९०८–०९ सालच्या सरकारच्या कडक अमलात अनेक प्रकारे सोसावे लागलेले. महाराष्ट्रवेद, संतांचा परिचय वगैरे अनेक पुस्तकांचे लेखक; साहित्यिक व काव्याची आवड असलेले. लेखन व वक्तृत्व दोनहिमध्ये निपुण. स्वभावाने उदार, भाविक, मित्रनिष्ठ व लोकसंग्रही. एकेकाळी त्यांचे घर हे सार्वजनिक कार्यांचे केंद्र व कार्यकर्त्यांचे आश्रयस्थान होते. जीवनातील उमेदीचा काळ सार्वजनिक कार्यांत तन-मन-धनाने घालवलेले. जीवनाच्या अखेरीस काही वर्षे एल्फिन्स्टन कॉलेज ( मुंबई ) मध्ये मराठीचे प्रोफेसर म्हणून काम करीत होते. कर्तृत्ववान व सज्जन. त्यांच्या काळात अशा प्रकारचे लोकसेवक क्वचितच दिसून येत.

## ८ : उत्तरावस्था व अखेर

बरीच वर्षे वकीली व्यवसायात घालवल्यावर भाईने वकीली सोडली आणि सार्वजनिक कार्यातूनही तो जवळ जवळ निवृत्तच झाला. त्याची प्रकृतीही पुढे नीट राहीनाशी झाली. झोप नीट पुरेशी न येण्याची त्याची तक्रार फार वर्षांपासून चालूच होती. ती पुढे कमी न होता उलट वाढत चालली. प्रकृती अधिक बिघडण्यापूर्वीच दोघा भावांनी आपली वृद्धावस्था ध्यानात घेऊन आपल्या पश्चात आपल्या मिळकतीसंबंधी काही भानगडी उत्पन्न न व्हाव्या म्हणून कायदेशीरपणे मिळकतीच्या वाटण्या करण्याचे ठरवले. आप्पा, भाई व मी तिघांनी मिळून दूरवर विचार करून दोघांनाही सोयीचे पडेल या दृष्टीने व्यवस्थेशीर वाटण्या केल्या. त्यानंतर कांही काळाने भाई आपल्या इच्छेप्रमाणे शेतीतील मळयावर राहू लागला.

आप्पा तर प्रथमपासूनच शेतीवर रहात होता. प्रथम तो धुळ्याच्या शेतीवर रहात होता. नंतर औरंगाबादेकडील शंकरपुरवाडीचे शेतीवर राहण्याचे त्याने ठराविले. तिकडे त्याचे लहानपणचे मित्र गणपतराव परांजपे तेथील जमिनीमधील एक भागीदार पूर्वीपासून सहकुटुंब रहातच होते. शेती चांगली करून अधिक धान्य निर्माण करण्याचा आप्पाचा पहिला निश्चय व त्याप्रमाणे प्रयत्न चालूच होता. परंतु त्यात त्याला विशेष यश प्राप्त झाले नाही. उलट कर्ज मात्र वाढत गेले. त्याची कारणे अनेक होती. आंब्याची लागवड मात्र चांगली यशस्वी झाली. त्याचे कायमचे उत्पन्न झाले. पुढे पुढे आप्पाची शक्ती व बुद्धी वार्धक्यामुळे पहिल्यासारखी चालेनाशी झाली तरी त्याचा शेतीचा हव्यास सुटला नाही. पण वार्धक्य व चिंता ह्यामुळे तो दिवसें दिवस खंगत चालला. माझी इच्छा त्याच्या जवळ त्या दिवसांत राहण्याची होती. परंतु माझी प्रकृती बाहेर कोठे राहण्यासारखी नसल्यामुळे त्या बाजूने माझा निरुपाय होता. मी दादरला रहात होतो तोपर्यंत, त्याची प्रवास करण्यासारखी स्थिती होती तेव्हा, तो माझ्याकडे येऊन राही. त्यामुळे आम्हा दोघांनाही बरे वाटे.

स्वराज्य प्राप्तीनंतर रणदिवे बंधूंचा सार्वजनिक कार्याशी संबंध कमी कमी होत चालला. त्याची मुख्य कारणे एकतर बाह्य राज्यकारणाची स्थिती एकदम बदलली. दोघे बंधू निरनिराळ्या जागी राहू लागल्यामुळे गृहस्थितीत फरक पडला व दोघांचेही वार्धक्य व प्राकृतिक अस्वास्थ्य ह्यामुळे शारीरिक अवस्थाही बदलत चालल्या, पूर्ववयातील उमेद ओसरत चालली, अशा अनेक कारणांमुळे व त्यातूनच निर्माण होणाऱ्या अनुषंगिक कारणामुळे त्याच्याकडून स्वराज्य-प्राप्तीनंतर विशेष असे कार्य होऊ शकले नाही. आप्पाची शेती, गोरक्षण वगैरेची काही कामे चालू होती तरी त्यातील पहिले हेतू बदललेल्या गृहस्थितीमुळे मावळत जाऊन केवळ घरगुती स्वरूपाचे होऊ लागले. समाज, घर, शरीर ह्या सर्वांत बदल झाल्यावर सर्वस्त्री बदललेल्या स्थितीत मनुष्य नव्या उमेदीने काम करू शकत नाही. रणदिवे बंधूना ह्या सर्व पालटलेल्या स्थितीत आपआपले स्वभाव व कर्तृत्वानुसार योग्य कार्य मिळू शकले नाही.

भाई स्टेशनजवळील शेतात राहू लागला. तेव्हा प्रथम त्याला तेथे बरे वाटत होतें पण पुढे तेथे त्याची प्रकृती बरी राहीनाशी झाली. त्याला तेथे फिट्स् येऊ लागल्या. धुळ्यास त्यावर योग्य उपाय होईना म्हणून तो शीव (मुंबई) ला येऊन मुलाजवळ राहू लागला. त्याला काही अंशी पराधीनता आल्यामुळे तो एकटा कोठे बाहेर जाऊ शकत नसे. भाईला फिट्स्चा उपद्रव कधीतरी मधून मधून होई. तो सोडून बाकी त्याचे जीवन शांत व स्वस्थ चालू होते. घरच्या मंडळींना मात्र त्याच्याविषयी फार चिंता वाटे. त्या दिवसांत मी दादरला रहात असल्यामुळे त्याला भेटू शकत असे. भेटल्यावर आम्ही खूप बोलत असू. त्या दिवसांत त्याला ईश्वरस्तवन, श्लोक वगैरे म्हणावेसे वाटत असे. मलाही म्हणायला सांगे. त्याला पीडा अशी काही नसल्यामुळे त्याचे दिवस काही बरे जात असत. झोप मात्र नीट पुरेशी नसे. काही वर्षे त्याची याच स्थितीत गेली. परित:परहित त्याचे जीवन चालले होते. मी सतत त्याचे जवळ रहात नसल्यामुळे त्याला फिट् कोणत्या प्रकारची येते ते मला प्रत्यक्ष माहीत नव्हते. मी कधी फिट् आलेली पाहिलीही नाही. त्यामुळे मी निश्चिंत होतो. पण एके दिवशी सकाळीच अचानक मला खबर कळली की भाई गेला ! मला ते स्वप्नाप्रमाणे वाटले. खबर देणारांना विचारले, काय ? भाई गेला ? कसा ? केव्हा ! उत्तर मिळाले, रात्रीच एकाएकी हार्ट अॅटॅक आला व त्यातून सावध झाला नाही. त्यातच शेवट झाला ! मला खबर कळताच मी ती खबर बापटांना कळवण्याच्या खटपटीत पडलो. ते भेटले नाहीत. मी तसाच शीवला गेलो. त्याला घेऊन गेल्याचे कळले. तसाच निघालो. बापट वाटेत भेटले. दोघेही स्मशानात गेलो. शेवटी भाईला पहायला मिळाले नाही. अखेर त्याच्या भडकलेल्या चितेचे दर्शन घेऊन शीवला जाऊन धाकट्या वहिनींना व घरातील मंडळींना भेटलो. पुढे काय लिहावे ? कसे लिहावे ! शब्द कुंठित होतात. ही दुःखद घटना ता. १४ सप्टेंबर १९५६ रोजी रात्री घडली ! भाईचे वय त्या वेळी ७५-७६ असावे.

भाई बरा आहे, स्वस्थ आहे, शांत आहे या भ्रमातच मी आजपर्यंत त्याचे बाबतीत होतो असे मला वाटू लागले ! खरोखर तो बरा नव्हताच. शेवटी तो गेला. अचानक गेला. मला आप्पाला न सांगता न विचारता

गेला ! भाई आता दिसणार नाही ! मनात काहूर उठले. सर्व जीवन क्रमशः पुनः पुनः आठवत राहिले ! आमच्या सर्वांचा भाई गेला ! काय त्याचे शरीर ! किती उदात्त व उन्नत त्याचे विचार ! आपल्या ध्येयाशिवाय दुसऱ्या कोणत्याही गोष्टीची त्याला गुमान नाही अशी त्याच्या मनाची ठेवण. आरोग्य व प्रसन्नतेचे भांडार असे त्याच्याकडे पाहिले की वाटे. ऐश्वर्यवंताला लाजवील अशी त्याची उदारता, असा त्याचा दिलदारपणा. त्याच्या प्रत्येक विशिष्ट कार्यात भारदस्तपणा वाटे. कमालीचा प्रेमळ, तसाच स्वाभिमानी पण. रूक्षता, भित्रेपणा ह्यांचा त्याला तिटकारा. भव्यता, शौर्य, धैर्य, साहस अशा गोष्टीत-प्रसंगात त्याचे मन उत्साहाने भरून जाई. असा भाई गेला ! त्याचा अवतार एकाएकी संपला ! काय व किती किती त्या वेळी आठवले. अशा रीतीने पुनः पुनः मनात उठणारे काहूर शेवटी मन सुन्न झाले तेव्हाच कमी पडले !

एक-दोन दिवसांतच आप्पा आला. त्याचे मनावर खूपच परिणाम झाला होता. परंतु त्याने मनाला सावरले. परिणाम कोणाला दिसू दिला नाही. पण मी तो जाणत होतो. मला त्याची कल्पना होती. त्याला वाटत असणार--भाईच्या जन्मांपासून निर्माण झालेली आपली जोडी तुटली, नाहीशी झाली. बाळपण, विद्यार्थिदशा, व्यायाम प्रवृत्ती, क्रांतीचे देशभक्तीचे विचार, गृहसंसार, त्यातील अनुकूल-प्रतिकूल योग, प्रसंग, त्यातून निभावून वृद्धिंगत झालेले व टिकलेले प्रेम, विश्वास, एकमेकाकरिता संतोषपूर्वक व प्रेमपूर्वक केलेले त्याग, सोसलेल्या अडचणी, कष्ट, त्यातील धन्यता व शेवटचा अचानक वियोग ! सर्व सर्व त्याला आठवत असेल. त्याच्या मनाची स्थिती ते आठवून, आठवून काय झाली असेल ? तो कितीही खंबीर असला तरी आता वृद्धावस्थेत काय काय सहन करणार ?

आप्पा—भाईचे लहान बंधू पुण्याचे डॉ. गोपाळ काशिनाथ (बाबासाहेब) ह्यांची प्रकृती ते नोकरीतून निवृत्त झाल्यानंतर काही काळाने कंपवाताच्या विकाराने बिघडली. तरी तशाही स्थितीत ते पेशंटला तपासून सल्ला देण्याचे काम करीत असत. परंतु पुण्याहून बाहेर जाण्यासारखी त्यांची प्रकृती स्वाधीन राहिली नाही. पुढे पुढे त्यांचा कंपवाताचा उपद्रव वाढतच

चालल्यामुळे त्यांची पराधीनताही वाढत चालली होती. अशा स्थितीत भाईचे वर्तमान त्यांना लवकर न कळले तर बरे असे वाटत होते. कारण एक तर भाईवर त्यांचा अतिशय लोभ होता. अशा पराधीन स्थितीत दुःखदायक वर्तमानाचा त्यांच्यावर वाईट परिणाम होईल अशी धास्ती वाटत होती. परंतु डॉक्टराना ती बातमी कळली व कल्पनेप्रमाणे त्यांच्यावर परिणामही झालाच. डॉक्टरांची प्रकृती बरी नसल्यामुळे मी वरचेवर पुण्यास जाऊन थोडे दिवस त्यांच्याजवळ राहत असे. मी किंवा आप्पा भेटल्याने त्यांना बरे वाटे. पण त्यांच्या जवळून परत येतांना आम्हांला फार दुःख वाटे व त्यांनाही रहावत नसे. आप्पाची स्थिती जोपर्यंत प्रवास करण्यासारखी होती तोपर्यंत तोही येऊन जात असे. व मीही १९५९ साली फार आजारी पडण्यापूर्वीपर्यंत डॉक्टराना भेटून व तेथे थोडे दिवस राहून येत असे. भाई तर स्वतःच पराधीन झाला होता. त्याला येणे शक्यच झाले नाही. अशा रीतीने आम्ही केव्हाही एकमेकांच्या संकटात, अडचणीत एकमेकांना साहाय्य देतच असू. डॉक्टरांच्या कोणत्याही प्रसंगात आम्ही त्यांच्या जवळ रहात असू. पण ज्यावेळी आम्हीच पराधीन झालो त्यावेळी आमच्याने काही होऊ शकत नाही, याचेच आम्हाला वाईट वाटे. मी आजारी पडल्यानंतर बाहेर जाण्याइतपत बरा होण्यात दोन वर्षे गेली. त्या मध्यंतरीच्या दोन वर्षांच्या काळात मी पुण्यास जाऊ शकत नाही याबद्दल मला वाईट वाटे. डॉक्टर माझी वाट पहात आहेत असे त्यांचा समाचार मधून मधून मला देणारे पुण्याचे कांतिलाल परीख यांचेकडून कळे. त्या दिवसांत डॉक्टरांची खबर देण्याचे काम कांतिलाल भाईंनी फारच मनःपूर्वक व नियमितपणे केले. माझी प्रकृती प्रवास करण्यासारखी होताच मी प्रथम पुण्यास गेलो. दोन वर्षांनी डॉक्टराना पाहिले. फारच अनिष्ट फरक त्यांच्यात झालेला पाहून मन विव्हळ झाले. त्यांची पराधीनता पाहणारालाही दुःखदायक वाटावी अशी होती. बोलू शकत नव्हते. खुणावू शकत नव्हते. दुसऱ्याच्या साहायाने थोडा वेळ बसून राहू शकत होते. मान व डोळ्याचे पाहण्याचे काम इतक्या गोष्टी नीट होत्या. त्यांना सर्व जाणीव होत असे. पण व्यक्त काहीच करता येत नव्हते. अशा स्थितीत त्यांना मी भेटलो. परस्परांना काय वाटले ते ज्याचा तोच जाणणार. त्यांच्याकरिता ७–८ दिवस

राहून मी तेथून निघालो. माझी स्थितीही राहण्यासारखी नव्हती. मी डोक्याच्या दुखण्यानेच पहिल्याने आजारी झालो होतो. पुनः केव्हा चक्कर येईल त्याचा भरवसा नाही ही धास्ती होती. म्हणून मला राहता येत नव्हते. मला राहिले पाहिजे असे वाटत असताही मी राहू शकत नाही ही गोष्ट माझ्या बाजूने दुःखदायक वाटत होती. त्यांच्या अडचणीत मी व माझ्या अडचणीत त्यांनी असे आम्ही कधीच एकमेकांना सोडून वागलो नसता या प्रसंगी मी राहू शकत नाही, त्यांच्याविषयी प्रेम, कारुण्य, विव्हळता व माझी स्वतःची लाचारी अशी दोनही बाजूची स्थिती मला दुःसह वाटत होती. अशा स्थितीत एक महत्त्वाची व समाधानाची गोष्ट. म्हणजे घरातील मंडळी--डॉक्टरांची पत्नी, मुलगे, मुली, जावई, डॉक्टरांचा भाऊ सर्व--त्यांच्याकडे पूर्ण लक्ष देऊन त्यांची सेवा करीत असत. त्यातूनही त्यांच्या मुलांची त्यांच्याविषयीची पितृभक्ती व सेवावृत्ती पाहून समाधान वाटे. चांगल्या सुखवस्तू स्थितीतील सुशिक्षित तरुण आपल्या वृद्ध व अपंग पित्याची मनःपूर्वक व भावपूर्वक सेवा करीत असल्याचे दृश्य आपल्या समाजात पहायला मिळणे दुर्लभ आहे. ते करुणापूर्ण पण सेवा, भक्ती, कर्तव्यनिष्ठा व खरे धर्माचरण यांचे दुर्मिळ दर्शन मला तेथे रोज होत असे. डॉक्टरांच्या मुलांविषयी मला धन्यता वाटे.

त्या खेपेचे माझे पुण्याचे दिवस फार विव्हळतेत गेले. डॉक्टरांची करुणाजनक स्थिती व माझी राहण्याविषयीची लाचारी ही दोनही दुःखे आवरून व दाबून ठेवून मी निघते वेळी डॉक्टरना भेटलो. बराच वेळ त्यांच्या मस्तकावरून हात फिरवीत राहिलो. त्यांची स्थिती त्यांच्या केवळ डोळ्यांवरून व कापणाऱ्या हातापायांवरून पूर्णपणे समजत होती. भविष्य समजत होते. आता डॉक्टरांची पुनः भेट होणे जवळ जवळ अशक्य असे वाटत असताही पुनः येईन असे काही सांगून मी तेथून निघालो व मुंबईस आलो.

दहा बारा दिवसांतच माझे मित्र कांतिलाल यांच्याकडून खबर आली. डॉक्टरांची शेवटची बातमी समजली. भविष्य समजून होतो तरी प्रत्यक्ष घटना घडल्याचे समजताच मनात खिन्नता पसरली. डॉक्टरांच्या जीवनाची शेवटची वर्षे फारच करुणाजनक स्थितीत गेली. ज्यांनी शेकडो लोकांना

व्याधिमुक्त केले, ज्यांनी कैकांना नवजीवन दिले, आपल्या ज्ञानाची, कलेची पराकाष्ठा करून अनेकांचे बुडणारे संसार ज्यांनी तारले–जे परम उदार, परोपकारी, जे दुःखितांना आराम देण्याचे प्रयत्नात रात्र-दिवस, सकाळ-दुपार न पाहता, भूक-तहान यांकडे लक्ष न देता सदैव झटले त्यांनाही पराधीन स्थितीत कैक वर्षे अशा प्रकारच्या यातना सोसाव्या लागल्या ! हे पुनः पुनः मनात येऊन विषादसहित आश्चर्याने मन भरून जात होते ! डॉक्टरांसारख्या शांत, प्रेमळ, आपल्या कार्यात निष्णात, भावनाशील, कळकळीने सेवा करणारा, नम्र व निरहंकारी मित्र आता कोठून प्राप्त होणार ? पुष्कळ विवेक व विचार करूनही मन पुनः पुनः विषादाने भरून जाई व आपण त्यांच्याकरिता काही करू शकलो नाही याबद्दल वाईट वाटे. डॉक्टरांची जीवनयात्रा संपली ! दुःखिताकरिता तळमळणारे त्यांचे हृदय नाहीसे झाले ! ता. २९ ऑगस्ट १९६० सोमवार या दिवशी हा दुःखद प्रसंग घडला ! त्या वेळी त्याचे वय अंदाजे ७५–७६ असावे.

भाई गेला ! डॉक्टर गेले ! आप्पाच्या मनाची स्थिती काय झाली असेल ? त्याला काय वाटत असेल ? तो मनाने दृढ; पण आता वार्धक्याने जर्जरित झालेला. आपले दोन लहान भाऊ आपल्या अगोदरच गेले ह्यामुळे त्याचे मन उदास झाले असेल वगैरे विचार माझ्या मनात येत. त्याला भेटावे असे मला वाटे. पण माझी स्थिती त्या बाजूचा ( शंकरपूरवाडीकडचा ) प्रवास करण्यासारखी मुळीच नव्हती. त्याला पत्रे पाठवली. पण जबाब नाही. पुढे कोणाकडून तरी कळले–त्याला पत्रे मिळत नाहीत. मी त्याला रजिस्टर पत्र पाठवले होते. ते मलाच परत मिळाले. त्या दिवसात आमची परस्परांची खबर परस्परांना कळत नव्हती. पुढे काही दिवसांनी, म्हणजेच १९६१ साली, उन्हाळ्याच्या दिवसांतच खबर कळली की, आमच्या मोठ्या वहिनी–आप्पाची पत्नी–सौ. लक्ष्मीबाई यांना देवाज्ञा झाली. त्यावर मी आप्पाला पत्र पाठवले. पण त्याच्याकडून उत्तर आले नाही.

आमच्या मोठ्या वहिनी गेल्या ! वाईट वाटले. आप्पाला काय वाटले असेल याची कल्पना होईना. कारण आप्पा वहिनीविषयी कधी कधी म्हणत असे की, ही माझ्या आधी जाईल तर चांगले, कारण मी गेल्यावर

हिला कोण सांभाळणार ? ही आजारी पडली तर हिचे कोण करणार ? पण वहिनींनी अगोदर जाऊन आप्पाला स्वतःच्या बाबतीत चिंतामुक्त केले यात शंका नाही. पण त्या गेल्याचे कळल्यावर मला चिंता वाटू लागली की, वहिनी गेल्या. आता आप्पाचे वार्धक्यात कसे होणार ?

आमच्या दोन्ही वहिनी फारच चांगल्या. त्यांच्याबद्दल मी पूर्वी थोडक्यात लिहिलेच आहे. परंतु आप्पा व भाई यांच्या सर्वसाधारण लोकांपेक्षा निराळ्याच प्रकारच्या विचार-आचारामुळे, धास्ती व चिंतायुक्त जीवन-व्यवहारामुळे व त्यांची राष्ट्रभक्ती, लोकसेवा वगैरेमुळे दोघींनाही पुष्कळच सहन करावे लागत होते. शिवाय एकत्र कुटुंब असताही स्वातंत्र्याच्या अभावी त्यांना पुष्कळ पराधीनता सहन करावी लागली. पण त्या दोघींमध्ये चांगले ऐक्य व मनमिलाफ असल्यामुळे त्यांनी त्या स्थितीतही कधी असंतोष दाखवून आप्पा व भाईस चिंतेत टाकले नाही. देशभक्त व क्रांतिउपासकांच्या घरच्या मंडळींना किती व किती प्रकारे कष्ट सोसावे लागतात ते त्या दोघींच्या व आप्पा-भाईच्या संसारचित्रावरून मला पूर्ण माहीत आहे. अनेक प्रकारच्या अडचणींत व चिंतेत जीवन कष्टवून आमच्या मोठ्या वहिनी गेल्या ! परमात्मा त्यांना सद्‌गती देवो ! आमच्या धाकट्या वहिनी हयात असून वार्धक्यात आपल्या मुलांबरोबर शांतिमय जीवन व्यतीत करीत आहेत.

आप्पा अगोदर पुष्कळ अशक्त झालाच होता. त्यातून आता वहिनी गेल्यानंतर औरंगाबाद– शंकरपूरवाडीकडे राहायला तो कंटाळला. माझा त्याचा पत्रव्यवहार बंद झाल्यामुळे पूर्ण माहिती मिळत नव्हती. तरी त्याला भेटून येणाऱ्याकडून मला सर्व कळत असे. त्याचे मन शेतीवरून उडाले व तो औरंगाबादहून धुळ्यास आला. त्यानंतर त्याची पत्रे मला येऊ लागली. तो उदास झाला होता. भाई गेला, डॉक्टर गेले, नानासाहेब देव अगोदरच गेले होते, वहिनीही गेल्या. याप्रमाणे बरोबरीच्या मोठ्या लहान अनेकांचा वियोग होत चालला. घरप्रपंचात त्याला बरे वाटेना. धुळ्यास आल्यावर कोणी मित्रांनी बोलावले म्हणजे तेथे जावे. मित्रांचे त्याचेवर अत्यंत प्रेम. मित्रांनी त्याला राहून घ्यावे. माझी वाट रात्रंदिवस आतुरतेने तो रोज पाही. प्रथम प्रथम त्याची पत्रे येत– त्यावरून त्याची मनःस्थिती समजे. नंतर पत्रेही लिहू

शकेना अशी स्थिती झाली. त्याचे मित्र रामेश्वरजी. त्याची सर्व परिस्थिती दर तीनचार दिवसानी कळवीत. मला त्यांचे फार आभार वाटत. मला जाता येत नव्हते त्याचे मला खूप वाईट वाटे. मला वाटे माझी प्रकृती प्रवास करण्यासारखी झाली की मी जाऊन येईन. पण प्रकृती सुधारेना. भाई गेला त्या वेळी आप्पाची व माझी भेट झाली होती. त्यानंतर भेट नाही. त्या वेळीही तो कृश झाला होता. त्या गोष्टीला सहा वर्षे होऊन गेली होती. आता तो फारच अशक्त झाल्याचे कळत होते. अशा वेळी मीच त्याला संभाळायला पाहिजे होते. पण परिस्थितीपुढे इलाज नव्हता. त्याला कोठेच बरे वाटेना. तेव्हा तो भाईच्या मळ्यात जाऊन राहिला. त्याने ज्या जमिनीत जीवापाड परिश्रम केले होते, त्या जागी त्या मळ्यात त्याला काही स्वस्थता वाटली. तेथे शेजारच्या अरविंद ऑइल मिलचे मालक गानू शेट यांनी त्याची सर्व प्रकारची व्यवस्था ठेवली. खाणे-पिणे, स्नान सर्व गोष्टींची सोय त्यानीच ठेवली. एक स्वतंत्र मनुष्य त्याच्या तैनातीत सर्व सेवाकार्याकरिता त्यांनी ठेवून दिला व स्वतः दिवसांतून कित्येक वेळा आप्पाकडे येऊन पडेल ती सेवा करू लागले. हे कळून मला काही समाधान वाटले. आप्पाची जीवन-भरची तपश्चर्या पुरी झाली होती. गानूशेट यांचा माझा प्रत्यक्ष परिचय नव्हता. पण त्यांचा आप्पाच्या ठिकाणी भाव कशा प्रकारचा होता तें मला रामेश्वरजींच्या पत्रावरून समजून मला फार समाधान वाटले व गानूशेट यांचे मला फारच उपकार वाटले. कारण जी आप्पाची सेवा करण्याचे आमचे कर्तव्य होते ते त्यांनी कठीण प्रसंगी आमच्या अगतिक स्थितीत आपल्यावर घेतले ही त्यांची केवढी उदारता! गानूशेट-विषयी रामेश्वरजी मला एका पत्रात लिहितात : 'गानूशेट फार मोठे मनुष्य. पण ते स्वतः मळ्यात येऊन आप्पासाहेबांची सेवा करतात. आप्पासाहेब त्यांना बसा म्हणाले तरी त्यांच्या समोर ते बसत नाहीत. उभेच राहतात. काय हा विनय! केवढी ही नम्रता! पितृभक्त मुलाप्रमाणे ते आप्पासाहेबांशी वागतात. दुसऱ्या एका पत्रात ते लिहितात—' आप्पासाहेबांनी अशा स्थितीत मोसंबीचा रस घेतला तर बरे म्हणून त्यांच्याकरिता मोसंबी गानूशेटनी पाठविली असता ते त्यांची किंमत विचारतात. किंमत सांगितल्यावर आप्पा-साहेब म्हणतात, एवढी महाग मोसंबी कशी खावी? धन्य आप्पासाहेब!

अंतकाळ जवळ आला तरी देशाच्या गरिबीचे तुम्हाला इतके तीव्र भान ! धन्य आहे तुमची.' पत्र वाचीत असता माझे हृदय भरून आले व धन्य आप्पा व धन्य गानूशेटही ! असे उद्‌गार माझे तोंडून निघाले.

रामेश्वरजींचे दर दोन तीन दिवशी पत्र येतच होते. त्यावरून आप्पाची स्थिती यथातथ्य कळत होती. मला चैन पडत नव्हते. सारे लक्ष आप्पाच्या स्थितीकडे लागले होते. सर्व जीवन आठवत होते. हळू हळू आप्पा अधिकाधिक क्षीण होत चालला होता. शरीर सर्व पराधीन होत चालले. चेतना कमी होत चालली. भान तुटू लागले. हे सर्व कळून मला चैन पडत नव्हते. सर्व लक्ष त्याच्याकडे लागले होते. त्याच्या स्थितीची कल्पनाचित्रे पुनः पुनः मनात येऊ लागली. आप्पाचे गतजीवन. त्यातील निरानिराळ्या अवस्था, त्यातील घटना एकामागून एक आठवू लागल्या. पुढे काय होणार, रामेश्वरजींकडून काय खबर येणार हे सर्व समजतच होतो. रामेश्वरजी वरचेवर ताबडतोब मला आप्पाची इत्थंभूत हकीगत कळवीत. त्याबद्दल त्यांचे आभार वाटत होते. आप्पाची भावपूर्वक सेवा करणारे गानूशेट यांच्या स्मरणाने नतमस्तक होऊन त्यांचे उपकार मानीत होतो. अशाच चित्ताच्या अवस्थेत ट्रंककॉल आला व तो रामेश्वरजींचाच समजताच ते काय सांगणार हे मनात अगोदरच आले. नंतर रामेश्वरजींच्या तोंडून समजले—आप्पासाहेब गेले. भविष्य माहीतच होते. ते स्पष्टच होते. किती काळामध्ये जाणार इतकाच प्रश्न होता. तो सुटला. मी मनाला तयार करून ठेवले होते तरी प्रत्यक्ष शब्द कानी पडताच धक्का बसायचा तो बसलाच.

ता. ३० सप्टेंबर १९६२ सायंकाळचा हा प्रसंग ! त्यावेळी आप्पाचे वय ८४ वर्षांचे.

# ९ : श्रद्धांजली व स्मरणांजली

ता. ३० सप्टेंबर १९६२ रोजी सायंकाळी आप्पासाहेबांचे देहावसान झाले. थोड्याच वेळाने रामेश्वरजी पोद्दार यांनी फोन-वरून ते वर्तमान मला मुंबईस कळवले. मी दुसऱ्या दिवशी सकाळीच तिघांचे ( माझे, बापटांचे व गणपतराव मोहाडीकरांचे ) नावाची दुखवट्याची तार रामेश्वरजीकडे पाठवली व एक खाजगी पत्र म्हणून रामेश्वरजींना पाठवले ते पत्र लेख म्हणून मी पाठवले नसता ते स्वतंत्र भारत ( धुळे ) वर्तमानपत्रात लेखासारखे प्रसिद्ध झाले. ते पत्र ( म्हणजे लेख ) वाचल्यानंतर बापट यांचे मला आलेले पत्र:—

गोखलेवाडी, शंकर रोड,
दादर, मुंबई—२८

सादर प्रमाण—स्वतंत्र भारत ९—१०—६२ अंक वाचावयास मिळाला. त्यात आपला लेख आहे. या लेखात माझ्याविषयी उल्लेख आहे तो अगदी बरोबर आहे. आप्पासाहेब देव माणूस होते. त्यांच्यापासून अनेक लोक अनेक प्रकारचा चांगुलपणा शिकले असतील. मीही पुष्कळ शिकलो. माधवरावांना ( भाई साहेब ) तर मी माझे गुरु मानतो. या बंधुद्वयासारखी साधुवृत्तीची माणसे संसारात असतात त्यामुळेच संसारात काही आकर्षण विरक्तांना देखील असते.

**पां. म. बापट**

या प्रकारचे बापट यांचे पत्र मला मिळाल्यावर मी त्यांना ‘ स्वतंत्र भारता ’कडे आप्पासाहेबांच्या निमित्ताने श्रद्धांजली पाठवावी अशी विनंती केल्यावरून ‘ स्वतंत्र भारता ’कडे त्यांनी पाठवलेली श्रद्धांजली :

## मूक सेवकाला मूक भक्ताची श्रद्धांजली

मी मूकसेवक दिवंगत श्री. आप्पासाहेब रणदिवे यांचा मूक भक्त आहे. आपल्या ‘ स्वतंत्र भारता ’त पू. केदारनाथजी ह्यांच्या लेखात माझा उल्लेख आला आहे, तो अगदी बरोबर आहे असे मी पू. नाथजींना कळवले असता त्यांजकडून लिहून आले की मी मूक न राहता दोन शब्द लिहून दिवंगत आप्पासाहेबांना श्रद्धांजली वाहावी.

आप्पासाहेब व माधवराव या बंधुद्वयासारखे साधुवृत्तीचे बंधुद्वय क्वचितच पहावयास मिळतात. धुळ्याला मी पूर्वी पुष्कळ वेळा येत असे व त्यांच्याच घरी उतरत असे. दोघेही स्वभावाने शांत व जनसेवाहौशी होते. आप्पासाहेब माझ्यासाठी मुळशी ( सत्याग्रहाच्या ) तळावर व्यवस्था ठेवण्यास काही दिवस आले होते. हे दिवस १९२२ सालातील असावेत. ( माझी स्मरणशक्ती फारच रोडावली आहे ). मी त्या वर्षी दिवंगत आण्णासाहेब दास्ताने यांचेबरोबर मुळशी सत्याग्रह प्रचारासाठी दौरा केला.

तेव्हा मागे मुळशी तळावरील व्यवस्था दि. आप्पासाहेबांनी सांभाळली. त्यांच्यासारखा व्यवस्थापक क्वचितच ! असो.

१९०८ साली पॅरिसहून परत आल्यावर आप्पासाहेब व माधवराव ह्यास भेटूनच श्री. हेमचंद्रदास ह्यास भेटण्यासाठी मी कलकत्त्यास गेलो. बॉम्बकला शिकण्यासाठी तो मजबरोबर पॅरिसमध्ये होता. माझ्या आठवणी-प्रमाणे मी त्याला बॉम्बकलेची पोथी देऊन जानेवारीत रवाना केले. व मी स्वतः मार्च १० ला पॅरीस सोडले. २६ मार्चला मुंबईस उतरून १ एप्रिल मध्ये मी कलकत्त्यास गेलो होतो.

मला क्रांतिकारकाची दिक्षा मिळाली १९०२ साली. ती मिळण्यास माधवराव व आप्पासाहेब, आण्णासाहेब दास्ताने व भटजी (म्हणजे श्री. दामोदर बळवंत भिडे, एक तालीम मास्तर, सातारा) कारण झाले. प्रत्यक्ष दीक्षा-शपथ भटजींनी दिली. त्यावेळेस माधवरावांच्या खोलीत (पुणे डेक्कन कॉलेज वसतिगृहातील खोलीत) आण्णासाहेब दास्ताने व माधवराव उपस्थित होते. त्यांच्या समक्ष मी शपथ घेतली. या शपथेने माझ्या आयुष्याला जे वळण लागले ते माझा उद्धार करणारे ठरले. ही शपथ मला मिळाली नसती तर मी अत्यंत गरीब कुटुंबांतील मुलगा कोठेतरी चाकरी करीत भाकरी मिळवीत एके दिवशी संपलो असतो !

मी आप्पासाहेब, माधवराव, आण्णासाहेब दास्ताने व भटजी या सर्वांनाच माझे गुरू मानीत आलो आहे. मला माझ्या पाच गुरूंची आठवण नेहमी होते. पाचवे गुरू माझ्या मराठी शाळेतील चौथ्या इयत्तेतील शिक्षक श्री. वामन बळवंत आवटी हे. त्यांच्या कृपेने मला इंग्रजी शिक्षण मिळाले.

श्रीहरी आप्पासाहेबांना त्यांचे इच्छित देवो ही प्रार्थना.

**पां. म. बापट**

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ........................ दि: ........................
क्रमांक ........................ दि: ........................

# निष्पाप सेवामय जीवन

लेखक : श्री. बाळूभाई मेहता

धुळ्याचे एक सज्जन आणि सुप्रतिष्ठित नागरिक श्री. विष्णु सीताराम ऊर्फ आप्पासाहेब रणदिवे हे रविवार ता. ३० सप्टेंबर १९६२ रोजी सायंकाळी ७॥ वाजता इहलोकची यात्रा संपवून निजधामाला गेले. हे कळविण्यास आम्हांला दुःख होत आहे. मृत्युसमयी त्यांचे वय ८४ वर्षांचे होते. वार्धक्यामुळे सुमारे दोन वर्षे झाली त्यांची तबियत एकसारखी खालावत चालली होती. तशा स्थितीतच त्यांचा अंत झाला.

विसाव्या शतकाच्या सुरुवातीला धुळ्यास जे प्रसिद्ध वकील होते त्यात श्री. सीताराम आत्माराम रणदिवे हे एक होते. ह्यांचे आप्पासाहेब हे ज्येष्ठ चिरंजीव. संस्कारी कुटुंबात जन्म झाल्यामुळे आप्पासाहेबांमध्ये सौजन्य आणि शालीनता ह्यांचा हृदयंगम मिलाफ झाला होता. त्यानंतर थोर पुरुषांचा सहवास लाभल्यामुळे त्यांचे जीवन दुधात साखर पडल्याप्रमाणे मधुर झाले होते.

कै. श्री. शंकर श्रीकृष्ण ऊर्फ नानासाहेब देव ह्यांचे श्री. आप्पासाहेब जिवलग मित्र होते. श्री. नानासाहेब हे लोकमान्य टिळकांचे अनुयायी. त्यामुळे आप्पासाहेब ह्यांच्या जीवनावरही टिळकांच्या राजकारणाची छाप पडणे साहजिकच होते. धुळ्याला प्रांतिक परिषद भरली. स्वदेशी प्रदर्शन भरले. शिवाजी उत्सव, गणपत्युत्सव साजरे झाले. ह्या सर्व कार्यक्रमात

नानासाहेबांना आप्पासाहेबांची पूर्ण साथ मिळे. एवढेच नव्हे तर नानासाहेब जेव्हा रामदासी संशोधनासाठी महाराष्ट्रात आणि इतर प्रांतातही हिंडत, त्या वेळी आप्पासाहेबांना बरोबर घेत असत. त्यामुळे संशोधनकार्यात कस-कशा अडचणी येतात आणि महत्त्वाचे हस्तलिखित ग्रंथ मिळवणे हे किती जिकीरीचे आणि चिकाटीचे काम असते, ह्याची आप्पासाहेबांना स्पष्ट कल्पना आली होती. नानासाहेबांनी धुळ्याला सत्कार्योत्तेजक सभा स्थापन केली, समर्थ वाग्देवता मंदिर उभारले आणि जांबेला श्रीसमर्थ मंदिर बांधले. ह्या सर्व कामांत नानासाहेबांना आप्पासाहेबांची मदत मिळे. थोडक्यात सांगायचे म्हणजे आप्पासाहेब हे नानासाहेबांचे उजवे हात होते.

नानासाहेबांचे वडील बंधु डॉ. देव हे तत्कालीन सांगली संस्थानचे वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी. डॉ. देव हे महात्मा गांधींच्या संपर्कात आले. बिहार प्रांतात नीळच्या गोऱ्या मळेवाल्यांनी तेथील स्थानिक शेतकऱ्यांवर अत्यंत जुलूम चालविला होता. ह्या जुलुमाविरुद्ध महात्मा गांधींनी सत्याग्रह सुरू केला. ह्या सत्याग्रहांत डॉ. देव सामील झाले. तेव्हां डॉ. देवांबरोबर आप्पासाहेबही सामील झाले. त्यामुळे आप्पासाहेबांचा महात्मा गांधींशीही परिचय झाला. महात्माजींच्या निकट सान्निध्यात आप्पासाहेब आले. महात्माजींचे जीवन जवळून पाहण्याचे सद्भाग्य त्यांना लाभले. महात्मा गांधींची सत्यनिष्ठा, गरीबाविषयींची कळकळ, ईश्वरनिष्ठा वगैरे अनेक सद्गुणांचा इष्ट परिणाम आप्पासाहेबांवरही झाला. सत्याग्रहाची चळवळ आटोपल्यावर महात्मा गांधींनी तेथील शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी शिक्षण, दारूबंदी, अनिष्ट सामाजिक रूढीविरुद्ध प्रचार वगैरे अनेक विधायक प्रवृत्ति सुरू केल्या. त्या सर्वांत आप्पासाहेबांनी भाग घेतला. त्यासाठी ते चंपारण्यात बरेच महिने राहिले होते. त्यामुळे सेवेचे उच्च शिक्षणच जणू त्यांना मिळाले. त्यावेळी बिहारचे पुढारी डॉ. राजेन्द्रप्रसाद आणि श्री. व्रजकिशोरबाबू (श्री. जयप्रकाश नारायण ह्यांचे श्वशुर) ह्यांच्याही परिचयात आप्पासाहेब आले. पुण्याचे शंकर दत्तात्रय देव, एकनाथपंत क्षीरे हेही त्यांच्याबरोबर होते.

सन १९२७ साली महात्मा गांधींचा पश्चिम खानदेशात दौरा झाला. होता. त्या वेळी गांधीजींचा मुक्काम आप्पासाहेबांच्या खोल गल्लीतील

घरातच होता. तसेच काँग्रेसचे अध्यक्ष ह्या नात्याने डॉ. राजेन्द्रप्रसाद ह्यांचा १९३६ साली दौरा पश्चिम खानदेशांत झाला होता. त्या वेळी ते सुद्धा आप्पासाहेबांच्या घरीच उतरले होते. त्या काळी जे जे पुढारी धुळ्याला येत, त्यांचा मुक्काम बहुधा आप्पासाहेबांच्या घरीच असे. ह्या सर्वांचे आतिथ्य-पूर्वक स्वागत रणदिवे बंधू करीत असत. अशा रीतीने आप्पासाहेबांचे घर हे अनेकविध प्रवृत्तीचे केन्द्र बनले होते.

सेनापति बापट हे आप्पासाहेबांचे बंधु श्री. भाईसाहेब ह्यांचे डेक्कन कॉलेजमधील सहाध्यायी. सेनापति बापट जेव्हा बडवाणीमध्ये त्यांच्या वनवासाच्या ( अज्ञातवासाच्या ) काळात राहिले होते, तेव्हा तत्संबंधी जरूर ती तजवीज आणि व्यवस्था रणदिवे बंधू ह्यांनी केली होती. सेनापति बापट हे जेव्हां जेव्हा धुळ्याला येत तेव्हा त्यांचे उतरण्याचे प्रियस्थान म्हणजे आप्पासाहेबांचे घरच होय. आप्पासाहेबांचे हे घर अशा रीतीने थोर पुरुषांच्या वास्तव्याने आणि पुण्यस्मृतीने भरलेले आहे. ह्या स्मृतीचे स्मारक म्हणून ते घर ओळखले जाईल अशी काही तरी व्यवस्थित योजना आखणे जरूर आहे.

पू. केदारनाथजी हे तर आप्पासाहेबांचे बालपणापासूनचे दोस्त. रणदिवे बंधूंच्या प्रेमामुळेच केदारनाथजी काही काळ धुळ्यास राहिले होते. केदारनाथजी आध्यात्मिक साधनेसाठी हिमालयाला गेले. नंतर गांधीजींच्या आश्रमात राहिले आणि आता ते मुंबईला राहत असले तरी त्यांच्याशी रणदिवे बंधूंचा पत्रव्यवहार अव्याहत चालूच असे. आप्पा-साहेबांना व्यावहारीक आणि आध्यात्मिक बाबतीत जेव्हा सल्लामसलतीचा जरूरी लागे तेव्हा ते केदारनाथजींची भेट घेत असत. एवढेच नव्हे तर त्यांच्याकडे कित्येक दिवस राहातही असत. त्यामुळे त्यांना समाधान होई. केदारनाथजी सुद्धा मधूनमधून त्यांच्याकडे काही दिवस राहात असत. शेवटच्या आजारात केदारनाथजींनी खुद्द येण्याचे आश्वासनही दिले होते, परंतु ते ( केदारनाथजीही ) त्याच वेळेला आजारी झाले म्हणून येऊ शकले नाहीत.

बडोद्याचे सुप्रसिद्ध प्रो. माणिकराव ह्यांचाही रणदिवे बंधूंशी चांगला परिचय होता. रणदिवे बंधूंनी आपली शरीरे चांगली कमावली होती.

दोन्ही बंधूंनी जोर बैठका, कुस्ती, लाठी, बोथाटी, फरीगदगा वगैरे अनेक प्रकारचे मल्लांचे खेळ ह्यात चांगले प्राविण्य मिळविले होते. संस्कारी आणि सुशिक्षित कुटुंबातील या बंधुद्वयांनी हे प्राविण्य संपादिल्यामुळे तत्कालीन अनेक तरुणामध्ये त्यांच्याप्रमाणे आपण शरीर कमवावे अशी महत्त्वाकांक्षा निर्माण झाली होती....

श्री. आप्पासाहेब ह्यांची काम करण्याची पद्धति प्रशंसनीय होती. प्रत्येक काम व्यवस्थितपणाने व नीटनेटकेपणाने झाले पाहिजे याविषयी त्यांचा कटाक्ष होता...

आप्पासाहेबाचे कौटुंबिक संबंध चांगले होते. आपले लहान बंधु भाईसाहेबावरील त्यांचे प्रेम राम–लक्ष्मणाप्रमाणे होते.

आप्पासाहेबांना गरीबांबद्दल अत्यंत सहानुभूती असे. स्वतः शेतकरी बनल्यामुळे शेतकऱ्याच्या जीवनाबद्दल फार कळकळ असे. आपल्या नोकरांवर त्यांचे खूप प्रेम असे. त्यामुळे त्यांच्याकडे नोकर म्हणून राहण्यास लोकांना बरे वाटे. हे नोकर त्यांच्याकडे टिकून रहात. आप्पासाहेबांचा दुसरा मोठा गुण म्हणजे त्यांची स्थितप्रज्ञता. त्यांचा वडील मुलगा शांताराम हा कॉलेजात शिकत असता ऐन युवावस्थेत वारला. तसेच त्यांचे कर्तबगार बंधु भाईसाहेब सुमारे सहा वर्षांपूर्वी वारले. त्यानंतर त्यांच्या प्रेमळ पत्नी सौ. लक्ष्मीबाई ह्याही सुमारे वर्ष सव्वावर्षापूर्वी स्वर्गवासी झाल्या. इतक्या महान् आपत्ति त्यांच्यावर एकामागून एक कोसळल्या परंतु त्यानी आपल्या मनाची शांती कधी ढळू दिली नाही. सगळी दु;खे अत्यंत धैर्याने त्यानी सहन केली. ह्या आपत्तींबद्दल एक अवाक्षरही काढताना त्यांना आम्ही कधी पाहिले नाही. फार काय आप्पासाहेबांना कधी कोणी रागावलेले पाहिले नाही. असे होते आप्पासाहेब अजातशत्रू.

आप्पासाहेबांच्या शेवटच्या काळात कित्येक महिनेपर्यंत धुळ्याच्या अरविंद मिलचे मालक श्री. गानू ह्यानी अत्यंत मनोभावाने त्यांची शुश्रूषा करून आदर्श सेवेचा पाठ दाखवून दिला.

आप्पासाहेबांचे सबंध जीवन निष्पाप आणि सेवामय होते. त्यांच्या आत्म्याला परमेश्वर शांती देईलच ह्याबद्दल शंका नाही.

* * *

रणदिवे बंधू विशेषतः आप्पासाहेब व्यायाम क्षेत्रात काम करीत असता त्यांच्या हाताखाली शारीरिक शिक्षण घेऊन विद्यार्थी व तरुण मंडळी कशी तयार होत असत, सार्वजनिक कामात किती धडाडीने भाग घेत असत, व अंगीकारलेले काम प्रसंगी किती साहसाने पार पाडीत असत ते दत्तात्रय ग. निरखे यांनी आप्पासाहेबांविषयींच्या लिहून पाठविलेल्या अगदी थोड्या आठवणीवरून वाचकांच्या ध्यानांत येईल. निरखे यांच्यासारखे शेकडो विद्यार्थी व तरुण रणदिवे बंधूंच्या हाताखाली तयार होऊन एके काळी सर्व खानदेश-भर पसरलेले होते. निरखे यांचे जीवनांतील पुष्कळसा भाग विद्यार्थी व तरुणाना व्यायामाचे शिक्षण देण्यात गेला आहे. शरीर सुदृढ, मन निर्मळ, व एकनिष्ठता ही त्यांची वैशिष्ट्ये आहेत. आप्पासाहेबांचेविषयी त्यांचे मनात नितांत सद्भाव आहे.

**दत्तात्रय ग. निरखे** आपल्या श्रद्धांजलीत लिहितात :

इंग्रजी पांचव्या इयत्तेच्या शालेय शिक्षणानिमित्त मी सन १९०९–१० साली धुळ्यास आलो. तत्पूर्वी माझे शिक्षण जळगाव येथे माझे आईवडीलां-जवळ झाले. जळगांवी असतानाच व्यायामाची आवड उत्पन्न करण्यात तेथील करकरे बंधूंचे प्रोत्साहन कारणीभूत झाले. त्यांचेच आज्ञेनुसार मी धुळ्यास पाताळे व्यायामशाळेत दाखल झालो व तेथेच माझी व श्री. आप्पा साहेब व भाईसाहेब यांची ओळख झाली. पाताळे व्यायाम-शाळेच्या चालक व व्यवस्थापक वर्गात वरील दोघे बंधू प्रमुख होते. व त्यांचे मार्गदर्शना-खालीच ती व्यायाम शाळा चालत असे. दैनंदिन कार्यक्रमांत व व्यायाम शिक्षणात श्री. आप्पासाहेबच जास्त लक्ष देत असत त्यामुळे त्यांचा व माझा अत्यंत निकटचा संबंध आला व पुढील सर्व व्यायाम शिक्षण त्यांचेच देखरेखीखाली झाले.

मी सुमारे १९०९–१० साली धुळ्यास आलो व पुढील कॉलेज शिक्षण संपेपर्यंत तेथेच रहात होतो. त्यावेळी उभय खानदेशात व्यायाम-क्षेत्रात काम करणारी जी थोडी फार निष्ठावंत मंडळी होती त्यात वरील उभय रणदिवे बंधूंचा फार मोठा भाग होता. त्यावेळच्या तरुण मुलांनी शरीराने सुदृढ व बलवान होऊन आपली मायभूमी स्वतंत्र करण्यात आपले

तन, मन, धन खर्ची घालावे अशा तळमळीने तरुण पिढीस तयार करण्याचे कार्य वरील उभयता बंधूंनी आपले शिरावर घेतले होते व त्या दृष्टीने ते सतत प्रयत्न करीत असत.

व्यायाम शाळेतील शिक्षणाचे बरेचसे कार्य श्री. आप्पासाहेब स्वतः जातीने करीत असत. त्यामुळे त्यांचा एकंदर स्वभाव, आचार व विचार यांचा प्रत्यक्ष अनुभव मिळत असे. ते स्वभावाने अत्यंत शांत, प्रेमळ, उत्साही, निगर्वी, व विशेष न बोलण्याच्या वृत्तीचे होते. कोठलेही काम व्यवस्थितपणे व विशेष लक्षपूर्वक करण्याचा कटाक्ष ते पाळीत असत. ते कधी कोणावर रागावल्याचे माझे निदर्शनास आले नाही.

व्यायाम-शाळेत प्रामुख्याने पुढील व्यायाम शिकवीत असत : कुस्ती, मल्लखांब, लाठी, बोथाटी, पट्टा, फरिगदगा, लेझीम वगैरे. श्री. आप्पासाहेबांचे आवडते व्यायाम व खेळ—पट्टा, फरीगदगा, लाठी, बोथाटी, मल्लखांब हे असत. विशेषतः पट्टा ते अत्यंत सफाईने फिरवीत असत. पूर्वीच्या काळी शिवाजी महाराजांच्या वेळी मराठे वीरांनी पट्ट्याचे सामर्थ्यावर शत्रुपक्षाला नामोहरम करण्यात मोठीच कामगिरी केल्याचे इतिहासावरून दिसून येते. त्याचे शास्त्रशुद्ध शिक्षण श्री. आप्पासाहेब स्वतःच देत असत. पट्टा फिरवतांना पायाची व हाताची हालचाल नियमबद्धपणे व सफाईने करण्यात फार हुशारी, चपळाई लागत असते. त्यांचे संपूर्ण ज्ञान श्री. आप्पासाहेबांकडून मला मिळाले. त्यांचा दुसरा आवडता व्यायाम म्हणजे लाठीचा. ही फिरवण्यात श्री. आप्पासाहेबांचा हातखंडा असे. वैयक्तिक लाठी फिरवण्यापेक्षा ते लाठी छूट फारच सफाईने करीत असत. लाठीचा खरा उपयोग आपणावर हल्ला झाला असताना त्याला निधड्या छातीने तोंड देऊन त्या हल्ल्यांतून सफाईने व सुरक्षितपणे बाहेर पडण्याचे कसब यानी आत्मसात केले होते. व त्याचा फायदा मला नित्य होत असे.

व्यायाम शाळेत जी थोडी फार होतकरू मुले दिसत त्यांचेकडे श्री. आप्पासाहेब स्वतः लक्ष देत, त्यांना त्या व्यायामात तरबेज करण्याची कला व हातोटी त्यांच्यात होती. मला स्वतःला कुस्ती व मलखांबाचे व्यायामाची फार आवड होती. त्यात प्राविण्य मिळवावे म्हणून ते जातीने

माझे कुस्तीचे वेळी हजर रहात व निरनिराळ्या डावपेचांची माहिती देत असत. कुस्तीतील माझी प्रगती पाहून त्यांनी मला पुण्यास डेक्कन जिमखान्यावर होणाऱ्या कुस्तीच्या लढतीत भाग घेण्यास प्रवृत्त केले. त्याप्रमाणे सन १९६४ सालचे तेथील मेळाव्यात मला कौशल्याचे रौप्यपदक मिळाले.

मला कुस्तीत संपूर्ण ज्ञान व्हावे व मी कोठेही अजिंक्य व्हावे अशा भावनेने ते मला नेहमी मार्गदर्शन करीत असत. कुस्तीसारख्या सर्वांग-व्यायामाला लागणारा खुराक मी घेत जावा या हेतूने त्यांनी मला रोज लागेल तेवढे दूध पिण्याची व्यवस्था केली. त्यांचे स्नेही श्री. माधवराव वैद्य शहरापासून २–३ मैलावर मळ्यात रहात असत, त्यांचेकडे बऱ्याच गाई म्हशी होत्या. तेव्हा मी तेथे रोज पहाटे पळत जाऊन मनसोक्त दुग्धाहार घेत असे. तसेच मी पुण्यास जाण्याचे सुमारास अगोदर काही दिवस बडोद्याचे प्रसिद्ध व्यायामपटु श्री. प्रो. माणिकराव हे धुळ्यास आले असताना त्यांचेबरोबर कुस्ती करून त्यातील विशेष डावपेचांची माहिती मला करून घेता आली. या सर्व तयारीचे व प्रगतीचे श्रेय श्री. आप्पा-साहेबांनाच द्यावे लागेल. अशा तऱ्हेच्या नित्याच्या त्यांच्या सहवासाने मला त्यांचेबद्दल अत्यंत आदर वाटत असे. एवढेच नव्हे तर त्यांच्या प्रेमळ सहवासाने मी त्यांना माझे गुरुस्थानी मानू लागलो. आपल्या आवडत्या मुलाइतक्या प्रेमाने ते माझेकडे लक्ष देत असत. एकादे वेळी मी व्यायाम-शाळेत गेलो नाही तर घरी येऊन माझेबद्दल ते चौकशी करीत असत. आज जवळ जवळ सत्तरी गाठण्याच्या वयात आलो असतांना निर्कोप प्रवृत्तीमुळे आजपर्यंतच्या जीवनात कोणत्याही विशेष रोगाने आजारी झाल्याचे मला आठवत नाही. आता वयोमानाने डोळ्यास मोतीबिंदुमुळे नित्याचे उद्योगकार्य पूर्ववत होऊ शकत नाही. परंतु सर्व निरोगी जीवनाचे श्रेय श्री. आप्पासाहेबांच्या सहवास व मार्गदर्शनालाच आहे.

श्री. आप्पासाहेबांच्या अशा निरनिराळ्या गुणांचे वर्णन शब्दाने करणे अशक्य आहे. त्यांच्या आचरणाची व विचारांची छाप व स्मृती अद्यावत आढळते. अशाच अनेक प्रसंगांची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. तो प्रसंग खालीलप्रमाणे होता :

सन १९१५ साली मार्च महिन्यात हरिद्वार येथे कुंभमेळा भरणार होता. त्या वेळी तेथील यात्रेत स्वयंसेवक म्हणून काम करण्याकरिता धुळ्याहून मी, श्री. नगरकर, बाबुराव जोशी, शंकरराव जोग, डॉ. आपटे आदि मंडळी गेलो होतो. वरील मंडळींची निवड अर्थात् श्री. आप्पासाहेबांच्या सल्ल्याने करण्यात आली होती. मी त्या वेळी नुकताच मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झालो होतो. ही उत्कृष्ट संधी म्हणून मला विशेष आनंद झाला. परंतु या सर्व गोष्टीला पैशाचे पाठबळ असल्याशिवाय ती अमलात आणणे कठिण होते. परंतु श्री. आप्पासाहेबांनी मला कोणत्याही गोष्टीची फिकीर न करता जाण्यास तयार राहण्यास सांगितले. एवढ्या लांबच्या प्रवासास जाण्याचा हा आयुष्यातील पहिलाच प्रसंग होता. त्यामुळे मन थोडे काकू करत होते. परंतु श्री. आप्पासाहेबही बरोबर येत असल्याने आम्ही अगदी निर्धास्तपणे प्रवासास निघालो. प्रवासास लागणाऱ्या खाद्यपेय, औषधपाणी, कपडालत्ता, पैसा वगैरेची सर्व व्यवस्था श्री. आप्पासाहेबांनीच केली होती. हरिद्वार येथे स्वयंसेवक कँप फार मोठ्या प्रमाणात भरला होता. हिंदुस्थानातून निरनिराळ्या प्रांतातून सुमारे पाचशे-सहाशे स्वयंसेवक हजर होते. आम्हां लोकांस (यात्रेतील) मार्गदर्शन करणे, वगैरे गोष्टींची माहिती देऊन त्याप्रमाणे निरनिराळ्या ठिकाणावर आमची नियुक्ती करण्यात आली होती. माझी नेमणूक हरीच्या पायरीजवळच्या नाक्यावर करण्यात आली होती. यात्रेच्या पर्वणीच्या दिवशी पहाटे यात्रेकरूंच्या तुफान गर्दीमुळे अपघात होऊन २५-३० माणसे मृत्युमुखी पडली. त्या वेळी प्रसंगावधान सुचून मी त्या गर्दीत जखमी व मृत झालेल्या लोकांस शक्य ती मदत केली. एकंदर प्रसंग अत्यंत धोक्याचा व बिकट होता पण सुदैवाने मी त्यातून सुखरूपपणे निभावलो.

या अपघाताची वार्ता कँपमध्ये समजल्याबरोबर तेथील मंडळीस माझे सुरक्षिततेबद्दल काळजी वाटू लागली. श्री. आप्पासाहेब आदि मंडळी ताबडतोब माझ्या शोधात धावत निघाली. तेथील गर्दीच्या चेंगराचेंगरीत जे मृत्यू पावले त्यांची प्रेते एका बाजूला नेऊन ठेवण्याच्या प्रयत्नात आम्ही गर्क होतो. अशा वेळी श्री. आप्पासाहेब, डॉ. देव, शंकरराव जोग, डॉ. आपटे आदि मंडळी तेथे उपस्थित झाली. मी सुखरूप असून कामांत दंग असल्याचे पाहून आप्पासाहेबांना अतिशय आनंद झाला व मला त्यांनी प्रत्यक्ष मिठी

मारली. त्यांच्या त्या वेळच्या वात्सल्य व आपलेपणाचे वर्णन मी शब्दात करू शकत नाही. ते इतके गहिवरून आले की त्यांचे तोंडातून शब्द बाहेर पडेना. पाच दहा मिनिटांनी मी एकंदर परिस्थितीचे निवेदन त्यांस केले. त्या प्रसंगातील माझी धडाडी पाहून तेथील पोलीस अधिकाऱ्यांनी मला धन्यवाद दिले.

सन १९२२-२३ साली मी धुळे सोडून मुंबईस नोकरी निमित्त आलो. तेव्हापासून त्यांचा सहवास अंतरला. तेही काही काळानंतर औरंगाबादकडे शेती करण्याच्या उद्योगात लागले. त्यामुळे त्यांची खबरबात कळणे कठीण झाले. मध्यंतरी काही काळ आधी श्री. भाईसाहेबांचे निधन झाल्यामुळे धुळ्यास गेलो असता फक्त त्यांच्या घराचे दर्शन घेऊनच समाधान मानावे लागत असे. अलिकडे श्री. आप्पासाहेबांचे निधन झाल्याचे समजल्याने अतिशय दुःख झाले. त्यांच्या उत्कट व प्रेमळ सहवासाचा व मार्गदर्शनाचा लाभ एक अत्यंत चिरस्मरणीय योग माझे आयुष्यात मला लाभला याबद्दल मी परमेश्वराचा आभारी आहेच. तसाच ज्या व्यक्तीच्या प्रेमाने मी माझे जीवनात शारीरिक व मानसिक स्वास्थ्य व आनंद उपभोगू शकलो त्या परमपूज्य आप्पासाहेबांचे ऋण या जन्मी विसरणे शक्य नाही. परमेश्वर त्यांना चिरशांती देवो अशी अखंड प्रार्थना त्याचे चरणी करून त्यांना वेड्यावांकड्या शब्दात माझी श्रद्धांजली ( मी ) अर्पण करीत आहे.

**दत्तात्रय ग. निरखे**

द. ग. निरखे यांच्याप्रमाणे खानदेशातील कितीतरी तरुण रणदिवे बंधूंकडून शारीरिक शिक्षण व मानसिक उच्च संस्कार घेऊन गेले. त्या सर्वांची मोजदाद करणे कठिण आहे. रणदिवे बंधूंचा दीर्घकाळ व्यायामक्षेत्रातील कार्यात गेला. तितक्या काळांत त्या क्षेत्रात त्यांच्याशी संबंध आलेली प्रत्येक व्यक्ती निरखे यांच्याप्रमाणेच त्यांच्या बाबतीत स्वानुभव सांगून त्यांना प्रेम व कृतज्ञतापूर्वक श्रद्धांजली अर्पण करील याविषयी शंका नाही.

आप्पा गेला ! त्याची जीवनयात्रा संपली ! निरनिराळी स्मृतिचित्रे चित्तावर उठू लागली ! लहानपणापासूनचा माझा जिवलग सोबती निघून गेला ! गुरुवर्य कोंडाजी वस्ताद यांचा पुत्रवत् आवडता शिष्य अस्तंगत झाला ! क्रांतीचा उपासक व उपासकांचा आधार, त्यांचा पोशिंदा, स्वजन

म्हणून त्यांची हरएक प्रकारे चिंता वाहणारा त्यांना संभाळणारा नाहीसा झाला ! तरुणांना पूज्य, आबालवृद्धांना प्रिय, व सर्वांकडून धन्य म्हणवून घेणारा कर्तृत्ववान पण निरहंकारी आप्पा आम्हांस कायमचा सोडून गेला ! आपल्या दरिद्री देशाकरिता तळमळणारा, स्वार्थरहित बुद्धीने सर्वांकरिता झटणारा आप्पा सर्वांना सदैवचा अंतरला ! आता यापुढे तो सदेह कोणालाही दिसणार नाही हे त्रिकालाबाधित सत्य पटत आहे तरी त्याचे एक वेळचे आदर्श शरीर अजून मला दिसत आहे. देशहिताच्या हेतूने व दृष्टीने राना-वनांतून, डोंगरकपाऱ्यांतून भुकेला व तहानेला फिरत असलेला, थकून गेलेला आप्पा अजून माझ्या दृष्टीसमोर येत आहे. शेतात काबाडकष्ट करणारा आप्पा मला स्पष्ट दिसत आहे. जीवनभर अनेक प्रकारचे कष्ट, अनेक चिंता, अनेक अडचणी सहन करीत सोशीत राहिल्याने शरीरातील रक्त-मास नाहीसे होऊन खरोखरच हाडाची काडे झालेले त्याचे शरीर मी अजून पहात आहे. वार्धक्याने ग्रासलेले, कष्टाने थकलेले व सुकलेले, चिंतेने पोखरलेले त्याचे शरीर माझ्या मनात वेदना उत्पन्न करीत आहे. माझ्या मनात भरलेली ही सारी चित्रे मला पुनः पुन. दर्शन देत आहेत !

आप्पा-भाईचे काका दोघां भावांविषयी म्हणत : आपल्या घरात ही दोन रत्ने आहेत. काकांचे ते शब्द आठवले की अजूनही ते किती मधुर लागतात ! पुढील अनुभवावरून पाहता ते केवळ रत्नेच नव्हते, पण रत्नांचे निर्मितेही होते. समग्र खानदेशातील एका काळच्या तरुणांत व्यायामाची आवड कोणी निर्माण केली ? त्यांना शक्तिसंपन्नतेचा मार्ग कोणी दाखवला ? त्यांच्यात देशभक्तीचा संचार कोणाच्या प्रेरणेने झाला ? त्यांच्या हृदयात स्वातंत्र्याच्या भावना कोणी प्रदीप्त केल्या ? शील व चारित्र्याचे संस्कार व धडे त्यांना कोणी दिले ? अशा अनेक प्रश्नांचे उत्तर एकच आहे. आणि ते म्हणजे रणदिवे बंधूंनी हेच. आप्पाला व भाईला—या अनुपम जोडीला—मोठ्या पुढाऱ्या-पासून ते साधारण व्यक्तीपर्यंत या दोघांपैकी केवळ एकट्यालाच जाणणारा कोणी सापडत नसे. रणदिवे म्हणजे रणदिवे बंधू म्हणून सर्व जाणत असत—मग ते लोकमान्य असोत की आणखी कोणी असोत. अशी अनेक दृष्टींनी अपूर्व अशी ही जोडी होती. कोणत्याही देशाच्या स्वातंत्र्याचा इतिहास वाचतांना त्यातील स्वातंत्र्यवीरांचा उल्लेख आला की मला आप्पा-भाईचे



आप्पासाहेब

त्यांच्याशी साम्य वाटे. त्यांना झुंजायचा प्रसंग आला व आप्पा-भाईला परिस्थितीभेदामुळे अजून आला नाही इतकाच फरक मला वाटे. अशा रीतीच्या तुलनात्मक अनेक भव्य व रोमांचक कल्पना ज्यांच्यावरून एके काळी माझ्या मनात येत ते आप्पा-भाई दोघेही गेले ! आमचा एकवेळचा चार जणांचा पक्का गट होता. आप्पा भाई, माधव वैद्य व मी. त्यापैकी भाई पहिल्याने गेला. नंतर माधव गेला. आप्पा राहिला होता. त्यावर मी समाधान मानीत होतो. पण शेवटी तोही गेला ! दोघेही बंधू सारखेच बलसंपन्न. दोघांच्याही तेजस्वी गौरवर्ण काया. ज्यांच्याकडे पाहताच दृष्टी तेथेच खिळून रहावी असे सर्वांगीं सुंदर, बुद्धीने प्रखर, मनाने निर्मळ, उदार, प्रेमळ, सदैव देशकल्याणाचा विचार करणारे, त्याकरिता सर्व काही सहन करणारे, क्षुद्र जीवनाची कल्पना ही ज्यांना सहन होत नव्हती असे दोघे भाऊ. अशी ही भाग्याने लाभलेली दुर्लभ जोडी आपल्याला मित्र म्हणून पुनः कोठे सापडणार ? कोठे मिळणार ? त्यांना मित्र म्हणून तरी काय म्हणावे ? बंधू ? सुहृद ? नाही. आमचा संबंध यथार्थपणे दर्श-वण्याला शब्द सापडत नाही. कोणताही शब्द अपुराच वाटतो. अनेकविध स्मृती व अगणित भावना यांच्या हृदयात उठणाऱ्या एकच गर्दीतून काय काय लिहावे व कसे लिहावे ? काय दर्शवावे व काय वगळावे ? काही समजत नाही व साधत नाही. आणि त्यातूनही काही समजले किंवा साधले तरी आप्पा व भाई गेले ते गेलेच ! आपल्या प्रेमाचे, सख्यत्वाचे व ममतेचे अपार ऋण माझ्यावर ठेवून दोघेही निघून गेले ! भाईच्या भडकलेल्या चितेचे शेवटी दर्शन घडले पण आप्पाचे बाबतीत तितकाही योग लाभला नाही. दोघेही गेले ! नाहीसे झाले ! आता कोठेही शोधले, कितीही धुंडाळले तरी सापडणार नाहीत, भेटणार नाहीत, दिसणारही नाहीत अशा स्थानात, अशा स्वरूपात ते कायमचे व संपूर्णपणे विलीन झाले ! ! !

आता मागे त्यांच्या स्मृती मात्र राहिल्या ! !

# उपसंहार

रणदिवे बंधूंचा जीवनवृत्तांत आठवला तसा निवेदन करीत आता उपसंहारापर्यंत येऊन पोहोचलो. यात त्यांच्या जीवनातील लहान सहान गोष्टी किंवा इत्थंभूत हकीकती न देता त्यांच्या जीवनातील निरनिराळ्या अवस्था व भूमिका देऊन त्या स्पष्ट करण्याचा मात्र प्रयत्न केला आहे. त्यांच्या जीवनातील अनुकरणीय प्रवृत्ती, त्यातील विशिष्ट कार्ये, ती करीत असता त्यातील त्यांची उदात्त, शुभ, व्यापक व कल्याणकारी दृष्टी व हेतू यांचे दिग्दर्शन व पृथक्करण करण्याचा मुख्य उद्देश हे निवेदन लिहिण्याचे मागे आहे.

मानवी जीवन कमी अधिक अंशानी गुण–दोष मिश्रित असते. ते तसे असूनही मनुष्याच्या जीवनाचा मुख्य ओघ कोणत्या संस्कारातून–संकल्पातून निर्माण झाला, कोणत्या प्रवृत्तीतून व कोणत्या रूपाने तो वहात राहिला, कोणत्या विशिष्ट सद्‌गुणामुळे त्याला वेग अगर भरती येत गेली व शेवटी त्याचे पर्यवसान किंवा विलय कोणत्या स्वरूपात झाला, या मुख्य गोष्टी गुण–दोषांचे प्रमाण काढताना पहाव्या लागतात. त्याचप्रमाणे त्या जीवनात दोषांचे मिश्रण असले तरी जीवनाच्या मुख्य ओघाला ते कितपत बाधक किंवा विघातक होत होते अगर किती अंशाने मलीन करणारे होते तेही पहावे लागते. अशा दोन्ही बाजू पाहून मनुष्याच्या जीवनाचा आढावा–हिशेब काढावा लागतो. जीवनाच्या सफलतेचे प्रमाण या सर्व गोष्टी पाहून ठरवावे लागते. त्याचप्रमाणे स्वतःची उन्नती मनुष्याने कितपत साधली व

धारण केलेला संकल्प व हेतू यात बाह्यतः किती अंशांनी सिद्धी प्राप्त झाली याही गोष्टी पहाव्या लागतात.

रणदिवे बंधूंच्या या निवेदनात त्यांच्या प्रशंसापरच मी बहुतेक लिहिले आहे ही गोष्ट स्पष्ट आहे. तरी त्यात असत्य व अतिशयता टाळण्याची मी पूर्णपणे सावधगिरी घेतली आहे. त्यांच्यात जे गुण, जे भाव, जी पात्रता व जी प्रभावी शक्ती जीवनभर माझ्या अनुभवास येत राहिली त्या सर्वांचा उल्लेख यथातथ्य अंशाने मी यात केला आहे. त्यांच्याविषयी माझ्या मनात असलेले प्रेम, आदर, सद्भाव व श्रद्धा यांच्या ओघात मी हे निवेदन लिहिले असले तरी यात मी असत्याचा आश्रय केला नाही किंवा मोहात सापडून त्यांना खोटे मोठेपण देऊन जगात त्यांना प्रख्यातीला आणण्याचा हेतू धरला नाही. या वृत्तांतात माझा उल्लेख व संबंध पहिल्यापासून शेवटपर्यंत आलेला निदर्शनास येत आहे. पण तो मुद्दाम किंवा काही विशिष्ट हेतुपूर्वक दर्शविलेला नाही. तर आमचे जीवनच परस्परांशी असे निगडीत होते की कोणत्याही महत्त्वाच्या प्रसंगी आम्ही एकमेकांपासून वेगळे राहू शकत नव्हतो. तरी त्यातूनही मुख्य बनावच यात दिले आहेत व त्यात ओघानुसार माझा संबंध येऊन गेला आहे. अशा स्थितीत स्वतः-विषयी काही लिहिण्याची खास इच्छा नसताही मला लिहावे लागले आहे. ते टाळून रणदिवे बंधूविषयी लिहायचे मला साधले नाही ही गोष्ट मात्र सत्य आहे.

आता उपसंहारातील मुख्य गोष्ट. या वृत्तांतात रणदिवे बंधूंच्या सद्गुणांची मी कितीही प्रसंसा केली असली व त्यांची पात्रता कितीही मोठी म्हणून मी वर्णन केली असली तरी जीवनाच्या सफलतेविषयीच्या दोन दृष्टींपैकी एकीत केवळ वैयक्तिक बाजूने मानवतेच्या शुद्ध भावनांच्या दृष्टीने त्यांनी स्वतःची काय उन्नती साधून घेतली असेल ती खरी. परंतु त्यांच्यातील सद्गुण व पात्रता यांचा उपयोग देशहिताच्या दृष्टीने जितका व्हायला पाहिजे होता तितका होऊ शकला नाही, म्हणून त्या दृष्टीने व त्या मानाने त्याना सफलता मिळाली नाही असे म्हणावे लागते. सशस्त्र क्रांतीच्या बाबतीत रणदिवे बंधूंचे विचार, त्यांचे प्रयत्न, ते सिद्धीस नेण्या-

कारिता त्यांनी सोसलेले कष्ट, अडचणी, चिंता, केलेले त्याग, त्यांना वाटणारी तळमळ या सर्वांचा हिशेब करून त्यांतून झालेली फलनिष्पत्ती मी जाणत आहे. कारण त्यातील मी एक हिस्सेदार असल्यामुळे सर्व हिशेब मला माहीत आहे. त्यांच्यातील नैसर्गिक जन्मजात पात्रता व त्यांनी स्वतः प्रयत्नपूर्वक प्राप्त केलेली लायकी यांचे प्रमाण व्यक्तिगत दृष्ट्या केवढेही मोठे वाटत असले तरी संकल्पित कार्यसिद्धीच्या मानाने ते कमी होते यात शंका नाही. तेवढ्याने क्रांती घडवून आणणे शक्य नव्हते. म्हणूनच ते शक्य झाले नाही. मी माझ्या स्वतःविषयीच्या अनुभवावरून व निरनिराळ्या दहशतवादी कटवाल्या गटांच्या प्रयत्नाविषयीच्या माहितीवरून या कार्यातील उणीवा ज्या मला समजल्या आहेत त्यापैकी पहिली व अत्यंत महत्त्वाची उणीव म्हणजे अशा प्रकारच्या प्रयत्नात दीर्घ दृष्टीच्या व अनुभवाच्या आधाराने घडवलेली योजना मला कोठेच दिसून आली नाही, ही होय. तरुणांमध्ये भावोत्कटता, त्याग, सहनशक्ती, धैर्य, शौर्य, साहस इत्यादि सर्व असूनही त्या मानाने सिद्धी का मिळू नये? तरुणांच्या मनात भावना तत्काळ जागृत होतात व थोड्याशा उत्तेजनाने त्या भडकतात. पण त्याप्रमाणे त्याना योजना सुचत नाहीत व जर काही सुचल्याच तर त्यात साहसाचाच भाग अधिक असून बुद्धि, चातुर्य व सफलतेच्या दृष्टीने आवश्यक असणारे कार्यसातत्य व साधन समृद्धि वगैरेचा भाग त्यात तात्पुरताच असतो. म्हणून भावनांना योग्य योजनेच्या मार्गाने प्रसंगोचित कार्यात लावून देण्याला अनुभवशीर पुढाऱ्यांची आवश्यकता असते. पण जेथे पुढाऱ्यांनाच योजना सुचत नाहीत, त्यांना सशस्त्र क्रांतीबद्दल विश्वास वाटत नाही, अशा स्थितीत केवळ भावनेने भरलेल्या व भारलेल्या तरुणांना काय सुचणार! हे लिहिण्यात कोणालाही दोष देण्याचा हेतु बिलकूल नसताही केवळ तत्कालीन स्थितीचे खरे स्वरूप लक्षात येण्याकरिता हे लिहावे लागत आहे. अनंत कान्हेरे काय किंवा खुदीराम बोस काय—त्यांच्यातील असीम साहसाचा उपयोग केवळ एकाद दुसऱ्या इंग्रजाचा खून करण्यात व्हावा व त्यांच्यातील धैर्य शौर्य वगैरे गुणांचा ह्यापेक्षा अधिक उपयोग करता येऊ नये या गोष्टी काय दाखवितात? रणदिवे बंधूंच्या मंडळात कृष्णा भोसेकर याच पातळीचा तरुण होता. पण त्याला इतर मंडळी कह्यात ठेवू शकली.

तरी त्याही स्थितीत अमेरिकेत जाण्यापूर्वी तो मला म्हणाला होता की एखादी मोठी व मजबूत इमारत जमीनदोस्त करण्याची माझ्यात शक्ती नसली तरी तिची एखादी वीट–एखादा दगड मला ढासळता येत असला तर तेवढे तरी कार्य मी का करू नये ? यावर मी त्याला खूप समजावले. वासुदेव बळवंत शूर यात शंकाच नाही. पण त्या शूरत्वाबरोबर संघटन-शक्ती व बिनचुक योजना नसल्यामुळे केवळ शूरपणापासून काय निष्पन्न झाले ? एडनच्या कारावासात त्यांनी आपल्या जीवनकार्याचा हिशेब काढला असेल तेव्हा त्यांना त्यात काय सापडले असेल ? योजनाचतुर व युद्धकुशल पुढाऱ्याशिवाय तारुण्यातील केवळ धमक किंवा साहस यांचा कार्यसिद्धीच्या दृष्टीने विशेष उपयोग होऊ शकत नाही. आप्पाचे सर्व जीवन अत्यंत चिंतेत गेले. एकवेळचे चांगले धष्टपुष्ट व कसलेले शरीर केवळ सुकत गेले. क्रांतीच्या कार्यात पडलेल्याना संभाळावे कोणी ? त्यांना पोसावे कसे ? त्यांचा योगक्षेम चालवावा कसा ? ही त्याला सदैव चिंता राही. त्या कार्यात पैशाची अडचण सदैवची असे. त्या काळात अशा कार्याला द्रव्यसहाय्य करणारा सापडणे कठीण. अशाच स्थितीत काही काळ कसा तरी निभावल्यावर केवळ जीवननिर्वाहाकरिता दरवडे घालण्याशिवाय साहसिक तरुणांना दुसरा मार्गच मिळत नाही. मग दरवडे हे देशाकरिता नसून स्वतःचा चरितार्थ चालवण्याकरिता प्रथम घालावे लागतात. त्यांतूनही कोणी बायका-मुलांचे धनी असतील त्यांनी कुटुंबाचा निर्वाह कोणत्या रीतीने चालवायचा ? योग्य पुढारी व जनतेचे पूर्ण साहाय्य याशिवाय अशी कार्ये पार पडू शकत नाहीत. रणदिवे बंधूंच्या त्या धडपडीच्या काळात क्रांतीचा विचार करणाऱ्या तरुणांचे कौतुक करणारे अगदी कोणीच पुढारी नव्हते असे नाही. पण त्यात सक्रिय भाग घेऊन प्रत्यक्ष पुढारीपण स्वीकारून तरुणांना आपल्याबरोबर घेऊन त्यांच्यातील शौर्य, धैर्य, वीरता साहस यांचा परिपूर्ण योग्य उपयोग करून घेणारे कोणी आढळले नाहीत. तसे मिळते तर आप्पासाहेबांसारखा अनेक प्रकारे लायक तरुण वर्षानुवर्षे रामदासी संशोधनाच्या कार्यात अडकून कसा राहिला असता ? आप्पाचा ऐन उमेदीचा व कर्तृत्वाचा काळ जुने-पुराणे कागद शोधण्यात व धुंडाळण्यांत जावा याबद्दल खेद वाटल्याशिवाय रहात नाही. कष्ट सोसायला

लागणाऱ्या सहनशीलतेशिवाय त्यांच्या अंगच्या दुसऱ्या कोणत्याही सद्‌गुणांचा व कर्तृत्वाचा त्या कार्यात उपयोग झाला नाही. पुढाऱ्यांच्याबद्दल तरी काय म्हणावे ? ते तरी काय करणार ? त्यांना स्वतःला ज्या गोष्टीचा–कार्याचा अनुभव नाही त्यात ते मार्गदर्शन तरी कसे करणार ? त्यांचाही त्यात दोष म्हणता येत नाही. शे-दीडशे वर्षांचा आमचा काळ अशा पारतंत्र्यात गेला की त्या काळात आमच्यांतील वीरवृत्तीला काही कार्य न मिळाल्यामुळे तिचा आमच्यातून जवळ जवळ लोपच झाला व स्वतंत्रपणे लढण्याची कला आमच्यातून जणू नष्टप्रायच झाली. ही कला लढाईच्या गोष्टी ऐकल्याने, चर्चिल्याने किंवा पुस्तके वाचल्याने प्राप्त होत नसते. ती प्रत्यक्ष आचरण्याच्या प्रसंगातून अवगत होत असते. ती आचरण्याचे प्रसंग आमच्या मध्यंतरीच्या काळात नामशेष झाले. त्या कार्याला लागणारे गुण ज्या जीवन-पद्धतीतून सहजपणे प्राप्त होत असतात ती जीवन पद्धती व तिची परंपरा मध्यंतरीच्या काळात तुटून गेली. अशा स्थितीतून योग्य पुढारी कसे निर्माण होणार ? व भावनासंपन्न तरुणांना मार्ग कोण दाखवणार ? योग्य पुढाऱ्या-शिवाय तानाजी, येसाजी बाजी काय करू शकले असते ? फार तर त्यांनी आपली शेती इतरांचेपेक्षा चांगली केली असती. आपआपल्या गावातील ते पुढारी झाले असते. पण शिवछत्रपतीसारखा पुढारी त्यांना मिळाल्यामुळे सर्व युद्धसाधनांनी सज्ज व जबरदस्त अशा बादशाही सैन्यालाही ते भारी झाले. मोठमोठ्या धुरंधरांना रणात लोळवण्याइतके ते समर्थ बनले ! हा प्रभाव व प्रताप योजनाचतुर व युद्धकुशल सेनानीच्या योजनाचातुर्याचा व युद्धकौशल्याचा यात संशय नाही. रणदिवे बंधू किंवा त्यांच्यासारखे देशाकरिता सर्वस्व अर्पण करायला तयार असणारे तरुण त्या काळात थोडे असले तरी तितक्यांच्या बळावर, साहसावर एखादा योजनाचतुर व युद्धकुशल पुढारी ब्रिटीश सल्तनत सर्वस्वी तोडून पाडू शकला नसता तरी तिचे बळ पुष्कळ अंशांनी कमी करू शकला असता यातही शंका नाही. सारांश, योग्य पुढाऱ्याशिवाय कित्येक तरुणांचे उकळणारे रक्त, त्यांचे धैर्य, शौर्य अगदी अल्पकार्यात खर्ची पडले. व कित्येकांचे रक्त सतत उकळत राहून खलास झाले. पारतंत्र्यामुळे परंपरा तुटून गेल्या. परंपरा तुटल्यामुळे योग्य पुढाऱ्यांचा अभाव झाला. व पुढाऱ्यांच्या अभावी

तरुणांचे उकळणारे रक्त, त्यांचे धैर्य, शौर्य, साहस, त्याग, सहनशीलता वगैरे बहुमोल गुणांचा योग्य उपयोग होऊ शकला नाही. हा सर्व अनर्थ शतक-दीडशतकाच्या पारतंत्र्यामुळे निर्माण झाला. या पारतंत्र्याने सर्व राष्ट्राला निष्प्राण बनवले.

अशा प्रकारच्या निष्प्राण अवस्थेमध्ये एका बाजूने पुढाऱ्याची वानवा व दुसऱ्या बाजूने त्याच अवस्थेतील प्रजेमध्ये फार काळापासून चालत आलेला राष्ट्रीय भावनेचा अभाव, भाषाभेद, प्रांतभेद, वंश व वर्णभेद, धर्म, पंथ संप्रदाय यांचे भेद व व्यक्तिगत स्वार्थ व त्याविषयीचे संकुचित व राष्ट्रघातक अभिमान, त्याचप्रमाणे परस्परातील अविश्वास, द्वेष, वैर, बंधुद्रोह ( भाऊबंदकी ) असे महान दोष त्या काळात सर्वत्र फैलावलेले व परमावधीस गेलेले. अशा अवनतीच्या काळात जन्मास आलेले रणदिवे बंधू व त्यांच्या सारखे थोडेफार इतर तरुण जे आपल्या संकल्पित हेतूप्रमाणे काही करू शकले नाहीत, त्यांच्या जीवनातील तो भाग सोडून बाकी जे काही ते करू शकले, त्यांनी जे कष्ट सहन केले, सर्वसाधारण लोकांप्रमाणे स्वार्थाच्या मागे न लागता उच्चविचार व हेतू याकरिता आपले रक्त आटवले त्याकरिता तरी त्यांना धन्यता द्यावयाला नको का? त्यांचा त्याग, त्यांची उदारता, मित्रभाव, देशाविषयी व गरीबांविषयी त्यांना वाटणारी तळमळ या सर्वांबद्दल आपण त्यांचा गौरव करणे आवश्यक नाही का? ते जे करूं शकले तितकीच त्यांची शक्ती होती, त्यांनी जे संकल्पिले होते व ज्या हेतूने त्यांचे प्रयत्न चालू होते ते सिद्धीस नेण्याची त्यांची पात्रता नव्हती ही गोष्ट एकंदर निष्कर्षा-वरून दिसून येत असली तरी रणदिवे बंधूंचा हा वृत्तांत निवेदन करण्यात माझा हाही हेतू आहे की आपल्या देशात ते व त्यांच्याप्रमाणे देशाकरिता तळमळणाऱ्या अनेक व्यक्ती एके काळी होऊन गेल्या आहेत याची जाणीव आजच्या तरुणांना व्हावी. केवळ रणदिवे बंधूच नव्हेत तर त्यांच्यापेक्षाही अधिक साहसाची कार्ये करण्याची शक्ती व हिंमत धारण करणाऱ्या कितीतरी व्यक्ती त्या काळात जन्मास आल्या होत्या. पण वर दर्शविलेल्या सर्व विपरीत-प्रतिकूल परिस्थितीमुळे त्यांच्या संकल्पाच्या मानाने त्या काही विशेष करू शकल्या नाहीत व आपल्या ध्येयसिद्धीपर्यंत पोहोचू शकल्या नाहीत. अशा अज्ञात व्यक्तींच्याविषयी समाजाला, त्यातूनही आजच्या तरुणांना काही कल्पना

यावी. याशिवायही स्वतःतील शक्ति व अनुकूलता याप्रमाणे राष्ट्रकार्यार्थ ज्यांनी आत्मसमर्पण करून आपल्या देहाचे बलिदान दिले, ज्यांनी कैक वर्षे कारावासातील दुःसह हालअपेष्टा सोसता सोसता प्राणार्पण केले, ज्यांनी मृत्युपर्यंत आपले जीवन दारिद्र्यात व अनेक विपत्तीत घालवून स्वतःला व स्त्री-बालकांना प्रत्यक्ष झिजवून घेतले, ज्यांना जीवनभर सुख, चैन सुचली नाही—रुचली नाही अशा निरनिराळ्या अवस्थात ज्यांनी आपल्या जीवनाचा अंत गाठला अशा दिव्यात्म्यांची कल्पना तरी—स्मृति तरी या निवेदनाच्या निमित्ताने आजच्या तरुणांना व्हावी हाही हेतू या निवेदनाच्या मागे आहे. नाशिकची अभिनव-भारत संस्था, बंगाल, पंजाब, युक्त प्रांत ( उत्तरप्रदेश ) यांतील गदर किंवा तशाच हेतूने निर्माण झालेल्या संस्था यांतील तरुणांच्या स्फूर्ति उत्साह, साहस, देशभक्ती वगैरेंनी भरलेल्या रोमांचक इतिहासाबरोबरच त्यांचा करुणाजनक इतिहास आपल्याला काय शिकवीत आहे ? त्यांचे प्रयत्न त्यांच्या संकल्पा-प्रमाणे सफळ झाले नाहीत त्याला कारण केवळ त्यांची असमर्थता नसून पुष्कळ अंशांनी अनेक प्रकारे बाह्य प्रतिकूल स्थिती कारण होती असे दुःख-पूर्वक व न्यायपूर्वक म्हणावे लागते. अनेक प्रतिकूलतामुळे ते क्रांती घडवून आणू शकले नाहीत तरी त्याकरिता त्यांनी सहन केलेले कष्ट व यातना, त्याचप्रमाणे क्रांतीवरील त्यांची अपार श्रद्धा, यावरून ते निःसीम क्रांति-उपासक होते याविषयी अणुमात्र शंका नाही. म्हणूनच आपल्या सर्वांच्या आदराला, प्रशंसेला व गौरवाला ते पात्र आहेत. ते धन्य आहेत !

ज्या काळात राजमान्य होण्याकडेच सर्व शिक्षित व बुद्धिवान समजल्या जाणाऱ्या वर्गाची ओढ होती व तशाच त्यांच्या महत्त्वकांक्षा होत्या, त्या वर्गाला मिळणारी मानप्रतिष्ठा व त्यांचा सुखरूपपणे चालत असलेला जीवन-निर्वाह पाहून सर्वसाधारण जनतेला तोच खरा जीवनसाफल्याचा मार्ग वाटत होता. त्या काळात काही देशभक्तांना प्रजेची ही अवनत स्थिती वाटली व त्यापैकी काहींना सनदशीर मार्गाने लोकजागृती करावी असे वाटले तर काहींना प्रजेत सरकारविषयी अप्रीती निर्माण करावी असे सुचले. पण काही तरुणांच्या मनातील भावोत्कटता, उत्साह व साहसिक वृत्ती वगैरेंना त्या कार्यात वाव न मिळाल्यामुळे त्यांनी स्वतःच्या श्रद्धेनुरूप व स्वभावा-नुरूप अन्य मार्ग पत्करला व कोणत्याही मोहाला वश न होता कोणत्याही

स्वार्थाची आशा न ठेवता कर्तव्यबुद्धीने व पवित्रपणे त्यांनी तो आक्रमला. तेही धन्यतेला पात्र आहेत, असे खरोखरच न्यायतः देशहिताच्या व राष्ट्रीयतेच्या दृष्टीने आपल्याला वाटायला पाहिजे. पण आपली सर्वसाधारण प्रजा त्या काळी कोणत्या मनःस्तरावर होती व आजही कोठे आहे ते आपण जाणत आहो. त्यांना आपल्या पहिल्या पिढीत मान्यता किंवा पाठिंबा मिळाला नाही व आता पुढच्या पिढीतही त्यांच्याकडे कोणी गौरवाने कृतज्ञतेने पाहिले नाही, त्यांच्याविषयी कोणी आदर दर्शविला नाही तर आश्चर्याबरोबरच दुःख वाटल्याशिवाय कसे राहील ? या शोचनीय स्थितीला राष्ट्रीयता व देशहिताच्या कळकळीचा अभाव याच गोष्टी मुख्यपणे कारण आहेत. आपल्या दुर्दैवाला हेच महान दोष निमित्त आहेत असेच शेवटी म्हणावे लागते. आपली प्रजा अजूनही याच पातळीवर आहे. ज्या प्रजेत देशभक्तांनी सोसलेल्या हालअपेष्टांची जाणीव नाही, त्यांच्या स्वार्थत्यागाची किंमत नाही, त्यांच्या सेवेबद्दल कृतज्ञभाव नाही ती प्रजा—तो देश उन्नत कसा होणार ? सद्‌गुणसंपन्न, पुरुषार्थी व कर्तृत्ववान कसा बनणार ? व जगातील चालू जीवनसंग्रामात तो टिकाव कसा धरणार ?

केवळ रणदिवे बंधूच नव्हेत पण त्यांच्यापेक्षाही अधिक उत्कटतेने क्रांतीकरिता तळमळणाऱ्या व पुरुषार्थपणे प्रयत्न करणाऱ्या कैक ज्ञात-अज्ञात व्यक्ती निरनिराळ्या मार्गांनी आपल्या जीवनयात्रा संपवून आतापर्यंत दुनियेतून निघून गेल्या असतील. त्यापैकी क्वचित कोणी अजूनही वृद्धावस्थेत जीवन कंठीत असतील. त्या सर्व ज्ञात व अज्ञात, दिवंगत व हयात क्रांतिउपासकांना रणदिवे बंधूंच्याबरोबरच माझे सादर व कृतज्ञतापूर्वक शतशः प्रणाम आहेत ! त्यांच्या जीवनसंकल्पात त्यांना पूर्णपणे सफलता मिळाली नसली तरी ते धन्य धन्य आहेत यात शंका नाही. त्यांच्या स्मृति, त्यांच्या विषयी आदर पुढील पिढीत राहिला, त्यांच्यातील अनुकरणीय सद्‌गुण पुढील पिढीने उचलले, ते वृद्धिंगत केले व ते यथाप्रसंगी आपल्या आचरणात आणले तरच राष्ट्राचे कल्याण आहे. तरच आपण स्वतंत्र भारताची प्रजा म्हणवून घेण्याला लायक ठरणार व तेव्हाच आपल्या मानवजन्माचे सार्थक होणार यात संशय नाही !

समस्त क्रांति-उपासकांना पुनः भक्तिपूर्वक वंदन !

* * *

क्र. १५२५८

# लेखकाची इतर पुस्तकें

| | नांव | | | किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | विवेक आणि साधना | ( आवृत्ति १ ) | मराठी | ४–०० |
| २ | विवेक और साधना | ( ,, १ ) | हिंदी | ४–०० |
| ३ | विवेक अने साधना | ( ,, ३ ) | गुजराथी | ३–०० |
| ४ | विचार दर्शन भाग १ | ( ,, १ ) | ,, | १–५० |
| ५ | ,, ,, ,, २ | ( ,, १ ) | ,, | १–५० |
| ६ | ,, ,, ,, १ | ( ,, १ ) | हिंदी | १–५० |
| ७ | सुसंवाद | ( ,, ३ ) | गुजराथी | ०–३१ |
| ८ | ,, | ( ,, १ ) | हिंदी | ०–५६ |
| ९ | ,, | ( ,, १ ) | मराठी | ०–४० |
| १० | व्यवहार शुद्धि मंडळ परिचय | ( ,, १ ) | मराठी | ०–१० |
| ११ | सबकी भलाईमें अपनी भलाई और धन्य जीवन | ( ,, १ ) | हिंदी | ०–१० |

REFBK-0015258

–: प्राप्तिस्थान :–

कांतिलाल मोहनलाल परीख
ज्युपिटर पेपर मार्ट
३८७, रविवार पेठ, पुणे, २.

नवजीवन कार्यालय
अहमदाबाद १४.